म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८७६
१९६५

समाज प्रबोधन संस्था



# स्वतंत्र राष्ट्रांचा उदय आणि लोकशाहीचे आव्हान

जॉन स्ट्रॅची

REFBK-0014408

किंमत चार रुपये

निबंध
१८०६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३६८० वि: निबंध
क्रमांक १८०६ नोंद दि २.३.७१

# स्वतंत्र राष्ट्रांचा उदय
# आणि
# लोकशाहीचे आव्हान

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४४०८

# स्वतंत्र राष्ट्रांचा उदय आणि लोकशाहीचे आव्हान

जॉन स्ट्रॅची

भाषांतरकार : वसंत पळशीकर

REFBK-0014408

समाज प्रबोधन संस्था

प्रकाशक :
शंकरराव देव,
अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्था,
४३०–३१ शनिवार पेठ,
पुणे २.
प्रथमावृत्ति मार्च १९६५
मूळ इंग्रजी प्रकाशन :
एनकाउन्टर,
२५ हे मार्केट,
लंडन, एस्. डब्ल्यू १. (इंग्लंड)
यांच्या परवानगीने
मराठी भाषांतर प्रकाशित.
भाषांतरित आवृत्तीचे
सर्व हक्क प्रकाशकाधीन.
मुखपृष्ठ :
बाळ ठाकूर
मुखपृष्ठ मुद्रण :
संगम प्रेस प्रा. लि., पुणे २.
मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय,
२९५ सदाशिव पेठ, पुणे ९.

●●●

या पुस्तकाच्या प्रकाशन खर्चापैकी पंचाहत्तर टक्के रक्कम अनुदान म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडलाकडून मिळाली आहे.

# निवेदन

सुविख्यात ब्रिटिश राजकारणी, मजूर पक्षातील नेते आणि समाजवादी विचारवंत श्री. जॉन स्ट्रॅची यांच्या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रकाशित करण्यास समाज प्रबोधन संस्थेस आनंद व अभिमान वाटत आहे. 'द ग्रेट अवेकनिंग' व 'द चॅलेंज ऑफ डेमॉक्रसी' ह्या पुस्तिका श्री. स्ट्रॅची यांनी दिलेल्या व्याख्यानांवरून तयार केलेल्या आहेत.

उच्च विचार विमर्शाला वाहिलेले एनकाउंटर हे नावाजलेले इंग्रजी मासिक आहे. या नियतकालिकातर्फे प्रचलित प्रश्नांवर वेळोवेळी पुस्तिका प्रकाशित केल्या जातात. श्री. स्ट्रॅची यांच्याहि पुस्तिका एनकाउंटर मासिकाच्या चालकांनी प्रसिद्ध केल्या आहेत.

या पुस्तिकांचे मराठी भाषांतर प्रकाशित करण्यास समाज प्रबोधन संस्थेस विनामोबदला परवानगी दिल्याबद्दल मूळ पुस्तिकांचे प्रकाशक एनकाउंटर नियतकालिकाचे संचालक यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.

दोन्ही पुस्तिकांचे भाषांतर श्री. वसंत पळशीकर यांनी केले.

भारतातील भूतपूर्व अमेरिकन वकील व प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ श्री. जॉन केनेथ गॅलब्रेथ यांच्या श्री. स्ट्रॅची यांच्या विचारांचा व जीवन-कार्याचा परिचय करून देणाऱ्या विवेचक लेखाचे भाषांतर करून दिल्याबद्दल प्रा. देवदत्त दाभोलकर यांचे व हा लेख पुस्तकात समाविष्ट करण्यास परवानगी दिल्याबद्दल एनकाउंटर नियतकालिकाचे संचालक यांचे आम्ही आभारी आहोत.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाकडून मिळालेल्या अनुदानामुळे हे पुस्तक अल्प किंमतीत वाचकांच्या हाती देणे संस्थेस शक्य झाले आहे. साहित्य संस्कृति मंडळाची संस्था ऋणी आहे.

विश्वकर्मा मुद्रणालयाचे चालक श्री. वि. ग. माटे व मुद्रणालयातील कामगार यांनी परिश्रम घेऊन छपाईचे काम सुबक व वेळेवर करून दिले याबद्दल समाज प्रबोधन संस्था त्या सर्वांची आभारी आहे.

प्रकाशक

# अनुक्रमणिका


जॉन स्ट्रॅची : जॉन केनेथ गॅलब्रेथ   नऊ ते पंधरा

## स्वतंत्र राष्ट्रांचा उदय

१ साम्राज्याची व्याख्या व उत्पत्ति   ३

२ लेनिनच्या साम्राज्यवादविषयक
सिद्धान्ताचा फेरविचार   १९

३ नवी साम्राज्ये निर्माण होतील काय !   ३९

४ ससा आणि कासव   ५७

५ लोकशाही   ७९

## लोकशाहीचे आव्हान

१ विद्यमान जगातील वाद   १०७

२ पाश्चिमात्य समाजांची वैशिष्ट्ये   ११८

३ पाश्चिमात्य समाजांची कामगिरी   १३२

४ लोकशाहीची कार्यपद्धति   १४४

५ समाजरचनेविषयी साम्यवादी भूमिका   १५५

६ साम्यवादी समाजांची शोकांतिका   १६७

७ साम्यवादी समाजांची कामगिरी   १८०

८ लिलीची फुले   १९३

९ लोकशाहीच्या मर्यादा   २०५

१० विश्वराज्य   २१८



जन्म २१ ऑक्टोबर १९०१. शिक्षण ईटन आणि मॅग्डलेन कॉलेज, ऑक्सफर्ड. १९२९ साली बर्मीगहॅमच्या ॲस्टन मॅनर विभागातून पार्लमेंटवर निवड. १९३१ साली मजूर पक्षाचा राजिनामा. १९३३ ते १९३९ कट्टर मार्क्सवादी, संयुक्त आघाड्यांचे राजकारण. नाझी जर्मनीशी सोव्हिएट रशियाने अनाक्रमण करार केल्यानंतर कम्युनिस्ट पक्षाशी प्रियाराधन संपले व पुन्हा मजूर पक्षाचे सभासद झाले. १९४५ मध्ये पार्लमेंटमध्ये निवडून आल्यावर १९४५ ते १९५१ या काळात मजूर मंत्रिमंडळात वेगवेगळी पदे भूषविली. १९५०-५१ या काळात युद्ध मंत्री म्हणून काम. संरक्षण प्रश्नांचा विशेष अभ्यास व व्यासंग. १५ जुलै १९६३ रोजी अकाली निधन.

जॉन केनेथ गॅलब्रेथ

दा. क्र. ११४०८

# जॉन स्ट्रॅची

## व्यक्ति व व्यासंग

एक महत्त्वाची गोष्ट सदैव लक्षात ठेवली पाहिजे. आणि ती ही की जॉन स्ट्रॅची यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक सामान्यपणे विरोधी असणाऱ्या गुणांचा मिलाफ झालेला होता. ते केवळ विद्वान नव्हते; त्यांच्या ठिकाणी असणारी जागती जिज्ञासा विद्वानामध्येहि क्वचितच आढळते. परिस्थिती केवळ समजून घ्यावी इतकेच नव्हे तर आपल्या कर्तृत्वाने तिला आकार देण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांची सारखी ओढ असे. हे गुण तसे दुर्मिळ नाहीत. तुरळकपणे किंवा एकत्रित असेहि ते अनेकदा आढळतात. परंतु अनेकदा या गुणांबरोबरच महत्त्वाकांक्षा, दुसऱ्याच्या भावनांविषयी बेफिकीर वृत्ति, धसमुसळा उत्साह असे दुर्गणहि सहचारी म्हणून वावरत असतात.

परंतु स्ट्रॅची हे एक खरे सुजन सद्‌गृहस्थ होते. आपली विचारशीलता आणि सौजन्य यांना त्यांनी कोणत्याहि परिस्थितीत उणेपणा येऊ दिला नाही. जीवनाचा अनेकविध रसास्वाद त्यांनी उत्साहाने, रसिकतेने घेतला होता आणि इतरांनीहि तो तसाच घ्यावा असा त्यांचा आग्रह होता. वर सांगितलेल्या गुणाशी ही वृत्ती नेहमी मिळतीजुळती आढळतेच असे नाही. या सौजन्याचा, अनाग्रहाचा, मोकळ्या वृत्तीचा अर्थ कणखर वृत्तीचा अभाव असाहि काहींनी लावला असावा असे वाटते. कणखर वृत्तीचा म्हणून एखाद्याची स्तुति होऊ लागते त्या वेळी मला थोडेसे आश्चर्यच वाटते. मेंदू चामड्यासारखा घट्ट असणे यात काय इष्ट आहे ? परंतु आपल्या तत्त्वासाठी कोणत्याहि व्यक्तिगत संकटाची तमा न धरता अविचलपणे उभे राहणे हाच जर कणखर वृत्तीचा अर्थ असेल तर, स्ट्रॅची इतर कोणाशीहि तुलनेत कमी पडले नसते. आपल्या तत्त्वनिष्ठेसाठी ते अनेकदा अडचणीत सापडले होते.

माझी आणि स्ट्रॅचींची तशी वैचारिक भेट ते साम्यवादाकडे झुकलेले असताना झाली. (स्ट्रॅची हे कम्युनिस्ट पक्षाचे सभासद कधीच नव्हते. परंतु पुढे पुढे स्ट्रॅचीच म्हणत असत त्याप्रमाणे हा केवळ एक तांत्रिक मुद्दा होता.) हारवर्ड विद्यापीठात स्ट्रॅचींचे 'आगामी सत्तासंघर्ष' (The Coming Struggle For Power) हे पुस्तक आम्ही लावले होते. श्रीमंत व आत्मसंतुष्ट विद्यार्थ्यांना त्यांच्यापुढे भविष्यात काय वाढून ठेवले आहे याचे दर्शन त्यातून व्हावे अशी आमची अपेक्षा होती. त्या विवेचनावर त्या विद्यार्थ्यांचा पूर्ण विश्वास बसत असे असे नाही. (खरे तर माझाहि स्वतःचा त्यावर विश्वास नव्हता) परंतु आंतरिक प्रक्षोभ करून विचारांना धक्का देण्याचे सामर्थ्य त्या पुस्तकात होते; आणि अनेकांना हा धक्का मिळाला असावा. हे पुस्तक म्हणजे एक उत्कृष्ट साम्यवादी प्रबंध आहे. साम्यवादी विचारसरणीवरील

लेनिन, स्टॅलिन व माओ यांनी लिहिलेल्या टीका सोडल्या तर इतका प्रभावी आणि प्रचारी दुसरा ग्रंथ या शतकात झाला नाही असे म्हणावयास हरकत नाही. एकट्या अमेरिकेतच या ग्रंथाच्या पक्क्या बांधणीच्या एक लाखाहून अधिक प्रती खपल्या असे स्ट्रॅची सांगत असत.

या ग्रंथाचा प्रभाव पडण्याचे मुख्य कारण म्हणजे स्ट्रॅची हे काही एखादे लेखन कामाठी करणारे पक्षाचे प्रचारक हस्तक नव्हते. स्ट्रॅचीसारख्यानी असे लेखन करणे यामुळेच धोक्याचे असते : स्ट्रॅचीनी ज्या दशकात हे व इतर अशी पुस्तके लिहिली तो काळच असा मोठा विचित्र होता. सर्व भांडवलशाही राष्ट्रांत प्रचंड प्रमाणात बेकारी अस्तित्वात होती आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे यातून बाहेर पडण्याची काहीच तादृश उपाययोजना नव्हती. कामगारवर्गात साहजिकच प्रक्षोभ वाढत होता. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे रक्षण करण्यासाठी काही राष्ट्रातून हुकूमशहा अधिकारावर आले होते. सत्तेचा क्रूर वापर करणे व क्रान्तीला थोपविण्यासाठी युद्धाचा आश्रय घेणे ही त्या हुकूमशहांची मुख्य सूत्रे होती. अशा काळात साम्यवादाचे आकर्षण साहजिकपणेच सर्वात अधिक असते. स्ट्रॅची याच काळात साम्यवादी होते.

यानंतर हेहि दिवस गेले. परिस्थिती बदलली आणि स्ट्रॅचीतहि बदल होत होता. वरील दुरवस्थेतून साम्यवादी क्रांतीखेरीज दुसराहि काही मार्ग असू शकतो अशी आशा केन्सच्या अर्थशास्त्रातून व अमेरिकेतील 'न्यू डील' या प्रयोगातून निर्माण झाली. 'प्रगतीचा कार्यक्रम' (A Programme for Progress) ह्या या दशकाच्या अखेरीस लिहिलेल्या पुस्तकात ही जाणीव दिसते. साम्यवादी पंडितांना स्ट्रॅचीनी हे पुस्तक दाखविले आणि ते त्यांना मुळीच आवडले नाही. त्याच्या प्रकाशनाला त्यांचा पुरस्कार मिळणार नाही असे त्यांनी सांगितल्याचे

स्ट्रॅची एकदा मला म्हणाले होते. यानंतर थोड्याच महिन्यात मोलोटॉव्ह व रिबेनट्रॉप यांचा करार झाला आणि त्यानंतर काही महिन्यांनी रशिया आणि पाश्चिमात्य राष्ट्रे यांची युति झाली. स्ट्रॅचीसारख्या ज्या लोकांनी सत्तासंघर्षाचे रोकडे विश्लेषण–भांडवलशाही राष्ट्रे हुकूमशाहीकडे वळतील व कामगार वर्ग त्यांच्याविरुद्ध चालून जाईल अशा स्वरूपाचे–केले होते ते या घटनेमुळे चांगलेच घोटाळ्यात पडले. सुरवातीला कामगार-वर्गांच्या या मायदेशाने–रशियाने–हुकूमशहा हिटलरशी संगनमत केले. नंतर भांडवलशाही राष्ट्रे ( की जी हुकूमशाहीकडे उत्तरोत्तर वळतील अशी अपेक्षा होती ) व सोव्हिएट रशिया यांची जूट होऊन हुकूम-शाही राष्ट्रांच्या विरुद्ध झगडा सुरू झाला. यानंतर यात काही अर्थ नाही अशा निष्कर्षाला येऊन स्ट्रॅची या गोंधळातून बाहेर पडले. या मागे आपल्या राष्ट्राचे हिटलरपासून रक्षण केले पाहिजे ही कोणत्याही इंग्रज मनुष्याच्या अंतःकरणात प्रबळ असणारी भावना स्ट्रॅचींच्याहि मनात त्या काळी प्रबळ होती असे मला त्यांच्याबरोबर केलेल्या संभाषणातून आढळून आले. साम्यवादापासून झालेली ताटातूट हा त्यांच्या आयुष्यातील सर्वांत दारुण प्रसंग होता असे स्ट्रॅचीनी एकदा मला सांगितले. दलितांच्या संघटनेत एक प्रकारचे मानसिक समाधान होते. एक प्रकारची ऊब होती. त्यातून बाहेर पडल्यानंतर बाहेरचे जग अगदी थंड गोळ्यासारखे भासत होते. साम्यवादापासून दूर जाताना आपल्या अंतःकरणात किती यातना झाल्या ही गोष्ट लक्षात आली की ही आपत्ति आपल्यावर येऊ नये म्हणून आपल्या आत्म्याचा कोंडमारा करूनहि पक्ष प्रणाली ( Party line ) बरोबर आपली कसरत चालू ठेवणाऱ्या लोकांच्याविषयी त्यांना सहानुभूति वाटू लागे. परंतु या सर्व अनुभवात ते नैराश्याकडे झुकले नाहीत, कटु झाले नाहीत. आत्म-समर्थनाच्या फंदात पडले नाहीत किंवा ॲडम स्मिथ, सेंट थॉमस

ॲक्विनास ( किंवा तसाच एखादा अवतारी संत ) किंवा मॅकार्थी या सारख्या कोणाच्याहि विसरसरणीच्या आहारी गेले नाहीत, याचे एक कारण ते कदाचित कधीच खऱ्या अर्थाने कडवे मार्क्सवादी नव्हते हे असावे असे मला आपले वाटते. नवीन पुरावा पुढे आला की जुनी मते पारखून घेण्याची त्यांची नेहमीच तयारी असे.

दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि स्ट्रॅचींचा लष्करी डावपेचाच्या व्यवहाराशी संबंध आला. युद्धानंतरहि मजूर पक्षाचे सरकार अधिकारावर असताना हवाईदल खाते व युद्ध खाते यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध राहिला. मध्यम वयाच्या विचारशीलांचा(Intellectuals) अशा प्रकारे लष्कराशी व युद्धाशी दणकट संबंध येतो त्या वेळीं आपण या क्षेत्रातहि जबाबदारीच्या, जाणतेपणाच्या भूमिकेतून वावरू शकतो ही एक नवीनच जाणीव त्यांना होते. लष्करातील उच्चपदस्थ सेनापती आपल्या कल्पना ऐकावयास उत्सुक असतात हा एक नवीन व अनपेक्षित असा अनुभव त्यांना येतो. स्ट्रॅचींचा अनुभव असाच असावा. या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्यहि फार महत्त्वाचे नसावे. परंतु त्यांच्या जीवनाच्या या कालखंडाविषयी मला फारच थोडी माहिती आहे आणि त्यामुळे माझी विधाने त्यांना अन्यायकारक होण्याचीहि शक्यता आहे.

यानंतरचा कालखंड मला अधिक चांगला माहीत आहे. मजूर पक्ष अधिकारावरून खाली आल्यावर स्ट्रॅचींनी आर्थिक व राजकीय घटनांचे विश्लेषण करावयाचे आपले काम पुन्हा हाती घेतले. या कालखंडातील पुस्तके–‘ आजची भांडवलशाही ’ ( Contemporary Capitalism) व ‘ साम्राज्याचा अन्त ’ ( The End of Empire )—व अनेकविध लेख व निबंध यातून त्यांच्या पूर्वीच्या लेखनात आढळून येणारा एका मध्यवर्ती कल्पनेचा एकसूत्रिपणा आढळत नाही. हे लेखन फुटकळ व प्रासंगिक वाटते. याचे कारण अशी एकसूत्रात्मक मध्यवर्ति कल्पना

कोणती असू शकेल या विषयी स्वतः स्ट्रॅचीच संदेहात पडले होते हे असावे. परंतु याहूनहि या काळात जी उदारमतवादी आर्थिक रचनेची व राज्यघटनेची बैठक स्ट्रॅचींनी मान्य केली होती ती अशी घट्ट जखडून टाकणारी नव्हती. मार्क्सवादाच्या ठोकळेबाज मांडणीपेक्षा कितीतरी विविधतेला व विस्ताराला या रचनेत वाव होता. साहजिकच या अनुरोधाने केलेल्या आर्थिक किंवा राजकीय समंजस टीकाटिपणीत अशीच सूत्रांची विविधता येणे क्रमप्राप्त होते.

स्ट्रॅचींचा आणि माझा या काळात संबंध येणे ही गोष्ट अटळ होती. मी त्याच प्रकारच्या गोष्टी करत होतो किंवा करण्याचा प्रयत्न करीत होतो. ‘ आजची भांडवलशाही ’ या आपल्या पुस्तकात माझ्या ‘ प्रतितोल सामर्थ्या ’ च्या ( Countervailing Power ) कल्पनेचा त्यांनी गुणग्राहक उपयोग केला होता. १९५६ मध्ये कित्येक आठवडे भारतात आम्ही भारतीय संख्याशास्त्र संस्थेचे ( Indian Statistical Institute ) पाहुणे म्हणून एकत्र राहिलो व भारतात एकत्र खूप प्रवासहि केला.

या कालखंडासाठी मी स्ट्रॅचींचा विशेष ऋणि आहे. या सुमारास स्वित्झर्लंडमध्ये कित्येक महिने मी वैचारिक अस्वस्थतेत घालवले होते. आर्थिक दारिद्र्य हे अटळ आहे या मार्क्सवाद व सनातन अर्थशास्त्र या दोहोंनाही मान्य असणाऱ्या मांडणीतून आपली सैद्धान्तिक सुटका कशी करून घ्यावी हे मला कळत नव्हते. मी या ठिकाणी निराश होऊन संपूर्णपणे अडलो होतो. स्ट्रॅचीना माझ्या या सर्व कल्पनांविषयी बेहद्द उत्साह होता. त्यांनी माझे सर्व म्हणणे ऐकून घेतले आणि नंतरच्या चर्चेत या वैचारिक पेचप्रसंगातून माझी सुटका झाली. नंतर मी माझे ते पुस्तक-- ‘ समृद्ध समाज ’ ( The Affluent society ) कितीतरी सहजपणे पूर्ण करू शकलो.

आतापर्यंत स्ट्रॅचींची व माझी खूपच ओळख झाली होती. समकालीन आर्थिक व राजकीय घटनातील कोणताहि प्रश्न असा नव्हता की, जो त्यांनी विचारात घेतलेला नव्हता. प्रत्येक प्रश्नावरील संबंधित पुस्तके व निबंध त्यांनी वाचलेले असत. कामगार संघटना, कल्याणकारी राज्याचे सामाजिक परिणाम, समाजवादी कारभार, संसदीय शासन व्यवस्थेचे महत्त्व, त्रसाहत वाद, नवजात राष्ट्रांचा आर्थिक विकास, रशियातील नियोजन, लैंगिक प्रश्न, मानसशास्त्रीय विश्लेषण--अशा अनेकविध सर्व प्रश्नांचा त्यांचा अभ्यास असे. रिचर्ड क्रासमनने स्ट्रॅचींचें 'सर्वांत मोठा स्वयंशिक्षित माणूस' असे यथायोग्य वर्णन केले आहे. नवीन विचाराविषयीची त्यांची उत्सुकता ही थोडीशी जादाच होती असेही मला कधी कधी वाटे. परंतु म्हणूनच ते कधीही कट्टर साम्यवादी होऊ शकले नाहीत. कधी कधी अगदी सामान्य किंवा शून्य महत्त्वाच्या पुस्तकाविषयी किंवा लेखकाविषयी ते अति उत्साहाने बोलत असत. परंतु आशावाद व इतरांच्या विचाराविषयीचा असा उत्साह हे जर दोष असतील तर, गुणांच्या सीमारेषेवरील ते दोष आहेत हे मान्य करावे लागेल. जॉन स्ट्रॅची हे एक सुजन आणि अत्यंत बुद्धिमान माणूस होऊन गेले.

—मुक्त अनुवाद : देवदत्त दाभोलकर.

× × ×

भाग पहिला

# स्वतंत्र राष्ट्रांचा उदय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४४०८
ग्रंथ शाखा

# १ साम्राज्याची व्याख्या व उत्पत्ति

व्याख्यानमालेच्या विषयाला हात घालण्याअगोदर वक्त्याची ओळख व्हावी अशी तुमची स्वाभाविक अपेक्षा असणार. कारण, वक्त्याचा दृष्टिकोन माहीत असल्याखेरीज त्याच्या भाषणातील प्रतिपादनाचा निवाडा करता येत नाही. सार्वजनिक राजकीय वक्तृत्वाचे माझ्या देशातील पट्टीचे श्रेष्ठ उपासक व गुणज्ञ रसिक सर विन्स्टन चर्चिल यांचे देखील असेच मत होते. कोणत्याही भाषणाचा निवाडा ब्रिटिश लोकसभा तीन प्रश्न विचारून करते असे ते म्हणत. पहिला प्रश्न '**कोण** बोलले?' दुसरा प्रश्न '**कसे** बोलले?' आणि मगच, '**काय** सांगितले?' असा तिसरा प्रश्न ब्रिटिश लोकसभा करते.

राजकारणात माझी अनेक वर्षे गेली आहेत. विविध भूमिका मी वठविलेल्या आहेत. पण या वेगवेगळ्या भूमिकातही एक गोष्ट कायम राहिली. वयात आल्यापासून तरी निश्चितच आजवर मी समाजवादी राहिलेलो आहे. समाजवादी असे मी म्हटले, तेव्हा साहजिकच तुम्ही प्रश्न करणार : 'समाजवादाचा तुमचा अर्थ काय हो?' विसाव्या शतकाच्या साठीत लोकशाही समाजवादाची निश्चित भूमिका काय आहे? मागासलेल्या राष्ट्रांच्या संदर्भात लोकशाही समाजवादाचा काय कार्यक्रम आहे? विसाव्या शतकाच्या विशीत ब्रिटिश राजकारणात मी प्रवेश केला. त्या नंतरच्या काळात जग पार बदलले आहे. या बदलत्या व बदललेल्या जगात लोकशाही समाजवादाचा आशय कोणता? लोकशाही समाजवाद आणि साम्यवाद यांच्यात परस्परसंबंध काय आहे? त्यांच्यात भेद आहे तो कोणता? पार्लमेंटरी लोकशाही राज्यव्यवस्था हा एकच मतभेदाचा मुद्दा या दोन विचारप्रणालीत आहे काय? आणि तसे

असले तर, पार्लमेंटरी लोकशाही ही खरोखरच इतकी महत्त्वाची कल्पना आहे का ?

व्याख्यानमालेच्या ओघात या प्रश्नांना मी उत्तर देऊ शकेन अशी मला आशा आहे. पण इथे मी काही विधाने करून ठेवतो. त्या विधानांवरून, विसाव्या शतकाच्या तिशीतले जग आणि साठीतले जग यात, माझ्या दृष्टीने केवढे अंतर पडले आहे ते स्पष्ट होईल. अध्यक्ष महाशयांनी १९३६–३७ साली लिहिलेल्या ' द कमिंग स्ट्रगल फार पॉवर ' या माझ्या पुस्तकाचा उल्लेख आपणासमोर केला. त्या पुस्तकाच्या वाचकांना ठाऊक आहे की, त्या सबंध कालखंडात मी कट्टर समाजवादी होतो. त्यातही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, जगापुढील समस्यांकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन त्या काळात मार्क्सिस्ट होता. त्या काळात इंग्लंडमध्ये प्रचारात असलेल्या युनायटेड फ्रंट, पॉप्युलर फ्रंट या कम्युनिस्टप्रेरित आघाड्यांमध्ये साम्यवाद्यांबरोबर मी काम केलेले आहे. त्यांची भूमिका ही माझीही भूमिका होती. अलीकडील पंधरा–वीस वर्षांतील माझी पुस्तके व लिखाण ज्यांनी वाचले आहे त्यांना, माझ्या त्या वेळच्या नि आजच्या भूमिकेत जमीनअस्मानाचे अंतर पडले आहे हे वेगळे सांगावे लागणार नाही. आज मी स्वतःला मार्क्सवादी म्हणवू शकेन की नाही मला सांगता येणार नाही. मार्क्सवादाचे खंडन करणारे मला मार्क्स-वादी म्हणतात आणि मार्क्सवादी मला मार्क्सद्वेष्टा म्हणतात असे मी पाहतो. या लोकांच्या नांवे ठेवण्याबद्दल मी काय बोलावे ! तीस वर्षांपूर्वीचे जग आज पार बदलले असल्याचे मी पाहतो खरे. माझी दृष्टी बदलली आहे की जग बदलले आहे ? वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विचार करता, पंचवीस वर्षांपूर्वीचे जग आणि आजचे जग ही दोन वेगळीच आहेत असे मला वाटते इतकेच मी म्हणू शकेन.

## विसाव्या शतकाच्या साठीतले जग

विसाव्या शतकाच्या तिशीतल्या जगाहून आजचे जग सर्वस्वी वेगळे आहे असे म्हणण्यामागील तीन कारणे मी तुमच्यापुढे ठेवतो. साम्राज्यांचा विलय या घटनेचा मी प्रथम उल्लेख करीन. तिशीतल्या जगात युरोपीय राष्ट्रांच्या वसाहती सर्व जगभर पसरलेल्या होत्या. जागतिक परिस्थितीचा

तो एक महत्त्वाचा विशेष होता. सर्वदूर पसरलेली ही साम्राज्ये, आमच्या अपेक्षेबाहेर, काही थोड्या अल्पावधीतच विलयास गेली आहेत. साम्राज्यांची दौलत नाहीशी झाल्यानंतरही फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी, अमेरिका ही जुनी साम्राज्यवादी राष्ट्रे अधिक भरभराट पावली आहेत ही माझ्या मते दुसरी घटना होय. वसाहती हातातून गेल्यावरही झालेली या राष्ट्रांची भरभराट काहीशी अनपेक्षितच होती. दोन मतप्रणालींच्या लोकांनी वर्तविलेले अंदाज साफ खोटे ठरले होते. पहिला गट साम्राज्यवाद्यांचा. ब्रिटिश साम्राज्यवादी नेहमी म्हणत की, 'ब्रिटनचे साम्राज्य संपुष्टात आल्यास ब्रिटिश लोकांना अन्नान्नदशा येईल. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची या छापाची भाषणे मी किती तरी वेळा ऐकली आहेत. अगदी प्रामाणिकपणे आणि मनापासून त्यांना असे वाटत असे. आज ब्रिटनचे साम्राज्य नाममात्र उरले आहे. ब्रिटिश लोकांची अन्नान्नदशा तर झाली नाहीच पण, विस्तीर्ण साम्राज्य मालकीचे असताना उपभोगली नाही अशा संपन्नतेचा उपभोग आज ब्रिटिश जनता घेत आहे.

पण फक्त साम्राज्यवाद्यांचाच अंदाज खोटा ठरला असे नाही. लेनिनच्या सिद्धांतावर पूर्ण विश्वास ठेवून कम्युनिस्ट ठामपणे सांगत की, साम्राज्ये कधी काळी लयास गेली तर जगातील प्रगत भांडवलशाह्या कोलमडल्याच म्हणून समजा. हे भविष्य ते भलत्याच आत्मविश्वासाने वर्तवीत. साम्राज्यवादी आणि कम्युनिस्ट, दोघांनाही इतिहासाने खोटे पाडले आहे. लेनिनचे नांव घेत असतानाच मला त्याच्या पुढील मर्मभेदक उक्तीची आठवण झाली. 'आपल्यापैकी कोणालाही कल्पना येत नाही इतक्या इतिहासातल्या घटना आपल्याला चकवा देत असतात.' या इथे तर खुद्द लेनिनलाही इतिहासाने चकविले आहे. लेनिनची टवाळी मी करीत आहे असा गैरसमज कृपा करून करून घेऊ नका. इतिहासाच्या भावी वाटचालीबद्दलचे अचूक भविष्य वर्तविणे कोणालाही कधीच शक्य होणारे नाही. सांगायचा मुद्दा असा की, विसाव्या शतकाच्या साठीत साम्राज्य लयास गेले आहे; आणि तरीही, ब्रिटनची आर्थिक स्थिती भरभराटीची आहे या अनपेक्षित परिणामाला आपणास तोंड द्यावे लागत आहे. पंचवीस वर्षांपूर्वीच्या मानाने आज सामान्य ब्रिटिश नागरिकाचे जीवनमान कितीतरी उंचावलेले आहे. या घटनेमुळे लोकशाही समाजवाद्यांना आपल्या भूमिकेचा फेरविचार करणे

आवश्यक झाले आहे. साहजिकच, तिशीत ज्या गोष्टी बोलणे उचित व आवश्यक होते त्यांचा पुनरुच्चार आज हास्यास्पद ठरणार.

आजचे जग वेगळे आहे या माझ्या म्हणण्यामागील तिसरे कारण सांगतो. या कारणाचा इतरांइतकाच माझ्यावरही परिणाम झालेला आहे. साम्यवादाचे आकर्षण आज ओसरले आहे. निदानपक्षी माझ्या देशातील लोकांना तरी हे आकर्षण उरलेले नाही. पण मला वाटते साधारणपणे साऱ्याच पाश्चिमात्य देशात ही परिस्थिती आहे. यात एक विरोधाभास आहे. तसे पाहिले तर, साम्यवाद अपयशी ठरल्याने त्याबद्दलचे आकर्षण लोकांना वाटेनासे झाले अशातला भाग नाही; उलट, रशियासारख्या एका खंडप्राय राष्ट्राचे एका प्रगत औद्योगिकदृष्ट्या विकसित राष्ट्रात रूपांतर करण्यात साम्यवाद यशस्वी झालेला आहे ही गोष्ट कोणी नाकारीत नाही. पण साम्यवादाच्या या कामगिरीकडे पाहूनच पाश्चिमात्य राष्ट्रातील साम्यवादाचे आकर्षण खलास झाले. जगाच्या अर्धविकसित भागातही हीच गोष्ट उद्या घडेल असे मला वाटते. आज अर्थात् त्या भागातील जनतेला साम्यवादाचे आकर्षण आहे. साम्यवादाच्या यशाचा प्रकारच साम्यवादाच्या आकर्षणावरचा जालीम इलाज ठरणार आहे. मात्र पंचवीस वर्षांपूर्वी जगाचा उद्धार करण्यासाठी साम्यवादाचा अवतार झाल्यासारखे वाटत असे हे निर्विवाद.

मी रशियाचे उदाहरण घेतो. आज तुमचे लक्ष जगातील दुसऱ्या मोठ्या साम्यवादी देशाच्या हालचालींकडे, चीनकडे, वेधलेले आहे याची मला जाणीव आहे. पण रशियात साम्यवाद प्रस्थापित होऊन दीर्घ काळ लोटला असल्याने रशियाचे उदाहरण घेणे अधिक योग्य होईल. चाळीस वर्षे साम्यवादी सत्ता तिथे अधिकारावर आहे. कम्युनिस्ट अंमलाखाली होऊ शकणाऱ्या उत्कर्षाचे वा अपकर्षाचे अधिकृत मोजमाप रशियात घेता येते. रशिया हे निर्विवादपणे एक श्रेष्ठ राष्ट्र आहे. रशियाच्या समस्त राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचा वेग, आर्थिक वृद्धीचा वेग फार झपाट्याचा आहे. आर्थिक विकासाच्या बाबतीत मोठी आघाडी त्यांनी मारली आहे. जलद गतीने वाढणाऱ्या इतर राष्ट्रांशी तुलना केलीत तर वेगवान आर्थिक विकासात रशियाची बरोबरी करणारी राष्ट्रे आहेत असे आढळेल. रशियन आर्थिक विकासाचा वेग अजोड नसला तरी तो चांगलाच जलद आहे, आणि गेली अनेक वर्षे सातत्याने तो टिकून

आहे. वैज्ञानिक आणि इंजिनिअरिंग क्षेत्रात, विशेषतः अंतराळ प्रवासाच्या क्षेत्रात, रशियाची कामगिरी डोळे दिपवणारी आहे. तेव्हा, रशिया आपली सर्वांगीण प्रगती झपाट्याने करून घेत आहे याबद्दल कोणास शंका असू नये.

पण, रशियाची वैगुण्येही मोठी आहेत हे तुम्हाला माहीत आहे. रशियातील राज्यव्यवस्था रानटीच आहे म्हणाना. लोकशाही संस्था व संकेत यांचा रशियात अभाव आहे. पाश्चिमात्य देशातील लोक आज रशियाकडे पाहून म्हणतात, 'रशिया औद्योगिक दृष्ट्या प्रगत राष्ट्र आहे, त्याची औद्योगिक–वैज्ञानिक कामगिरी मनावर छाप टाकणारी आहे हेही खरे; पण त्यात विशेष काही नाही.' रशिया पूर्व युरोपीय राष्ट्रांना कसा वागवितो ते ते पाहतात. पूर्व युरोपीय राष्ट्रे ही रशियाचे उपग्रह आहेत, मांडलिक राष्ट्रे आहेत, किंवा, अगदी स्पष्ट म्हणायचे तर, रशियाच्या त्या वसाहती आहेत. मी व माझी पत्नी, आम्ही उभयता पूर्व युरोपीय राष्ट्रात पुष्कळ हिंडलो आहोत. पाश्चिमात्य साम्राज्यवादी राष्ट्रांपेक्षा अधिक वाईट वागणूक रशिया पूर्व युरोपीय राष्ट्रांना देत नाही असे म्हटले तर हरकत घेता येणार नाही. पण रशियाच्या खाती वसाहतींपेक्षा त्यांना अधिक सन्मानाची व बरोबरीची वागणूक मिळत नाही हेही खरे. म्हणजे, शेवटी, रशियाही इतर राष्ट्रवादी देशांप्रमाणेच एक देश ठरतो; फारसा वाईटही नाही व विशेष चांगलाही नाही.

अशा या राष्ट्रवादी रशियाचा साम्यवादाच्या उच्च आदर्शांशी अर्थाअर्थी तरी संबंध लागतो काय? साम्यवादाच्या मागचा ध्येयवाद, मूल्ये आणि साम्यवादाने उभे केलेले भावी समाजाचे चित्र उदात्त होते; आणि तिशीत आम्ही कम्युनिस्टांच्या खांद्याला खांदा लावून झटलो ते या उदात्त ध्येयांसाठी. माणसाचे माणसाकडून होणारे शोषण समूळ नाहीसे करावे ही आमची आकांक्षा होती. या ध्येयाच्या पूर्तीसाठी अपार क्लेश सहन करावे लागले, मोठ्या प्रमाणावर जुलूमजबरदस्ती करावी लागली, तरी त्यात गैर नाही अशी भावना आमची होती. पण, ज्या कालाचा थोर रशियन साहित्यिक बोरिस पास्तरनाक यांनी 'जिवाचा थरकाप उडविणारी चाळीस वर्षे' असा उल्लेख केला, तो उलटून गेल्यावर तरी रशियात काय झाले? तर, रशियात आणखी

एक राष्ट्रवादी राज्य प्रस्थापित झाले. अलीकडेच, या चाळीस वर्षांच्या इतिहासाचा निष्कर्ष मी सारांशाने मांडला होता. मी म्हटले होते की, 'कम्युनिस्टांनी साधने वापरली अत्यंत अमानुष आणि इतके करून काय मिळविले तर साधारणाहून अतिसाधारण.'

माझा दृष्टिकोन मी स्पष्ट केला आहे. पुढची वाटचाल करीत असताना तुमच्या मनाचा गोंधळ आता होणार नाही. आपण कोणाबरोबर चाललो आहोत हे तुम्हास माहीत असेल. मी काही निष्कर्ष सिद्ध केले आहेत असा गैरसमज कृपया करून घेऊ नका. आतापर्यंत मी माझी मते ओळीने मांडीत गेलो आहे. या व्याख्यानमालेच्या ओघात माझ्या दृष्टिकोनाची उकल मी करणार आहे. या दृष्टिकोनाप्रत मी कसा येऊन पोचलो ते त्यावरून तुम्हास कळेल.

## व्याख्यानांचे विषय

पांच व्याख्यानांच्या ओघात विषय मी कसकसा हाताळणार आहे त्याची रूपरेषा सांगण्याचा प्रयत्न थोडा करतो. थोर समाजवादी विचारवंत प्रा. जी. डी. एच्. कोल नेहमी म्हणत, 'जाणकार वक्त्याने तीन गोष्टी केल्या पाहिजेत. आपण काय सांगणार आहोत ते प्रथम त्याने स्पष्ट करावे; नंतर ते सांगावे; आणि शेवटी, आपण काय सांगितले त्याची उजळणी करावी.'

मी जे सांगणार आहे ते असे आहे : साम्राज्यवादाची व्याख्या करून साम्राज्ये अस्तित्वात कशी आली ते मी आजच्या पहिल्या व्याख्यानात सांगेन. दुसऱ्या व्याख्यानात, १८७० नंतरच्या काळातील आधुनिक साम्राज्यवाद आणि लेनिनचा त्यासंबंधीचा सिद्धान्त यांचे विवेचन मी करीन. राजकीय सार्वभौमत्वाचे हस्तांतर वसाहतींना केल्यानंतर, आणि अंकित राष्ट्रांना पूर्ण स्वातंत्र्य दिल्यानंतरही, साम्राज्यवाद व साम्राज्यवादी शोषण चालू राहू शकते का या महत्त्वाच्या प्रश्नाचा मी विशेषेकरून विचार करीन. तिसऱ्या व्याख्यानात, नवी साम्राज्ये उदयास येण्याची शक्यता कितपत आहे त्याचा विचार मी करीन. अमेरिका आपले साम्राज्य निर्माण करण्याच्या मार्गावर असल्याची भीती काही लोकांना वाटते. कम्युनिस्ट साम्राज्य-रशियाचे, चीनचे साम्राज्य–उदयास येईल की नाही? मोठा वादग्रस्त प्रश्न आहे!

नवजात स्वतंत्र राष्ट्रांचा आर्थिक विकास हा माझ्या चौथ्या व्याख्यानाचा विषय राहील. 'ससा आणि कासव' असे नांव त्या व्याख्यानाला देण्याचे माझ्या मनात आहे. ससा आणि कासव यांच्यामधील शर्यतीची रूपक कथा प्रसिद्ध आहे. भारत आणि चीन या दोन देशांच्या आर्थिक विकासाची तुलना आणि त्यांच्यातील भेद यासंबंधीच प्रामुख्याने माझे विवेचन असेल. ब्रिटन-मध्ये, आणि इथेदेखील, लोकांना चीन फार झपाट्याने भारताला मागे टाकत आहे असे वाटत असल्याचे मी पाहतो. चीन ससा तर भारत जणू कासव. पण गोष्टीत, धीमे चालणारे कासवच शेवटी शर्यत जिंकते हे तुम्हाला आठवत असेलच. शेवटच्या व्याख्यानात लोकशाहीचा विचार करावयाचा आहे. क्रियाशील राजकारणी माणसाच्या भूमिकेतून, व्यवहारी आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने, लोकशाहीचा विचार मी मांडेन; आणि लोकशाहीचे मला महत्त्व का वाटते ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न करीन.

## साम्राज्याची व्याख्या

'साम्राज्य कशाला म्हणावयाचे व साम्राज्ये कशी उद्भवतात?' या प्रश्नाने आपण आता विषय प्रवेश करणार आहोत. प्रवेशद्वारापाशीच क्षणभर थांबून साम्राज्यांचा इतिहास आठवा असे मी तुम्हाला म्हणणार आहे. मानव-जातीच्या इतिहासाकडे पाहिले तर प्राचीन काळापासून साम्राज्ये चालत आली असल्याचे आढळते. साम्राज्यांचा पसारा जगाच्या पाठीवर सर्वत्र पसरला होता असे आढळते. साम्राज्य या घटनेचा आकार, विस्तार व इतिहास किती मोठा आहे! किंबहुना असे म्हणता येईल की, मानव संस्कृतीचा उदय झाला तेव्हापासून आजतागायत साम्राज्ये चालत आली आहेत. अनेक साम्राज्ये उदयाला आली आणि विलय पावली पण साम्राज्य ही संस्था कायम आहे. साम्राज्य ही कदाचित् मानवी इतिहासातील सर्वात जुनी संस्था आहे. मानवसंस्कृतीच्या प्रारंभकाली ज्यांना साम्राज्य म्हणता येईल अशी विशेष प्रकारची राज्ये अस्तित्वात असलेली आढळतात. या राज्यांचा विशेष असा की, दुसऱ्या राष्ट्रांवर राज्य करणारी ही राज्ये होती. ही साम्राज्याची मी एक व्याख्याच केली. कोणतीहि व्याख्या ही तशी कामा-पुरती बनविलेली असते. साम्राज्यवाद आणि साम्राज्य यांची एखादी दुसरीच

व्याख्या तुम्ही करू शकाल; एखादे राष्ट्र, लोक, राज्य ( काहीहि म्हणा ), दुसऱ्या एखाद्या राष्ट्राला, लोकांना किंवा राज्याला जिंकून घेऊन आपली हुकूमत प्रस्थापित करते तेव्हा त्या प्रक्रियेला साम्राज्यवाद असे मी म्हणतो. या प्रक्रियेने जे राजकीय संघटन निर्माण होते त्या संघटनाला मी साम्राज्य म्हणतो.

याहून व्यापक व्याख्या तुम्हाला खात्रीनेच करता येईल. कोणत्याहि प्रकारच्या आक्रमणाला तुम्ही साम्राज्यवाद म्हणायचे ठरविले, किंवा कोठल्याही शोषणाला साम्राज्यवाद म्हणायचे ठरविलेत, तर कोणी हरकत घ्यायचे कारण नाही. पण अशी व्यापक व्याख्या प्रत्यक्ष घटनांना लागू करताना अडचणी निर्माण होणार. उदाहरणार्थ, साम्राज्ये अस्तित्वात येण्यापूर्वीहि आक्रमणाचे व युद्धाचे प्रसंग इतिहासात अनेक वेळा घडले आहेत; तसेच शोषण ही कसोटी मानावयाची ठरविली तर, देशांतर्गत एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करतो त्यालाही साम्राज्य म्हणावे लागेल.

साम्राज्य आणि साम्राज्यवाद यांच्यासंबंधी तीन प्रश्न मला उपस्थित करावयाचे आहेत. साम्राज्ये अस्तित्वात **कशी** आली ? ती अस्तित्वात **केव्हा** येतात ? आणि, साम्राज्य प्रस्थापनेचे **उद्दिष्ट** काय होते ? साम्राज्ये अस्तित्वात केव्हा येतात या प्रश्नाला माझ्या मते प्रधान महत्त्व आहे कारण इतर दोन प्रश्नावर त्या प्रश्नाच्या उत्तराने पुष्कळच प्रकाश पडतो असे मला वाटते.

## मार्क्स-एंगल्सप्रणीत साम्राज्याची उपपत्ति

सुमेर, बाबिलोन, सीरिया, रोम, ग्रीस यांच्या काळापासून ते थेट गेल्या शतकातील साम्राज्यांच्या विस्तारापर्यंत—इतक्या प्रदीर्घ कालखंडात पसरलेल्या या घटनेची शास्त्रशुद्ध कारणमीमांसा गंभीरपणे करण्याचा माझ्या मते एकच प्रयत्न आजवर झाला आहे. मार्क्स व एंगल्सच्या लिखाणातच केवळ, निदान माझ्या माहितीप्रमाणे, या ऐतिहासिक घटनेचे मर्म उलगडून दाखविण्याचा पद्धतशीर प्रयत्न केलेला आढळतो. साम्राज्यवाद कशाला म्हणायचे आणि त्याचा उद्भव कसा होतो यासंबंधीचे मार्क्स-एंगल्सचे विश्लेषण व स्पष्टीकरण बरोबर आहे असे मला पूर्वीइतक्याच ठामपणे आजहि वाटते.

मार्क्सच्या संपूर्ण विचारात वाढाव्याच्या ( surplus value ) कल्पनेला

मध्यवर्ती व निर्णायक महत्त्व आहे. आपल्या गरजा भागविण्यासाठी ज्या उत्पादनतंत्राचा व साधनांचा वापर समाज करीत असतो त्या वापरातून तात्कालिक गरजा भागविण्यास आवश्यक त्याहून अधिक उत्पादन होत असते की नाही ही मार्क्स–एंगलसच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. तात्कालिक गरजेपेक्षा अधिक असलेल्या उत्पादनात, शिल्लक वाढाव्यात मानवी प्रगतीचे, व एकप्रकारे इतिहासाचे, बीज आहे. साम्राज्य आणि साम्राज्यवाद या घटनांचे स्पष्टीकरण आणि विश्लेषण या वाढाव्याच्या कल्पनेच्या आधारे मार्क्स–एंगल्सने करावे हे ओघानेच आले. सारा मार्क्सवादच या कल्पनेच्या करांगुलीवर तोलला गेलेला आहे. मार्क्स–एंगल्सचा साम्राज्यवादाचा सिद्धान्त हा एका ऐतिहासिक घटनेला वाढाव्याची कल्पना लागू केल्याने निष्पन्न होतो.

आपल्या तात्कालिक गरजांपेक्षा अधिक उत्पादन करण्याची क्षमता असलेले उत्पादन तंत्र व साधन समाजाच्या हाती आले त्या क्षणी साम्राज्यनिर्मितीला अनुकूल भूमिका निर्माण झाली असे मार्क्स-एंगल्सचे म्हणणे होते. आपल्या म्हणण्याचे त्यांनी दिलेले स्पष्टीकरण फार साधे व सरळ आहे. उपभोग्य वस्तूंचा साठा एखाद्या समाजापाशी असला म्हणजे त्या समाजापासून तो हस्तगत करण्याचे प्रलोभन निर्माण होणार; एरवी त्या समाजावर आक्रमण कोण आणि कशासाठी करणार? सुसंघटित आणि बलवान् समाजांनी दुर्बल, विस्कळित समाजांवर हल्ला करून वाढाव्याची संपत्ति हस्तगत करण्याच्या केलेल्या प्रयत्नातून साम्राज्ये उदयाला आली असली पाहिजेत. मार्क्स–एंगल्स यांनी पुढे असेही म्हटले आहे की, अगदी प्रारंभीच्या काळात, परकीय जमातीतील सक्षम स्त्री वा पुरुषाला सरळसरळ गुलाम बनवून वाढाव्याची संपत्ति हस्तगत करण्याचा सर्वांत सोपा मार्ग अनुसरला जात असे. माणसाची श्रमशक्ति विकत घ्यायची आणि मग त्या श्रमशक्तीचा वापर करून वाढावा लाटायचा हा गुंतागुंतीचा मार्ग झाला. त्यापेक्षा, युद्धात जिंकून माणसाला आपला गुलाम बनविणे हा वाढाव्याची संपत्ति हस्तगत करण्याचा सर्वांत सोपा मार्ग नाही काय?

अगदी सुरवातीची साम्राज्ये ही, वस्तुतः, गुलाम जिंकून आणणारी राज्येच होती असा सिद्धान्त मार्क्स–एंगलसनी मांडला आहे. मानवी इतिहासात या

सिद्धान्ताला पुष्टि देणारा पुरावा आढळतो. तो असा की, मानव संस्कृति उदयास येण्याच्या आधीच्या कालात साम्राज्ये आढळत नाहीत; पण संस्कृतीच्या प्रारंभापासून मात्र साम्राज्ये अस्तित्वात आलेली आहेत. अगदी हातातोंडावर राहणाऱ्या रानटी टोळ्यांना, मी पुन्हा एकवार म्हणतो, दुसऱ्यांना गुलाम करण्याचा मोह होण्याचे काही कारणच नव्हते. टोळीवालेदेखील अधूनमधून कैदी पकडून नेत असले पाहिजेत यात संशय नाही. पण अशा कैद्याला काम करायला लावून त्यांना काही प्राप्ति होण्याची शक्यता नव्हती. कारण स्वतःचेच पोट भरण्यात त्या कैद्याचा सर्व वेळ व शक्ति खर्च पडणार.

उत्पादनतंत्र इतके अप्रगत असताना तुम्ही साम्राज्य स्थापन करायला गेलात तर तुमची गत फ्रेंच लोककथेतील शेतकऱ्यासारखी होईल. फ्रेंच शेतकरी हा मोठा पक्क्या डोक्याचा नि बनिया माणूस समजला जातो. त्या लोककथेत एक फ्रेंच शेतकरी गावातल्या पाद्र्याकडे जाऊन म्हणतो, 'महाराज, मी जगातला एक फार दुर्दैवी माणूस आहे. माझ्या गाढवाला जेवणावाचून जिवंत राहण्यास मी इतक्या मेहनतीने शिकविले. त्या मूर्खाने काय करावे म्हणता. अहो, तो जाऊन चक्क मेलाच!' एंगलसच्या अ-संस्कृत टोळीवाल्याने साम्राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असता तर त्याचीही गत कथेतल्या फ्रेंच शेतकऱ्याप्रमाणे झाली असती.

काही मूलभूत शोध लागल्यानंतर असा वाढावा निर्माण होणे शक्य झाले. अन्नधान्याची पिके, चाक, गावातून कायम वस्ती करून राहणे,—हे सर्व मुळात शोध होते हे विसरू नका. एकाअर्थी अणुशक्तीच्या शोधापेक्षाही अधिक क्रांतिकारी असे हे शोध होते. हे शोध लावल्यानंतर तात्कालिक गरजांहून अधिक उत्पादन करणे मानवसमाजाला शक्य झाले. परक्या माणसाला गुलाम बनवून राबवून घेणे मग परवडू लागले. आणि मनुष्यस्वभावहि असा की, लोक आपल्या पदरी गुलाम बाळगू लागले.

फ्रेडरिक एंगलसचे एक अवतरण मी तुम्हांला वाचून दाखविणार आहे. त्यातली एंगलसच्या विचाराची झेप, मुद्देसूद विवेचन, ओघवती भाषा—या सर्व कारणांमुळे एंगलसच्या लिखाणातील तो एक उत्कृष्ट, अर्थगर्भ उतारा ठरलेला आहे त्याची तुम्हाला आठवण करून द्यावी, आणि खरोखरीच

मार्क्स-एंगल्सचा सिद्धान्त असाच होता हे तुम्हास दाखवून द्यावे, म्हणून हे अवतरण तुम्हाला वाचून दाखविण्याचे मी ठरविले आहे. 'अँटि-ड्यूहरिंग' या एंगल्सच्या पुस्तकातून खालील अवतरण घेतलेले आहे. हे पुस्तक तुमच्या वाचनात आले असेल असे मी समजतो. एंगल्स लिहितो,

'एका माणसाच्या श्रमातून त्याच्या जीवनविषयक प्राथमिक गरजा भागून उरेल इतके उत्पादन व्हावे इतके उत्पादनतंत्र विकसित झाले होते. या उत्पादनसाधनांचा वापर केल्याने, जीवनविषयक गरजांचे उत्पादन करण्यास आवश्यक त्याहून अधिक माणसांना पोसता येणे शक्य झाले. माणसांना कामाला लावता येईल अशी उत्पादनसाधनेही हाती आली होती. मानवी श्रमशक्तीला प्रथमच किंमत आली, मूल्य प्राप्त झाले. पण ज्याला कामाला जुंपता येईल असा मोकळा माणूस (किंवा जादा श्रमशक्ती) जमातीच्या अंतर्गत सापडला नसता. युद्धात पकडून आणलेला कैदी हा मात्र असा मोकळाच असे. टोळक्या-टोळक्यांनी माणसे राहू लागल्यापासून युद्धेही होत होतीच आणि कैदीही पकडून आणले जात. अतिप्राचीन काली असे कैदी मारून खाल्ले जात; पुढे पुढे, या कैद्यांचे काय करावे हे न कळल्याने, त्यांना नुसतेच मारून टाकले जाई. पण, ज्या ऐतिहासिक काळाचा विचार आपण करीत आहोत त्या काळात अशा कैद्यांना एक नवे मूल्य प्राप्त झाले. विजयी टोळ्या कैद्यांना जीवनदान देऊन त्यांना कामाला जुंपू लागल्या. गुलामगिरीच्या प्रथेची सुरुवात इथून झाली. अल्पावधीतच, संस्कृतीच्या प्रथमावस्थेतील समाजातून गुलामांच्या उत्पादकश्रमांवर आधारलेली अर्थव्यवस्था रूढ झाली.

'या अर्थव्यवस्थांच्या ऱ्हासालाही गुलामगिरीची पद्धतच कारणीभूत झाली ही गोष्ट वेगळी. गुलामगिरीमुळेच शेती व उद्योगधंदे या दोन व्यवसायांमध्ये श्रमविभाजनाचे तत्त्व मोठ्या प्रमाणावर लागू करता येणे शक्य झाले. या श्रमविभाजनामुळेच प्राचीन काली ग्रीक संस्कृतीचे फूल फुलले. ग्रीककला, सुसंस्कृत ग्रीक राज्ये, ग्रीक विज्ञान यापैकी कशाचाच उत्कर्ष गुलामगिरीच्या अभावी झाला नसता; तीच कथा रोमन साम्राज्याची. पण ग्रीक संस्कृति फुलली नसती आणि रोमन

साम्राज्य उत्कर्ष पावले नसते तर आजचा युरोपही पाह्यला मिळाला नसता......

'गुलामगिरी किंवा तत्सम अन्याय्य प्रघातासंबंधी उच्च नैतिक भूमिकेवरून आवाज उठविणे, या अमानुष संस्थांबद्दल सात्त्विक संताप व्यक्त करणे फार सोपे आहे. दुर्दैव एवढेच, या सर्व टीकेतून आपणा सर्वांच्या परिचयाचीच गोष्ट सांगितली जाते; की, या प्रकारच्या सामाजिक संस्था आजच्या आमच्या भौतिक परिस्थितीशी व भावनांशी जुळत्या नाहीत. तसे पाहिले तर या आमच्या भावनाही आजच्या परिस्थितीतूनच आकारित झालेल्या आहेत. या संस्था अस्तित्वात कशा आल्या, त्या टिकून का राहिल्या आणि इतिहासात त्यांनी कोणते कार्य बजावले या प्रश्नांवर अशी टीका काहीच प्रकाश टाकू शकत नाही. त्याकाळच्या परिस्थितीचा अभ्यास केला तर मात्र असे म्हणावे लागते की, गुलामगिरीच्या संस्थेचा उदय ही मानवसमाजाच्या प्रगतीची खूण आहे. विकासाच्या दिशेने एक मोठे पाऊल पुढे पडले. आता हे म्हणणे कोणास विसंगत आणि पाखंडीपणाचे वाटल्यास त्याला इलाज नाही; इतिहासाचा अभ्यासच हे सांगतो. शेवटी उत्क्रान्तीच्या प्रथमावस्थेत माणूस पशू होता ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. स्वाभाविकच पाशवी अवस्थेतून मनुष्याप्रत पोचण्यासाठी, स्वतःला वर खेचण्यासाठी, त्याला प्रसंगी क्रूर व पाशवी मार्गांचा अवलंब करणे भाग पडले. सामूहिक परिवाराधिष्ठित प्राचीन समाजव्यवस्था या ना त्या रूपात ज्या समाजात टिकून राहिली त्या राष्ट्रात परिवाराधिष्ठित साम्यकुलांच्या जोरावर निरंकुश हुकूमशाही राजवटी फोफावल्या हे ऐतिहासिक सत्य आहे. हिंदुस्थानापासून थेट रशियापर्यंत स्वतःला प्रति-ईश्वर मानणारे कर्दनकाळ सुलतान कालपरवापर्यंत राज्य गाजवीत होते. ज्या समाजात ही साम्यकुले बरबाद झाली त्याच समाजांचा विकास झाला. आणि, या समाजांनी, आपला विकास प्रथमतः गुलामांच्या श्रमशक्तीने उत्पादनात वृद्धि घडवून आणून, उत्पादन-तंत्रात विकास घडवून आणून, केला. अत्यल्प वाढावा ( surplus ) निर्माण करण्याइतकेच मानवी श्रम उत्पादनक्षम होते त्या अवस्थेत

श्रमविभाजनाच्या मार्गानेच उत्पादक घटकांचा व उत्पादनक्षमतेचा विकास, व्यापारवृद्धि, विज्ञानकलांची उपासना व वाढ आणि राज्यसंस्थेचा व न्यायसंस्थेचा विकास होऊ शकणार होता. मेहनतीच्या, उत्पादनाच्या कामावर राबणारी सर्वसामान्य जनता आणि सामाजिक व आर्थिक व्यवहाराचे संचालन करणारा, व्यापार करणारा, आणि, नंतरच्या काळात, विज्ञानकलांच्या उपासनेत गढून गेलेला, मूठभर वरिष्ठांचा वर्ग ही प्रारंभीच्या काळात झालेली श्रमविभाजनाची पहिली सुरवात आहे. गुलामी हा श्रमविभाजनाचा सर्वात सोपा व नैसर्गिक प्रकार होता. प्राचीन जगातील परिस्थिति, व विशेषतः ग्रीक समाजाची अवस्था पाहता, गुलामगिरीच्या प्रघातानेच ग्रीक समाजाची प्रगति वर्गसंघर्षावर उभारलेल्या समाजाप्रत होऊ शकली असती हे स्पष्ट आहे. गुलामांच्या दृष्टीनेही एक पाऊल पुढेच पडलेले होते. त्या आधीच्या काळात युद्धकैदी मारले जात, किंवा त्याही आधी, भाजून खाल्ले जात; आता, गुलाम बनल्याने ते जिवंत तरी राहू लागले.'

फार छान उतारा आहे हा. खरे म्हणजे, तुम्ही मुळातूनच एंगल्सचे संपूर्ण विवेचन वाचायला हवे. एंगल्सच्या विचारातली धिटाई, त्याची सच्ची विज्ञाननिष्ठा यांचे त्यात कसे स्वच्छ प्रतिबिंब उमटले आहे. एंगल्सविषयी गैरसमज पसरण्यास, तो बदनाम होण्यास, ऐतिहासिककालीन गुलामगिरीच्या समर्थनाइतके सोपे हत्यार दुसरे सांपडले असते का ? कठोर तार्किक भूमिकेतून विश्लेषण करीत असता, ती भूमिका ज्या निष्कर्षापर्यंत घेऊन जाईल ते निष्कर्ष स्वीकारण्याइतके धैर्य व प्रामाणिकता मार्क्स व एंगल्स यांच्यात होती या गोष्टीचा हा पुरावा आहे. गुलामगिरी ही आज अमानुष प्रथा ठरणार असली तरी, सहा हजार वर्षांपूर्वी तिचा प्रथम उदय झाला त्या वेळी, मानव-समाजाच्या विकासातली ती एक आवश्यक पायरी होती यापेक्षा अधिक धाडसाचे विधान कोणते होऊ शकते ? एंगल्सने केलेले हे विधान आताच तर मी तुम्हांला वाचून दाखविले.

## मार्क्सवादाकडे पाहण्याचा सम्यक दृष्टिकोन

तुमच्या परवानगीने मी थोडे विषयांतर करणार आहे. मार्क्स, एंगल्स व लेनिन यांच्या भव्य व विस्तीर्ण विचार विश्वाकडे आपण कोणत्या दृष्टीने पाहावयाचे त्याचा निर्णय आपल्याला केला पाहिजे. या तिघांच्या विचारांवरच साम्यवादी तत्त्वज्ञानाची उभारणी झालेली आहे. आपले सगळे म्हणणे शंभर टक्के बरोबर असते हा कम्युनिस्टांचा दावा मान्य करावयास आज मी तयार नाही हे मी तुम्हाला सुरवातीसच सांगितले. पण मार्क्सवाद सगळाच खोटा म्हणून टाकून द्यायलाही मी तयार नाही. मार्क्सवादात मानवी समस्यांवर प्रकाश टाकणारी अत्यंत महत्त्वाची सूत्रे आहेत असे आजही मला वाटते. मार्क्सच्या प्रतिपादनात व भविष्य वर्तविण्यात चुका झाल्या असे म्हटल्याने अखेर मार्क्स हा तुमच्याआमच्यासारखा माणूसच होता इतकेच फार तर सिद्ध होईल. या मुद्दयांसंबंधी प्रोफेसर अर्नाल्ड टॉयनबी यांच्याशी माझा अलिकडेच पत्रव्यवहार झाला. मार्क्सविषयक आपली दृष्टि काय असावी याची त्यांनी अतिशय समर्पक शब्दात मांडणी केलेली आहे. ते म्हणतात : 'मार्क्सजवळ प्रेषिताची दिव्य व अचूक दृष्टि होती असे समजू नका. पण उलट बाजूला जाऊन, मार्क्स हा एकोणिसाव्या शतकातील बाद ठरलेला एक समाजशास्त्री होता असे म्हणून त्याला निकालात काढणे गैर होईल. मार्क्स हा एक प्रतिभावंत माणूस होता असे म्हणा.' टॉयनबींनी मार्क्सविषयक योग्य दृष्टिकोन मार्मिक शब्दात सूचित केला आहे.

साम्राज्यांच्या उदयाविषयींचा मार्क्सवादी सिद्धान्त मी स्वीकारतो. अलिकडच्या काळातील साम्राज्यवादी राष्ट्रे अर्थातच गुलामांची शिकार करीत नसत; त्यांचे शोषणाचे मार्ग सूक्ष्म, सभ्य व प्रच्छन्न बनलेले होते हे मला सांगितले पाहिजे. अर्वाचीन साम्राज्य ही एक गुंतागुंतीची संघटना बनलेली होती. पुढे जाऊन मला असेही म्हणावयाचे आहे की, अंकित राष्ट्राचे शोषण करीत असतानाच दुसरीकडे अंकित राष्ट्राच्या उन्नतीस हातभार लावण्याचे काम साम्राज्यवादी राष्ट्रांकडून व्हावे अशा प्रकारची गुंतागुंतीची, परस्परावलंबी संघटना अलीकडील साम्राज्यांची बनलेली होती. अंकित राष्ट्रांवर जेत्यांकडून अन्याय घडला तसे काही उपकारही त्यांनी केले. हे माझे विधान वादग्रस्त असल्याची मला कल्पना आहे.

## साम्राज्ये हीहि पुनरुत्थानाचे वाहन

इंग्लंडमधून इकडे येताना हिंदुस्थानावरून मी आलो. मी ब्रिटिश आहे. आणि थोडाबहुत राष्ट्राभिमानीहि आहे. तेव्हा, इतिहासातील इतर कोणत्याही साम्राज्याहून अधिक, ब्रिटिशांचे हिंदुस्थानावरील साम्राज्य हे शेवटी शेवटी शोषणापेक्षां पुनरुत्थानाचेच वाहन अधिक बनले होते असे मी म्हटले तर तुम्ही उदार बुद्धीने त्याचा विचार कराल अशी आशा आहे. या माझ्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ मार्क्सचे एक अवतरण मला इथे उद्धृत करायला हवे. ब्रिटिश साम्राज्याचा पुरस्कार करण्याचा आरोप मार्क्सवर तरी खचितच कोणी करणार नाही. मार्क्सने हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीसंबंधी लिहिले त्याला शंभरावर वर्षे होऊन गेली. त्या वेळीच मार्क्सने स्पष्टपणे म्हटले की हिंदुस्थानावरील ब्रिटिश साम्राज्याला एक "प्रागतिक", विधायक बाजूही पण आहे. न्यूयॉर्कहून प्रसिद्ध होणाऱ्या ट्रिब्यून या वृत्तपत्रातून '**हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीचा भावी परिणाम**' या शीर्षकाखाली मार्क्सने एक लेखमाला लिहिली. मार्क्सने काढलेला अंतिम निष्कर्ष स्पष्ट करणारी दोन चार वाक्ये मी आपणास वाचून दाखवितो. त्याच्या हयातीत नुकत्याच कोठे आरंभ झालेल्या हिंदी औद्योगिकरणाविषयी मार्क्स लिहितो,

> 'इतक्या मोठ्या विस्तीर्ण देशात रेल्वेचे जाळे पसरल्यानंतर रेल्वे वहातुकीच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक ते उद्योगव्यवसाय तुम्हाला निर्माण हे करावेच लागणार. आणि मग, या नव्या उद्योगव्यवसायांच्या भोवती रेल्वे वाहतुकीला अनावश्यक अशा उद्योगातही यंत्राधिष्ठित उत्पादन तंत्राचा प्रसार झाल्याखेरीज कसा राहील ? हिंदुस्थानच्या भावी औद्योगिकरणाची रेल्वे ही नांदी ठरणार आहे. रेल्वे वाहतुकीमुळे नवे उद्योगधंदे उभे राहिले की, ज्या श्रमविभाजनाच्या प्रकारावर हिंदी जाती संस्था उभी आहे ते पारंपरिक श्रमविभाजन मोडून निघणार. भारताच्या प्रगतीच्या व सामर्थ्याच्या आड येणारी ही जातिसंस्था नव्या उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर निकालात निघेल हे ओघानेच आले.'

मार्क्स देखील साम्राज्यासंबंधी प्रगल्भ व वास्तव दृष्टिकोन राखीत होता याबद्दल तुम्हाला शंका राहू नये. साम्राज्यवाद आणि शोषण यांचा तो कट्टर

द्वेष्टा होता; तरी पण, कळत वा नकळत, साम्राज्यांमुळे घडून आलेले पुनरुत्थानाचे कार्य मार्क्सच्या नजरेसमोर होते.

या विषयासंबंधी जो दृष्टिकोन व्याख्यानाच्या आतापर्यंतच्या ओघात मांडण्याचा मी प्रयत्न केला तो चित्रित करण्याच्या दृष्टीने दोन हकीकती मी आपणास निवेदन करणार आहे. साम्राज्याची वैय्यर्थता, आणि शोकांतिकाही पण, या हकीकतीत चित्रित झालेली आहे. कितीहि उपकारक असले तरी साम्राज्य हे शेवटी परकीयांनी चालविलेले राज्य, ते जित राष्ट्रातील लोकांना प्रिय होऊ शकत नाही. जगाच्या नजरेतहि ते अन्याय्यच ठरते. कलकत्त्याच्या मध्यभागी असलेल्या एका स्मारकाने वरील म्हणण्याचा प्रत्यय मला आणून दिला. कलकत्ता हे स्वतंत्र भारतातील अग्रगण्य शहर आहे. एक दिवस जगातले ते मोठ्यापैकी औद्योगिक केंद्र बनेल अशी त्याची भाग्यरेषा आहे. एकोणिसाव्या शतकातील मेयो या व्हाइसरॉयचे ते स्मारक आहे. स्मारकावरील लेखाचा मजकूर माझ्या आठवणीप्रमाणे असा काहीसा आहे : ‘ गरिबांचे रक्षणकर्ते, निपक्ष वृत्तीने न्याय देणारे, हिंदू, ब्रिटिश व मुस्लिम सर्वांना सारखेच प्रिय असलेले, हिंदुस्थानचे व्हाइसरॉय गव्हर्नर जनरल लॉर्ड मेयो यांच्या स्मरणार्थ. १७ मे १८७२ रोजी यांचा खून झाला. ’ वरचा लेख व त्यांचा खून होऊन झालेला मृत्यू — त्यामुळे चटकन् हसू येते; पण या लेखात कारुण्यही आहे; बिचारा मेयो खरोखरीच उदारमतवादी व सुधारक व्हाइसरॉयांपैकी एक होता.

या प्रसंगाला जुळेल असा एंगल्सच्या लिखाणातील एक उतारा सांगतो. लोकांना ‘ जबरदस्तीने सुखी ’ करण्याच्या मार्क्स व मी नेहमीच विरोधी राहिलेलो आहोत असे एंगल्सने आपल्या एका पत्रात म्हटले आहे. हे उद्गार अत्यंत अर्थगर्भ आहेत. साम्राज्यवादी मंडळी जर कोणी आज हयात असतील, किंवा जे भूतपूर्व साम्राज्यवादी असतील, त्यांनी या उद्गारांचे नित्य पठण करावे. पण तुम्हाला सांगू, विसाव्या शतकाच्या साठीत, कम्युनिस्टांनी हे उद्गार हृदयावर कोरून घेण्याची सर्वांत अधिक गरज आहे. कम्युनिझमच्या एका संस्थापकाच्या म्हणण्याचा मान राखून कम्युनिस्टांनी जबरदस्तीने लोकांना “ सुखी ” करण्याचा आपला हट्ट सोडला तर या जगाच्या सुखात व शांतीत चांगलीच भर पडेल.

# २ लेनिनच्या साम्राज्यवादविषयक सिद्धान्ताचा फेरविचार

पहिल्या व्याख्यानात आपण साम्राज्याच्या उदयाची मार्क्स-एंगल्सप्रणीत मीमांसा पाहिली. मध्यंतरीच्या अनेक शतकांच्या काळातील साम्राज्ये ओलांडून मी सरळ अगदी अलिकडील साम्राज्यांच्याकडे वळणार आहे. आज साम्राज्यांच्या उरलेल्या अवशेषांचा विचारही यात येईल.

## साम्राज्यांचा परमोत्कर्षाचा कालखंड

आधुनिक साम्राज्यवादाचा उदय १८७० साली झाला असे मानले जाते. हे साल निवडण्याला शास्त्रशुद्ध आधार आहे असे नाही. तरी पण १८७० हे साल महत्त्वाचे आहे. १८७० च्या आसपास पुढारलेल्या भांडवलशाही राष्ट्रांच्या साम्राज्यवादी हालचालींना जोर चढला—ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट आहे. याच सुमारास साम्राज्य उभारणीच्या मोहिमांना जोर का चढला याच्या कारणात आपण शिरणार आहोतच. तूर्त तुम्ही हे साल लक्षात ठेवले म्हणजे झाले. १८७० च्या आधीहि साम्राज्ये अस्तित्वात होतीच; पण १८७० नंतर साम्राज्यविस्तार फार झपाट्याने झाला.

१८७० ते १९०० या तीस वर्षांच्या काळातील विस्ताराची कल्पना देणारे पुढील दोनतीन आकडे बघा. या कालात ८८ दशलक्ष लोकसंख्या असलेला ४७,५४,००० चौरस मैलांचा प्रदेश इंग्लंडने पादाक्रांत केला. जर्मनीने ८५

लाख लोकवस्तीच्या एक दशलक्ष चौरस मैल प्रदेशाची भर आपल्या साम्राज्यात घातली. फ्रान्सने २६ दशलक्ष लोकवस्तीच्या ३५ लाख चौरस मैलांचा टापू काबीज केला. प्रत्येक साम्राज्यवादी देशाने कब्जा केलेल्या प्रदेशाची व लोकांची अशी एक मोठी यादी होते. यात शिवाय या राष्ट्रांची छुपी लूटही मिळविली पाहिजे. ही लूट त्या काळात, व इ. स. १९०० नंतरही, बरीच मोठी आहे. काही साम्राज्यवादी राष्ट्रांनी चीनची आपापसात केलेली वाटणी विशेषतः या यादीस जोडायला हवी. ‘ प्रभावाची क्षेत्रे ’ असे गोंडस नाव या वाटणीला इतिहासात आहे. त्या काळापर्यंत ज्ञात असलेल्या जगाचा फार मोठा हिस्सा मुठभर चढ्या साम्राज्यवादी राष्ट्रांनी या काल-खंडात आपापसात वाटून घेतला.

या विस्तारामागची प्रेरणा कोणती ? १८७० ते १९१४ या चव्वेचाळीस वर्षांच्या अवधीत साम्राज्यवादी विस्ताराची अशी प्रचंड लाट निर्माण होण्याचे काय कारण ? एकोणिसाव्या शतकाच्या पन्नाशीत, आणि साठीत देखील, परिस्थिती वेगळीच होती. ‘ या बेकार वसाहती म्हणजे गळयातली निव्वळ धोंड आहे ’ असे उद्‌गार हुजूरपक्षीय पंतप्रधान बेंजामिन डिझरेलीने त्या दिवसात वैतागाने काढलेले आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर इंग्लंड-मध्ये साम्राज्य विस्तारावाबत लोकांमध्ये तीव्र विरोधाची भावना होती. १८७० नंतरच्या काळात हेच लोकमत जहाल साम्राज्यवादी बनलेले आढळते.

एकाएकी लोकमताने पलटी घेण्याचे कारण काय ? या घटनेचे स्पष्टीकरण देता आले पाहिजे. आद्य साम्राज्यांच्या उदयाची तर्कशुद्ध मीमांसा व स्पष्टी-करण देण्याचा मार्क्स-एंगल्स यांचा प्रयत्न ज्याप्रमाणे एकमेव आहे त्याच-प्रमाणे या १८७० नंतरच्या साम्राज्यांच्या विस्ताराची मीमांसा करून एक सर्वांगीण तर्कशुद्ध सिद्धान्त मांडण्याचा प्रयत्न एकट्या लेनिनने केला आहे.

## लेनिन

समाजशास्त्री लेनिनच्या व्यक्तित्वाची व कामगिरीची थोडी ओळख आपण करून घेऊ या. बोल्शेविक पुढारी लेनिन आणि तत्त्वचिंतक लेनिन असे दोन लेनिन होऊन गेले. क्रांतिकारक लेनिनचा परिचय सर्वांना आहे; एका माणसाचा अपवाद सोडून, माझा मित्र माईल्स मालेसन या नटाने मला

सांगितलेल्या आठवणीतला तो गृहस्थ सोडून. चाळीस वर्षांपूर्वी मालेसन ब्रिटिश म्युजियमच्या अभ्यासिकेत जाऊन वाचन करीत असे त्या वेळची ही गोष्ट आहे. मालेसन हा कट्टर डावा समाजवादी. ब्रिटिश म्युजियमच्या अभ्यासिकेत मार्क्सने तर अभ्यास केला होताच पण ब्रिटनमध्ये घालविलेल्या हद्दपारीच्या काळात लेनिनहि तिथे अभ्यास करीत असे ही गोष्ट मालेसनच्या स्मरणात होती. अभ्यासिकेत तिसाहून अधिक वर्षे काम केलेला एक क्युरेटर होता. लेनिनच्या दिवसातही अभ्यासिकेत हाच गृहस्थ कामावर असणार याविषयी मालेसनला खात्री होती. महामना लेनिनविषयी काही ऐकायला मिळेल या आशेने त्यांनी क्युरेटरला विचारले, ‘ लेनिन इथे येत व अभ्यास करीत हे तुम्हाला आठवत असेल नाही ? ’ ‘ लेनिन, छे, या नांवाचा गृहस्थ काही आल्याचे आठवत नाही बुवा, ’ काहीसे बुचकळ्यात पडून क्युरेटरने उत्तर दिले. मालेसन म्हणाले, ‘ लेनिन आपले पार्टीतले टोपण नांव वापरत नसावेत बहुधा. उलियानोव्ह हे आपले खरे—नांवच ते वापरीत असतील. या नांवाचे कोणी गृहस्थ इथे येत असत. हे तुम्हाला आठवते का ? ’ क्युरेटर लागलीच उत्तरले, ‘ हात्तिच्या. उलियानोव्ह माझ्या चांगले लक्षात आहेत. ठेंगणा, टोकदार दाढी असलेला मोठा गोड माणूस. मोठा मधुर संभाषणी. चांगलेच आठवतात की. त्यांचे पुढे काय झाले हो ? ’ तेव्हा सर्वांनाच क्रांतिकारक लेनिनची ओळख आहे असे नाही. पण बहुतेकांना तरी आहेच.

समाजशास्त्रज्ञ तत्त्वचिंतक लेनिनची गोष्ट वेगळी आहे. लेनिनचा साम्राज्यवादाचा सिद्धान्त मी विचारात घेणार असून लेनिनने बरोबर काय सांगितले नि तो चुकला कुठे ते माझ्या समजुतीप्रमाणे मी सांगेन. नंतरच्या घटनांकडे पाहता लेनिनचा सिद्धान्त काही ठिकाणी चुकीचा शाबीत झाला आहे असे मला वाटते. लेनिनपेक्षा मला अधिक अचूक दृष्टि आहे असा याचा अर्थ नव्हे. मोठ्या माणसांच्या सिद्धान्तांवर टीका करता आली म्हणजे आपण त्यांच्यापेक्षा मोठे आहोत असा कोणी आव आणीत नसतो; कारण आपले शहाणपण घडून गेलेल्या घटनांनी आपल्याला आलेले असते. मूळ सिद्धान्त मांडणाऱ्याला असे ‘ मागे वळून पहाण्याचा ’ फायदा मिळत नाही. ‘ शेक्सपियरची उंची माझ्याहून अधिक, पण मी शेक्सपियरच्या खांद्यावर

उभा आहे, ' असे शेक्सपियरसंबंधी बर्नार्ड शॉने म्हटले. आपण सगळेच एका अर्थी पन्नास वर्षांपूर्वीच्या तत्त्वज्ञांच्या खांद्यावर उभे आहोत. कारण, पुढील पन्नास वर्षांत अमुकतमुक घडेल असे त्यांनी भविष्य वर्तविले, आणि गेल्या पन्नास वर्षांत त्यातले काय घडले नि काय घडले नाही याची आपण मोजदाद घेऊ शकतो.

## लेनिनचा साम्राज्यविषयक सिद्धान्त

लेनिनचा साम्राज्यवादाचा सिद्धान्त काय सांगतो ? ' १८७० नंतर काही राष्ट्रांना जगाची वाटणी करून घेण्याची साम्राज्यवादी प्रेरणा एकाएकी का झाली ? ' या प्रश्नाचे उत्तर लेनिनने शोधले. लेनिनने दिलेले उत्तर लहानसेच आणि सोपे आहे. स्वतःच्या देशात भांडवलशाही परिपक्व अवस्थेस पोचल्या-नंतर बड्या राष्ट्रांना भांडवल गुंतवणुकीकरता मोठ्या प्रमाणावर परदेशातील कुरणे शोधणे या सुमारास क्रमप्राप्तच झाले, असे लेनिनचे उत्तर आहे. ' अति-परिपक्व भांडवलशाही राष्ट्रे '—असा स्वतः लेनिनचा शब्दप्रयोग आहे. स्थूलमानाने लेनिनचे हे उत्तर बरोबर आहे. त्या काळातल्या आर्थिक घडामोडींची तपशीलवार आकडेवारी परिचित असलेल्या माणसाचे, अशी काही भांडवलाची हालचाल होती, याबद्दल दुमत असणार नाही.

प्रोफेसर केर्नक्रॉस या चोख व प्रतिष्ठित अर्थशास्त्रज्ञाने ' होम अँड फॉरिन इन्व्हेस्टमेंट्स—१८७० ते १९१३ ' या आपल्या पुस्तकात दिलेली आकडे-वारी पहा. इंग्लंडमधील या काळातील एकंदर बचतीपैकी निम्मी रक्कम परदेशी गुंतविली गेली असा त्यांचा निष्कर्ष आहे. माझे सहकारी श्री. हॅरॉल्ड विल्सन यांच्या हिशेबानुसार ब्रिटिशांची या काळातील परदेशातील वार्षिक भांडवल गुंतवणूक ब्रिटनच्या एकंदर राष्ट्रीय उत्पादनाच्या सात टक्क्यांइतकी होती. सात टक्के म्हणजे केवढी मोठी रक्कम होत असेल याची कल्पना येण्यासाठी पुढील तुलना लक्षात घ्या. आज, १९६२ साली, सधन पाश्चिमात्य राष्ट्रांनी आपल्या एकंदर राष्ट्रीय उत्पादनापैकी १ टक्का रक्कम मागासलेल्या राष्ट्रांचा आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कामी कर्ज व देणगी रूपाने खर्च करावी या सूचनेनुसार वाद चालू आहे. त्या काळी हीच पाश्चिमात्य राष्ट्रे सधन नव्हती, आणि त्याचे एकंदर राष्ट्रीय उत्पादनहि कमी होते. अशा काळात

एकंदर राष्ट्रीय उत्पादनाच्या सात टक्क्यांइतकी रक्कम दरवर्षी परदेशात गुंतविली जात होती. तेव्हा त्या रकमेचे मूल्य किती मोठे होत असेल याची कल्पना करा.

तेव्हा, नफा मिळविण्याच्या उद्दिष्टाने फार मोठ्या प्रमाणावर खाजगी भांडवलदारांकडून परदेशात भांडवल गुंतवणूक त्या काळात झाली ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे. लेनिनने सांगितलेली ही पहिली गोष्ट.

'इतक्या मोठ्या प्रमाणावर परदेशात भांडवल गुंतवणूक भांडवलदारांनी का करावी ?' हा लेनिनने उपस्थित केलेला दुसरा प्रश्न. ज्या देशातून भांडवलशाहीचा विकास चांगलाच झालेला होता त्या देशातील भांडवलदारांना अशा रीतीने मोठ्या प्रमाणावर परक्या मुलुखात भांडवल गुंतविण्याची गरज का पडावी ? परदेशात अशी गुंतवणूक करण्याखेरीज दुसरा मार्गच त्यांना उरला नव्हता, असे लेनिनचे या प्रश्नाला उत्तर आहे. स्वतःच्या देशात या प्रचंड भांडवलाची किफायतशीर गुंतवणूक होण्यास अर्थव्यवस्थेत मोकळीक उरली नव्हती. मक्तेदारीच्या वाढीमुळे आणि इतरहि कारणांमुळे राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी अत्यंत विषम झालेली होती. सर्वसामान्य बहुजनसमाजाचे जीवनमान इतक्या निकृष्ट पातळीवर कायमचे बांधून ठेवलेले होते की वाढत्या उद्योगधंद्यांमधून निर्माण होणाऱ्या वाढत्या मालाला स्वदेशी बाजारपेठात पुरेशी मागणीच नव्हती. तेव्हा स्वदेशात भांडवल गुंतविणे किफायतशीर ठरेनासे झाले. या बड्या भांडवलदार राष्ट्रांना एकाच वेळी परदेशी भांडवल गुंतवणुकीची गरज इतक्या मोठ्या प्रमाणावर व तीव्रपणे निर्माण झाल्याने या राष्ट्रात, व राष्ट्रातील मक्तेदार भांडवलदारात, सर्वात किफायतशीर क्षेत्रे आपल्या भांडवलासाठी काबीज करण्याची स्पर्धा उत्पन्न झाली. जगाची वाटणी आपापसात करून घेणे ही या स्पर्धेची पहिली अवस्था झाली. वाटून घ्यायला किफायतशीर क्षेत्रे जगात उरली नाहीत तेव्हा परस्परांच्या कब्जात असलेली क्षेत्रे एकमेकांपासून जिंकून घेण्यासाठी त्यांच्यात आपापसात साम्राज्यवादी युद्धे सुरू झाली. लेनिनच्या साम्राज्यवादाच्या सिद्धान्ताचा हा पुढचा भाग आहे.

आपल्या काळच्या जगाचे लेनिनने जे चित्र रेखाटले त्याची ही अत्यंत संक्षिप्त, पुसट व स्थूल रूपरेषा आहे. भांडवलशाही राष्ट्रांना साम्राज्यांचा

विस्तार करणे अटळच होऊन बसले असे लेनिनचे म्हणणे होते. देशात सारखा गोळा होणारा हा भांडवलाचा प्रचंड ओघ त्यांना परदेशांकडे वळविता आला नसता, त्यासाठी जगातील विस्तीर्ण क्षेत्रे जिंकून घेऊन त्यांना आपल्या राजकीय व लष्करी प्रभुत्वाखाली ठेवले नसते, तर ही राष्ट्रे रसातळाला गेली असती असे लेनिनचे मानणे होते. साम्राज्ये जवळ नसती तर भांडवलशाही अर्थव्यवस्था कोलमडली असती; कामगारवर्गाची उपासमार झाली असती; लाखो कामगार बेकार झाले असते; आणि अशा स्थितीत क्रांति चार दिवस आधी झाली असती; या सगळ्या परिणामांविषयी लेनिनच्या मनात अणुमात्र शंका नव्हती. रशियाचा सर्वाधिकारी असताना, आयुष्याच्या अखेरीस, लेनिनने असा सिद्धान्त मांडला की साम्राज्ये हा भांडवलशाही राष्ट्रांचा एकमात्र आधार आहे. कोणत्या ना कोणत्या मार्गाने साम्राज्यांचा आधार काढून टाकता आला तर भांडवलशाही राष्ट्रांच्या मर्मावर आघात होऊन भांडवलशाहीचा विनाश ओढवेल आणि भांडवलशाही राष्ट्रात क्रांति होईल. लेनिनची एक अत्यंत प्रसिद्ध उक्ति आहे, 'लंडन आणि पॅरिसचा रस्ता पेकिंगवरून जातो.'

## साम्राज्यांचा विलय आणि लेनिनची भविष्यवाणी

प्रत्यक्ष घडलेला इतिहास काय सांगतो? लेनिनची भविष्यवाणी खरी ठरली आहे काय? एका मर्यादेपर्यंत लेनिनचे म्हणणे खरे झाले आहे. लेनिनच्या वेळच्या जगाचे ते समर्पक चित्र आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन आणि इतर पुढारलेल्या राष्ट्रातील अर्थव्यवस्थांची उभारणी अशी झालेली होती की, भांडवल गुंतवणुकीला मोकळे रान सापडावे म्हणून साम्राज्य विस्ताराचा कार्यक्रम त्यांना जोराने हाती घ्यावा लागला.

आजच्या जागतिक परिस्थितीचा आणि लेनिनच्या सिद्धांताचा मेळ बसतो काय? गेल्या सोळा वर्षात जगातील भांडवलशाही राष्ट्रांची साम्राज्ये विलयाला गेली आहेत. पूर्वीच्या साम्राज्यवादी राष्ट्रांनी आपणहून ती विसर्जित केली, तसेच काही ठिकाणी त्यांना सत्ता सोडणे भाग पडले. आज काही बारके सारके अपवाद सोडले तर साम्राज्ये संपुष्टात आली आहेत. ही एक

प्रचंड उलथापालथ आपल्या डोळ्यांसमोर घडलेली आपण पहात आहोत. एकट्या ब्रिटननेच आपल्या साम्राज्यांपैकी नऊ दशांश भागांना गेल्या सोळा वर्षांत स्वातंत्र्य बहाल केले आहे. इतिहासात सोळा वर्षांचा काळ म्हणजे काहीच नाही. आकडेच अत्यंत बोलके आहेत. १९४५ साली जगाच्या एकूण दोनशेवीस कोटी लोकांपैकी सुमारे ६० कोटी लोकांवर युनियन जॅकचे राज्य होते. तेच १९६१ साली, इंग्लंडमधली लोकसंख्या सोडली तर, जेमतेम पाच कोटी लोक इंग्लंडच्या अंकित होते. म्हणजे जवळपास ५५ कोटी लोकांना स्वायत्तता प्राप्त झाली. ब्रिटिश साम्राज्याचे विसर्जन हा एक व्यापक जागतिक स्थित्यंतराचा भाग आहे. फ्रेंच व डच ही दुसरी दोन मोठी साम्राज्ये. या साम्राज्यांचीही तीच गत झालेली आहे. इंडोचायना ते अल्जिरियापर्यंत आपले साम्राज्य टिकविण्यासाठी फ्रेंच लोकांनी अतिशय जिद्दीने लढा दिला. त्या मूर्खपणाला सीमा नाही. पण शेवटी परिणाम तोच निघाला. त्यांचे साम्राज्य हे गेलेच. हॉलंड हे एक लहानसे राष्ट्र. पण डच साम्राज्य खूप विस्तीर्ण होते. इंडोनेशियासारखा एक अफाट व समृद्ध द्वीपसमूह त्यांच्या हाती होता. तो हातचा सोडण्याची त्यांची अजिबात तयारी नव्हती. खूप शर्थीने त्यांनी आपली सत्ता टिकविण्याचा यत्न केला. पण शेवटी त्यांनाही माघार घ्यावी लागली. तेव्हा ब्रिटिशांप्रमाणे स्थूलमानाने शांततेने व गोडी-गुलाबीने आपल्या हातांनी साम्राज्य विसर्जित केले काय, किंवा नाइलाजाने आणि घनघोर रक्तपातानंतर सोडले काय, सगळ्याचा परिणाम एकच झाला. जगात वसाहतींची राज्ये जवळपास संपुष्टात आली.

लेनिन आज जिवंत असता, आणि साम्राज्यांच्या विलयाचा साम्राज्यवादी राष्ट्रांवर काय परिणाम होणार असे कोणी त्याला विचारते तर, लेनिनने निःशंकपणे उत्तर दिले असते, 'साम्राज्ये नष्ट झाली म्हणता? तर मग साम्राज्यवादी राष्ट्रातील भांडवलशाही अर्थव्यवस्थाही त्याबरोबर लयास झाल्या असतील.' साम्राज्यांच्या अभावी भांडवलशाही अर्थव्यवस्था टिकून राहू शकणार नाही याबद्दल त्याच्या मनाची पक्की खात्री होती. केवळ लेनिनचेच मत असे होते असे नाही. ब्रिटिश हुजूरपक्षीय मंडळींनीही साम्राज्य हातातून गेले तर इंग्लंड रसातळाला जाणार असे समीकरण मांडून ठेवलेले होते. एकोणिसाव्या शतकात सेसिल ऱ्होड्स नावाचा एक साम्राज्य विस्ताराचा कट्टर पुरस्कर्ता

होऊन गेला. दक्षिण आफ्रिकेवर युनियन जॅक फडकविण्यात याचीच कामगिरी बव्हंशी कारणीभूत झालेली. १८९५ साली साम्राज्यविस्ताराचा प्रचार करण्यासाठी ऱ्होड्स इंग्लंडमध्ये आलेला होता. ऱ्होडसची ठाम श्रद्धा की, इंग्लंडने साम्राज्य गमावले, किंबहुना इंग्लंडने सतत आपल्या साम्राज्याचा विस्तार केला नाही, तर इंग्लंडचा ऱ्हास होईल, ब्रिटिश लोक उपाशी मरतील, आणि इंग्लंडमध्ये राज्यक्रांती घडून येईल. आपले म्हणणे त्याने ठसठशीतपणे मांडले आहे. ऱ्होड्स म्हणतो :

> ‘ ब्रिटनमधील चार कोटी लोकात यादवी युद्धाचा भडका उडू नये असे वाटत असेल तर, या देशातील फाजील लोकसंख्येचे पुनर्वसन करण्यासाठी, या देशातील कारखान्यातून व खाणीतून तयार होणाऱ्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी, आमच्या मुत्सद्यांनी नवीन प्रदेशांवर कब्जा केला पाहिजे. साम्राज्याचे संपादन हा लोकांच्या भाकरीचा प्रश्न आहे. यादवी युद्ध तुम्हाला नको असेल तर तुम्हाला साम्राज्यवादी बनले पाहिजे. ’

सांगायचे काय तर, त्याच्या मताचा लेनिन काही एकटाच नव्हता.

पन्नास वर्षांपूर्वीची ही भविष्यवाणी आणि प्रत्यक्ष घटना यांची तुलना मी करीत आहे हे तुमच्या ध्यानात आले असेल. सोळा वर्षांच्या अल्पावधीत ब्रिटिश साम्राज्य विसर्जन पावले आहे. आता या गोष्टीचे मला स्पष्टीकरण द्या की, आज एक इंग्लंड नव्हे तर, फ्रान्स, हॉलंड, पश्चिम जर्मनी ही सर्वच राष्ट्रे दरिद्री तर झाली नाहीतच, पण त्यांच्या इतिहासात कधी नव्हती इतकी संपन्नता त्यांना लाभली आहे. काहींना या गोष्टीवर विश्वास ठेवणे कठीण जाईल; काहींना ही गोष्ट न रुचणारी असेल; पण वस्तुस्थिती नाकारता येण्यासारखी नाही. साम्राज्यांच्या उत्कर्षाच्या काळापेक्षा कितीतरी संपन्न जीवनमान या देशातील बहुसंख्य कामगार वर्ग व सर्वसामान्य जनता आज उपभोगीत आहे. साम्राज्ये गमावली तर या देशातून यादवी माजेल या लेनिन आणि ऱ्होड्स यांच्या भविष्यवाणीबद्दल काय बोलावे ? माझ्यासारख्या समाजवादी राजकारणी माणसाला या भविष्यवाणीबद्दल उपरोधिक हसू येते. अहो, यादवी युद्ध माजायचे तर दूरच राहिले, हुजूरपक्षीय उमेदवारांना मते

अनुक्रम ७३६४० वि: निबंध

१६७५ नों दि: २३-६

देण्यापासून देखील आम्ही समाजवादी ब्रिटनमध्ये मतदारांना परावृत्त करू शकलो नाही !

लेनिनची गाडी रुळांवरून कोठेतरी घसरली हे खरं. माझे म्हणणे असे की, कोणताही सिद्धांत असो, तो कितीहि क्रांतिकारक महत्त्वाचा असो, आणि तो कोण्याही मोठ्या माणसाने सांगितलेला असो, आपण प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी तो वारंवार ताडून पाहायला हवा. लेनिनचा साम्राज्यवादाचा सिद्धांत एक महत्त्वाचा सिद्धांत होय. पण प्रत्यक्ष परिस्थितीशी तुलना करता आपणाला आढळले की, लेनिनची भविष्यवाणी सपशेल खोटी ठरली. यात लेनिनला आपण हीन लेखतो आहोत असे मानण्याचे काहीच कारण नाही. शेवटी भविष्याच्या पोटात काय दडलेले आहे हे कोणीच खात्रीपूर्वक पाहू शकत नाही. पण सिद्धान्त वरचेवर ताडून न पाहण्याने मात्र फार मोठे नुकसान होते. जगातील घडामोडींसंबंधीं आपण सगळेच लहान-मोठे सिद्धांत रोज मांडीत असतो. सिद्धांत मांडण्यात चूक नाही. पण वरचेवर तपासून न पाहताच जर ते उराशी बाळगले तर ती अंध धर्मश्रद्धाच झाली. लौकिक व्यवहारांविषयीच्या सिद्धांतावरील अशा आंधळया, पूर्ण श्रद्धेतून होणाऱ्या चुकांसाठी फार जबर किंमत चुकवावी लागते.

## भांडवलशाही समाजांच्या वाढत्या वैभवाचे मर्म

भांडवलशाही समाजांच्या आर्थिक परिस्थितीत झालेली ही अपूर्व भरभराट तुम्ही चटकन् मान्य करावीत असे मी म्हणणार नाही. तुम्ही स्वतःहून माझ्या म्हणण्यातली सत्यासत्यता पडताळून पाहू शकता. असे म्हणत असता मला याची जाणीव आहे की, परकीय सत्तेच्या अंमलाची झळ तुम्ही सोसलेली आहे. साम्राज्यवादी शोषणाचे क्लेश तुम्ही भोगलेले आहेत. आमच्या हातून तुम्ही स्वातंत्र्य संपादन केल्यावरही आम्ही अगदी सुखात आहोत, आमची भरभराट होत आहे, असे सांगण्यात तुम्हाला हिणवल्यासारखे वाटण्याची शक्यता आहे हे मला कळते. आपल्या शेजारी घर बांधून चैनीत राहणाऱ्या इसमाने पूर्वी चोऱ्या करून संपत्ती मिळविलेली आहे असा शोध लागला तर आपणास काय वाटेल? धक्का बसेल, घृणा वाटेल, आणि हेवाही पण. पूर्वीच्या साम्राज्यवादी राष्ट्रांबद्दलही तुमच्या मनात अशीच काहीशी संमिश्र भावना असली तर त्यात वावगे काही नाही.

संपत्ती कोणी कशी मिळविली याच्या खोलात जाण्यापेक्षा कालची साम्राज्यवादी राष्ट्रे आज अधिकच वैभव संपन्न झाली आहेत ही वस्तुस्थिती प्रथम स्वीकारली पाहिजे. ती प्रत्यक्ष वस्तुथिती आहे, म्हणून स्वीकारली पाहिजे. या वैभवाची खुलासेवार कारणमीमांसा करण्याच्या प्रयत्नात मी शिरत नाही. प्रौढत्व प्राप्त झालेल्या भांडवलशाही समाजांनी आपल्या अर्थव्यवस्थेत मूलगामी बदल केले आहेत, हे या वाढत्या वैभवाचे मुख्य कारण आहे. उत्पन्नाचे समवाटप करण्याच्या दिशेने या देशातील भांडवलशाही अर्थव्यवस्थांनी बरीच वाटचाल केली असून त्यामुळे भांडवलशाहीचे रूप आमूलाग्र पालटले आहे. औद्योगिक कामगार व सर्वसामान्य जनता यांनी लोकशाही मार्गांनी दबाव आणल्याने उत्पन्नाच्या समवाटणीच्या दिशेने वाटचाल होऊ शकली. या ठिकाणी लेनिनच्या 'इंपिरिअलिझम' या पुस्तकातील एका उपेक्षित परिच्छेदाकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेने उत्पन्नाची समवाटणी करण्याची सुधारणा स्वीकारली तर मग भांडवलशाही राष्ट्रांना साम्राज्यांच्या आधाराची आवश्यकता उरणार नाही असे त्यात लेनिनने म्हटले आहे. लेनिनच्या प्रतिभेची व सूक्ष्म दृष्टीची ही साक्ष आहे. त्याच्या बुद्धीने ही शक्यता अजमावली. तसे त्याने लिहूनही ठेवले. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात भांडवलशाही राष्ट्रे या सुधारणेचा स्वीकार करणार नाहीत असे लेनिनने म्हटले. तरी पण, भांडवलशाही राष्ट्रांना साम्राज्यांचा आधार लागणार नाही अशी भांडवलशाहीची एक अवस्था असू शकते हे त्याच्या चाणाक्ष बुद्धीला दिसले होते. पुस्तकाच्या चौथ्या प्रकरणाच्या सुरवातीला लेनिन लिहितो :

'आज भांडवशाही देशातून सर्वच उद्योगधंद्यांच्या मानाने शेती फार मागासलेली आहे. सर्वसामान्य जनता अर्धपोटी असून दारिद्र्यात पिचत आहे. उद्या भांडवलशाही राष्ट्रांनी शेतीचा विकास घडवून आणला, सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सुधारले, तर, तंत्रविज्ञानातील आश्चर्यकारक प्रगती लक्षात घेऊन देखील असे म्हणता येईल की, **फाजील** भांडवलाचा प्रश्न निर्माण होणार नाही. ...... आज भांडवलाची निर्यात करावी लागण्याचे कारण असे आहे की, काही थोड्या देशात भांडवलशाही 'अति-पक्व' अवस्थेला पोचली आहे.

आणि शेतीची मागासलेली अवस्था आणि सर्वसामान्य जनतेची दारिद्र्यावस्था या कारणांमुळे भांडवलाची **किफायतशीर** गुंतवणूक करण्यास मोकळीक उरलेली नाही.

ज्या सुधारणांच्या आवश्यकतेचे प्रतिपादन लेनिनने केले त्या सुधारणा प्रत्यक्षात भांडवलशाही राष्ट्रात घडून आलेल्या आहेत. या सुधारणा झाल्यानंतर भांडवल निर्यातीची गरज उरणार नाही आणि स्वाभाविकच त्या स्थितीत साम्राज्य संपादन आवश्यक राहणार नाही; त्या दिशेने दबाव निर्माण होणार नाही. लेनिनचे हे आर्थिक विश्लेषण अचूक होते. राजकीय प्रवाहांबाबतचे त्याचे निदान मात्र चुकले. उदारमतवादी राज्यात लोकशाही मार्गांनी जनता भांडवलशाहीत मूलभूत बदल घडवून आणू शकेल या जनतेच्या राजकीय शक्तीचा अंदाज त्याला बांधता आला नाही. सर्वसामान्य जनतेला कधी राजकीय शक्ती प्राप्त होईल याचीच कल्पना त्याला येऊ शकली नाही.

## कम्युनिस्टांचे स्पष्टीकरण

सरम्राज्यवादी राष्ट्रांच्या अलीकडील भरभराटीचे कम्युनिस्ट मंडळी दुसरेच स्पष्टीकरण देतात. ते काय म्हणतात ?

एखाद्या कम्युनिस्टाला तुम्हीं या सर्व प्रश्नांची उत्तरे विचारलीत तर तो माझ्यापेक्षा सर्वस्वी वेगळे स्पष्टीकरण तुम्हाला देईल. साम्राज्यांचा आधार न घेता स्वतःची भरभराट करून घेण्याची युक्ती भांडवलशाही राष्ट्रांनी हस्तगत केली आहे हा दावा तो नाकारील. साम्राज्यांच्या विसर्जनाची घटना ही फसवी आहे, ती केवळ ‘धूळफेक’ आहे, इतके सोपे उत्तर त्याच्या तोंडून येईल. पूर्वीच्या वसाहतींना मिळालेले स्वातंत्र्य हा केवळ तोंडावर धरण्याकरिता कागदी मुखवटा असून या ‘स्वतंत्र’ राष्ट्रांची पूर्वीइतकीच पिळवणूक बिनघोरपणे चालू असल्याचे तो सांगेल. कम्युनिस्टांच्या मते भारत, मलाया या राष्ट्रांना वरकरणीच, दाखवण्यापुरते, स्वातंत्र्य मिळालेले आहे. हे काही सच्चे स्वातंत्र्य नव्हे. साम्राज्यांचा आधार सोडून दिल्यावरही साम्राज्यवादी राष्ट्रांची होणारी भरभराट ही भांडवलशाहीच्या सुधारणेमुळे होत नसून नामधारी स्वातंत्र्याच्या मुखवट्याआड पूर्वीच्या वसाहतींचे अधिक मुक्तपणे व जोराने शोषण व लूट चालविता येत असल्याने शक्य झालेली आहे असे

कम्युनिस्टांचे मत. '**ब्रिटन अँड द क्रायसिस ऑफ द ब्रिटिश एम्पायर**' या नांवाच्या आपल्या पुस्तकात रजनी पामदत्त या ब्रिटनमधील अग्रगण्य कम्युनिस्ट विचारवंताने नेमके असेच प्रतिपादन केले आहे, अमेरिकन प्रोफेसर पॉल बरन या मार्क्सिस्ट गृहस्थांनी '**द पोलिटिकल इकॉनॉमी ऑफ ग्रोथ**' या आपल्या पुस्तकातही हाच दृष्टिकोन मांडला आहे. या कम्युनिस्ट प्रतिपादनावर आपल्याजवळ काही उत्तर आहे का ?

परवाच इथे झालेल्या एका परिसंवादात याच अर्थाचा पुढील प्रश्न मला विचारण्यात आला : 'भारत स्वतंत्र झाल्यानंतरच्या काळात ब्रिटन आणि भारत यांच्यातील आर्थिक संबंधात झालेल्या बदलांसंबंधी तुमचे काय स्पष्टीकरण आहे ?' प्रश्नकर्त्यांच्या मनात असा काही बदल खरोखरी झाला का ? अशीच शंका होती हे प्रश्नावरूनच स्पष्ट दिसत होते. असा प्रश्न कोणी मला केला की, त्याला पुढील प्रतिप्रश्न करावा असे नेहमी मला वाटते. 'भारत स्वतंत्र झाल्यानंतर ब्रिटन व भारत यांच्यातील स्वातंत्र्यापूर्वीच्या संबंधातले कोणते भाग **कायम** राहिले आहेत ते आपण सांगाल काय ?'

## भारताचे स्वातंत्र्य : सच्चे की नकली ?

स्वातंत्र्यापूर्वी हिंदुस्थान सरकार काय करू शकत नव्हते त्याची यादी डोळ्यांसमोर आणा. मुळात म्हणजे हिंदुस्थान सरकार हिंदी लोकांचे नव्हतेच. हिंदुस्थान सरकारातील नेमणुका इंग्लंडमधून केल्या जात. वरिष्ठ नोकरवर्ग सगळा ब्रिटिश होता. पण, ब्रिटिश सरकारनेच नेमलेले असूनही, हिंदुस्थान सरकारला कोणतेही कर, ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या परवानगीशिवाय बसविता येत नव्हते की करांचा दर ठरविता येत नव्हता. प्रत्येक लहान सहान गोष्टीकरता इंग्लंडमधील साहेबाची स्वतंत्र परवानगी घ्यावी लागे. आयात-निर्यात होणाऱ्या मालावर जकात बसवायची तर जकातीचे दरही ठरवायची हिंदुस्थान सरकारला परवानगी नव्हती. लँकेशायरच्या गिरण्यातील कापडावर आयातबंदी टाकणे किंवा जकात बसविणे या करता ब्रिटिश सरकारची परवानगी अगोदर घेतल्याशिवाय काही करण्याची हिंदुस्थान सरकारची प्राज्ञा नव्हती. आयातींवर स्वतंत्र भारत सरकारने नियंत्रणे बसविली आहेत तशी नियंत्रणे बसविण्याचा विचार देखील त्या वेळच्या हिंदुस्थान सरकारला

शिवला नसेल. ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या परवानगीशिवाय परदेशात कर्जे उभारण्याचा अधिकार नव्हता; इतकेच काय, पण एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांनी जी जमीनदारी पद्धत उत्तर हिंदुस्थानात निर्माण केली त्यात देखील त्या वेळच्या हिंदुस्थान सरकारला काही अदल बदल स्वतःच्या इच्छेने करता आला नाही. १९४७ पूर्वी परिस्थिती अशी होती.

१९४७ नंतरचे भारताचे सरकार सर्वस्वी भारतीयांचे आहे. वर उल्लेखिलेल्या पैकी सर्व गोष्टी ते आपल्या अधिकारात करू शकेल, नव्हे करीत आहेच. लँकेशायरचे कापड हिंदी लोकांच्या इच्छेविरुद्ध एक यार्डभर देखील भारतात आयात करता येत नाही. फार थोडे परदेशी कापड आज भारतात आयात होते. कापड आयात करण्याऐवजी, आपल्याजवळ असलेल्या तुटपुंज्या परदेशी चलनाचा उपयोग उद्योगधंदे उभे करण्यास आवश्यक ती यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी भारत सरकारने करावा हे सर्वस्वी वाजवी आहे. ब्रिटन किंवा इतर जगापासून ते उपभोग्य वस्तूंची आयात अगदी किमान करतात. सर्व प्रकारच्या आयातींवर कडक नियंत्रणे भारत सरकारने बसविलेली आहेत. जमीनदारी पद्धती त्यांनी भारतभर नष्ट केलेली आहे. आपल्या देशाच्या विकासाकरता पंचवर्षीय योजनांची मालिका ते आखीत आहेत. सध्या तिसरी पंचवार्षिक योजना तेथे राबविली जात आहे. भारताचे औद्योगीकरण घडवून आणणे हे या योजनांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

ब्रिटन आणि भारत यांच्यामधील आर्थिक संबंधात काही बदल झालाच नाही असे म्हणणे म्हणजे जाणूनबुजून अगदी उघड असलेल्या गोष्टींकडे पाठ फिरविणे आहे. सिद्धांतावरील श्रद्धा माणसाला किती आंधळे बनवू शकते त्याचे हे उदाहरण आहे. एखादा सिद्धांत प्रथम मांडला गेला त्या वेळी तो अचूक लागू पडत असेल. तो सिद्धांत शोधून काढणारी व्यक्ती थोर प्रतिभावंत असेल; पण म्हणून पन्नास वर्षांनंतरच्या घटना अचूकपणे वर्तविण्याची जादू त्या सिद्धांतात असेल असे का मानावे? सिद्धांताची झापड आपल्या डोळ्यांवर बांधून न घेतलेल्या माणसाला १९४७ पूर्वी भारत ही एक ब्रिटिश वसाहत होती हेही सांगावे लागत नव्हते आणि आज भारत हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे हेही त्याला पटवून द्यावे लागत नाही. त्याला ती गोष्ट प्रत्यक्ष दिसतेच आहे.

एखादे राष्ट्र आपल्या अखत्यारात युद्ध करू शकते किंवा नाही ही त्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याची निर्णायक कसोटी मानता येईल. हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचे प्रभावी दर्शन एका युद्धाचे प्रसंगी झाले ही मोठी नामी गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या जनतेला वा सरकारला विश्वासात न घेताच १९३९ साली ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानने जर्मनीबरोबर युद्ध पुकारल्याचे जाहीर केले. ब्रिटिश सरकारच्या मूर्खपणाचा हा कळस झाला. माझ्या अनेक भारतीय मित्रांनी ही गोष्ट सांगितलेली आहे की, त्या वेळपर्यंत काँग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनापासून दूर राहणाऱ्या अनेक सुशिक्षित हिंदी नागरिकांना या घटनेने ब्रिटिशांपासून पूर्ण स्वातंत्र्य संपादन करण्याची गरज प्रथम मनोमन पटली. आज भारताच्यावतीने युद्ध जाहीर करण्याचे ब्रिटिश सरकार मनातही आणू शकणार नाही.

## नवोदित राष्ट्रांचे स्वातंत्र्य सच्चे

पूर्वीच्या वसाहती या अगदी बाळबोध आणि मूलभूत अर्थाने पूर्णपणे स्वतंत्र झालेल्या आहेत. भारताचे उदाहरण घेतले कारण भारत ही जगातली पहिल्या नंबरची वसाहत होती. माझे भाषण ऐकत असताना तुमचेपैकी काही जण मनात एकीकडे काय म्हणत असतील याची मला कल्पना करता येते. मीच तुमच्या मनातील भावना व्यक्त करतो. भारताच्या स्वातंत्र्याची जी खूण मी पटविली त्या अर्थाने आज सिंगापूरला स्वातंत्र्य मिळालेले नाही हे खरे आहे. पण सिंगापूरच्या स्वायत्ततेची ही मर्यादा कोणापासून लपवून ठेवलेली नाही की ती कोणी नाकारीत नाही. मी केलेल्या व्याख्येनुसार सिंगापूर खाचितच स्वातंत्र्य संपादण्याच्या मार्गावर आहे. हे स्वातंत्र्य ते केवळ स्वतःपुरते अलग मिळवील किंवा दुसऱ्या स्वतंत्र राष्ट्राबरोबर संयुक्त राज्य म्हणून मिळवील, ( त्याला संयुक्त राज्य म्हणावयाचे की फेडरेशन ते तुम्हीच ठरवा, ) पण सिंगापूरला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय रहात नाही. एकट्याने स्वातंत्र्य हवे की मलायाबरोबर संयुक्त राज्य स्थापन करायचे, की अधिक मोठे संघराज्य स्थापन करावयाचे, हा निर्णय तुमचा आणि, फारतर, मलाया किंवा ज्या राष्ट्रांबरोबर तुम्ही संबंध प्रस्थापित करणार असाल त्या राष्ट्राचा आहे. त्या बाबतीत मी काही म्हणू इच्छित नाही. तुमच्या सरकारने तयार

केलेल्या पंचवर्षीय योजनेचे दर्जेदार पुस्तक मी सध्या वाचीत आहे. देशाचे औद्योगिकरण आणि सर्वसाधारण विकास याची योजना तुमच्या सरकारने तयार केलेली आहे. संपूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. तुमचे भवितव्य शेवटी काय आहे त्या संबंधी काही मी बोलावे यात मर्यादेचे उल्लंघन होईल. मी एवढेच म्हणेन की, तुमच्या सिंगापूरमध्ये स्वातंत्र्याचा पाया घातला जात आहे.

वसाहतींना स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्या देशांचे आर्थिक शोषण साम्राज्यवादी राष्ट्रांकडून होतच राहते. या अर्थाची जी वेगवेगळी विधाने कम्युनिस्टांकडून केली जातात त्या पैकी सर्वच विधानांचे मी खंडन केलेले नाही याची मला जाणीव आहे. ज्या राष्ट्राकडून किंवा कंपनीकडून नवोदित स्वतंत्र राष्ट्र भांडवलाची आयात करते त्या राष्ट्राकडून किंवा कंपनीकडून नवजात राष्ट्राचे शोषण होऊ शकेल ही गोष्ट खरी. ही शक्यता मी केव्हाच नाकारणार नाही. उलट, एखादे अननुभवी नवजात स्वतंत्र सरकार बाहेरून फार मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आयात करते, आणि अशी आयातीची आवश्यकताही टाळता येत नाही, तेव्हा हा सौदा अंगावर उलटून त्या राष्ट्राचेच शोषण होण्याचा संभव असतो. सिंगापूरमधील तुम्हां मंडळींपैकी काहींना असे काही घडेल अशी भीती वाटत असल्याचे मी पाहतो. पण तुमच्या सरकारलाही भांडवलाची नितांत गरज आहे आणि कोठून तरी हे भांडवल आयात करूनच ही गरज भागवावी लागणार हीहि गोष्ट उघड आहे.

या मुद्यावर तुम्ही माझा सल्ला विचारलेला नाहीत. तरी पण जाता जाता तुमच्या परवानगीने एक गोष्ट मी तुम्हास सांगू इच्छितो. परकी भांडवलाच्या आयातीमधून तुमचे शोषण होण्याची, तुमचे स्वातंत्र्य बंदिस्त होण्याची मला स्वतःला फारशी भीती वाटत नाही. इथले स्थानिक सरकार कर्तबगार व सुप्रतिष्ठित आहे. स्थानिक सरकार नालायक असले तर असा गैरफायदा घेतला जाण्याचा धोका असतो. पण, समजा, या बाबतीत तुम्हाला खबरदारी घ्यायची आहे. जितके सर्वदूर तुम्हाला भांडवलाकरता जाळे टाकता येईल तितके तुम्ही टाकावेत हा यावरील हमखास उपाय आहे. कोणा एका एजन्सीवर वा राष्ट्रावर तुम्ही स्वतःला अवलंबून ठेवू नये. फक्त भांडवलशाही राष्ट्रांकडूनच उसनवारी करायची अशी मर्यादा घालून न घेणे तुमच्या हिताचे

ठरले असते असे मला वाटते. कम्युनिस्ट, बिगर कम्युनिस्ट, पाश्चिमात्य-पौर्वात्य, जगातल्या राष्ट्रांपैकी जे द्यायला तयार आहेत त्यांच्याकडून भांडवल तुम्ही आयात करावेत. अनेक ठिकाणांहून तुम्ही भांडवल घेतलेत तर कोणी एक गट किंवा राष्ट्र तुमच्या दौर्बल्याचा गैरफायदा उठवू शकणार नाही असे मला वाटते. स्वातंत्र्य हस्तगत केल्यावरही अशा शोषणाचा, दगाबाजीचा धोका असतो हे काही खोटे नाही.

राजकीय स्वातंत्र्य पुरेसे नाही इतपत मला कम्युनिस्टांच्या टीकेत तथ्य दिसते. राजकीय स्वातंत्र्य ही मुख्यतः एक संधी आहे. राष्ट्राचे पुनरुत्थान घडवून आणण्याची, राष्ट्र सुसंपन्न करण्याची, राष्ट्र उद्योगधंद्यांनी समृद्ध करण्याची, संधी राजकीय स्वातंत्र्याने उपलब्ध होते. पण या संधीचा पूर्ण लाभ उठविला पाहिजे. संधी जर का दवडली तर राजकीय स्वातंत्र्य हे केवळ एक बाह्य आवरण म्हणून शिल्लक राहते. राजकीय स्वातंत्र्याच्या नावाखाली आपल्याला चक्क नागवले जात आहे अशी लोकांची भावना प्रसंगी बनते. हेच का ते स्वातंत्र्य असा प्रश्न लोकांना पडतो. ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ प्रा. गुन्नार मिर्दाल यांनी अलीकडेच सिंगापूरला भेट दिल्याचे मला समजले. **'इकॉनॉमिक थिअरी अँड अंडर डेव्हलप्ड रीजन्स'** या आपल्या पुस्तकात हा मुद्दा त्यांनी फार नेटकेपणाने मांडला आहे. ते लिहितात :

> राजकीय स्वातंत्र्य प्राप्त होण्याआधी जरी कल्पना वेगळी असली तरी, राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर दरिद्री आणि मागासलेल्या राष्ट्राच्या लौकरच स्पष्टपणे लक्षात येते की, राजकीय स्वातंत्र्य आर्थिक विकासाच्या प्रयत्नात काडीचाही भार हलका करू शकत नाही.

पण राजकीय स्वातंत्र्याचे महत्त्वही श्री. मिर्दाल स्पष्ट करतात. ते लिहितात :

> 'जे राजकीय स्वातंत्र्य त्यांना नुकतेच मिळाले आहे, किंवा मिळविण्याच्या मार्गावर नवीन राष्ट्रे आहेत, ती त्यांची अतिशय मौल्यवान जिंदगी आहे. कारण आपल्या हितसंबंधाची जपणूक करणारी समाजाची संघटना बांधण्याचे स्वातंत्र्य त्यांना मिळते. जगात वेगवेगळी सार्वभौम राष्ट्रे आहेत तोवर या राष्ट्रांचे धोरण राष्ट्रवादीच असणार. या अर्थाने राष्ट्रवादी की, त्यांचे सर्व प्रयत्न आपल्या देशाची आर्थिक

प्रगती घडवून आणण्यावर आणि जगातील इतर राष्ट्रांशी बरोबरी करण्यावर केंद्रित होणार. आंतरराष्ट्रीय हितसंबंध लक्षात घेण्याचे काम गरीब राष्ट्रांचे नाही. त्यांच्या स्वार्थाचे असतील तेवढेच आंतरराष्ट्रीय हितसंबंध ते मानतील.'

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या या अर्थशास्त्रज्ञाच्या म्हणण्याने तुम्हांला हुरूप यावा. सर्व शक्ती पणाला लावून आपली वाढ करून घेण्याचे गरीब राष्ट्रांचे एकमेव कर्तव्य आहे. देशोदेशींची तज्ञ मंडळी येऊन 'व्यापक आंतरराष्ट्रीय हितसंबंधा'चा विचार करण्याचा उपदेश तुम्हाला करतील त्याकडे तुम्ही खुशाल दुर्लक्ष करावेत. जगाच्या अविकसित राष्ट्रांनी प्रथम आणि अंतिमतः आपल्या स्वतःच्या हितसंबंधांचाच विचार करावा.

तेव्हा, सरतेशेवटी मी असे म्हणेन की, राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावरही स्वतंत्र राष्ट्रांचे शोषण करणाऱ्या, राष्ट्राचे स्वातंत्र्य बंदिस्त करणाऱ्या, विशिष्ट घटना घडू शकतात हे कम्युनिस्टांचे प्रतिपादन मर्यादित अर्थाने खरे आहे. पण नवजात स्वतंत्र राष्ट्रातील सरकार या धोक्यापासून स्वतःचे संरक्षण करू शकते. अगदीच दुर्बल व नालायक सरकारची गोष्ट सोडली तर, हा धोका इतरांना न टाळतां येण्यासारखा खचित नाही.

पाश्चिमात्य जगातील जुनी भांडवलशाही राष्ट्रे अलीकडच्या वीस वर्षांत कल्पनेच्या बाहेर समृद्ध झाली आहेत हे आपण वर पाहिले. नवजात स्वतंत्र राष्ट्रांचे अद्यापही कोठे कोठे शोषण होत आहे त्याच्याशी या समृद्धीचा संबंध जोडण्याचा प्रयत्न काही मंडळींकडून केला जातो. या शोषणाचे परिमाण इतके अल्प आहे की, अशा दांत कोरण्याने पाश्चिमात्य राष्ट्रे श्रीमंत होऊ शकली नसती. या साठी मी आकडेवारीपण सादर करू शकेन. पुढारलेल्या भांडवलशाही राष्ट्रांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही जर का मागासलेल्या राष्ट्रांच्या शोषणातून झालेली असती तर, आज होत असलेल्या वसाहतवादी शोषणाचे, त्या कल्पनेतील शोषणाशी तुलनाच होऊ शकत नाही, इतके प्रचंड आकारमान त्या पिळवणुकीचे असते. प्रचंड प्रमाणावरील अंतर्गत भांडवल गुंतवणूक हे पाश्चिमात्य भांडवलशाही राष्ट्रांच्या वाढत्या समृद्धीचे खरे कारण आहे. यात आम्ही आमचा स्वार्थ पहात आहोत असा आरोप तुम्ही करू शकाल. एवढे मात्र खरे की, बचती-

पैकी पूर्वीच्या मानाने पुष्कळ मोठा हिस्सा आम्ही आमच्या देशातच गुंतवण्यासाठी राखून ठेवल्याने आमचा लाभ झाला आहे. साम्राज्यवादाचा विस्तार होत असताना भांडवलाची फार मोठ्या प्रमाणावर निर्यात झाली. त्याच्या नेमकी उलटी घटना आज घडत आहे. तेव्हा, आज जे घडत आहे त्याला साम्राज्यवाद तरी खासच म्हणता येणार नाही.

## कम्युनिष्टांचे पोथीनिष्ट शब्दप्रामाण्याचे आंधळेपण

आणखी एक उत्तम प्रमाण देऊन आजचे माझे व्याख्यान मी संपविणार आहे. १९५२ साली स्टालिनने '**इकॉनॉमिक प्रॉब्लेम्स ऑफ सोशलिझम इन् यू. एस्. एस्. आर.**' ही आपली पुस्तिका प्रसिद्ध केली. स्टालिनने जगापुढे ठेवलेला हा शेवटचा विचार. ते स्टालिनचे 'राजकीय मृत्युपत्र' होते असे म्हणायला हरकत नाही. आयुष्याच्या अखेरीस त्याला दिसत असलेल्या जगाचे चित्र या पुस्तिकेत आहे. पण त्याला दिसत असलेले जग प्रत्यक्षापेक्षा सर्वस्वी वेगळे होते. त्या शेवटच्या दिवसातही लेनिनिस्ट सिद्धांताच्या जाड भिंगातूनच तो जगाकडे पाहत होता. जग आहे तसे पाहण्यास तो असमर्थ होता. अमेरिकेच्या टाचांखाली इतर सर्व भांडवलशाही राष्ट्रे चिरडली जात आहेत. अशीच त्याची बालंबाल खात्री होती. स्टालिन लिहितो :

> पश्चिम युरोप, जपान आणि इतर भांडवलशाही राष्ट्रांपुढे अमेरिका भिकेचा तुकडा टाकीत आहे. पश्चिम जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली आणि जपान ही अमेरिकेच्या मगरमिठीत सापडली आहेत. जर्मनी व जपान ही प्रमुख शरणागत राष्ट्रे अमेरिकन साम्राज्यवादाच्या टाचेखाली भरडली जात आहेत. ...'

इंग्लिश माणसाच्या तोंडाची चव हा उतारा वाचत असताना कडवट होते. पश्चिम जर्मनी आणि जपान ही अमेरिकन स्टेट डिपार्टमेंटची लाडकी अनौरस संतती आहे अशी आमची समजूत आहे. दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रापेक्षा कर्ज व मदतरूपाने अमेरिकेने या दोन राष्ट्रांना फार अधिक साहाय्य दिले आहे. जर्मनी आणि जपान या दोन राष्ट्रांनी ज्या जलद गतीने युद्धोत्तर कालात स्वतःचे आश्चर्यकारक पुनरुत्थान केले. त्याची बरोबरी कोणतेही राष्ट्र — कम्युनिस्ट, भांडवलशाही वा इतर — करू शकलेले नसताना

स्टालिन मात्र त्यांच्या स्थितीचे वर्णन ‘अमेरिकन साम्राज्यवादाच्या टाचेखाली विव्हळत असलेले’ असे करू लागला तेव्हा आम्हाला चिडल्यासारखे झाले. या दोन राष्ट्रांना अमेरिकेने सढळ हाताने केलेल्या मदतीमुळे आम्हाला त्यांचा स्वाभाविक हेवा वाटत आलेला आहे. अमेरिकेच्या वर्तनाबद्दल आम्ही इंग्रज किंवा युरोपियन लोक तक्रार करण्याच्या स्थितीतच नाही. अमेरिका आम्हाला भिकेचा तुकडा टाकीत होती असे स्टालिन म्हणतो. वस्तुस्थिती अशी आहे की, १९५८ पर्यंतच्या बारा-तेरा वर्षांत अमेरिकेने युरोपला कर्ज वा मदत-रूपाने चारशे कोटी डॉलर्स दिले. चारशे कोटी डॉलर्सला जर ‘भिकेचा तुकडा’ म्हणायचे असेल तर अशा भिक्षेच्या तुकड्यावर उदरनिर्वाह करायला मी एका पायावर तयार आहे! या चारशे कोटी डॉलर्सच्या ओझ्याखाली पिचण्याला मला आवडेल!

स्टालिन सारख्या निर्विवाद कर्तृत्ववान आणि व्यवहारी चाणाक्ष माणसाने वस्तुस्थितीचा इतका विपर्यास करावा ही एक मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. मार्क्सिस्ट सिद्धांतामधील शब्दन शब्द तो प्रमाण मानीत असला पाहिजे हे एकच या गोष्टीचे स्पष्टीकरण होऊ शकते. मार्क्सिस्ट सिद्धांतानुसार सर्वांत बलाढ्य भांडवलशाही राष्ट्र आपल्याहून दुर्बल असलेल्या भांडवलशाहीचे निष्ठुरपणे शोषण करीत असते. त्या अर्थी अमेरिका भांडवलशाही राष्ट्रांसकट इतर राष्ट्रांचे शोषण करीत असलीच पाहिजे. आपल्या डोळ्यांदेखत घडत असलेले वर्तमान स्टालिन पाहत नव्हताच मुळी. पोथीनिष्ठ शब्दप्रामाण्यामुळे माणसाला आंधळेपण येत असावे. याच पुस्तिकेत स्टालिनने आणखी एक अफलातून विधान केलेले आठवते. जपान-युरोपातील दुय्यम दर्जाची भांडवलशाही राष्ट्रे आणि अमेरिका यांच्यामध्ये युद्धप्रसंग ओढविण्याचा संभव अधिक; त्या मानाने कम्युनिस्ट आणि भांडवलशाही गटात युद्धाचा भडका उडण्याचा संभव कमी असे स्टालिन म्हणतो. चारशे कोटी डॉलर्सची मदत केल्याबद्दल अमेरिकेच्या विरुद्ध ब्रिटन आणि इतर राष्ट्रे बंड करून उठतील असे त्याला वाटले की काय? वस्तुस्थितीचा चमत्कारिक विपर्यास करणारी ही दृष्टी आहे. सिद्धांत माणसाची किती दिशाभूल करू शकतो याचे मला माहीत असलेले अत्यंत नामी उदाहरण म्हणून मी देतो.

शेवटी मला एक पुस्ती जोडली पाहिजे. अमेरिकेजवळ कर्तुम् अकर्तुम्

अचाट सत्ता आहे ही वस्तुस्थिती खरीच. आजवरच्या इतिहासात एका राष्ट्राचे बल इतके प्रचंड कधी नव्हते असे म्हणता येईल. आजच्या जागतिक परिस्थितीच्या कोठल्याही आढाव्यात अमेरिकेच्या या अद्वितीय बळाला असलेले मोक्याचे महत्त्व मान्य केलेच पाहिजे. या घटनेचे संभाव्य परिणाम काळजीपूर्वक अभ्यासले पाहिजेत. नवीन साम्राज्यांचा उदय झालेला भविष्यकाळात आपण पाहणार आहोत का, हा विषय मी चर्चेला घेईन त्या वेळी नव्या अमेरिकन साम्राज्यवादाचा धोका कितपत आहे त्याचाही खल करीनच. पण केवळ एका अमेरिकन साम्राज्यवादाच्या धोक्याचाच विचार मी करणार नाही तर कम्युनिस्ट – बिगर कम्युनिस्ट, पाश्चात्य – पौर्वात्य सर्वच प्रकारच्या साम्राज्यांच्या उदयाचा धोका कितपत आहे याचा विचार मी करीन. ते माझे प्रतिपादन विवाद्य ठरेल अशी माझी कल्पना आहे.

• • •

# ३ नवी साम्राज्ये निर्माण होतील काय ?

ब्रिटिश, फ्रेंच, डच या जुन्या साम्राज्यांचा अस्त झाला आहे. पण असे तर नाही की, साम्राज्यवादाचा हा अस्त नसून सम्राटपदाची वस्त्रे दुसऱ्या कोणाच्या अंगावर चढत आहेत ? अनेकांचा समज असा आहे की जुन्या साम्राज्यवादी सत्तांची जागा घेणारे एक राष्ट्र, साम्यवादी किंवा बिगर साम्यवादी, जगात उद्याला येईल. स्टालिनने तर भविष्यच वर्तविले होते की, अमेरिका आपले साम्राज्य निष्ठूरपणे सर्वदूर प्रस्थापित करील आणि त्यातून अमेरिकेचा ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी या इतर भांडवलशाही राष्ट्रांबरोबर संघर्ष उद्भवेल. साम्यवादी व बिगर साम्यवादी अशी कुस्ती न जुंपता भांडवलशाही राष्ट्रातच आपापसात युद्ध होण्याचा संभव अधिक आहे अशी त्याची पक्की खात्री होती हे आपण पाहिले आहे.

मागच्या व्याख्यानात मी असे म्हटले की वस्तुस्थितीचा अतिशय मोठा विपर्यास स्टालिनच्या हातून घडला. स्टालिनने भाकित केल्यापासून घडलेल्या सर्व घटना डोळ्यासमोर आणल्या म्हणजे आयुष्याच्या अखेरीस स्टालिन या जगापासून खूपच दूर अंतराळात वावरत असला पाहिजे हे उघड दिसते. अमेरिकेच्या टाचेखाली ब्रिटन, जपान, फ्रान्स, प. जर्मनी चिरडली जात आहेत हे बेफाट विधान आहे हे दाखवून देत असतानाच मी असेही म्हणालो की, बिगर-साम्यवादी जगामध्ये अमेरिका अद्वितीय बलाढ्य

राष्ट्र आहे. अमेरिकेचे बळ आणि तिच्या हातात एकवटलेली सत्ता लक्षात घेता नजिकच्या भविष्यकाळात एका नव्या अमेरिकन साम्राज्याचा उदय आपण पाहणार आहोत का असे प्रश्नचिन्ह मनात उभे राहते असेहि मी म्हटले. या शक्यतेचा विचार करीत असताना चीन वा रशिया या साम्यवादी राष्ट्रांकडूनहि साम्राज्यवादाचा धोका कितपत आहे याचा विचार करणे आवश्यक व हितावह ठरेल.

## अमेरिकेची साम्राज्यविरोधी परंपरा

अमेरिकेच्या बलाढ्यतेतून निर्माण होणाऱ्या धोक्याची संभवनीयता मी प्रथम विचारार्थ घेतो. अमेरिका हे विसाव्या शतकातील पहिल्या नंबरचे साम्राज्यवादी राष्ट्र आहे अशी इकडच्या लोकांची समजूत असावी असे त्यांच्याशी झालेल्या बोलण्यावरून मला वाटले.

इकडच्या लोकांचे हे मत ऐकून इंग्रज माणसाला विस्मय वाटतो. ब्रिटनला साम्राज्यवादी परंपरा आहे हे अनेक अर्थांनी खरे आहे. उदाहरणार्थ, माझ्या वडिलांनी साम्राज्याचा अभिमान मला शिकविला. ते स्वतः कट्टर साम्राज्यवादी होते, आणि साम्राज्य ही एक अभिमानास्पद, मंगल घटना आहे अशी त्यांची धारणा होती. इंग्लंडमध्ये साम्राज्यवादी परंपरा अस्तित्वात होती. पण अमेरिकेबाबत हे मुळीच खरे नाही. खुद्द अमेरिकन लोकांना तर आपण साम्राज्यवादाचे कट्टर विरोधक आहोत असे वाटते. अमेरिकन राज्यक्रांति ही साम्राज्यवादाविरोधी झालेली आद्य यशस्वी क्रांति असा पाठ अमेरिकन माणसे इतिहासाच्या वर्गात शिकतात. ते बाळकडू त्यांना मिळालेले असते. ते त्यांचे म्हणणे खरेहि आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीस अमेरिकेतील तेरा वसाहतींनी इंग्लंडविरुद्ध युद्ध खेळून आपले स्वातंत्र्य हस्तगत केले. त्यावेळपर्यंतच्या आधुनिक काळच्या इतिहासात साम्राज्याविरुद्धचा इतका मोठा हा पहिलाच लढा होय. त्यामुळे अमेरिकनांना कोणी साम्राज्यवादी म्हणून लेखले तर ते दिङ्मूढ होतात. आता हेच पहा. अमेरिकेतील आफ्रिकन अफेअर्स खात्याचे उपमंत्री श्री. मेनेन विल्यम्स आफ्रिकेतल्या दौऱ्यावर असता जिथे जातील तिथे स्वातंत्र्याचा पुरस्कार करून आले. स्थानिक आफ्रिकन समाजाचा विकास किती झाला आहे, स्वातंत्र्य सांभाळण्या-

इतके ते सुजाण झाले आहेत अथवा नाहीत, या गोष्टींचा विचार न करता सर्व आफ्रिकन राष्ट्रांना तत्काल स्वातंत्र्य दिले पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतल्याने ब्रिटिश सरकार दरबारी तीव्र नाराजी उत्पन्न झाली. खुद्द मेनेन विल्यम्सना मात्र आपण काही विशेष वक्तव्य करीत आहोत असे वाटलेहि नसावे. अमेरिकन माणूस हा स्वभावतःच साम्राज्यविरोधी भूमिका घेतो. अमेरिकन माणसाला दिसणारे स्वतःचे रूप आणि त्याची परदेशी असलेली कीर्ति यात इतके जमीन अस्मानाचे अंतर असावे ही काहीशी बुचकळ्यात टाकणारी गोष्ट आहे.

साम्राज्यविरोधाची अमेरिकन इतिहासातली ही परंपरा व तेथील सर्व-सामान्य माणसाच्या मनातली साम्राज्यवादाबद्दलची तीव्र स्वाभाविक घृणेची प्रतिक्रिया यांची किंमत तुम्ही लोकांनी शून्य लेखू नये असे मला वाटते. साम्राज्य प्रस्थापित करण्यात अमेरिकेला या परंपरेचा व लोकमानसाचा अडथळा होणार आहे. तो निर्णायक ठरेल, किंवा अमेरिका साम्राज्य कधीच प्रस्थापित करू शकणार नाही इतका प्रचळ तो अडथळा आहे, असे मी म्हणणार नाही. पण साम्राज्याची कल्पना अमेरिकन जनतेच्या गळी उतर-विणे कठीण करणारा हा संस्कार लक्षात येण्याजोगा आहे. उद्या अमेरिकन सरकारने साम्राज्य संपादनाची मोहीम काढावयाचे ठरविले तर त्यांना आपण करीत असलेले कृत्य कोणत्याहि प्रकारे साम्राज्यवादी नाही अशी लोकांची समजूत पटवून द्यावी लागेल. साम्राज्य प्रस्थापित करावयास आपण निघालो आहोत ही गोष्ट ते कधी सरळपणे सांगू शकणार नाहीत. राजकारणात अशी लोकांची दिशाभूल करणे शक्य असते हे आपल्याला माहीत आहे. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात ह्यू लाँग नावाचा एक गृहस्थ प्रभावशाली होऊन गेला. मोठा चतुर फासिस्ट होता तो. अमेरिकेत खोलवर रुजलेली लोकशाही परंपरा लक्षात घेता अमेरिका फासिस्ट होणे कधीकाळी शक्य आहे का असा प्रश्न एकदा त्याला विचारता त्याने उत्तर दिले, 'हो तर; अमेरिका फासिस्ट राष्ट्र बनण्यात अडचण काहीच येणार नाही; अमेरिकन फासिझमचे लेबल उलटे फिरवून अँटिफॅसिस्ट असे वर लिहून ठेवले म्हणजे झाले.' साम्राज्यवादाच्याहि बाबतीत शेवटी हे शक्यच नाही असे काही म्हणता येणार नाही. वरपांगी साम्राज्यविरोधी घोषणांनी अमेरिकन जनतेची भुलावण करणे

अशक्य नाही. अमेरिकन माणूस वृत्तीने अत्यंत उदार आहे हे खरे; पण त्याचबरोबर तो अशा धूर्त प्रचाराला बळी पडण्याइतका अविवेकी आहे हेहि मला कबूल केले पाहिजे.

## अमेरिकन साम्राज्यनिर्मितीच्या मार्गातील अडथळे

आपल्या बळाचा वापर करून अमेरिका स्वतःचे नवे साम्राज्य प्रस्थापित करेल असा विचार करताना यापेक्षा अधिक महत्त्वाच्या अडथळ्यांचा विचार आधी करावयास हवा. साम्राज्य प्रस्थापनेच्या वाटेत आडव्या येणाऱ्या इतर अनेक बाबी आहेत असे मला वाटते. अमेरिकन अर्थव्यवस्थेला आपल्या भरभराटीकरता, वा स्थैर्य टिकविण्याकरता, वा अस्तित्वाकरता, इतर अर्थ-व्यवस्थांना आपल्या राजकीय वर्चस्वाखाली आणण्याची आवश्यकता नाही ही दुसरी प्रतिकूल गोष्ट म्हणता येईल. १८७० ते १९१४ या दरम्यानच्या काळात साम्राज्यांच्या प्रस्थापनेचे व विस्ताराचे लेनिनप्रणीत विश्लेषण मी वर स्वीकारले आहे. परदेशात मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतविण्याची अंतर्गत आवश्यकता निर्माण होऊन भांडवलशाही समाजांनी प्रथम भांड-वलाची निर्यात केली, आणि मागाहून, ह्या भांडवलाच्या संरक्षणार्थ व विस्तारार्थ राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले; त्यातून साम्राज्यवाद निर्माण झाला, वाढीस लागला, असा लेनिनचा सिद्धान्त असल्याचे आपण पाहिले. वस्तुस्थिती आज अशी आहे की अमेरिकेतील बडी कारखानदार मंडळी वा कॉर्पोरेशन्स यांना परदेशात भांडवल गुंतविण्यात फारसा रस नाही. आपल्याच देशात किफायतशीर भांडवल गुंतवणूकीला पुरेसा वाव आहे असे त्यांना वाटते. या स्थितीची पूर्ण कारणमीमांसा करायची असेल तर मला अर्थ-शास्त्राचा इथे बराच प्रपंच करावा लागेल. सारांशाने प्रमुख कारणे सांगण्याचा प्रयत्न मी करतो. अमेरिका हा खंडप्राय देश आहे हे त्याचे एक कारण आहे. पण त्याहिपेक्षा एकोणिसशेतिशीत, 'न्यूडील'च्या जमान्यात, ज्या सामाजिक सुधारणा झाल्या त्या सामाजिक सुधारणांनी मूलभूत परिवर्तन घडून आले. अमेरिकेत मजूर संघटना, अमेरिकन शेतकरी आणि 'न्यू डील'चे प्रवर्तक यांनी राष्ट्रीय उत्पन्नाचे पूर्वीपेक्षा अधिक समान फेरवाटप घडवून आणले नसते, १९२० मध्ये उत्पन्नाचे वाटप जितके विषम होते तितकेच ते विषम

राहिले असते, आणि श्रीमंत-गरीब यांच्यामधील अंतर त्या काळाइतकेच प्रचंड राहिले असते, तर, अमेरिकेतील अंतर्गत बाजारपेठ फार मर्यादित व लहान राहिली असती. त्या परिस्थितीत, परदेशात प्रसार पावल्याखेरीज अमेरिकन अर्थव्यवस्थेचे स्थैर्य टिकले नसते, वाढ झाली नसती. पण 'न्यू डील'चा अवतार अमेरिकेत झाला, त्यातून अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रभावीपणे फेरवाटप झाले. भांडवल गुंतवणूकीच्या मार्गाने परदेशातून अर्थव्यवस्थेचा विस्तार प्रचंड प्रमाणावर न करताहि अमेरिकेची अर्थव्यवस्था भरभराट पावू शकेल, स्थिर राहील, याकरता हे फेरवाटप पुरेसे क्रांतिकारक परिणाम करणारे होते असे माझे मत आहे. अमेरिकेतील धनाढ्य व्यक्ति आणि कॉर्पोरेशन्स यांच्या वक्तव्यात आणि निवेदनात या वस्तुस्थितीचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. त्यांना परदेशात भांडवल गुंतविण्याची ओढ आहेसे दिसत नाही आणि म्हणून साम्राज्य संपादण्याची महत्त्वाकांक्षाहि त्यांच्यामध्ये आढळत नाही.

## खनिज तेलधंद्याचा एक ठळक अपवाद

या सर्वाला एक ठळक अपवाद आहे; तो खनिज तेलाच्या उद्योगधंद्याचा. अमेरिकेच्या भूमीत असलेल्या खनिज तेलाच्या साठ्यापासून निघणारे तेल हे तुलनेत महागडे पडत असल्याने तेल कंपन्या मात्र परदेशात भांडवल गुंतवणूक करण्याबद्दल उत्सुक आहेत. आणि या मंडळीत खास मासलेवाईक साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षा आढळास येते; खनिज तेलाच्या उद्योगधंद्यात अमेरिकेचे हितसंबंध जिथे गुंतलेले आहेत त्या प्रदेशात अमेरिकन सरकारला साम्राज्यवादी धोरणे पत्करण्याच्या दृष्टीने दडपण सतत राहिलेले आहे ही गोष्ट खरी. पण अमेरिकन अर्थव्यवस्थेतील असंख्य उद्योगापैकी खनिज तेलाचा उद्योग हा केवळ एक उद्योग आहे आणि बाकीच्या उद्योगधंद्यांचे अशा स्वरूपाचे दडपण अमेरिकन सरकारवर निर्माण झालेले नाही; वा तसे तें निर्माण करण्याच्या दृष्टीने अमेरिकन उद्योगपतीमध्ये वारे वाहत आहेत असेहि आढळत नाही. खनिज तेल उद्योगासारखी अपवादात्मक उदाहरणे आणखीहि काही आहेत. उदाहरणार्थ, मध्य अमेरिकन राष्ट्रात युनायटेड फ्रूट कंपनी या अमेरिकन कंपनीची अमेरिकन सरकारच्या संरक्षणाने केलेल्या साम्राज्यवादी कारवायासाठी कुप्रसिद्धी आहे. ( अलिकडे या कंपनीच्या या

कारवायांना प्रभावी पायबंद घातल्याच्या महत्त्वपूर्ण घटना घडल्या आहेत. ) अशी काही अपवादभूत उदाहरणे आणखीहि देता येतील. पण अमेरिकन उद्योगपति आणि कार्पोरेशन्सचे लक्ष मुख्यत्वेकरून आपल्याच देशावर केंद्रित राहिलेले आहे असे म्हणता येते.

## अमेरिका साम्राज्य संपादू शकणार नाहीं त्याची कारणे—

अमेरिका कधी साम्राज्य संपादण्याच्या मोहिमेवर निघू शकणार नाही याकरता जे दुसरे कारण मी देणार आहे ते माझ्या मते वरील कारणापेक्षा अधिक सबळ आहे. अमेरिकन लोकांच्या रक्तातच साम्राज्यवाद नाही हे माझे पहिले कारण होते. हे कारण मानसिक स्वरूपाचे आहे. पण माझ्या मते हा तिसरा अडथळा पार करणे अधिक दुरापास्त आहे. समजा अमेरिका आपल्या आजवरच्या परंपरेच्या विरुद्ध जाऊन जगात आपले साम्राज्य प्रस्थापित करायला निघाली तर अमेरिकेचे स्वागत एकोणिसाव्या शतकात झालेल्या साम्राज्यवादी सत्तांच्या स्वागतापेक्षा काही वेगळे होईल. म्हणजे त्यांना सर्व-प्रकारे विरोधच होईल. सत्तरऐंशी वर्षांपूर्वी आजच्या अविकसित राष्ट्रात राष्ट्रवादाची जाणीव आकारलेली तरी नव्हती. किंवा अत्यंत क्षीण होती. त्यामुळे इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी यांना परकीय देश आपल्या प्रभावाखाली आणणे कितीतरी सोपे होते. आज प्रत्येक भूभाग राष्ट्रवादाच्या प्रेरणेने जागृत झालेला आहे आणि ही राष्ट्रवादाची भावना अत्यंत प्रखर व वणव्यासारखी ज्वलंत आहे. मागासलेल्या राष्ट्रांचा स्वातंत्र्याचा उत्कट आग्रह स्वाभाविक आणि योग्य आहे. स्वातंत्र्याकांक्षेच्या पूर्तीतून अनेक नव्या समस्या निर्माण होतात हे खरे, पण मूलतः स्वातंत्र्याकांक्षा ही एक सर्वस्वी स्वागतार्ह गोष्ट आहे. मला नाही वाटत, परदेशी समाजावर रामराज्य करील असा शहाणा व निःस्वार्थी समाज कुठे असेल. अमेरिकेने किंवा दुसऱ्या कोणत्या राष्ट्राने साम्राज्य प्रस्थापित करावयासाठी जहाज समुद्रात सोडावयाचे म्हटले तर जगातल्या कोनाकोपऱ्यातून उसळणाऱ्या स्वातंत्र्याकांक्षेच्या तुफानी लाटांच्या प्रचंड माऱ्याला त्या राष्ट्राला तोंड द्यावे लागेल. पण या प्रतिकारावरहि मात करून अमेरिका किंवा अमेरिकेसारखे मोठे राष्ट्र साम्राज्य प्रस्थापित करू शकेल. कारण या नवोदित राष्ट्रांचे लष्करी दौर्बल्य इतके आहे की अमेरिकेने

निश्चयच केला तर रणांगणावर पराभव करून ती साम्राज्य प्रस्थापित करू शकेल. स्वातंत्र्याकांक्षा हा अडथळा अनुल्लंघनीय नाही.

साम्राज्य प्रस्थापनेच्या मार्गातील चौथा अडथळा सांगतो. या अडथळ्याचे स्वरूप तऱ्हेवाईक आहे. जागतिक परिस्थितीचे स्टालिनचे विपर्यस्त निदान मी वर दिले आहे. त्या विपर्यासातहि अणुभर सत्य होते. स्टालिनने केलेल्या विश्लेषणात बेफाट अतिशयोक्ति असली तरी इतके खरे की, जगात आज मधल्या रांकेच्या पण सामर्थ्यवान आणि मान्यवर राष्ट्रांना अमेरिकेचा साम्राज्य-विस्तार खपणार नाही. आणि अमेरिकेने प्रयत्न केलाच तर अमेरिकेचा प्रयत्न हाणून पाडण्यात विरोधी शक्तींना ते शक्य तितकी मदतच करतील.

## अमेरिका साम्राज्य स्थापील म्हणणे आततायीपणाचे

अमेरिकेच्या साम्राज्य विस्ताराला पाचवा अडथळा जगात असलेल्या दोन बलाढ्य साम्यवादी शक्तिकेंद्रांचा आहे. रशिया एक बलाढ्य बृहद्राष्ट्र आहे आणि उद्या चीनहि त्या मालिकेत जाऊन बसण्याची शक्यता आहे. या वस्तुस्थितीमुळे अमेरिकेला आपले साम्राज्य निर्माण करणे फार जड जाईल. अमेरिकेच्या महत्त्वाकांक्षांना मुरड घालणारे ते एक अत्यंत महत्त्वाचे कारण आहे हे मी क्षणभरहि नाकारीत नाही. असा थोडासाहि प्रयत्न अमेरिकेने केला तर ही दोन बृहद्-राष्ट्रे सर्व शक्तिनिशी अमेरिकेचा प्रतिकार करतील याविषयी शंका नाही. जगात एकापेक्षा अधिक, दोनतीन बृहद्राष्ट्रे असल्याचा फायदा असा की लहान राष्ट्रांना स्वतंत्र आणि स्वायत्त राहण्याची संधि व शक्यता प्राप्त होते. नेहमीच हे घडत आले आहे. दुर्बल, लहान राष्ट्रे दोन विरोधी बृहद्राष्ट्रातील तणाव्यावर आपल्या स्वातंत्र्याचा तोल सांभाळून असतात. कांहींच्या मते अशी स्वायतत्ता ही अनैतिक गोष्ट आहे. उदाहरणार्थ, भारत आणि इतर तटस्थ राष्ट्रांनी साम्यवादी आणि पाश्चिमात्य राष्ट्रांच्या झगड्यापासून स्वतःला अलिप्त ठेवले, आपली तटस्थता जाहीर केली, या गोष्टीचा जॉन फॉस्टर डलेस यांना केवळ रागच होता असे नाही ; त्यांच्या मते ही तटस्थता अनैतिक होती; ते एक पाप होते. वस्तुतः, जुना इतिहास चाळून पाहिलात तर तुम्हांला असे आढळेल की, लहान व दुर्बल राष्ट्रांनी नेहमीच मोठयांच्या भांडणापासून अलिप्त राहून स्वतःचे अस्तित्व सांभाळले

आहे. तटस्थतेत आपले हित आहे हे न ओळखणारी राष्ट्रे आज गाढवच ठरली असती.

अमेरिकेने मनावर घेतले तर अमेरिकेला जगात साम्राज्य प्रस्थापित करणे शक्य आहे अशी भूमिका चटकन् घेणे हे आततायीपणाचे का होईल त्याची पाच कारणे मी वर दिली. अमेरिकेतील लोक " सज्जन " आहेत की " दुर्जन " या गोष्टीवर वरील प्रतिपादन व विश्लेषण अवलंबून नाही, यावर मला भर द्यावासा वाटतो. आपणा सर्वांसारखेच अमेरिकन लोक आहेत. अमेरिकेतील अठरा कोट लोक देवहि नाहीत, दैत्यहि नाहीत; ती साधी माणसे आहेत. योगायोगाने इतिहासाच्या प्रवाहात या क्षणाला त्यांच्या हाती अलोट शक्ति एकवटली आहे. या शक्तीचा वापर ते कसा करतील यासंबंधीच्या शक्याशक्यतांचा आपण गंभीरपणे विचार करावा हे म्हणणे इष्ट व उचित आहे. साम्राज्यविस्ताराच्या मार्गात **अजिबातच** अडथळे नसते तर, इच्छा-अनिच्छा बाजूला राहून, नवे अमेरिकन साम्राज्य स्थापन करण्याच्या भरीला अमेरिका पडली नसतीच असे मी म्हणू इच्छित नाही. पण प्रत्यक्षात असलेले अडथळे फार कठीण आहेत; आणि म्हणून, तुमच्यापैकी काहींना अमेरिकेचा साम्राज्यविस्तार जितका सुलभसाध्य व संभाव्य वाटतो तितका तो मुळीच नाही असे मला सांगावेसे वाटते.

भावी कालात नवे साम्राज्य उदयाला येण्याची शक्यता आहे किंवा नाहीं ? ते भलेहि अमेरिकन साम्राज्य नसेल. रशियन किंवा चिनी साम्राज्य असेल. नुसता असा प्रश्न विचारला तरी साम्यवाद्यांचा आणि त्यांच्या मित्रांचा जळफळाट होतो. अशी शंका घेणारा एक तर महामूर्ख असला पाहिजे किंवा साम्यवादी समाजाची नालस्ती करण्याचा विडा तरी त्याने उचललेला असला पाहिजे असे साम्यवादी म्हणणार. त्यांच्या मते साम्यवादी वा समाजवादी समाज हा स्वभावतःच साम्राज्यविस्ताराच्या विरोधी आहे. जो साम्राज्यवाद प्रस्थापित करेल तो समाज साम्यवादी नाहीच; आणि अर्थातच मग, जो साम्यवादी आहे तो समाज कधीहि साम्राज्यवादी असणे शक्यच नाही. साम्राज्यवादाची लेनिनने केलेली व्याख्या मान्य केल्यास वरील विधान तर्कशुद्ध आहे असे म्हणावे लागते. आपल्या नागरिकांचा परदेशांशी असलेला व्यापार वा परदेशातील आपली भांडवली गुंतवणूक सुरक्षित राखण्यासाठी एखादे राष्ट्र

जी कारवाई करते तिला उद्देशूनच केवळ साम्राज्यवाद हा शब्द तुम्ही वापरणार असाल तर अर्थातच कोणतेहि साम्यवादी राष्ट्र कधीहि साम्राज्यवादी असू शकत नाही. कारण साम्यवादी राष्ट्रातील नागरिकांना परदेशात भांडवल गुंतविण्याचा किंवा परदेशांशी व्यापार करण्याचा अधिकार मुळातच नसतो. साम्राज्यवादाची अशी संकुचित व्याख्या तुम्ही जर केलीत तर त्या व्याख्येच्या चौकटीत बसणाऱ्या साम्राज्यवादाकडे रशिया वा चीन यांची प्रवृत्ति कधी होणार नाही हे उघडच आहे.

## रशियन वा चिनी साम्राज्यवाद

एके काळी हा सिद्धांत मी खरा मानीत असे. पण गेल्या वीस वर्षांच्या काळातील प्रत्यक्ष घटनांनी हा सिद्धांत खोटा पाडला आहे. रशियन आणि चिनी सरकारची धोरणे आणि कृती याकडे पाहिल्यावर या दोन्ही राष्ट्रांमध्ये इतर राष्ट्रांप्रमाणेच साम्राज्यवादी आकांक्षा वास करीत आहेत याबद्दल माझी खात्री पटली आहे. या पेक्षा अधिक माझे म्हणणे नाही. सामान्यतः इतर बृहद्राष्ट्रांप्रमाणेच आपल्या वर्चस्वाच्या कक्षेत येणाऱ्या लहान, दुर्बल राष्ट्रांवर हुकमत गाजविण्याची, त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याची प्रवृत्ती या राष्ट्रांजवळही आहे माझ्या या म्हणण्याला पुरावा काय? पुराव्यातला मोठा हिस्सा सोव्हिएट रशियाच्या कृतींपासून मिळतो. ज्येष्ठ आणि प्रौढत्वास पोचलेल्या साम्यवादी समाजाचे रशिया हे उदाहरण आहे. रशियाच्या पश्चिम सरहद्दीवरील लहान व दुर्बल राष्ट्रे गेली सोळा वर्षे रशियाच्या कक्षेत आहेत. मी स्वतः युरोपियन असल्याने, आणि या प्रदेशात हिंडलेलो असल्याने, या काळांत घडलेल्या घटना माझ्या डोळ्यांदेखत घडलेल्या आहेत. माझ्या अधिक परिचयाच्या आहेत. स्वाभाविकपणे जगाच्या या भागात घडलेल्या घटनांबद्दलच मी अधिक बोलेन. तुम्हां मंडळींवर चीनच्या धोरणांचा व कृतींचा अधिक परिणाम होत असल्याने तुम्हांला चीनविषयी अधिक चिंता वाटते याची मला जाणीव आहे. चीनच्या कारकीर्दीविषयीही मी बोलेन. पण फार तपशिलात जाऊन बोलण्याइतकी माहिती मला नसल्याने थोडक्यातच त्या गोष्टीचा विचार करणे मला भाग आहे.

## युगोस्लाव्हियाचे रशियाच्या विरूद्ध बंड

दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी जर्मन सैन्याला मागे रेटत असताना अनायासे पूर्व युरोप रशियाच्या हाती आला. झाले हे नैसर्गिकच झाले. प्रश्न असा आहे : या आपल्या 'उपग्रहां'ना, पाल्यांना किंवा अगदी रोकड्या भाषेत बोलावयाचे तर वसाहतींना, रशियाने गेल्या सोळा वर्षांत कोणती वागणूक दिली आहे? सुरवातीला काही वर्षे पडद्याआड काय चालले आहे याचा काहीच पुरावा उपलब्ध नव्हता. त्यामुळे नेमके काय घडत आहे ते सांगणे कठीण होते. स्टालिनने आपल्या पुस्तिकेत म्हटले की, पूर्व युरोपीय राष्ट्रांना रशिया उदारपणे मदत करीत आहे आणि तेवढेच काय ते बाहेरच्या जगाला माहीत होते. परिस्थिती अशी असताना अकस्मात् युगोस्लाव्हियाने रशियाविरुद्ध बंड पुकारले. रशियन लोकांना आमची अर्थव्यवस्था आम्ही नियंत्रित करू देणार नाही, सैन्यावर त्यांची हुकुमत आम्ही स्वीकारणार नाही, युगोस्लाव्हिया हे यापुढे संपूर्णपणे स्वायत्त राष्ट्र बनेल, असे युगोस्लाव्ह नेत्यांनी जाहीर केले. १९४८ साली या मुद्यावरून साम्यवादी जगात फार मोठे तुफान झाले. ही घटना तुमच्या माहितीची आहे. साम्यवादाचा एक नंबरचा द्रोही म्हणून स्टालिनने टिटोची निर्भर्त्सना केली. आपल्या निर्भत्सनेमुळे टिटो गडगडेल अशी स्टालिनची खरोखरच समजूत असावी असे दिसते. अनेक कारणांमुळे युगोस्लाव्हियाविरुद्ध सैनिकी कारवाई करणे स्टालिनने टाळले. किंवा त्याला ते शक्य झाले नाही. आपल्या विखारी टीकेमुळे टिटोला पदच्युत करून युगोस्लाव्ह साम्यवादी, आपल्या बाजूला येतील ही त्याची अपेक्षाही फलद्रूप झाली नाही. युगोस्लाव्हिया खरोखरच एक स्वतंत्र, स्वायत्त, साम्यवादी राष्ट्र बनले. जगातले नवदे आश्चर्यच!

युगोस्लाव्हियाविषयी मला नेहमीच आपुलकी वाटत आलेली आहे. नंतरच्या काळात बरेच वेळा मी तिकडे गेलो असल्याने युगोस्लाव्ह लोकांच्या या संबंधीच्या भावना मला चांगल्या परिचित आहेत. वस्तुनिष्ठ दृष्टीने त्यांचा निवाडा। चूक की बरोबर हे तूर्त बाजूला ठेवू. पण एकजात सर्व युगोस्लाव्ह लोक म्हणतात की, रशियाने त्यांचे निर्घृणपणे शोषण केले. युगोस्लाव्ह अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी युगोस्लाव्ह–रशियन संयुक्त

उद्योगधंदे व कंपन्या रशियाने स्थापन केल्या. पण, रशियाने युगोस्लाव्ह व रशियन वस्तूंचे भाव अशा पद्धतीने बांधून घेतले की, युगोस्लाव्ह संपत्तीची पद्धतशीर लूट रशियाला करता आली, असे युगोस्लाव्ह लोक सांगतात. आपली वस्तु महागड्या दराने विकावयाची व युगोस्लाव्ह वस्तु अत्यंत स्वस्त दरात विकायला भाग पाडायचे असा सावकारी प्रकार. साम्राज्यवादी राष्ट्राने वसाहतींचे शोषण करावे त्यातलाच हा प्रकार असे युगोस्लाव्ह लोकांचे ठाम मत आहे.

## यशस्वि पोलिश उठाव

१९५६ मध्ये रशियन कृतींचा पुरावा फार मोठ्या प्रमाणावर एकदम उपलब्ध झाला. योगायोग असा की, रशियाच्या शोषणाविरुद्ध पोलिश जनतेने जो यशस्वी उठाव केला त्या १९५६ सालच्या ऑक्टोबरमध्ये मी वॉर्सात म्हणजे पोलंडच्या राजधानीत होतो. पोलिश सरकारनेच मला आमंत्रण दिलेले होते. तेव्हा सरकार विरोधी मंडळींच्या गाठीभेटी मी घेत होतो असे म्हणण्याचे कारण नाही. पोलिश कम्युनिस्ट पार्टीच्या मध्यवर्ती समितीच्या सभासदातच माझी ऊठबस होती. ही सर्वच मंडळी कर्तृत्ववान आणि पहिल्या रांकेतील साम्यवादी होती. साम्यवादविरोधी पूर्वग्रहदूषित प्रचार त्यांच्या तोंडून मी ऐकला असण्याची शक्यता नाही. आणि तरीही, रशियाने निर्घृणपणे आपली पिळवणूक चालविली आहे याबद्दल या सर्व मंडळींचे एकमत होते. ‘आता हे फार झाले’ अशी या सर्वांची भावना होती आणि रशियापासून आपली स्वायत्तता हस्तगत करण्याचा त्या सर्वांचा एकमुखी निर्धार होता. अनेक प्रकारची आकडेवारी माझ्या तोंडावर त्यांनी फेकली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत १ टन कोळशाची किंमत १०० रुपये असताना पोलंडचा कोळसा मात्र रशिया ५ रु. टन या भावाने खरेदी करीत होता. आपल्या पिळवणुकीचे थोडे जादा वर्णन त्यांनी केले असण्याची शक्यता आहे. वसाहतीतील लोकही आपल्या पिळवणुकीचे प्रसंगी असेच अतिशयोक्त वर्णन करीत असतात असे मी म्हटले तर तुम्हाला राग येणार नाही ना ? सांगायचा मुद्दा असा की, वसाहतीतील लोकांसारखीच बरोबर त्यांची

प्रतिक्रिया झालेली मला दिसली. पारतंत्र्य लादणाऱ्या साम्राज्यवादी सत्तेबद्दल वसाहतीतील लोकांना वाटणारा कट्टर द्वेष पोलिश लोकांना रशियनांबद्दल वाटत असलेला मी पाहिला.

पक्षातील रशियाधार्जिण्या, रशियाचे हस्तक असलेल्या, 'नातालिन' गटाला पदच्युत करून गोमुल्कांना चिटणीसपदी निवडून देण्यासाठी, आणि विशेषतः, रशियाने नेमलेल्या जनरल रॉकोसोव्स्की या पोलिश फौजांच्या सरसेनापतीला हाकलून लावण्यासाठी, पक्षाच्या मध्यवर्ती समितीची जी सुप्रसिद्ध आठवी सर्वसाधारण बैठक बोलाविली त्या चित्तथरारक दिवसात मी वॉर्सामध्ये होतो. आपल्या सैन्यावर आपली हुकुमत प्रस्थापित केल्याशिवाय आपण स्वायत्त होऊ शकणार नाही, याची त्यांना पुरेपूर कल्पना असल्याने रशियन सरसेनापतीला हुसकावून लावून सैन्याचा कब्जा स्वतःच्या ताब्यात घेण्याचा पोलिश नेत्यांचा निर्धार होता. त्या आठवड्यातील घटना विलक्षण रोमांचकारी होत्या. मध्येच एका रात्री वॉर्सामध्ये एक मोठे विमान आले आणि त्या विमानातून ख्रुश्चोव्ह, मार्शल कोनीव्ह आणि रशियन सरकार व सैन्यदले यांचे आठ वरिष्ठ अधिकारी उतरले. ही सर्व मंडळी थेट बैठकीच्या जागी गेली. पोलिश नेत्यांनी आपली पायरी ओळखून वागावे अशी दमदाटी ते करू लागले. त्या प्रसंगी पोलिश नेत्यांनी असामान्य धैर्य दाखवून सांगितले, 'तुम्ही परत आपल्या देशात गेल्याशिवाय आम्ही हा प्रश्न विचारात देखील घेणार नाही. आल्या वाटेने तुम्ही मॉस्कोला परत गेला नाहीत तर आम्ही आमची बैठक इथेच बरखास्त करू आणि या मुद्यावर पुन्हा चर्चा होणार नाही.'

या सर्व हकीकतीत माझाही संबंध आला. त्या रात्री माझे एक व्याख्यान ठरले होते. मध्यवर्ती समितीच्या एका सदस्याने दिवस-रात्र सतत बैठका चालू असल्याचे सांगून व्याख्यानाला येता येणार नाही याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. पण रात्री पाहतो तो श्रोत्यात ही सर्व बडी मंडळी उपस्थित होती. ही काय भानगड आहे ते मला कळेना. व्याख्यान संपल्यावर त्यांनी सांगितले की, रशियन नेते आल्या पावली परत मॉस्कोला जात नाहीत तोवर त्यांनी मुळी आपली बैठकच रद्द केली होती. बैठक रद्द केल्यामुळे

 अनुक्रम 63660 वि: ... 18606 नों: वि: ...

मोकळा वेळ घालवायला ती सारी मंडळी माझ्या व्याख्यानाला येऊन बसली.

कोणत्या क्षणाला काय होईल याचा त्या वेळी भरवसा नव्हता. पण अखेरीस रशियन नेते मॉस्कोला परतले. पोलिश नेत्यांच्या सर्वच मागण्या त्यांच्या पदरात पडल्या नाहीत. त्यांनी तडजोड केली हे फार शहाणपणाचे झाले असे माझे मत आहे. वॉर्सा करारातून ते बाहेर पडले नाहीत. एवढेच नाही तर, रशियन सैन्य पोलंडमधून काढून घेतले जावे असा आग्रहही त्यांनी धरला नाही. मर्यादित स्वायत्ततेवर त्यांनी तहनामा केला. आर्थिक क्षेत्रात त्यांनी स्वायत्तता हस्तगत केली. तडजोड स्वीकारण्याचा त्यांचा निर्णय योग्य होता असे मला वाटते. कारण त्या रात्री, रशियन नेत्यांनी परतण्याचा निर्णय घेतला त्या आधी, दोन रशियन डिव्हिजन्स वॉर्सावर चाल करून येत होत्या आणि वॉर्साच्या संरक्षणार्थ तीन पोलिश डिव्हिजन्स वॉर्साच्या सीमेवर उभ्या होत्या. रुळावरून ट्राम घसरण्याचा आवाज आला की, गोळीबाराला सुरवात झाली असे वाटून मी आणि माझी पत्नी दचकून अंथरुणात उठून बसत असू. पण गोळ्या सुटल्या नाहीत. रशियन नेत्यांनीही समंजसपणे पोलिश लोकांनी सुचविलेल्या तडजोडीला मान्यता दिली आणि प्रकरण हातघाईला न येता मिटले. त्या आठवड्यात वॉर्सामध्ये असलेल्या प्रत्येकाला पोलिश लोकांची प्रतिक्रिया सूर्यप्रकाशाइतकी स्पष्टपणे दिसू शकत होती. आपली पिळवणूक होत आहे आणि या पिळवणुकीविरुद्ध झगडून आपल्याला स्वातंत्र्य मिळवावयाचे आहे ही त्यांची उत्कट आणि तीव्र भावना उमटून दिसत होती.

18606

## हंगेरियन क्रांतीची शोकान्तिका

त्यानंतरच्या आठवड्यात हंगेरियन क्रांतीची शोकांतिका घडली. मी बुडापेस्टमध्ये नव्हतो; तेव्हा तिथली ‘चक्षुर्वै सत्यं’ हकीकत मी तुम्हाला सांगू शकणार नाही. तेथल्या घटनांचा वृत्तान्त तुमच्या माहितीचाच असेल. एका गोष्टीचाच विचार करायला मी तुम्हांला सांगणार आहे. रशियन राज्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार ब्रिटन, अमेरिका आणि इतर पाश्चात्य राष्ट्रांच्या हस्तकांनी, पंचमस्तंभीयांनी, घडवून आणलेला हा उठाव होता; त्यासाठी

त्यांनी चोरून शस्त्रास्त्रे पाठविली, प्रचारसाहित्य वाटले; या उठावात हंगेरियन शेतकरी व कामगारवर्ग सामील नव्हते; वगैरे. 'व्हॉइस ऑफ अमेरिका' या रेडिओ केंद्रावरून अमेरिका आणि पाश्चिमात्य राष्ट्रे मुक्तीचा प्रचार करीत हे कोणीच अमान्य करीत नाही. हंगेरीत उठावाचे वेळी अमेरिकन वा पाश्चात्य हस्तक असतीलहि. लहानसहान शस्त्रास्त्रांचा पुरवठा काही थोडा बाहेरून चोरून झालाहि असेल. हे सगळे जरी एकवेळ खरे मानले तरीदेखील साम्यवाद्यांचे स्पष्टीकरण फार तोकडे पडते. प्रत्यक्षात काय घडले ते आठवा. इतके तर निश्चित की, चार दिवसपर्यंत बुडापेस्टमध्ये घनचक्कर धुमश्चक्री चालली होती; नंतर कित्येक दिवस हंगेरीत सर्वत्र जोरदार गनिमी लढाया चालू होत्या. तेव्हा या क्रांतीत सर्वसामान्य जनतेचा व कामगारवर्गाचा सहभाग फार मोठा होता हे उघडच आहे. त्याखेरीज लढाई इतके दिवस आणि इतकी जोरदार झालीच नसती. कारखान्यातून कामगार बाहेर पडले आणि त्यांनी आधुनिक सुसज्ज सैन्याशी, या सैन्याच्या रणगाड्यांशी, दोन हात केले. ही सर्व करामत परकीय प्रचारकांची वा हस्तकांची आहे असे म्हणणार असलो तर पंचमस्तंभीयांच्या शक्तीबद्दल आपल्या कल्पना अचाट आहेत असे ठरेल. फार मोठे श्रेय त्यांच्या पदरात टाकल्यासारखे होईल. अध्यक्ष-महाशय, तुम्ही आणि मी, आपण दोघांनी चळवळी केल्या आहेत, प्रचार-कार्यात भाग घेतला आहे. आणि मला वाटते, तुम्हांला आणि मला, दोघांनाहि प्रचार आणि चळवळी यांच्या मर्यादा चांगल्या ठाऊक आहेत. एखाद्या राष्ट्रातील सबंध जनतेला सशस्त्र उठावाला यशस्वीपणे उद्युक्त करणे त्या जनतेच्या भावना तितक्याच तीव्र, उकळत्या बिंदूला पोचल्याखेरीज शक्य नसते हे कोणाहि अनुभवी माणसाला सांगायला नको. आपली भयानक पिळवणूक चालली आहे, त्यातून सोडवणूक करून घेण्यासाठी आपल्याला उठाव करण्याखेरीज मार्ग नाही, असे सर्वसामान्य माणसांना उत्कटपणे वाटल्याखेरीज राज्यसत्तेविरुद्ध शस्त्र हातात धरायला जनता प्रवृत्त होत नाही.

हंगेरियन जनतेला आपली भयानक पिळवणूक चालली आहे असे वाटत होते आणि या भावनोद्रेकातून हंगेरियन शोकांतिकेचा जन्म झाला याविषयीं काही संशय असू शकत नाही. पोलिश लोकांप्रमाणे सन्माननीय तडजोडीला हंगेरियन जनता तयार झाली नाही हा त्यांचा मूर्खपणा झाला असे मला

वाटते. ते काहीहि असो, स्पष्ट शब्दात सांगायचे तर, पूर्व युरोपातील या दोन राष्ट्रांना आपल्याला रशियाकडून वसाहतींना मिळणारी यागणूक मिळते असे वाटत होते. तेव्हा साम्यवादी समाजहि साम्राज्यवादी संबंध प्रस्थापित करू शकतो हे निर्विवाद सिद्ध झाले आहे. रशियन साम्राज्यवाद पाश्चिमात्य राष्ट्रांच्या साम्राज्यवादाहून अधिक क्रूर होता असे मी म्हणत नाही. हंगेरियन क्रांति ज्या निर्दयपणे दडपून टाकण्यात आली त्या निर्दयपणाची तुलना पाश्चिमात्य राष्ट्रांच्या हातून घडलेल्या कृतींशी केली जाऊ शकणार नाही असेहि मी म्हणत नाही. माझे म्हणणे एवढेच की पाश्चिमात्य साम्राज्यवादी राष्ट्रांपेक्षा रशियाचे रेकॉर्ड काही चांगले नाही. पाणी इथेच मुरते आहे. कारण साम्यवाद्यांचा सगळा दावाच मुळी असा आहे की 'समाजवादी' समाज हा दुसऱ्या समाजाशी असा कधी वागूच शकणार नाही. पण वेळ आल्यावर ब्रिटिश राजसत्ता जितक्या स्वार्थी बुद्धीने जगाच्या इतर कोनाकोपऱ्यात वागली तितक्याच स्वार्थी बुद्धीने रशियाहि वागला, हे स्पष्टपणे सांगितले जाण्याची आवश्यकता आहे. बुडापेस्टवर रणगाडे घालण्याआधी बराच काळ रशियन राज्यकर्ते द्विधा मनोवृत्तीत सापडले होते, आणि त्यांच्या मनाचा निर्णय होत नव्हता यासाठी त्यांना काही मार्क जरूर द्यायला हवेत. क्रांती-विरुद्ध हस्तक्षेप न करण्याकडे सुरवातीला त्यांचा कल होता. पण क्रांतीचा धोका कुठे पोचतो आहे हे जसे स्पष्ट झाले, आणि आपल्या कक्षेतून हंगेरी बाहेर पडेल असे त्यांना दिसले, तेव्हा त्यांच्यापैकी 'वेळीच धडा शिकवा' म्हणणाऱ्यांची जीत झाली. हंगेरीतील क्रांति पूर्णपणे चिरडून टाकली गेली. साम्राज्यवाद्यांच्या परिभाषेतहि याला 'खंबीर' भूमिका घेणे म्हणतात.

सुरवातीला मी जे म्हणालो तेच पुन्हा मांडतो. रशियातील साम्यवादी क्रांतीच्या चाळीस वर्षांच्या धडपडीनंतर साम्यवादाचा प्रयोग मातीत मिळाला किंवा फसला असे नाही; पण एवढेच झाले की, त्या सर्व भगीरथ प्रयत्नांतून एक उद्योगसंपन्न राष्ट्रवादी राज्य निर्माण झाले. हे राष्ट्रवादी राज्यहि इतर तसल्याच राज्यांपेक्षा काही वेगळे वागताना दिसत नाही हा फार मोठा धक्का देणारा भ्रमनिरास आहे.

## चीनची तिबेटवर स्वारी

चीनमधील साम्यवादी राजवटीच्या कारकीर्दीबद्दल बोलण्यासाठी थोडा वेळ मी शिल्लक ठेवला आहे. तिबेटवर स्वारी करून तिबेट आपल्या राज्यास जोडला हा चीनचा साम्राज्यवादी वागणुकीचा प्रमुख पुरावा म्हणता येईल. मला असे वाटते की, चीनने तिबेटवर आपली सत्ता प्रस्थापित केली हे स्वाभाविक होते. इतिहासात ज्या ज्या वेळी चीनमधील राजवट सामर्थ्यशाली राहिली आहे त्या त्या वेळी तिबेट हे चीनचे अंकित राष्ट्र बनले. पण तिबेटमध्ये मोठा उठाव व्हावा, या उठावाचे निमित्त करून दलाईलामाला परागंदा केले जावे, आणि तिबेटी लोकांवर चिनी साम्यवादी धोरणे जबरदस्तीने लादली जावीत, या गोष्टी चीनच्या वागणुकीबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या आहेत. तिबेटमधील सरंजामशाही ही भलतीच जुनाट आणि प्रतिगामी होती आणि लौकरात लौकर कोणीतरी तिचा अंत करावा अशी वेळ येऊन ठेपलेली होती हे निश्चित. पण बहुसंख्य तिबेटी जनतेने संत्रस्त होऊन मोठा उठाव करावा अशा निर्दय व जुलमी पद्धतीने परिवर्तन करण्याची गरज होती का ? याहि ठिकाणी, आजवर अशा प्रकारची जुलूमजबरदस्ती वा छळ कोठे झालाच नाही असे मी म्हणत नाही. मला इतकेच पुन्हा विचारावयाचे आहे की, इतर साम्राज्यवादी, बलाढ्य राष्ट्रे अशा परिस्थितीत जशी वागत आली त्यापेक्षा चीनचे वर्तन काडीमात्रहि वेगळे होते काय ?

आणखी पुढे जाऊन भारतीय सरहद्दीवर चीनने अतिक्रमण केले, त्या कृतीने तर चिनी साम्राज्यवादाची मुहूर्तमेढ रोवली गेली हे मी सांगू इच्छितो. एका अर्थी, सरहद्दीवरील अतिक्रमण हा फार मोठा गुन्हा घडला असे नाही. तो भाग निर्जनच आहे. आणि हिमप्रपातांवर मालकी प्रस्थापित केल्याने आर्थिक लाभाची फारशी आशा नाही. दुसऱ्या बाजूने पहाल तर, चीनच्या या मूर्खपणाला काही सीमा आहे काय ? भारत हा चीनचा साम्यवादी गटाबाहेरचा सर्वात चांगला मित्र. चीनला यूनोत प्रवेश दिला जावा म्हणून नेटाने प्रयत्न भारतच करीत आला. चीनची बाजू घेऊन भारतच इतरांकडे चीनकरता रदबदली करीत असे. 'पंचशील' तत्त्वांवर चीनबरोबर भारताने समझौता केला होता. भारताच्या सरहद्दीवर आक्रमण करून भारताला आपला

वैरी बनविणे हे महामूर्खपणाचेच म्हणावयाचे नाही तर काय? पाश्चात्य साम्राज्यवादी राष्ट्रांनी प्रसंगी केलेल्या मूर्खपणाची अगदी बरोबरी करणाराच हा मूर्खपणा नाही काय ?

मागच्याच आठवड्यात मी भारतात होतो. भारतात अलिकडे प्रवास केलेल्या कोणालाहि पटेल की चीनने भारतीय जनतेला खोलवर दुखवले आहे. चिनी सरकारच्या नालायकीचाच हा विजय नाही का? मी पं. नेहरूंजवळ या घटनेची चर्चा केली. नेहमीप्रमाणेच, याहि घटनेसंबंधी त्यांची प्रतिक्रिया सौम्य, समंजस आणि संयमित आहे. पण म्हणून चीनने बळजबरीने घेतलेला प्रदेश सोडायला पं. नेहरू तयार होतील असे समजू नका. त्यांची तशी इच्छा नाही असे मला दिसले. पण समजा उद्या ते तयार झाले तरी भारतीय लोकमत त्यांना तसे काही करू देणार नाही. चिनी दबावाविषयी लोकमत प्रक्षुब्ध आहे आणि चीनला प्रतिकार करण्याचा भारतीय जनतेचा निर्धार आहे. साम्राज्यवादी राष्ट्रांकडून घडणाऱ्या कृति आपणहि करू शकतो हे चीनने दाखवून दिले आहे असे मला वाटते.

शेवटी तुम्ही मला विचाराल की, रशिया किंवा चीन आपली साम्राज्ये प्रस्थापित करू शकतील याची शक्यता कितपत ? या त्यांच्या प्रयत्नात त्यांना यश येईल असे मला वाटत नाही. पुन्हा एकवार सांगतो की, चिनी वा रशियन " सज्जन " आहेत वा " दुर्जन " याच्याशी याचा काही संबंध नाही. या दोन साम्यवादी बृहद्-राष्ट्रांनी आपल्या सत्तेचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला तर राष्ट्रवादी स्वातंत्र्याकांक्षेच्या अति-बलाढ्य प्रवाहाचा त्यांनाहि विरोध होईल. राष्ट्रवादी स्वातंत्र्याकांक्षा ही आजच्या जगातली सर्वांत बलाढय शक्ति आहे. ती आपल्या वाटेत आडवी उभी असल्याचे त्यांना अनुभवाला येईल. मला असेहि वाटते की अमेरिका आणि रशिया-चीन या दोहोंची स्थिति समांतर, सारखी आहे. रशिया आणि चीन या साम्यवादी राष्ट्रांची परंपराहि मूलतः " साम्राज्यविरोधी " आहे. म्हणजे असे की, आपण साम्राज्यवादी कारवाया करीत आहोत. अशी उघड कबूली अमेरिकन लोक जसे स्वतःला देऊ शकणार नाहीत तसेच रशियन वा चिनीहि देऊ शकणार नाहीत. दुसरे असे की, अमेरिकेच्या वाटेत येणारी दुय्यम, पण सामर्थ्यवान, मान्यवर राष्ट्रे चीन-रशिया यांच्या विस्तारालाहि कसून विरोध करतील.

स्वतंत्र राष्ट्रवादी शक्तींचा विरोध त्यांना होईल. पाश्चिमात्य राष्ट्रांचा आणि अमेरिका या बृहद्-राष्ट्राचा विरोध होईल. लहान, दुर्बल राष्ट्रे स्वतःचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी या पाश्चिमात्य राष्ट्रांच्या गटाचा व सामर्थ्याचा आधार घेतील. अमेरिकेकडून त्यांच्या स्वातंत्र्याला धोका उत्पन्न झाला तर ते रशिया व चीन यांचा आधार शोधतील; आणि रशिया-चीनकडून दडपण निर्माण होऊ लागले तर पाश्चिमात्य राष्ट्रांकडे झुकतील.

## अविकसित राष्ट्रांना स्वातंत्र्याचे रक्षण करता येईल

भविष्याविषयी मी आशा बाळगून आहे. आग्नेय आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका या भागातील राष्ट्रांना, म्हणजेच जगातील अविकसित राष्ट्रांना, आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करता येईल असे मला वाटते. स्वातंत्र्य विनासायास रक्षिले जाऊ शकेल असा अर्थातच याचा अर्थ नाही. त्या त्या देशातील सत्ता खंबीर, निश्चयी व समर्थ असण्याची गरज आहेच. तशी मग कोणत्याहि राष्ट्राला समर्थ मध्यवर्ति सरकारची आवश्यकता असतेच. ही गरज नेहमी पूर्ण होतेच असे नाही. पण गरज असते हे उघड आहे.

● ● ●

# ४ ससा आणि कासव

ससा आणि कासवाची गोष्ट तुमच्या माहितीची आहेच. अविकसित देशांबद्दल, आणि विशेषतः चीन व भारत या दोन खंडप्राय देशांबद्दल, त्या कथेचा साज वापरून मी तुम्हांला चार गोष्टी सांगू इच्छितो. इथे चीन हा ससा आणि भारत हे कासव इतके लक्षात ठेवायचे आहे.

ला फाँतिनच्या या लोककथेतील ससा शर्यत सुरू होताच भरधाव वेगात पळत सुटतो आणि लौकरच लांबवर दिसेनासा होतो हे तुम्हांला आठवेल. कासव मात्र खूप मागे पडलेले असते आणि सावकाश एक एक पाऊल टाकीत असते. पण पळता पळता मध्येच आपण शर्यत लावली आहे हे ससा विसरून जातो आणि कोवळे कोवळे गवत भरपेट खाऊन डाराढूर झोपून जातो. इकडे कासव न थांबता चालतच राहते आणि सशाच्या बरोबरीला येते. ससा पुन्हा एकदा भरधाव पुढे जातो पण या वेळी पळण्याच्या नादात समोरचे न पाहिल्याने जाळीत अडकतो; तिसऱ्या वेळी तो नदीत उडी घेतो. अशा रीतीने दर खेपेला त्याची धाव वाया जाते आणि शेवटी मंद पण सतत चालत राहिलेल्या कासवाची शर्यतीत जीत होते.

चीन व भारत यांच्या विकासाची कथा शेवटी अशा प्रकारे संपायची आहे असे समजावयाचे कारण अर्थातच नाही. या शर्यतीत दोघांचीही जीत होऊ शकते. कारण, दोन्ही राष्ट्रांचा आर्थिक विकास होऊ शकेल आणि तसा तो होईल याविषयी मला खात्री आहे. चीन आणि भारत या राष्ट्रांच्या औद्योगीकरणापुढे गेल्या हजार वर्षांतील इतर क्रांतिकारक घटना खुज्या वाटू लागतात. कारण या दोन राष्ट्रांच्या पंक्तीला बसू शकेल असे तिसरे राष्ट्र

कोणतेच नाही. रशिया आणि अमेरिका ही मोठी राष्ट्रे आहेत असे आपण साधारणपणे मानतो. पण लोकसंख्येच्या दृष्टीने तुम्ही पहाल तर चीन-भारत यांच्यापुढे रशिया-अमेरिका ही राष्ट्रे छोटी आहेत. चीन आणि भारत या दोन राष्ट्रांची एकत्रित लोकसंख्या शंभर कोटींवर जाते. एकूण जगातील लोकसंख्येच्या एक तृतीयांश माणसे या दोन देशात राहतात.

सुरवात आपण चीनपासून करू. मी चीन द्वेष्टा आहे असे तुम्हांला वाटण्याचा संभव आहे. पण हा आरोप कोणी केलाच तर मला मान्य होण्यासारखा नाही असा मी आधीच इशारा देतो. सिंगापूरला आल्यापासून चीनची मी इतकी स्तुती ऐकत आहे की, गेल्या काही दिवसात, तुमच्या मनांतील चित्र अधिक वास्तववादी बनावे या हेतूने मी चीनवर टीका करीत आहे असे माझ्या लक्षात आले. खरोखरच मला असे वाटते की, चीनची "छाया" तुमच्यावर चांगलीच दाट पडली आहे आणि चीनच्या सामर्थ्याच्या दडपणाखाली तुम्ही बरेचसे येत आहात. चीनवर मी टीका करीत असलो तरी चीन हे जगातील एक थोर राष्ट्र आहे ही वस्तुस्थिती मला नाकारायची नाही. मला एवढेच म्हणायचे आहे की, जगात ते एकच थोर राष्ट्र नाही. आशिया खंडातील विकसनशील राष्ट्रांतील दोन खंडतुल्य राष्ट्रांपैकी ते एक आहे ही गोष्ट एक क्षणभरही मी दृष्टिआड करीत नाही. पण तितक्याच आग्रहाने मी ठासून सांगेन की, आशिया खंडात आर्थिक विकासाच्या मार्गावरील ते एकटेच राष्ट्र नाही. सिंगापूरमधील श्रोत्यांपुढे बोलत असताना सुरवातीलाच या काही गोष्टींची स्पष्टता करून घेण्याची आवश्यकता मला वाटली. हे चुकले की, बरोबर झाले ते तुम्ही ठरवा.

ससा आणि कासवाच्या गोष्टीकडे परत वळायचे तर, गोष्टीतल्या सशा-प्रमाणे चीनने शर्यतीला सुरवात भरधाव घोडदौडीने केली. चिनी सरकारने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीप्रमाणे १९५२ ते १९५८ या सहा वर्षात चीनचे ठोकळ राष्ट्रीय उत्पादन ( G. N. P. ) — यात देशात उत्पादन झालेल्या सर्व लहान-मोठ्या वस्तूंचा हिशेब आला — दर वर्षी बारा टक्क्यांनी वाढले. चिनी सरकारने प्रसिद्ध केलेली आकडेवारी बरोबर आहे हे मला सिद्ध करता येणार नाही. पण ती चुकीची वा खोटी आहे असे मानण्याचेही मला काही कारण दिसत नाही. त्या काळात चीनमध्ये जाणारा प्रत्येक प्रवासी

विकासाच्या वेगाने थक्क होऊन परत येई. चीनच्या आर्थिक विकासाचा ज्यांनी खोलवर जाऊन अभ्यास केला आहे अशा मंडळींत भारातील योजनाकारांची गणना होते. इथे येताना वाटेत मी भारतात थांबलो होतो. महिन्यापूर्वीच मी त्यांच्याशी या प्रश्नावर चर्चा केली. चीनमधील घडामोडींचा निःपक्ष दृष्टिकोनातून ते अभ्यास करतात. ही माणसे कम्युनिस्टद्वेष्टी नाहीत. त्यांच्यापैकी बरेच जण स्वतः समाजवादी विचाराचे आहेत; आणि भावनेने आशियाई आहेत. चीनच्या आर्थिक विकासाबद्दल आपल्याला प्रथम वाटलेल्या उत्साहाला मुरड घालण्याची आवश्यकता आहे असे ते मानतात. त्याचे त्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे. १९५८ नंतर चीनबद्दल कोणत्याही प्रकारची विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध होत नाही ही गोष्ट भारतीय योजनाकार निदर्शनास आणतात. १९५८ नंतर विकासाच्या मार्गात प्रचंड अडचणी अकस्मात उपस्थित झाल्यामुळे, आकडेवारी उपलब्ध होणे कठीण जात आहे की काय ते निश्चितपणे सांगणे कठीण आहे. पण हे खरे की, १९५८ नंतर शेती उत्पादनाच्या क्षेत्रात दोन-तीन वर्षे हंगाम फार वाईट गेले. ही गोष्ट चिनी सरकारने अधिकृतपणेच मान्य केलेली आहे. (यात नवल वाटण्यासारखे काही नाही. शेतीचा विकास घडवून आणणे ही विशेष अवघड गोष्ट आहे. भारताला शेती विकासाच्या कार्यक्रमात काय अडचणी येत आहेत, कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, त्याकडे मी पुढे वळेनच.)

## चिनी आकडेवारीवर चटकन् विश्वास न ठेवण्याचा धडा

या अनुभवानंतर आर्थिक विकासाच्या वेगासंबंधी चिनी सरकारकडून प्रसिद्ध होणाऱ्या आकडेवारीवर चटकन् विश्वास न ठेवण्याचा धडा शिकायला हवा. प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवर खुद्द चिनी सरकारचाही विश्वास होता अशी अपेक्षा मी करतो. आपण २०० टक्क्यानी शेतीच्या उत्पादनात वाढ करण्यात यशस्वी होत आहोत, असे चिनी सरकार वारंवार सांगत होते हे तर जाहीरच आहे. दोनशे टक्के वाढ ही टक्केवारी सामान्य कल्पनेच्या बाहेरची होती. पण वारंवार चिनी सरकार आपल्या यशाच्या पुष्ट्यर्थ आकडेवारी प्रकाशित करू लागले तेव्हा त्यावर विश्वास न ठेवावा तरी

पंचाईत. ज्या कालखंडात आपण ही वाढ करून दाखवू असे चिनी सरकार आत्मविश्वासाने सांगत होते त्या कालखंडाच्या शेवटी एकाएकी राष्ट्रव्यापी दुष्काळाची वार्ता चिनी सरकारने जाहीर केली. तेव्हा, कोठेतरी चुकते आहे हे स्पष्टच आहे. चिनी सरकार आता असे म्हणत आहे की, पाऊसपाणी अनुकूल न झाल्याने हा दुष्काळ पडला. माझा काही या म्हणण्यावर विश्वास बसत नाही. सगळ्याच देशांप्रमाणे चीनमध्येही मधून मधून पाऊसपाणी वेळचेवेळी न झाल्याने, वा हवामान एकदम बदलल्याने, पिके नष्ट होतात हे जरी खरे असले तरी, इतक्या वाईट राष्ट्रव्यापी दुष्काळाचे हे एकमेव कारण असू शकेल असे काही मला वाटत नाही. शेतकी तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की, अशा खंडतुल्य देशात सरासरीने उत्पादनाची पुन्हा बरोबरी होते; म्हणजे एका भागात दुष्काळ पडला तर दुसऱ्या भागात पिके चांगली आलेली असतात, आणि त्यामुळे चांगला भाग दुष्काळी भागाला सावरून घेतो.

## उत्तम हंगाम व वाईट हंगाम यातील फरक ५% इतकाच

पाच वर्षांपूर्वी, त्या वेळच्या भारतीय अर्थमंत्री श्री. सी. डी. देशमुख यांना असेच मी एकदा 'या वर्षी पाऊस चांगला झाला की नाही ?' असे विचारले. यंदाचे पाऊसपाणी चांगले झालेले नाही असे उत्तर त्यांनी दिले. पण लगेचच पुढे ते म्हणाले, 'दिशाभूल करून घेऊ नका. आमच्यासमोरची अन्नाची समस्या ही सर्वस्वी वाईट पाऊसपाण्यातून निर्माण झालेली नाही. आपल्या तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार उत्कृष्ट हंगाम आणि वाईट हंगाम या दोहोमधील उत्पादनात फरक पाच टक्के इकडे, पाच टक्के तिकडे, इतकाच होतो. उत्तमातले उत्तम पीक आणि वाईटातले वाईट पीक यात दहा टक्क्यांची सारी तफावत पडते.' दहा टक्के फरक हा देखील निःसंशय अतिशय महत्त्ववाचा आहे. भारताच्या बाबतीत दहा टक्के फरक वैपुल्याचा दुष्काळ धरण्यास पुरेसा असण्याची शक्यता आहे, पण चिनी सरकार चीनमधील दुष्काळाचे जे वर्णन देत आहे ते इतके सार्वत्रिक अन्नान्नदशेचे आहे की, हा काही दहा टक्के फरकाचा मामला नाही. म्हणजेच, म्हणायचे असे की, चीनमधील दुष्काळी परिस्थितीला पाऊसपाणी सर्वस्वी जबाबदार नाही.

## सामुदायिक शेतीची घोडचूक

रशियन सरकारने उत्साहाच्या भरात १९३० त ज्या घोडचुका केल्या, व त्यातून ज्या अडचणी निर्माण झाल्या, त्याच प्रकारच्या गोत्यात चिनी सरकार आलेले आहे असे मला दिसते. आर्थिक विकासाच्या साम्यवादी सिद्धान्तानुसार शेतीचे सामुदायिकीकरण हा शेतीच्या विकासातील पहिला कार्यक्रम होय. मला तुम्हांला सांगावयाच्या महत्त्वाच्या गोष्टींपैकी एक अशी की, दाट लोकसंख्येच्या राष्ट्रांत शेतीचे सामुदायिकीकरण ही मोठी घोडचूक असल्याचे अनुभवास आले आहे. या माझ्या विधानाने तुम्हांला धक्का बसेल; तसा तुम्हांला धक्का बसावा अशीच माझी इच्छा आहे.

सामुदायिकीकरण कशाला म्हणावयाचे? शेतकऱ्यांची लहान लहान शेते मोडून ती एका सामूहिक शेतात एकत्र आणावयाची. यांत्रिक औजारांनी ही शेती करता यावी म्हणून एकत्र आणावयाची. आता याला तुम्ही ‘ कम्युन्स ’ म्हणा, ‘ कोल्खोज ’ म्हणा, किंवा आणखीही काही नाव द्या. वैयक्तिक आणि सामुदायिक शेतीतला मूलभूत फरक आणि त्या मागची भूमिका ही अशी आहे. हा बदल योग्यच आहे अशी आपली प्रथमदर्शनी प्रतिक्रिया होते. पाश्चिमात्य शेतीतील ट्रॅक्टर्स, कंबाइन हार्वेस्टर्स, इत्यादी उत्तमोत्तम आधुनिक यंत्रे आपल्याही शेतीत वापरात आणणे महत्त्वाचे आहेच; त्या शिवाय आपली शेती पुढारलेली कशी होणार, असे तुम्हाआम्हाला वाटते. आणि हे सर्व केलेच पाहिजे याविषयी खात्री होते. पण ही मोठाली यंत्रे शेतकऱ्याच्या लहानशा तुकड्यावर कशी वापरणार? तेव्हा मग ही लहान लहान शेते मोडून त्यांचे एक मोठे शेत करणेच बरोबर असा निर्णय आपण करतो. मी देखील एके काळी असाच विचार करीत असे. पण प्रत्यक्ष अनुभव, आणि त्या अनुभवाची चिकित्सा, या दोन्ही गोष्टी असे सांगतात की, या निष्कर्षाचा फेरविचार करायला हवा. शेतीचे यांत्रिकीकरण का केले जाते? शेतीत यंत्रे वापरण्याचे दर एकरी अधिक उत्पादन करावे हे काही कारण नाही. मनुष्यबळाने केलेल्या शेतीपेक्षा यंत्रांच्या साहाय्याने केलेल्या शेतीत दर एकरी अधिक पिकत नाही. मनुष्यबळ वाचवावे एवढा एकच हेतु प्राधान्येकरून शेती यांत्रिक करण्यामागे असतो.

## शेतीत सर्रास यंत्रवापर हे धोरण चूक

अमेरिकेसारख्या देशात जमीन मुबलक आहे पण मनुष्यबळ उपलब्ध नाही. तेव्हा अमेरिकेने आपल्या शेतीत यंत्रांचा सर्रास वापर करावा हे धोरण योग्य ठरेल. चीन, भारत आणि आशियातील इतर राष्ट्रांतील परिस्थिती बरोबर याच्या उलट आहे. जमीन अल्प, माणसे अधिक. फार मोठी जमीन नजिकच्या काळात नव्याने लागवडीखाली आणता येईल ही शक्यता नाही. हवे तेवढे मनुष्यबळ उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत मनुष्यबळ वाचवून दर एकरी उत्पादन कमी करणारे शेतीचे यांत्रिकीकरण काय कामाचे ? शेती यांत्रिक करावयाची हा सामुदायिकीकरणामागील हेतु आर्थिक दृष्ट्या शहाणपणाचा आहे असे मला वाटत नाही. शेती शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्याच्या मी विरुद्ध आहे असा याचा अर्थ नाही. भारत, चीन या सारख्या राष्ट्रांच्या दृष्टीने, दर एकरी अधिकात अधिक उत्पादन करता येणे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. पण दर एकरी उत्पादन वाढविण्याकरता ज्या विज्ञानाचा उपयोग करावयाचा ते विज्ञान म्हणजे ट्रॅक्टर्स, हार्वेस्टर्स आणि अशीच मोठी यंत्रसामुग्री नव्हे. खते, उत्तम व सुधारलेल्या जातीचे बी, पाणी-पुरवठ्याची साधने, शेतीच्या सुधारलेल्या पद्धती या गोष्टींचा वापर त्यासाठी आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, यंत्र-विज्ञानाची जोड शेतीला देण्याची गरज नसून रसायन-विज्ञानाची जोड देण्याची गरज आहे. शेती विकासाच्या दृष्टीने दाट लोकसंख्येच्या देशात हा निर्णय घेतला जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. साम्यवादाच्या पोथ्याबरहुकूम चीनने अगदी आत्यंतिक सामुदायिकीकरणाचा मार्ग स्वीकारला तेव्हाच त्यांचा रस्ता साफ चुकला. शेतीउत्पादन वाढीच्या प्रयत्नात, त्यांना जे घोर अपयश आले आहे त्याचे खरे कारण या दिशाभुलीत आहे.

शेतीच्या यांत्रिकीकरणाची पूजा करण्यात आपण फार मोठी चूक आजवर केली असा काहीसा क्रांतिकारक निष्कर्ष वरील विवेचनातून निघतो. वैयक्तिक शेतकऱ्यांची लहान लहान शेते मोडून सामुदायिक मोठी शेती यंत्रांच्या सोयीकरता करायची हा निर्णय तंत्रदृष्ट्याही मूलतः चुकीचा आहेच; शिवाय या गोष्टीला शेतकऱ्यांचा नेहमीच अतिशय कडवा विरोध झालेला

आहे. रशियामध्येही हेच अनुभवाला आले आणि, मला वाटते, चीनमध्येही कम्युन्सना शेतकऱ्यांचा दांडगा अंतस्थ विरोध आहे. शेती अधिक वैज्ञानिक पद्धतीने केली पाहिजे; पण यांत्रिक पद्धतीने न करतां रासायनिक अर्थाने तिचे वैज्ञानीकरण केले गेले पाहिजे. झापाट्याने वाढत असलेल्या जागतिक लोकसंख्येला, पुरेसे अन्न निर्माण करण्याची गुरुकिल्ली खतांचा वापर करण्यात आहे असे मला वाटते. त्याच्या जोडीला बागाईत शेती करणे, अधिक शास्त्रीय पद्धतीने शेती करणे यांचीही आवश्यकता राहणारच. ही सुधारणा शेतकऱ्याच्या लहान शेतावरही करता येते. या सुधारणांसाठी त्याची शेती काढून घेऊन त्याला कोणत्यातरी प्रकारच्या सरकारी शेतावर रोजंदार मजूर म्हणून राबायला लावण्याची काही गरज नाही (कम्युन्स म्हटले काय, सामुदायिक शेती म्हटले काय, शेवटी प्रत्यक्षात ती सरकारी शेतीच ठरते आणि त्यावर काम करणाऱ्या व्यक्ती रोजंदार मजूर बनतात, मालक रहात नाहीत).

आता या शर्यतीतल्या कासवाकडे, म्हणजे भारताकडे, आपण आपले लक्ष वळवू या. चीनने केलेली वाटचाल झपाट्याची असल्याकारणाने तुमचे लक्ष चीनवरच खिळलेले आहे. तुम्हा सिंगापूरवासीयांना तुमच्या पश्चिमेकडील खंडप्राय भारताच्या संथ वाटचालीची दखलच नाही असे दिसते. तुमची नजर दुसरीकडे लागलेली आहे. त्या दरम्यान भारत जागेवर थांबलेला नाही. धीमेपणाने पण सतत भारत प्रगती करीत आहे. आणखी काही काल तुम्ही भारताकडे लक्ष दिले नाहीत तर तुम्हाला एक दिवस आश्चर्याचा धक्का बसणार आहे.

चीन आणि भारत यांनी साधारणपणे एकाच वेळेस वाटचालीस सुरवात केली. शर्यतीचीच उपमा चालू ठेवायची तर एकोणीसशे चाळिशीच्या शेवटच्या वर्षात दोन्ही राष्ट्रे स्वतंत्र झाली. तेव्हापासून ही शर्यत सुरू आहे. चीनच्या तुलनेने भारताची सुरवात मंद गतीने झाली.

## भारताच्या पंचवार्षिक योजना

भारताची पहिली पंचवार्षिक योजना ब्रिटिशांच्या काळातील भारत सरकारला साजेशीच होती. सार्वजनिक सोयी निर्माण करणाऱ्याच योजना

त्यात बहुतांशी समाविष्ट केलेल्या होत्या. औद्योगीकरणाच्या दृष्टीने काही मोठी पावले टाकण्याचा प्रयत्न त्यात केलेला आढळला नाही. बरोबर पाच वर्षांपूर्वी, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी, औद्योगीकरणाच्या प्रयत्नांना खरी सुरवात झाली असे म्हणता येईल. आर्थिक व औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या दोन पंचवार्षिक योजनांच्या ( दुसरी पंचवार्षिक योजना संपून सहा आठवड्यांपूर्वीच तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची सुरवात झाली आहे ) तपशीलात शिरण्यापूर्वी आज ही राष्ट्रे कोणत्या अवस्थेप्रत पोचली आहेत ते जरा पाहू. तात्कालिकदृष्ट्या विचार केला तर त्या त्या देशातील लोकांचे जीवनमान कोणत्या दर्जाचे आहे या गोष्टीला सर्वांत अधिक महत्त्व आहे. या ठिकाणी चीन आणि भारत ही दोन्ही राष्ट्रे अद्यापीही अत्यंत दरिद्री आहेत ही गोष्ट प्रथम लक्षात ठेवली पाहिजे. उदाहरणार्थ, तुमच्या सिंगापूरचे, किंवा भले फेडरेशनचे, दरडोई उत्पन्न चीन व भारत यांच्याहून अधिक आहे. रशिया किंवा पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेत ते अतिशय कमी आहे हे निराळे सांगण्याची गरज नाही. चीनने काही क्षेत्रात खरोखरच वाखाणण्यासारखी सिद्धी मिळविली असली, आणि सर्वसाधारणपणे चीनच्या वाटचालीचा वेग हा अधिक असला, तरी भारतापेक्षा लोकांचे जीवनमान उंचावण्यात चीन अधिक यशस्वी झालेला आहे ही चुकीची समजूत आहे. या दृष्टीने या दोन देशांची तुलना अर्थशास्त्रज्ञ नेहमी करीत असतात. माझ्या पाहण्यात आलेली अगदी अलीकडील तुलना प्रा. जॉन केनेथ गॅलब्रेथ यांनी केलेली आहे. अनेक आकडेशास्त्रज्ञांचे परिश्रम या कारणी लागलेले आहेत; प्रा. गॅलब्रेथ यांनी एकट्याने हे काम केलेले नाही. या मंडळींच्या मते चीनमध्ये दरडोई उत्पन्न सध्या वर्षाला सुमारे रु. ३०० आहे तर भारतात ते सुमारे रु. ३८५ इतके आहे.

या दोन आकड्यांमधल्या फरकाला मी फार अवास्तव महत्त्व देत नाही. कोट्यावधी लोकसंख्या असलेल्या अविकसित देशात, अचूकपणे दरडोई वार्षिक उत्पन्नाचा आकडा काढता येणे शक्य आहे असे मला वाटत नाही. या दोन आंकड्यांवरून बोध इतकाच घ्यायचा की, चीनने आपल्या लोकांचे जीवनमान भारतापेक्षा पुष्कळच अधिक उंच पातळीवर नेले आहे असे लोकांना वाटत असल्यास ते चुकीचे आहे. आज तरी वस्तुस्थिती तशी नाही. दोन्ही देश

कर्मदरिद्री आहेत; त्यातल्या त्यात भारतापेक्षा चिनी माणूस जरा अधिक गरिबीत राहतो एवढेच आज म्हणता येईल. अन्न, वस्त्र, निवारा आणि अशा दैनंदिन गरजांच्या इतर वस्तु लोकांच्या घरात पोचविण्यात भारत चीनच्या थोडासा पुढेच, निदान चीनच्या बरोबर तरी, खासच आहे. या वस्तुस्थितीची जाणीव असल्याचे सर्वसामान्यतः आढळत नाही. पण ही सत्य परिस्थिती जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे असे मला वाटते.

चीनने आपल्या उत्पन्नातला अधिक हिस्सा उत्पादकभांडवल गुंतवणुकीत लावला आहे, लोकांचे जीवनमान आज निकृष्ट ठेवून आपली सर्व शक्ती देशाची उत्पादनाची साधने वाढविण्यात तो खर्च करीत आहे, आणि उद्या जीवनमान झपाट्याने वाढविता यावे म्हणून आज ते पोटाला चिमटा घेऊन भांडवल संचय करीत आहेत, असे अर्थातच तुम्ही मला सांगू शकाल. या तुमच्या म्हणण्यात तथ्यांशही आहे. भारतापेक्षा भांडवल संचयाचा चीनचा वेग अधिक आहे. त्याची कारणे आणि त्याचे भविष्यातील संभाव्य परिणाम यांच्या तपशिलात मी पुढे जाईन. हा तुमचा मुद्दा ठीक आहे. पण या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊनही, लोकांच्या नित्याच्या सुखाच्या आणि कल्याणाच्या दृष्टीने, सशाने कासवापुढे आघाडी मारली आहे असे मानणे आज तरी चुकीचे ठरते.

भारताच्या दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांकडे आपण वळू. आकडेवारी लक्षात ठेवणे फार कठीण नाही. भांडवल संचयाचे प्रमाण आणि दर दोन्हीत भारतीयांनीही वाढ केली आहे. विकासाच्या मार्गावरील कोणत्याही देशाने पुरेशा जलद गतीने नव्या भांडवलाची उभारणी करणे अत्यावश्यक आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी भांडवल संचयाचा दर ढोकळ राष्ट्रीय उत्पादनाच्या जवळ जवळ ८ टक्क्यांपर्यंत नेला असल्याचे भारतीय नियोजनकारांनी मला सांगितले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ११ टक्क्यांपर्यंत आणि चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी १६ टक्क्यांपर्यंत हा दर वाढवीत नेण्याचे उद्दिष्ट त्यांनी डोळ्यासमोर ठेवले आहे. एखाद्या देशात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला खरोखरच चालना द्यायची असेल तर, त्या देशात भांडवल संचयाचा दर ठोकळ राष्ट्रीय उत्पादनाच्या १० ते १२ टक्के

इतका असायला हवा असे अर्थशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. भांडवलसंचयाचा दर इतका झाला की, आर्थिक विकासाला बाहेरून गती द्यावी लागत नाही. अंतस्थ गतिशीलतेने अर्थव्यवस्थेची वाढ होत जाते. भारताने ही अवस्था काही अद्याप गाठलेली नाही. पण तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी या अवस्थेला आपण पोचू अशी भारतीय नियोजनकारांची धारणा आहे.

आजच्या भांडवल संचयाच्या दराने ठोकळ राष्ट्रीय उत्पादनात दर वर्षी किती टक्के वाढ होत आहे? भारतीय आकडेशास्त्रज्ञांच्या मते आज दरवर्षी ४ टक्यांनी ठोकळ राष्ट्रीय उत्पादनात वाढ होत असून या पंचवार्षिक योजनेच्या काळात ती ६ टक्के वर जाईल. १९५२ ते १९५८ या सहा वर्षांच्या काळात चीनचे ठोकळ राष्ट्रीय उत्पादन दर वर्षी १२ टक्यांनी वाढत होते असा चिनी सरकारचा दावा आहे (तो खराही असण्याची शक्यता आहे) याच्याशी तुलना करता भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ मंदगतीने होत आहे हे नक्कीच.

पण सध्यांची चार टक्के वाढ किंवा भविष्यातील ६ टक्के वाढ, ही खरोखरच इतकी मंद आहे काय? जगातील काही राष्ट्रांची अर्थव्यवस्था ज्या वेगाने वाढली आहे त्यांच्या तुलनेत ही गती मंद आहे. रशियाच्या ठोकळ राष्ट्रीय उत्पादनात सर्वात जास्त वेगाने वाढ होत आहे असा एक प्रवाद आहे. तो प्रवाद खरा नाही. काही लोकांना हे आवडणार नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, सर्वात अधिक वेगाने जपानची अर्थव्यवस्था भरभराट पावत आहे. गेल्या वर्षी ठोकळ राष्ट्रीय उत्पादनात १७ % नी वाढ झाल्याचे ते सांगतात. हे किती खरे आहे याची खात्री मी देऊ शकत नाही. हा वेग अशक्यप्राय वाटतो. पण ते अतिशय झपाट्याने प्रगती करीत आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत वाढीचा दर वर्षाला ६ टक्के इतका होणार आहे. या गतीने देखील अठरा वर्षात ठोकळ राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट होणार आहे. म्हणजे, हा दर टिकून राहिला तर अवघ्या दोन तपांच्या आतच विलक्षण परिवर्तन घडून येणार आहे. दारिद्र्यात काळ कंठणाऱ्या माणसांना वीस वर्षांचा काळ हा फार प्रदीर्घ वाटला तर ते स्वाभाविक आहे. पण भारताच्या इतिहासात वीस वर्षे म्हणजे एक क्षण आहे. हीच गोष्ट चीनच्याहि बाबतीत

खरी आहे. अठरा वर्षांत राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट झाले तर, तो बदल क्रांतिकारक आणि अत्यंत वेगवान बदल म्हणावा लागेल. आज हजारो वर्षे या दोन देशातील लोकांचे जीवनमान एका दोलायमान अवस्थेत राहिले आहे. ते कधी उंचावते, तर कधी ढासळते. दीर्घ कालाचा विचार केला तर, ते आहे तिथे स्थिर राहिले आहे असे आढळून येते. म्हणून इतर देशांच्या तुलनेने भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल मंद वाटत असली तरी भारतीय इतिहासाच्या संदर्भात, किंबहुना मानवजातीच्या इतिहासातील कोणत्याहि भूतकालाच्या संदर्भात, हा वेग आश्चर्यकारक आहे. या बाबतीत तरतमभावाची जाणीव बाळगणे अत्यावश्यक आहे.

भारतीयांना त्यांच्या प्रयत्नात यश मिळेल का ? ६ टक्के वार्षिक वाढीचा दर तरी प्रत्यक्षात ते सिद्ध करू शकतील काय ? इतर अनेक गोष्टींवर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे. राजकीय स्थैर्य, राष्ट्रीय ऐक्य, इत्यादि गोष्टींशिवाय अर्थव्यवस्थेची वाढ होणार नाही हे तर ओघानेच आले. पण ज्या दोन गोष्टींचा सहसा विचार होत नाही, आणि ज्या दोन गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत असे मला वाटते, त्या बाबींची मी चर्चा करणार आहे. हे दोन्ही घटक परस्परांशी संबद्ध आहेत. शेतीचे उत्पादन ते किती वाढवू शकतील ही झाली पहिली बाब आणि परदेशातून किती मदत उपलब्ध होईल, किती परकीय भांडवल ते आयात करू शकतील, ही दुसरी.

## शेती हा निर्णायक महत्त्वाचा घटक

शेतीचे उत्पादन आपण दरवर्षी ४ टक्क्यानी वाढवू शकलो तरच बाकीचे आपले अंदाज, ( जे मी वर दिले आहेत, ) खरे ठरतील; शेती हा निर्णायक महत्त्वाचा घटक आहे असे भारतीय नियोजनकार सांगतात. औद्योगिकरणाच्या योजना यशस्वी व्हावयाच्या असतील तर शेतीचे उत्पादन किमान ४ टक्क्यांनी वाढावयास हवे. याबाबतीत पहिली गोष्ट लक्षात घ्यायची ती अशी की दरवर्षी २ टक्क्यांनी भारताची लोकसंख्या वाढत आहे . ( सिंगापूरपेक्षा वाढीचा हा दर कमीच आहे ). वाढीचा दर दोन टक्के आहे म्हणून भिऊन जाण्याचे काही कारण नाही. अमेरिकेची लोकसंख्यादेखील जवळजवळ याच प्रमाणात वाढत आहे हे लोक सहजी विसरतात; तरी पण मुलांच्या

ओझ्याखाली अमेरिका दरिद्री होत चालली आहे असे कोणी म्हणत नाही. अमेरिकेचे ऐश्वर्य इतके की, झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येला सामावून घेणे तिला सहजी शक्य आहे असे कोणी म्हणाले तर ते शंभर टक्के खरे आहे. तरीपण हा मुद्दा उपस्थित केलेला बरा. कारण अमेरिकन लोकच उद्या असे म्हणण्याची शक्यता अधिक : ' या भारतीय लोकांना मदत करून काय उपयोग ? सावळ्या पोरांच्या लोंढ्यापुढे ही मदत कुठपर्यंत टिकणार ? खरे म्हणजे गोऱ्या पोरांचाहि असाच " लोंढा " अमेरिकेत दरवर्षी येत आहे. दोन टक्के लोकसंख्येतील वाढ हाय खाण्याइतकी भयंकर नसली तरी, अन्नधान्याचे उत्पादन दरवर्षी वाढावे ही गोष्ट त्यामुळे अत्यंत आवश्यक ठरते. दरवर्षी अन्नधान्याचे उत्पादन चार टक्क्यांनी वाढले तर, वाढत्या लोकसंख्येला पुरवूनहि दरवर्षी शेतीच्या उत्पादनात २ टक्क्यांनी निव्वळ भर पडेल. कारण केवळ वाढत्या लोकसंख्येलाच खाऊ घालण्याचा प्रश्न त्यांच्यासमोर नाही. त्यांच्यावर इतरहि वाढत्या जबाबदाऱ्या आहेत. औद्योगिकरण करीत असताना मोठ्या संख्येने खेड्यापाड्यातून लोक शहरात येणार. आजच भारतभर ही प्रक्रिया, लोकसंख्येचे हे स्थलांतर, झपाट्याने घडून येत आहे. महिन्यापूर्वीच मी ही गोष्ट पाहिली; यासंबंधीची आकडेवारी ऐकली. वाढत्या लोकसंख्येला खाऊ घालायचे तर आहेच; पण दिवसेंदिवस शहरातून बिगर शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येत वाढ होत जाणार आहे. याहि वाढत्या शहरी लोकसंख्येला खाऊ घालायचे आहे. ही माणसे स्वतः अन्नोत्पादन करणार नाहीत शेतीचे उत्पादन वाढणे ही यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

शेतीचे उत्पादन वाढविता आले नाही तर ? परदेशातून अन्नधान्य आणावे लागेल. आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाली तर बाहेरून धान्य ते आणतीलहि. या वर्षी चीन बाहेरून अन्नधान्याची आयात करीत आहे त्याअर्थी चीनवर खरोखरच दुष्काळाचे संकट कोसळलेले असणार. ऑस्ट्रेलिया व कॅनडा या राष्ट्रांकडून मोठ्या प्रमाणावर गहू खरेदी करण्यासाठी आपल्याजवळचे अमूल्य परदेशी चलन चिनी सरकार काही खुशीने वापरीत नाही हे निश्चित. त्यापेक्षा मशीन टूल्स, मलायातील रबर, किंवा औद्योगिकरणात मदतरूप होणाऱ्या गोष्टींची आयात करायची त्यांची खरी इच्छा असणार. पण खाण्याचे संकट पडल्याने त्यांना बाहेरून गहू विकत घ्यावा लागतो

आहे. काही वर्षांपूर्वी भारतालाहि याच कारणास्तव अन्नधान्याची आयात करावी लागली होती. अन्नधान्य बाहेरून विकत घेणे ही गोष्ट शक्य असली तरी विकासाची वाटचाल करीत आलेल्या देशाला आपल्याजवळील अमूल्य व तुटपुंज्या परदेशी चलनाचा उपयोग अन्नधान्याची आयात करण्यासाठी करावा लागणे ही मोठी आपत्तीच असते.

बाहेरून अन्नधान्याची आयात करावी लागू नये अशी भारतीय नियोजनकारांची फार तीव्र इच्छा आहे. औद्योगिकरणाच्या प्रारंभीच्या अवस्थेत मागासलेल्या राष्ट्राला सबंधच्या सबंध नवे कारखाने हवे असतात; नाना प्रकारची यंत्रसामुग्री, मशीन टूल्स, कच्चा-पक्का माल लागत असतो. या गोष्टी विकत घेण्यासाठी आपल्याजवळ असलेल्या पैशांपैकी रुपया न् रुपया वापरता यावा ही त्यांची गरज असते. भारताला आपल्या वाढीचा वेग ६ टक्क्यांवर नेता येईल की नाही हे ज्या वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून आहे त्यापैकी सर्वांत महत्त्वाचा घटक शेती उत्पादनातील ४ टक्के वाढ हा आहे असे म्हणायला म्हणून हरकत नाही.

दाट लोकसंख्येच्या या शेतीप्रधान देशातून शेतीचे उत्पादन वाढविण्याचा योग्य मार्ग कोणता ? माझे मत तुम्हांला सांगतो. फार तर मी लावलेली ती एक बाजी आहे असे म्हणा. भारत ज्या मार्गाने प्रयत्न करीत आहे तो मार्गच शेवटी अधिक फलदायी ठरेल यावर मी शर्त लावायला तयार आहे. त्यांच्या मार्गात अडचणी येतील; प्रसंगी अपयश येईल; त्यांना कोठे तात्कालिक माघार घ्यावी लागेल; पण दूरगामी विचार करता भारताचा मार्ग हा सामुदायिकीकरणाच्या मार्गापेक्षा अधिक खात्रीचा आहे असे मला वाटते.

## भारताचा वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम

शेती उत्पादन वाढीच्या क्षेत्रातील भारताचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम ' गट विकास व राष्ट्रीय विस्तार योजना ' हा आहे. शेतकऱ्यांना खते व बी बियाणे पुरविणारी, पाणीपुरवठ्याच्या साधनांसाठी कर्जे देणारी, शेती पद्धतीसंबंधी मार्गदर्शन करणारी, पोल्ट्री, मत्स्योत्पादन इत्यादींबाबत सहाय्य व सल्ला देणारी, ती एक एजन्सी आहे.

विसाव्या शतकाच्या सुरवातीला अमेरिकन लोकांनी त्यांच्या देशात सुरू केलेल्या ' ॲग्रिकल्चरल एक्स्टेन्शन सर्विस 'च्या धर्तीवर सुरू केलेली ही योजना आहे. अमेरिकेतहि प्रारंभीची काही वर्षे या योजनेचे परिणाम फारसे उत्साहवर्धक नव्हते. पण कालांतराने अमेरिकन शेतकी तज्ज्ञ आणि खतांचा मुबलक पुरवठा या दोन गोष्टींच्या साहाय्याने या एजन्सीने अमेरिकन शेतांच्या उत्पादनक्षमतेत आश्चर्यकारक वाढ घडवून दाखविली. या शेतकी ' क्रांती 'ने अमेरिकन सरकार पेचात सापडलेले आहे. अमेरिकेत आता इतके अन्नधान्य निर्माण होते की त्या धान्याचे काय करावे ते सरकारला कळत नाही. रॉकी पर्वतराजींच्या नैसर्गिक ' लेण्यां 'मधून धान्याचे प्रचंड साठे करून ठेवणे अमेरिकन सरकारला भाग पडले आहे. दिवसेंदिवस अमेरिकन शेतीवर काम करणाऱ्यांचे प्रमाण कमी होत असूनहि उत्पादन मात्र वाढतच आहे. शास्त्रीय ज्ञानाचा आणि खतांचा पुरेपूर उपयोग केल्याने दर एकरी धान्योत्पादनाचे प्रमाण अधिकाधिक पडत आहे.

भारतीय प्रयत्नांना असे अचाट यश येण्याचा फारसा संभव नाही. तरी पण, शेतकऱ्यांची शेते काढून न घेता त्यांना सर्व प्रकारची मदत देणाऱ्या या विकास योजनांमुळे, येत्या दहा वर्षांत भारतात अन्नधान्याचे उत्पादन काही पटींनी वाढल्याचे पहावयास मिळेल असे मला वाटते. उत्पादन वाढायला या विकास योजनांचे काम पुरेसे आहे असे मला सुचवायचे नाही. उत्पादन वाढावे यासाठी शेतकऱ्याला आर्थिक प्रलोभनहि असणे आवश्यक आहे. पण मला वाटते आज भारतात शेतकऱ्याला असे प्रलोभन आहे. पाच वर्षांपूर्वी मी तिथे असताना जमीनदारी नष्ट करण्यावरून, जमीनमालकीच्या रचनेत सुधारणा करून कसणाऱ्याला जमीन देण्याच्या प्रश्नावरून, मोठी चर्चा चालली होती. जमीन मालकीच्या रचनेत सुधारणा करणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी यशस्वीरीत्या केली गेली आहे असे दिसते. आज भारतात बव्हंशी कसणाऱ्याच्या हाती जमीन आहे. तो खुद्द सरकारात सारा भरतो. पैशाचे मूल्य घटले असल्याने जमिनीवरील हा कर अगदी अत्यल्प आहे. भारतीय शेतकऱ्यांवर करांचा फार मोठा बोजा आहे असे म्हणणे वस्तुस्थितीच्या बरोबर विरुद्ध होईल. भारतीय शेतकऱ्याइतका कमी शेतसारा भरावा लागणारा शेतकरी जगात सापडणे

मुष्कील. बहुसंख्य शेतकऱ्यांजवळ असलेली जमीन अगदी थोडी आहे हे खरे; खेड्यात तीव्र विषमता आहे हेहि खरे. एकीकडे शेकडो एकर एकेकाच्या मालकीचे आहेत तर दुसऱ्या टोकाला असे अनेक शेतकरी आहेत जे स्वतःच्या शेतीतून पोट भरू शकत नाही म्हणून दुसऱ्यांच्या शेतीवर मजुरीला जातात. तुमच्यापुढे एक नमुनेदार चित्र रेखाटण्याचा माझा प्रयत्न नाही. भारतातील परिस्थितीत अनेक प्रकारची तीव्र विषमता आहे. ही तीव्र विषमता आपल्याला अन्याय्य निष्ठुर वाटत असली तरी आज भारतातील लहान आणि मोठ्या दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना आपल्या शेतीतून अधिक धान्य उत्पादन करायला आर्थिक प्रलोभन आहे आणि या प्रलोभनाच्या आड ही विषमता येत नाही. अधिक पिकविले तर त्याचा फायदा प्रत्यक्ष शेतकऱ्याला मिळेल. लोभी सरकार किंवा लोभी जमीनदार त्याच्याकडून अधिक झालेले उत्पादन हिसकावून घेईल अशी परिस्थिति नाही. आर्थिक प्रलोभन प्रभावी ठरायचे असेल तर वाढलेले उत्पादन शेतकऱ्याच्या पदरात पडलेच पाहिजे.

वरील परिच्छेदात शेवटी सांगितलेली शर्त जर पाळली गेली तर शेती उत्पादनात वाढ होत राहील असे मला वाटते. हा बदल एकाएकी होणार नाही. भारतीय शेतकरी पुराणप्रिय आहे. विकास योजनांनीहि सर्व देश अद्याप व्यापलेला नाही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी विकास योजना लागू नाही असा देशाचा भाग राहणार नाही अशी भारत सरकारला आशा होती. प्रत्यक्षात पाच-सात लाख खेड्यांपैकी साठ टक्के खेड्यांपर्यंत ही योजना पोचलेली आहे आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात या योजनेने सर्व देश व्यापलेला असेल.

आपण जाहीर केलेली उद्दिष्टे साध्य करण्यात, भारतीय लोक नेहमीच यशस्वी होत नाहीत हेहि मी सांगतो. इथे महत्त्वाचा मुद्दा असा की, आपले अपयशहि ते जाहीरपणे नमूद करतात आणि त्याची आपणा सर्वांना माहिती होऊ शकते; होते. असे असेलहि कदाचित् की, चिनी लोक आपली उद्दिष्टे शंभर टक्के सिद्धीस नेतात; त्यांना अपयश म्हणून माहीत नाही. पण त्यांच्या बाबतीत खरे खोटे आपण कधी तपासून पाहू शकत नसल्याने आपल्याला खात्रीलायक ज्ञान कशाचेच असत नाही. भारतीय अपयशाला प्रसिद्धी मिळते; आपल्याला त्यांचे अपयश माहीत असते; खुद्द भारतीयांनाहि

त्यांच्या अपयशाची जाणीव असते. अपयशहि जाहीर होत असल्याने जगाच्या नजरेत त्यांच्या प्रतिमेला डाग लागतो असे म्हणता येईल. पण व्यापक भूमिकेतून पाहता ही परंपरा व स्थिति अधिक निकोप आहे. कारण आपले अपयश जर स्वतःला मान्य झाले तर आपली चूक दुरुस्त करण्यासाठी तुम्ही पाऊल उचलता.

सर्व देशभर विकास योजना सुरू करणे ही गोष्ट भारताच्या बाबतीत फार सोपी नाही. तो लहानसा कार्यक्रम नाही. भारतातील खेड्यांची संख्या पाच लाखांहून अधिक आहे. प्रत्येक खेड्याला स्वतंत्र विकास योजना नसते. एका गटात साठ–सत्तर खेडी येतात असे मला वाटते. प्रत्येक खेड्याच्या 'आवाक्या'त येईल अशा बेताने देशात सर्वत्र गट स्थापन करावेत आणि या प्रत्येक गटाच्या ठिकाणी निरनिराळे तज्ज्ञ राहावेत, खते बी-बियाणे यांचे साठे असावेत, अशी त्यांची कल्पना आहे. भारतातल्या शेतकऱ्याला तुम्ही प्रश्न विचारलात तर तो देतो ते उत्तर लक्षात घेण्यासारखे आहे : 'बैलगाडीने एका दिवसात जाऊन आणता येईल इतक्या अंतरावर खताचे गोदाम असले पाहिजे. एरवी त्याचा कितीसा उपयोग ?' असे उत्तर तो शेतकरी देतो. कोणत्याहि खेड्यापासून पंधरा-वीस मैलांच्या अंतरात गटाचे ठिकाण असणे आवश्यक ठरते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी भारतातील सर्व खेड्यांना विकास योजनांचा लाभ मिळू लागेल यात शंका नाही.

या विकास योजनांचे कामकाज प्रत्यक्षात कसे चालले आहे ? भारतातील अधिकारी मंडळींचे मत आणि माझा एक ओझरता अनुभव मी तुम्हांला निवेदन करणार आहे. इथे येताना मी वाटेत भारतात थांबलो होतो हे तुम्हांला सांगितले आहेच. इतक्या मोठ्या देशात सगळीकडे जाण्याचा प्रयत्न न करता पाच वर्षांपूर्वी हिंडलेल्या भागालाच पुन्हा भेट द्यावी, ते अधिक लाभदायी ठरेल, असे मला वाटले. सगळा देश पाह्यचा म्हटले तर वर्षे निघून जातील. तेव्हा नव्या ठिकाणी हिंडण्यापेक्षा जुन्या परिचित भागात जावे व झालेला बदल पहावा, ते अधिक व्यवहार्य ठरेल, असा मी विचार केला. एकच अनुभव मी तुम्हांला निवेदन करतो. हा अनुभव प्रातिनिधिक अर्थातच नसणार. पण त्यातून तुम्हांला काही बोध होईल. ही हकीकत ओरिसा राज्यातली आहे. ओरिसा हे राज्य भारतातील त्यातल्यात्यात मागासलेल्या

भागात मोडते. अमेरिकेचे भारतातील सध्याचे वकील प्रा. गॉलब्रेथ यांच्या बरोबर मी पूर्वी तिथे गेलो होतो. त्या वेळी त्या भागात विकास योजना चालू असल्याचे आम्हांला आढळले नव्हते. भुवनेश्वर–पुरी–कोनारक रस्त्याच्या त्रिकोणात विकास योजना त्या वेळी तरी लागू झालेली नव्हती. योजना लौकरच सुरू होणार म्हणून लोक बोलत होते इतकेच. या भागात फारसे-काही नवीन घडत असल्याची चिन्हे आम्हांला दिसली नव्हती. हजारो वर्षां पूर्वीचेच, तेच अगदी साधे आणि मागासलेले जीवन लोक जगत होते.

महिन्यापूर्वी मी तिथे गेलो तेव्हा चित्र बदललेले होते. दर काही मैलांवर विकास योजनेतील वेगवेगळ्या प्रकल्पांच्या पाट्या दिसत होत्या. कोठे खताचे गोदाम, तर कोठे बी-बियाणे उत्पादन केंद्र होते. १९५६ ते १९६१ या पाच वर्षांच्या दरम्यान भारतातील या लहानशा, मला परिचित असलेल्या, कोपऱ्यात तरी फार मोठे परिवर्तन घडून आलेले होते याविषयी शंका नाही. शेतकऱ्यांनी आपली शेती सुधारलेल्या पद्धतीने करावी, खते, नवे बी-बियाणे यांचा वापर करावा, म्हणून फार कसोशीने प्रयत्न केले जात आहेत.

पुरी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याशी झालेले माझे बोलणे तुम्हांला सांगतो. ‘ या योजनांचा लाभ शेतकऱ्यांना खरोखर किती होत आहे ? त्यांच्यावर तुमच्या प्रयत्नांचा परिणाम होत आहे का ? ’ असे मी त्यांना विचारले.

‘ थोडा थोडा पण परिणाम निश्चित होत आहे. ’ ते म्हणाले.

‘ या परिणामाचे कारण काय असावे ? ’ मी विचारले.

‘ खरे त्याचे कारण असे आहे की, ’ ते म्हणाले, ‘ शेतकऱ्यांची मुलेच मुळी आपल्या बापांना नव्या पद्धतीने शेती करायला भाग पाडतात. त्यांना शाळेत शिकायचे असते; मधल्या वेळी खायला हवे असते; चांगले कपडे हवे असतात. हे सगळे व्हायचे तर त्यांच्या बापांना अधिक पैसा मिळाला पाहिजे. केवळ पोटाला भागेल इतके पिकवून यापुढे चालणार नाही. अधिक पिकवून त्यातले काही विकता आले पाहिजे.

भारतात ऐकलेल्या अनेक गोष्टींमध्ये मला हे उत्तर अतिशय मार्मिक व उत्साहवर्धक वाटले. या मार्गानेच विकास घडवून आणायला हवा असे मला

वाटते. जमिनीबद्दल विलक्षण माया आणि आसक्ति असणाऱ्या आशियाई शेतकऱ्याला मुबलक मनुष्यबळ असताहि, बळेच सामुदायिक शेतीत खेचायचे आणि त्याच्या बोडक्यावर ट्रॅक्टर्स, हार्वेस्टर्स आणि इतर अद्ययावत, मनुष्यबळ वाचविणारी यंत्रे मारायची हा काही शहाणपणाचा मार्ग नव्हे. मनुष्यबळ वाचविले पाहिजे ही काही ग्रामीण आशियाची निकड नाही. जमिनीच्या तुकड्या न् तुकड्याचा उपयोग जास्तीत जास्त उत्पादन करण्यासाठी केला जावा ही निकड आहे. दर माणशी उत्पादन वाढविण्याची निकड नसून दर एकरी उत्पादन वाढविण्याची निकड आहे. खूप मनुष्यबळ पडले आहे; ते वापरता येईल इतकी जमीन जवळ नाही. म्हणून, चीनचा मार्ग हा व्यवहार्य नाही; भारताचाच मार्ग व्यवहार्य आहे.

कोण बरोबर आणि कोण चूक हे अर्थात् शेवटी काळच ठरवील. आणखी काही वर्षे तरी याबाबतीत निवाडा करता येणार नाही. पण इथून पुढे पुरावा गोळा व्हायला सुरवात होईल. १९६६ पर्यंत म्हणजे भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी, हा निवाडा करता येण्याची शक्यता आहे. त्या वेळपर्यंत भारतीय पद्धतीला यश येत आहे की नाही हे आपल्याला खात्रीपूर्वक सांगता येणे शक्य व्हावे.

भारत आपल्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नात यशस्वी व्हायचा असेल तर, भारताला परकीय आर्थिक साहाय्य मिळाले पाहिजे ही दुसरी गरज म्हणून मी सांगितली. त्यासंबंधी माझे म्हणणे मी थोडक्यात मांडतो. बाहेरील मदतीशिवाय हाती घेतलेले हे कार्य यशस्वीपणे सिद्धीस नेणे भारताला शक्य होईल असे मला वाटत नाही. चीनलाहि केवळ स्वतःच्या कुवतीवर स्वतःचा विकास साधता येईल असे मला वाटत नाही. चीनला रशियाकडून प्रचंड प्रमाणावर मदत मिळते आहे. भारत हे लोकशाही राज्य आहे. भारताच्या बाबतीत तरी बाहेरच्या जगाकडून मोठ्या प्रमाणावर साहाय्य घेतल्याशिवाय लोकशाही राज्यव्यवस्था कायम टिकवून भारताला आपले औद्योगीकरण करता यावयाचे नाही.

या म्हणण्याचा भलताच अर्थ करू नका. आपल्या देशाच्या औद्योगिकरणासाठी भारताला जे भांडवल गुंतवावे लागणार आहे त्यातला, अधिकांश भाग बाहेरून आयात करण्याची गरज आहे असे नाही. किती हिस्सा

बाहेरून आणावा लागला हे शेवटीच सांगता येणार आहे. पण एकूण भांडवल गुंतवणुकीचा बराचसा भाग बाहेरून आयात करण्याची गरज भासेल अशी माझी कल्पना आहे. अधिकांश भांडवल हे भारतातच संचित झाले पाहिजे; प्रामुख्याने भारतीय भांडवलच परत भारतीय उद्योगधंद्यात गुंतवावे लागेल. पण तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दरवर्षी ३५ ते ४० कोटी पौंडांइतके भांडवल बाहेरून आयात करण्याची गरज राहील असे तज्ज्ञांचे मत आहे. ही गरज मुख्यतः अशामुळे की या पैशातून ज्या वस्तू किंवा माल विकत घ्यावयाचा तो भारतात होतच नाही वा पुरेसा होत नाही; असा माल परदेशात व परदेशी चलनाचा उपयोग करूनच विकत घ्यावा लागणार. उदाहरणार्थ वीज निर्मितीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणे तयार करणारे कारखाने भारतात सुरू केले जात आहेत. त्यासाठी त्यांना जी यंत्र-सामुग्री हवी ती अत्यंत व्यामिश्र स्वरूपाची व खास तेवढ्याकरता तयार केलेली अशी लागणार आहे. ही सर्व सामुग्री आपली आपणच बनवायची असे भारतीयांनी ठरविले तर त्यांना हे कारखाने सुरू करायला अनेक वर्षे, नव्हे अनेक तपे, थांबावे लागेल. दरवर्षी ६ टक्के वाढीचे लक्ष्य जर त्यांना गाठायचे असेल तर त्यांना बाहेरून मदत घ्यायलाच हवी. ही मदत प्रचंड प्रमाणावर घ्यावी लागेल असे नाही. तरी पण, बरेच मोठे, म्हणजे ३५ ते ४० कोटी पौंड इतकेहि भांडवल बाहेरून दरवर्षी आयात केले पाहिजे.

३५ ते ४० कोटी पौंड हा आकडा तुम्हांला लहान वाटतो की मोठा? फार लहानही नाही आणि फार मोठाही नाही. आपले विशेष काही मत बनत नाही. वास्तविक पाहता एवढी रक्कम काही मोठी नाही. एकट्या अमेरिकेकडून, ब्रिटनकडून किंवा पश्चिम जर्मनीकडून ही रक्कम यावी अशी अपेक्षा असती तर ही रक्कम मोठी आहे असे म्हणावे लागले असते. पण जगातल्या संपन्न देशांनी एकत्र येऊन ही रक्कम द्यायची म्हटले तर ही रक्कम काही मोठी नाही. मलाया, सिंगापूर व आणखी अशाच मागासलेल्या राष्ट्रानाही आर्थिक मदतीची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊनही, इंग्लंड, अमेरिका, प. जर्मनी, इटाली वगैरे राष्ट्राना मिळून ही रक्कम जड नाही. या विषयाचा ज्यांनी अभ्यास केला आहे त्या लोकांच्या मते एवढी रक्कम भारताला दरवर्षी देणे हे शक्य कोटीतले आहे. ही सर्व रक्कम भारत

पाश्चिमात्य राष्ट्राकडूनच घेईल असेही समजण्याचे कारण नाही. शक्य असेल तेवढी यातली रक्कम भारत रशियाकडूनही घेईल. आजच भारत रशियाकडून मदत घेत आहे. जर्मनी, इंग्लंड आणि रशिया या प्रत्येकाकडून भारताने एक एक पोलादाचा कारखाना घेतला आहे. ही पद्धतही योग्यच आहे. तिन्ही राष्ट्रांच्या तंत्रकौशल्याची तुलना आपोआपच पहायला मिळत आहे. आपले कर्ज तीन ठिकाणी भारताने विखुरले असे झाले. अशीच मदत भारत रशियाकडून घेत राहील अशी मी आशा करतो. म्हणजे रशियाचाही हातभार ही जबाबदारी उचलण्यात लागेल. सगळीच जबाबदारी आपल्या डोक्यावर घेण्याची पाश्चिमात्य देशांना हौस नाही हे मी तुम्हाला सांगू इच्छितो. रशियाने यातला काही हिस्सा उचलला तर आम्हांला खुषीच आहे. पोलाद कारखाने, तेलशुद्धीचे कारखाने व अशा मोठ्या प्रकल्पांसाठी रशियाने देऊ केलेले भांडवल बरेच आहे. साधारणपणे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भारताला दरवर्षी ३५ ते ४० कोटी पौंड भांडवलाची आयात करता येईल, असा माझा कयास आहे. विना सायास इतकी मदत भारताला मिळेल असे अर्थातच नाही. मदत देताना इंग्लंड, अमेरिका, प. जर्मनी किंवा इतर राष्ट्रे पुष्कळ आढेवेढे घेतील. इतकी मदत देणे काही शक्य होणार नाही, भारताचे दिवाळे निघायची पाळी आली आहे, भारताची अर्थव्यवस्था कोलमडत आहे, मोठी वाईट परिस्थिती आहे, वगैरे वगैरे अनेक तक्रारी आपल्याला ऐकायला मिळतील.

एकदा गमतीने माझ्या एका भारतीय मित्राला मी म्हणालो की, ' दर दोन वर्षांनी तुम्ही जर आपले दिवाळे काढू शकलात तर ते सगळ्यात धूर्त धोरण ठरेल. कारण कितीही काकू केली तरी शेवटी बाहेरून भांडवली मदत ही भारताला दिली जाईल याविषयी मला तिळमात्र शंका नाही. भारताचे दिवाळे वाजणार नाही इतकी काळजी घेतली जाणारच. तेव्हा भारताच्या परिस्थितीवर निराशेने व संतापाने काढलेले उद्गार, वर्तविलेली भविष्ये यांच्याकडे तुम्ही फार लक्ष देऊ नका. भारताला इतकी मदत कोठून मिळणार ! तेव्हा शेवटी आपण दिलेली मदत ही सगळी वाया जाऊन, भारताचे दिवाळे वाजायचे ते वाजणारच आहे अशा प्रकारची भाषा तुम्हाला नेहमीच ऐकावी लागेल. खरे म्हणजे खुद्द भारतीयांनीच या भाषेत बोलायला हवे. कारण

आतापर्यंत तरी दीर्घकालीन गरज लक्षात घेऊन मदत देण्याची जबाबदारी घ्यायला पाश्चिमात्य राष्ट्रांनी टाळले आहे. वास्तविक मदत द्यायची असे एकदा ठरल्यावर धंद्यात करतो तशी गुंतवणूक करण्याची वृत्ती ठेवायला हवी. ते काही असो, मी तुम्हांला सांगतो की, आम्ही काहीही बोललो, चालढकल केली, तरी शेवटी पाश्चिमात्य राष्ट्रे भारताची गरज भागविल्याशिवाय काही रहात नाहीत. पाश्चिमात्य राष्ट्रांनी घोडचुका केलेल्या नाहीत असे नाही. पण भारताच्या विकासाच्या प्रयत्नात अपयश येऊ देण्याइतका मूर्खपणा पाश्चिमात्य राष्ट्रे करतील यावर माझा विश्वास बसत नाही. भांडवलशाही व समाजवाद या दोहोपासून काही काही घेऊन लोकशाही राज्यव्यवस्थेखाली एक मिश्र अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा भारताचा प्रयत्न — याला मी एक केवळ प्रयोग म्हणायला तयार नाही — फसू देणे म्हणजे पाश्चिमात्य राष्ट्रांनी स्वतःची कबर खणण्यासारखे आहे. आम्ही वेडेपणा करू शकतो पण इतका वेडेपणा आम्ही करणार नाही असे मला वाटते. तेव्हा भारताला परकीय चलनाच्या स्वरूपात भांडवली मदत मिळण्याची जी दुसरी गरज ती बहुधा भागेल.

भारत आपल्या प्रयत्नात यशस्वी होईल की नाही हे इतरही काही राजकीय घडामोडींवर अवलंबून आहे. भारताचे राष्ट्रीय ऐक्य टिकून राहिले पाहिजे. पुष्कळांना वाटते की, नेहरू आणखी दहा वर्षे जगतील की नाही यावर बरेचसे अवलंबून आहे. येताना आम्ही पं. नेहरूंची भेट घेतली त्या वेळी ते चांगले धडधाकट दिसले. दहाच काय, आणखी वीस वर्षे जगण्याचा त्यांचा निर्धार दिसला. पण कितीही झाले तरी शेवटी नेहरू हा देखील माणूसच आहे. पण नेहरूंच्या पश्चात भारताचे तुकडे होतील, हे भविष्य मात्र खोटे ठरेल या विषयी मला खात्री आहे. भारत हा एकखांबी तंबू नाही. काँग्रेस पक्षाचे नेते हे अनुभवी आणि तावून सुलाखून निघालेले नेते आहेत. पं. नेहरूंचे असामान्यत्व निर्विवाद आहे. पण भारतीय मंत्रिमंडळात देशाचा राज्यकारभार हातात घेऊन चालवायला समर्थ माणसे इतर कोणी नाहीत असे समजणे चुकीचे आहे. नेहरूंचा मृत्यू हा फार मोठा आघात ठरणार असला तरी त्यांच्या पश्चात् राजकीय स्थैर्य टिकून राहणार नाही ही भीती निराधार आहे. खुद्द नेहरूच हे प्रथम सांगतील.

व्याख्यानाच्या शेवटी भारत मागे पडत आहे की यशस्वी होत आहे याबद्दल वाद घालण्याची माझी इच्छा नाही. यासंबंधी आपल्या प्रत्येकाचे वेगवेगळे मत असू शकेल. प्रश्न तो नाही. सांगण्याचा मुद्दा असा की, आकार आणि महत्त्व या दोन्ही दृष्टीने चीनच्या औद्योगीकरणाशी भारताचे औद्योगीकरण बरोबरी करते. भारताची सुरवात मंद गतीने झाली हे खरे पण भारताची प्रगती अधिक सातत्याने व स्थिरपणे झालेली आहे. पुढे जाऊन मला असेही वाटले की, भारताच्या वाढीचा वेग काहीही राहिला तरी भारत हे आज जगातले निर्णायक महत्त्वाचे राष्ट्र आहे. भारताचा प्रयत्न फसला आणि भारतातील लोकशाही कोलमडून त्या जागी लष्करी वा कम्युनिस्ट हुकुमशाही आली, ( असे झालेच तर प्रथम लष्करी राजवट येईल व तिचे रूपांतर कम्युनिस्ट हुकूमशाहीत होईल असे मला वाटते. ) तर जगात कम्युनिस्टांचे पारडे एकदम जड होईल. तेव्हा, एका अर्थी जगाचे भवितव्य भारतावर अवलंबून आहे असे म्हटले तरी चालेल.

भारतातील घडामोडींचा अभ्यास करणे इथे सिंगापुरात तुम्हांला फायद्याचे ठरेल. पुढील काही वर्षांत जगाच्या या कोपऱ्यात भारताचे आर्थिक वजन व प्रभाव चांगलाच वाढलेला तुम्हांला दिसेल. काल-परवाच मला कोणी म्हणाले की, पुढच्या वर्षी ( १९६२ ) तुम्ही सिंगापूर आणि मलायामध्ये प्रथमच तीस हजार टन पोलाद भारतातून आयात करणार आहात. भारतात नव्याने स्थापन झालेल्या तीन पोलाद कारखान्यांचा हा 'परिणाम' आहे. असे परिणाम दिवसेंदिवस दिसू लागतील आणि उत्तरेकडील शेजाऱ्याइतकीच पश्चिमेकडील शेजाऱ्याची आठवण तुम्हांला भविष्यात नेहमी राहील याची मला खात्री आहे.

• • •

# ५ लोकशाही

या शेवटच्या व्याख्यानात मी देशांतर्गत राज्यव्यवस्थेवर भर देणार आहे. नवोदित राष्ट्रातील परिस्थिती तसेच राज्य करण्याच्या त्यांच्या पद्धती या गोष्टी आंतरराष्ट्रीय राजकीय संबंधांच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत. पण अभ्यास करीत असताना या परस्पर संबंधित गोष्टी वेगळ्या वेगळ्या करून विचार करणे आपल्याला भाग पडते. तेव्हा या शेवटच्या व्याख्यानात मी लोकशाहीचा विचार करणार आहे. लोकशाही म्हणजे काय आणि तिचे एवढे महत्त्व काय म्हणून ?

लोकशाहीची एक कामचलाऊ व्याख्या करून मी भाषणाला सुरवात करतो. स्थूलतेचा दोष या व्याख्येत अर्थातच राहील. पण कोठून तरी सुरवात ही करायला हवीच. मी राजकीय तत्त्वज्ञ नाही वा राज्यशास्त्राचा प्राध्यापक नाही. मी प्रत्यक्ष राजकारणी आहे. तेव्हा माझ्या अर्थाची लोकशाही आणि राज्यकारभाराची व जगापुढे ठेवली जात असलेली साम्यवादी राजवटीची पर्यायी पद्धत यांच्यातील विरोध पाहणे, या दोहोत तुलना करणे, उद्बोधक ठरेल. सार्वत्रिक प्रौढ मतदानाने देशातले सरकार निवडलेले असेल तर त्या देशात लोकशाही आहे असे मी म्हणेन. आपल्याला हवे ते सरकार निवडण्याची आणि कालांतराने, त्या सरकारबद्दल असमाधान वाटल्यास, त्या सरकारला पदच्युत करून दुसरे सरकार निवडून देण्याची संधी लोकांना जिथे आहे, त्या देशात लोकशाही आहे असे मी म्हणेन. लोकशाहीचा सगळा आशय वरील व्याख्येत व्यक्त होतो असे अर्थातच नाही. या

राज्यव्यवस्थेला राज्यशास्त्राच्या क्रमिक पुस्तकात ‘ प्रातिनिधिक सरकार ’ असे म्हणतात. ‘ प्रातिनिधिक सरकार ’ हा आधुनिक लोकशाहीचा गाभा आहे असे मला वाटते. नाहीतरी रोज आपण फार खोलात न जाता म्हणतच असतो, ‘ या राज्यात लोकशाही आहे, त्या राज्यात मात्र नाही; ’ अशी तुलना करीत असतो. आणि असे म्हणत असता प्रामुख्याने आपल्या डोळ्यांसमोर पुढील कसोटीच असते : ‘ त्या राज्यातील लोकांना आपल्याला हवे ते सरकार निवडून देण्याचा अधिकार आहे की नाही ? तेथे ठराविक कालानंतर स्वतंत्र निवडणुका होतात की नाही ? ’

लोकांनी निवडून दिलेले प्रातिनिधिक सरकार हा माझ्या मते लोकशाहीचा गाभा आहे. या प्रातिनिधिक सरकारला राज्यकारभार चालविता यायचा असेल तर इतर काही शर्ती पुऱ्या व्हायला हव्यात. तेथे **भाषण स्वातंत्र्य** असणे आवश्यक आहे. उघडच आहे, भाषण स्वातंत्र्यच नसेल तर दोन उमेदवारांपैकी, दोन पक्षांपैकी, आणि पर्यायाने दोन प्रकारच्या सरकारांपैकी, कोणते सरकार आपल्याला हवे ते लोकांना ठरविता येणार नाही. तुमच्या सिंगापूरमध्ये एका पोटनिवडणुकीची तयारी चालू आहे. लोक रस्त्यात कोपऱ्या कोपऱ्यावर सभा घेत आहेत, प्रचार करीत आहेत. अशा सभा घेता येणे, प्रचार करता येणे हेच भाषण स्वातंत्र्य. तेव्हा खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य चालायचे असेल तर भाषण स्वातंत्र्याचा हक्क ही सर्वांत महत्त्वाची शर्त आहे. भाषण स्वातंत्र्याइतकेच **संघटना स्वातंत्र्य** महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, मजुरांना ट्रेड युनियन्समध्ये सभासद होता आले पाहिजे. मजुरी, कामाचे तास, कामाच्या पद्धती या प्रश्नांवरून मालकांबरोबर संघटितपणे बोलणी करता आली पाहिजेत; आणि ही बोलणी फिसकटली तर संपावर जाता आले पाहिजे. या दोन प्रकारच्या स्वातंत्र्यांशिवाय आधुनिक लोकशाही तग धरू शकेल असे मला वाटत नाही. संघटना स्वातंत्र्यात कामगार संघटनांचे पदाधिकारी गुप्त प्रौढ मतदानाच्या पद्धतीने निवडून देण्याचा हक्क समाविष्ट असला पाहिजे. पार्लमेंटरी निवडणुका याच एक निवडणुका लोकशाहीत महत्त्वाच्या आहेत असे नाही. ट्रेड युनियन्समधील निवडणुका, पक्षांतर्गत निवडणुका अशा अनेक प्रकारच्या निवडणुकांना लोकशाहीत अतिशय महत्त्व आहे. या शिवाय इतर काही प्रकारची स्वातंत्र्ये आवश्यक

असतात. ज्यूरी आणि न्यायाधीश याना आपल्या बुद्धीशी प्रामाणिक राहून निवाडा करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. न्यायदान, न्यायाधीश आणि ज्यूरर्स राज्यसेत्तच्या आधीन असता कामा नयेत. 'कायद्याचे राज्य' ज्याला म्हणतात तेही हवे. आपणच केलेले कायदे, बनविलेली घटना, खुद्द सरकारनेच धाब्यावर बसविता कामा नये.

## कायद्याचे राज्य ही अत्यंत आवश्यक गोष्ट

कायद्याचे राज्य एक सूक्ष्म आणि व्यामिश्र कल्पना आहे. पण ही एक फार प्राचीन आणि तितकीच महत्त्वाची कल्पना आहे. लोकशाहीच्या दृष्टीने तिचे अपरंपार महत्त्व आहे. या गोष्टीकडे आजच्या जगात तरी आपले दुर्लक्ष होणार नाही. बिगर लोकशाही राष्ट्रातून राहणाऱ्या नागरिकांचे सर्वांत अधिक नुकसान 'कायद्याचे राज्य' ही राष्ट्रे मानीत नसल्यामुळे होते. मी मुद्दामच नैतिकदृष्ट्या निवाडा करणारा शब्द वापरीत नाही. बिगर लोकशाही राष्ट्रे आपल्या नागरिकांशी व्यवहार करीत असताना अंतिमतः कोणत्याच कायद्याचे, घटनेचे स्वतःवर बंधन मानीत नाहीत ही अतिशय गैरसोयीची गोष्ट आहे. अशा राष्ट्रातील नागरिकांचे आयुष्य सर्वस्वी त्या राष्ट्रातील सरकारांच्या हातात राहते.

राज्यव्यवस्थेची दुसरी पर्यायी कल्पना साम्यवाद्यांची आहे. त्या कल्पनेशी वरील व्याख्येची आपण तुलना करू.

रशिया, चीन, हंगेरी, पोलंड, पूर्व जर्मनी खरे म्हणजे सगळ्याच साम्यवादी राष्ट्रात वस्तुतः लोकशाही राज्यव्यवस्थाच अस्तित्वात आल्याचा दावा साम्यवादी करतात हे तुम्हाला माहीत आहे. या देशातून "जनतेची लोकशाही" खरोखरच आहे का असे कोणी त्यांना विचारले की त्यांना राग येतो. "जनतेची लोकशाही" या शब्दाने त्यांना काय सूचित करायचे असते ? भांडवलशाही त्या देशात नष्ट केलेली आहे. आणि जिथे भांडवलशाही नाही तिथे लोकशाही असते अशी त्यांची व्याख्या आहे. त्यांची व्याख्या ही अशी असल्यामुळे खुल्या निवडणुका होतात की नाही, स्वायत्त ट्रेड युनियन्स आहेत की नाहीत, या ट्रेड युनियन्सना संप करण्याचा अधिकार आहे

की नाही, आणि मी सांगितलेली लोकशाहीची इतर वैशिष्टये आपल्या देशात आहेत की नाहीत, याचा ते कधी विचार करीत नाहीत. या गोष्टींचा त्यांच्या मताने लोकशाही राज्यव्यवस्थेशी काही संबंध नाही. ते लोकशाही हा शब्द वापरतात तेव्हा त्यांना वेगळेच म्हणायचे असते. तो शब्द ते गंभीर अर्थानेच वापरतात, पण हा अर्थ सर्वस्वी वेगळाच आहे. भांडवलशाही नष्ट करणे म्हणजेच लोकशाही प्रस्थापित करणे असा तो अर्थ आहे.

लोकशाहीची माझी व्याख्या बरोबर आणि त्यांची व्याख्या चूक असे सांगणारा कोणताच कायदा नाही. कोणी काय आपल्याला वाटेल तशी शब्दाची व्याख्या करावी. पण मला मात्र असे वाटते की, साम्यवाद्यांची लोकशाहीची व्याख्या गोंधळात टाकणारी तरी खासच आहे. आपल्या देशात **समाजवादी** किंवा **साम्यवादी** राज्यव्यवस्था आहे असे त्यांनी म्हटले तर ते समर्थनीय आहे; त्या देशातून भांडवलशाही त्यांनी नष्ट केलेली आहे हे म्हणणे कठीण. पण या राज्यव्यवस्थांना उद्देशून लोकशाही या शब्दाचा वापर करणे हे संभ्रम निर्माण करणारे आहे. जगातील सर्वांचे ज्या बाबतीत एकमत आहे त्या लोकशाहीच्या वैशिष्टयांपैकी कोणतीच वैशिष्टये या राष्ट्रात नाहीत.

पण कोणी मला विचारायच्या आधी मीच विचारतो, यापैकी कोणतीच वैशिष्टये साम्यवादी ‘पीपल्स डेमॉक्रसीज्’मध्ये नाहीत! माझ्या माहितीप्रमाणे सगळ्या साम्यवादी राष्ट्रात निवडणुका होतात. पण, त्याच वेळी, माझ्याइतकेच तुम्हालाही माहीत असावे की, सगळ्या साम्यवादी राष्ट्रातील निवडणुकांचे एक समान वैशिष्टय आहे : साम्यवादी राष्ट्रातील निवडणुकात प्रत्येक मतदारसंघात एकच उमेदवार असतो. आमच्या पक्षाचे भूतपूर्व प्रधानमंत्री आणि नेते क्लेमेंट ॲटली यांनी या निवडणुकांचे फार मार्मिक वर्णन केले आहे. ते म्हणतात, ‘साम्यवादी निवडणुका या घोड्यांच्या शर्यती आहेत; वैशिष्टय एवढेच की, या शर्यतीत एकच घोडा पळतो.’ अगदी चपखल वर्णन आहे हे. आपण ज्याला निवडणुका समजतो त्या अर्थाने या निवडणुका नाहीतच मुळी. निवड करायला संधी असेल तिथे निवडणूक होऊ शकते. पण एका मतदारसंघात दोन वा अधिक उमेदवारांच्या ऐवजी जर एकच उमेदवार असला तर मतदारांना निवडण्याची संधी आहे असे काही म्हणता

येणार नाही. मतदार मते देवोत वा न देवोत तो उमेदवार निवडून हा येणारच. निवडणूक ही खुली आहे की नाही, खरीखुरी आहे की बनवाबनवीची आहे, त्याची ही निर्णायक कसोटी आहे. तुम्हांला एक उदाहरण देतो.

१९५६ साली मी पोलंडमध्ये होतो हे तुम्हाला मी सांगितलेच आहे. त्या वेळी रशियाच्या वर्चस्वापासून आपली राष्ट्रीय स्वायत्तता प्रस्थापित करण्याची उत्कट आकांक्षा खुद्द पोलिश साम्यवाद्यांना वाटत होती. काही प्रमाणात त्यांनी आपल्या प्रयत्नात यशही मिळविले हेही तुम्हांला मी सांगितले. लोकशाही राज्यव्यवस्थेचे काही सामान्य व सर्वसामान्य रिवाज आपल्याकडेही सुरू करावेत अशी त्यांची इच्छा होती. खरे म्हणजे, लोकशाहीतील प्रधान वैशिष्ट्य आपल्या राष्ट्रात निर्माण करावे, **लढविलेल्या**, दोन किंवा अधिक उमेदवारांनी **लढविलेल्या**, निवडणुका पोलंडमध्ये सुरू कराव्यात अशी त्यांची इच्छा होती. मी पोलंडमध्ये पोचल्यावर काही तासातच सेंट्रल कमिटीच्या एका प्रमुख सदस्याने मला बाजूला घेऊन विचारले, 'मि. स्ट्रॅची, जगातल्या सर्वात श्रेष्ठ लोकशाही राष्ट्राचे आपण नागरिक आहात. तुम्हाला आम्ही व्याख्याने द्यायला बोलावले आहे. आमच्या देशात खरीखुरी लोकशाही निर्माण करण्याच्या दृष्टीने काय करता येईल ते तुम्ही आम्हाला सांगावेत अशी आमची इच्छा आहे. निवडणुका खरोखरच लढविल्या जाव्यात असे आम्हाला वाटते. पण त्यासाठी प्रत्येक मतदारसंघात एकाहून अधिक उमेदवार हवेत. खरोखरच काही बिगर साम्यवादी किंवा साम्यवादविरोधी लोकांनी पुढील निवडणुकांना उभे राहावे अशी आमची इच्छा आहे ......

'पण आमच्यासमोर एक मोठी कठीण समस्या आहे' ते पुढे म्हणाले, 'बिगर साम्यवादी किंवा साम्यवाद विरोधी उमेदवारांना आम्ही निवडणूक लढवू दिली तरी निवडणुकीत साम्यवादीच निवडून येतील याची व्यवस्था कशी करता येईल ? तुम्ही या बाबतीत मार्गदर्शन कराल का ?'

तुम्हाला हा सगळाच विनोद वाटेल; पण अक्षरशः हे त्यांनी वापरलेले शब्द आहेत. मी म्हणालो, 'मला बोलावीत असताना तुमचा–माझ्याबद्दल फाजील समज झालेला दिसतो. कारण तुमच्या प्रश्नाला मजजवळ काही

उत्तर नाही. माझ्या मते लोकशाहीचा मुळी अर्थच असा की, तुम्ही एकापेक्षा अधिक उमेदवारांना केवळ निवडणूक लढवू देता असे नाही, तर कोणता उमेदवार निवडून येईल याची खात्री देऊ शकत नाही.' त्या गृहस्थांची फार निराशा झाली.

तुमच्या परवानगीने सिंगापूरमधील परिस्थितीसंबंधी, एक टिप्पणी मी इथे जोडतो : गेल्या काही दिवसात पार पडलेल्या हॉंगलिम पोटनिवडणुकी-संबंधी मी काही सांगणार आहे. या निवडणुकीत सरकारपक्षीय उमेद-वाराचा प्रचंड बहुमताने पराभव झाला. या तुमच्या शहरात खरीखुरी लोकशाही काम करीत आहे असे मला तुम्हांला सांगायचे आहे. कारण हॉंगलिमच्या पोटनिवडणुकीत कोण जिंकणार आहे हे प्रत्यक्ष मतदान होऊन जाईपर्यंत तुमच्या सरकारलाही ठाऊक नव्हते! म्हणजे या निवडणुकीत काही गफलत नव्हती. याचाच अर्थ हॉंगलिम मतदारसंघातील मतदारांवर त्यांनी कोणाला मत द्यावे या बाबतीत दडपण वा सक्ती होत नव्हती. त्यांचा ते विचार करून मत देत होते. त्यांची निवड योग्य की अयोग्य याच्याशी इथे मला कर्तव्य नाही.

## आपल्या इच्छेनुसार राज्यकर्ते निवडण्याची पद्धत बहुमोलाची

लोकशाहीची मी केलेली साधीसुधी कामचलाऊ व्याख्या स्थूलमानाने बरोबर आहे हे मी तुम्हांला पटवून दिल्यावरहि तुमच्यापैकी काही जण म्हणतील, 'तुम्ही काय लोकशाही म्हणता ती ठीकच आहे. पण तिला घेऊन करायचे काय? काय तिची किंमत?' खुल्या निवडणुका आणि लोकशाहीची इतर जी वैशिष्ट्ये मी सांगितली यांचे देखील काही अनिष्ट परिणाम आहेतच. बहुधा प्रत्येक सरकार आपल्या मतदारांना पार कंटाळलेले असते; मतदारांवर चिडलेले असते. निदान मला तरी मतदारांवर खूष असलेले सरकार क्वचितच पहायला मिळालेले आहे. सरकार पक्षीयांची नेहमीचीच भावना अशी की मतदारांनी आपणाशी द्रोह केला, किंवा गाढवपणे मते दिली, वगैरे. मत-दारांच्या इच्छा पुऱ्या करायच्या म्हणजे सरकारच्या नाकी नऊ येतात. मतदारांच्या मागण्या नेहमीच न्याय्य व योग्य असतात अशातला भाग नाही. सगळ्याच माणसांप्रमाणे मतदारहि चुका करतात. काहीहि असो, वेगवेगळ्या

उमेदवारांतून लोकांनी आपल्या इच्छेनुसार निवड करावी ही राज्यकर्ते निवडण्याची जी विक्षिप्त पद्धत आहे ती मला बहुमोलाची वाटते.

राज्यकर्ते निवडण्याची पद्धत म्हणालो ते अशासाठी की आधुनिक लोकशाहीत प्रत्यक्ष मतदारांच्या हाती राज्य असत नाही. वीस लाखांइतक्या छोट्या लोकवस्तीच्या सिंगापूर शहरातहि लोकांच्या हाती राज्यकारभार सोपविता येणार नाही. मतदारांनी मनात आणले तरी ते राज्यकारभार चालवू शकणार नाहीत. तेव्हा इंग्लंडमधील तीन कोटी मतदारांनी, किंवा अमेरिकेतील दहा कोटी मतदारांनी, राज्य करायचे ठरविले तर त्यांना ते चालविता येईल हे अशक्यच. आधुनिक काळात अगदी आदर्श लोकशाही झाली तरी ती मतदारांना दोन किंवा अधिक राजकीय पक्षांनी उभ्या केलेल्या आपल्या प्रातिनिधिक उमेदवारातून खुली निवड करण्याची संधी जास्तीत जास्त देऊ शकते. एक राजकीय पक्ष राज्यकर्ता पक्ष म्हणून सरकार बनवितो आणि दुसरा ( किंवा दुसरे ) विरोधी पक्ष म्हणून काम करतो असे लोकशाहीत शेवटी होते.

वेगवेगळ्या राजकीय पक्षांतून एक पक्ष मतदार स्वतःकरता निवडतात असे आपण वर म्हटले. राजकीय पक्ष ही काय चीज आहे ? अगदी रांगड्या भाषेत सांगायचे तर राजकारणी लोकांचे हे कंपू आहेत, गट आहेत, असे म्हणावे लागेल. राजकीय पक्ष म्हणजे मूलतः यापेक्षा अधीक काही असू शकत नाही. राजकीय पक्षांचे नेतृत्व म्हणजे काही राजकारणी माणसांचा गट. राजकीय पक्ष म्हणजे एवढेच असले तर वेगवेगळ्या गटांतून आपल्याला हवा तो गट निवडण्याचे स्वातंत्र्य हे इतके महत्त्वाचे असू शकत नाही असे तुम्ही म्हणाल. या स्वातंत्र्याचे महत्त्व तुम्ही कसे सिद्ध करणार असे तुम्ही म्हणाल. याचे महत्त्व मला का वाटते ते मी सांगतो. या गोष्टींचा मला थोडा अनुभव आहे. आधुनिक लोकशाही राज्यव्यवस्था कशी काम करते हे माझ्या देशात मी गेली चाळीस वर्षे पाहतो आहे. जगात दुसऱ्याही देशात तिचे कामकाज कसे चालते ते मी पाहिलेले आहे. दोन राजकीय पक्ष मतदारांच्या मतांकरता स्पर्धेच्या रिंगणात उतरले की, मते मिळविण्याच्या धडपडीत मतदारांना आपल्या मागण्या पुऱ्या करून घेण्याचा एक कामचलाऊ, रांगडा मार्ग सापडतो अशा निर्णयाला मी आलेलो आहे. आधुनिक लोकशाही ही एक

स्पर्धा आहे. जो राजकीय पक्ष मतदारांच्या इच्छा अधिक प्रमाणात उचलून धरतो त्याच्या हाती राज्य येते. आणि राज्य हातात आल्यावर मतदारांना दिलेली अभिवचने पुरी करण्याचे दडपण त्या पक्षावर येते. लोकांच्या काही मागण्या त्यांना पुऱ्या कराव्या लागतात. आपण दिलेली सर्वच आश्वासने कोणताच राजकीय पक्ष पाळीत नसतो. कारण निवडणुकीच्या धमालीत मते मिळविण्यासाठी अशक्य आणि परस्परविरोधी आश्वासने सगळेच राजकीय पक्ष देत असतात. पण आपल्या हातात राज्य दिले तर आपण काय करणार आहोत याची साधारणपणे बरोबर कल्पना या वेगवेगळ्या आश्वासनांमधून मतदारांना मिळत असते.

लोकशाहीच्या यशासाठी केवळ दोन किंवा अधिक प्रतिस्पर्धी राजकीय पक्ष असून भागत नाही. या वेगवेगळ्या पक्षांच्या भूमिकेत, धोरणात, खरोखरच वेगळेपणा असला पाहिजे, अंतर असले पाहिजे. एक पक्ष नियोजनबद्ध विकास आणि समाजवाद यांचा पुरस्कार करणारा असेल तर दुसरा अनिर्बंध भांडवलशाहीचा पुरस्कार करणारा असू शकेल. दोन्ही पक्षांपैकी कोणत्याच पक्षाला सर्वस्वी आपल्या मनासारखे राज्य करता येणार नाही. पण आपण निवडलेल्या दिशेने त्या पक्षाला वाटचाल करता येईल. प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या दृष्टिकोनात आणि कार्यक्रमात जर असा मूलभूत भेद असेल, वर्गभेदांवर, परस्पर विरोधी हितसंबंधांवर, जर हे पक्ष संघटित झालेले असतील तर एका पक्षाला बाजूला करून व दुसऱ्या पक्षाच्या हाती सत्ता देऊन मतदार देशाच्या भवितव्याची घडण करण्यात महत्त्वाचा हातभार लावीत असतात असे निष्पन्न होईल. जर विरोधी पक्षात काहीच फरक नसेल तर एक पक्षीय (एका मतदारसंघात एकच उमेदवार) राज्य आणि लोकशाही यात मतदारांच्या दृष्टीने काहीच फरक नाही. दोघात निवड करण्याला अर्थ तेव्हाच आहे जेव्हा दोघात काही अंतर आहे, भेद आहे, आणि तो केवळ नावाचा नाहीं.

## दोन पक्षात काही मुद्यांवर समान भूमिका असावी

आणि आता जरा आडवळणी मुद्दा. राजकीय पक्षांमध्ये अंतर असले पाहिजे; त्यांची तोंडे वेगवेगळ्या दिशांना असली पाहिजेत. एक पक्ष

भांडवलशाही प्रस्थापित करू इच्छित असेल तर दुसरा समाजवाद; एक पक्ष कट्टर राष्ट्रवादी असेल तर दुसरा उदारमतवादी, आंतरराष्ट्रीयवादी असेल. पण हेहि त्याचबरोबर आवश्यक आहे की वेगवेगळ्या पक्षांची तोंडे अगदी विरुद्ध दिशांना नसावीत. दोन विरोधी पक्षांत छत्तीसचा आकडा नसावा. दोन प्रतिस्पर्धी पक्षांत जर कोणत्याहि मुद्यावर एकमत नसेल, समान भूमिका नसेल, सर्वच बाबतीत परस्परविरुद्ध भूमिका घेऊन जर ते चालणार असतील, तर त्या देशात लोकशाही नांदू शकेल असे मला वाटत नाही. एक पक्ष अगदी शुद्ध भांडवलशाहीचा पुरस्कर्ता आहे असे समजा. अनिर्बंध भांडवलशाहीला कोणत्याहि प्रकारे मुरड घालायला, विरोधी मागण्यांशी जुळवून घ्यायला, समाज कल्याणाचे कार्यक्रम हाती घ्यायला हा पक्ष तयार होणार नाही. समजा दुसऱ्या बाजूला भांडवलशाहीला उलथून पाडण्याची शपथ वाहिलेला क्रांतिकारक पक्ष आहे. तोहि मिश्र अर्थव्यवस्था मान्य करायला तयार नाही. अशा परिस्थितीत लोकशाही राज्यव्यवस्था टिकणार नाही. एका पक्षाने खुली अनिर्बंध अर्थव्यवस्था प्रस्थापित करावी आणि दुसऱ्या पक्षाने दर वेळी ती मोडून समाजसत्तावाद प्रस्थापित करावा—हे पर्याय व्यवहार्य ठरणार नाहीत. थोड्याच वर्षांत अशा देशाचे दिवाळे वाजेल. खरे म्हणजे या दोन पक्षांपैकी जो पक्ष सत्तेवर असेल तो पक्ष दुसऱ्या पक्षाला शांततामय मार्गाने सत्तेवर येऊच देणार नाही. कारण दुसरा पक्ष सत्तेवर आला तर आपली धडगत नाही हे त्या पहिल्या पक्षाला चांगले माहीत असणार.

साम्यवादी जगात " पुराण " कालापासून एक विनोद चालत आलेला आहे (हा बहुधा पोलिश असावा. असले विनोद पोलंडमध्येच बहुतेक जन्माला येतात. ). एक माणूस आपल्या साथीदाराला म्हणतो, ' रशियात एकच पक्ष असला पाहिजे हे म्हणणे निखालस खोटे आहे. रशियातहि दोन पक्ष असू शकतात—त्यातला एक पक्ष सत्तेवर आणि दुसरा तुरुंगात असला म्हणजे झाले. ' देशातील दोन प्रतिस्पर्धी पक्षात परस्परांच्यात विस्तव जाऊ नये इतका विरोध असेल तर अपरिहार्यपणे याच थराला गोष्टी येणार. लोकशाही नांदायची असेल तर प्रतिस्पर्धी पक्षांच्या धोरणात, कार्यक्रमात, सिद्धान्तात, अंतर असले पाहिजे; त्या दोन पक्षात काही भावनात्मक वैमनस्य

असले पाहिजे; आणि तरीहि, या वैमनस्याच्या आणि विरोधी भूमिकांच्या पलिकडे काही मुद्यावर दोन्ही पक्षात एकवाक्यता, सामंजस्य असणे आवश्यक आहे. सकृद्दर्शनी विसंगत वाटणारी ही गोष्ट ब्रिटनमध्ये आम्ही जुन्या काळापासून चालत आलेल्या दोन वाकप्रयोगांनी व्यक्त करीत असतो. ‘ विरोधी पक्षाचे काम विरोध करण्याचे आहे. ’ विरोधी पक्षाची धोरणे व कार्यक्रम हे राज्यकर्त्या पक्षापासून वेगळे असावेत आणि त्यांनी सरकार पक्षाला आपल्या विरोधाने सतत धारेवर धरावे या दोन्ही गोष्टी स्पष्टपणे वरील वाक्यात सांगितलेल्या आहेत. पण आम्ही, ‘ राणीचे राज्य बिनघोर चाललेच पाहिजे, ’ असेहि म्हणतो. वेळप्रसंगी परस्परांशी सहकार्य करूनहि पण देशाचा कारभार सुरळीतपणे चालेल असे सरकार बनविण्याची जबाबदारीहि दोन्ही पक्षांवर नेहमीच टाकलेली आहे. देशाचा कारभार कसा चालवावा यासंबंधी दोन्ही पक्षांची मते परस्परांहून भिन्न असली तरी आपल्या भांडणात देशाचा कारभारच थंड पडता कामा नये, देशाचा कारभार चालू ठेवणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे, ही गोष्टहि उभय पक्षांनी मान्य केलेली आहे.

ब्रिटिश राजकीय जीवनात तिसरीहि एक म्हण प्रचलित आहे. आणि या म्हणीमध्ये ही विसंगति नाही ही गोष्ट स्पष्ट केलेली आहे. ‘ राणी सरकारचा स्वामिनिष्ठ विरोधी पक्ष ’ ( Her Majesty’s Loyal Opposition ) असा वाक्प्रयोग आम्ही करतो. ही एक गुंतागुंतीची व प्रगल्भ कल्पना आहे. एकदा एका रशियन माणसाने मला या म्हणीचा अर्थ स्पष्ट करून सांगण्यास सांगितले. मी खूप प्रयत्न केला पण शेवटी मला काही यश आले नाही. ही एक व्यामिश्र कल्पना आहे. पण या व्यामिश्र कल्पनेवरच लोकशाही नांदणार की नाही हे बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे.

लोकशाही राज्यव्यवस्था राबविण्याइतके एखाद्या देशातील लोक प्रगल्भ झाले आहेत असे समजा. तरी आपला पुढचा प्रश्न शिल्लक उरतोच : लोकशाही ही राज्यव्यवस्था हिताची आहे का ? लोकशाहीने कार्यसिद्धी होते का ? सर्वसामान्य माणसाचे जर लोकशाहीत कल्याण झाले नाही तर जनता लोकशाहीला आपला पाठिंबा देणार नाही.

## हुकूमशाही राज्यव्यवस्था अधिक कार्यक्षम हा गैरसमज

दुसऱ्या कोणत्याहि राज्यव्यवस्थेप्रमाणे लोकशाहीला देखील ही व्यावहारिक कसोटी लावलीच पाहिजे. शेवटी, आधुनिक काळातील सरकारचे काम तरी काय ? काही प्रकारचे निर्णय घेण्याची ती एक प्रक्रिया व व्यवस्था आहे. आधुनिक समाजात कोणत्याहि सरकारपुढे रोज नित्य नवे प्रश्न उपस्थित होत असतात आणि या प्रश्नांवर सरकारला निर्णय घेणे अपरिहार्यच असते. काही निर्णय छोटे असतात, तात्कालिक असतात; काही निर्णय मोठे आणि दूरगामी महत्त्वाचे असतात. आधुनिक सरकार सारखे निर्णय घेत असते. निर्णयांचा नुसता प्रवाहच वाहत असतो. चांगले-वाईट, असे-तसेच, सगळ्या प्रकारचे निर्णय घेतले जातात. निर्णय घेण्याशिवाय गत्यंतरच नसते. युरोपातील ( आणि आशिया व आफ्रिकेतील ) पुष्कळ लोकांना असे वाटते की नेमक्या या निर्णय घेण्याच्या कसोटीलाच लोकशाही उतरत नाही. नैतिकदृष्ट्या लोकशाही ही श्रेष्ठ राज्यव्यवस्था असेल; तात्त्विकदृष्ट्या लोकशाही राज्यव्यवस्थेत अनेक फायदे असतील; पण व्यवहारात हुकूमशाही राज्यव्यवस्था ही अधिक **कार्यक्षम** असते असे या लोकांचे म्हणणे आहे. युरोपमध्ये एकेकाळी ही धारणा सार्वत्रिक होती. मुसोलिनीच्या फासिस्ट इटालीकडे बोट दाखवून नेहमी सांगितले जाई, ‘ पहा, इटालीत गाड्या कशा वेळेवर येतात ! ’ लोकशाहीपेक्षा हुकूमशाही केव्हाहि अधिक कार्यक्षम राहणार ही गोष्ट अक्षरशः अशा पोरकट उदाहरणांनी सिद्ध करून दिली जात असे.

प्रथमदर्शनी माणसाला हे म्हणणे चटकन् पटते. लोकशाही सरकार नेहमीच शहाणपणाने निर्णय घेत नाही हे खरे आहे. मधून मधून लोकशाही सरकार घोडचुका करीत नाही असे मी कधीच म्हणणार नाही. माझ्या आयुष्यात ब्रिटिश सरकारने अशा चुका केलेल्या मी पाहिलेल्या आहेत. तेव्हा मी असे कसे म्हणेन की लोकशाही सरकार घोडचुका करीत नाही ? उदाहरणार्थ, १९३८ साली म्यूनिख येथे हिटलरपुढे नमते घेण्याची ब्रिटिश सरकारने केलेली चूक मनासमोर आणा. ही शरणागति तात्पुरती ठरली; हिटलरशी दोन हात करायला हवेत ही वस्तुस्थिति वर्षभरानंतर मान्य करण

भाग पडले. पण म्युनिखच्या एका चुकीने जवळजवळ ब्रिटनचे स्वतंत्र अस्तित्वच समूळ उपटून निघाले. माझ्या मते तर त्या एका चुकीमुळे जगाला विनाकारण अतिविध्वंसक युद्धातून जावे लागले. केवढी ही घोडचूक !

किंवा, अलिकडचे, ब्रिटनने सुवेझवर केलेल्या चढाईचे, उदाहरण घ्या. ही देखील भयंकर चूक होती. पण या दोन्ही उदाहरणात एक गोष्ट तुम्ही लक्षात घ्यायला हवी आहे. या चुका दुरुस्त केल्या गेल्या. म्युनिखला केलेली चूक वर्षभरात सुधारून घेतली गेली; सुवेझची चूक तर चोवीस तासात सुधारली गेली. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दडपण इतके प्रचंड निर्माण झाले की ब्रिटनने आपली चढाई थांबवली आणि पूर्ण माघार घेतली.

## चुका होतात पण त्या सुधारण्यासाठी लोकशाहीत दडपण कायम असते

लोकशाही राज्यव्यवस्थेत चुका होत नाहीत असे नाही. अगदी घोडचुका होतात. पण या चुका सुधारून घेतल्या जाव्यात या प्रकारचे दडपण लोकशाहीत कायम असते : आणि त्यामुळें, प्रत्येक खेपेला जरी नाही तरी, पुष्कळ वेळा लोकशाहीत चूक सुधारून घेतली जाते.

या बाबतीत लोकशाहीची तुलना हुकूमशाही राज्यव्यवस्थांच्या कारकीर्दीशी आपण करू या. प्रथम मी " उजवी " फासिस्ट हुकूमशाही विचारात घेतो. कोणत्याहि सरकारला घ्याव्या लागणाऱ्या निर्णयात दुय्यम दर्जाचे निर्णय पुष्कळ असतात. अशा निर्णयांच्या बाबतीत पुष्कळदा हुकूमशाही राज्यव्यवस्था आरंभीच्या काळात अतिशय कार्यक्षम असतात. काही बाबतीत हिटलरचे सरकार अतिशय कार्यक्षम व चोख होते हे नाकारण्यात काही अर्थ नाही. हिटलर सत्तेवर आला त्या वेळी जर्मन अर्थव्यवस्थेचे दिवाळे निघालेले होते. हिटलरने जर्मन अर्थव्यवस्थेला पुन्हा संघटित केले. हे तर निर्विवादच की, कोणी कधीहि संघटित केले नव्हते अशा यशस्वीपणे त्याने जर्मनीला युद्धाकरता सज्ज केले. त्या दृष्टीने त्याने घेतलेल्या निर्णयात अव्वल दर्जाची कार्यक्षमता होती. पण हिटलरने घेतलेल्या अधिक व्यापक आणि मूलभूत महत्त्वांच्या निर्णयांच्या बाबतीत हेच म्हणता येईल का ? काही काळ,

हिटलरच्या कावेबाज हेतूंच्या सिद्धीच्या दृष्टीने हे निर्णयहि अत्यंत प्रभावी व परिणामकारक ठरले. त्याने फ्रान्सला गुडघे टेकायला लावले. युरोपातून ब्रिटनची उचलबांगडी केली; आणि वैमानिक सामर्थ्य पणाला लावून ब्रिटनचा पराभव करण्याची शर्थ केली. या प्रयत्नात त्याला यश आले नाही. पण जग जिंकायला निघालेल्या कोणच्याहि सेनापतीला कुठे तरी अपयश हे येणारच. निर्णय घेण्याची हुकूमशाहीची यंत्रणा अकार्यक्षम होती असे या उदाहरणावरून म्हणता येणार नाही. या वेळपर्यंत हिटलरने मूर्ख-पणाचा निर्णय घेतला असे काही म्हणायला जागा नव्हती. पण एकाएकी हिटलरने असा पवित्रा टाकला की रशिया आणि अमेरिका या दोन बलाढ्य राष्ट्रांना त्याने आपल्या विरुद्ध युद्धात खेचले. १९४१ साली एक अवस्था अशी होती की सर्व पश्चिम युरोप जर्मनीच्या अंकित होता. फक्त ब्रिटनचाच पराभव काय तो झालेला नव्हता. जर्मनीचे सामर्थ्य ब्रिटनच्या मानाने कितीतरी पट जास्त होते. पण सहा महिन्यांच्या आत अशी अवस्था झाली की ब्रिटन, रशिया आणि अमेरिका या तिन्ही राष्ट्रांशी एकाच वेळी जर्मनीला युद्ध करण्याची पाळी आली. त्या क्षणापासून जर्मनीचा पराभव अटळ ठरला. कोणत्याहि सरकारने कधीहि केलेल्या कोणत्याहि चुकीपेक्षा ही अधिक गाढव-पणाची चूक नव्हे काय? जर्मनीचे कारखाने पहिल्या प्रतीचे होते; जर्मन सेनेची बरोबरी करू शकेल अशी दुसरी कोणती सेना नव्हती; आणि तरीहि, या एका चुकीने जर्मनीचा विनाश अटळ ठरला. या एका चुकीचे हे विराट विध्वंसक परिणाम लक्षात घेतले म्हणजे क्षणभर हृदयाचे ठोके बंद पडतात इतकी ही भयानक चूक झाली. न सुधारता येणारी ही भयानक चूक आहे हेहि तुम्ही लक्षात घ्या. हुकूमशाही राज्यव्यवस्थेत घेतले जाणारे निर्णय बहुतांशी असेच, सुधारता न येण्यासारखे, असतात हे मी पुढे दाखवून देणार आहे.

## जपानने केलेली घोडचूक

'उजव्या' हुकूमशाहीचे आणखी एक उदाहरण तुम्हांला देतो. पर्ल हार्बर या अमेरिकन नाविक दलाच्या केंद्रावर जपानी सरकारने केलेल्या हल्ल्याचे उदाहरण मी घेणार आहे.

हा निर्णय जपानी लोकांनी कसा घेतला ते स्पष्ट करणाऱ्या कागदपत्रांचा

अभ्यास मी नुकताच केला आहे. जपानमधील लष्करी हुकूमशाहीचे अनेक दुय्यम निर्णय हिटलरशाहीप्रमाणेच कार्यक्षमतेचे द्योतक होते. त्यांच्यात नावे ठेवण्याजोगे काही नव्हते. त्यांच्या फौजांची तयारी अगदी उत्कृष्ट होती. पर्ल हार्बरवरील हल्ला हे वेगवेगळ्या सैन्य दलांमधील परस्पर संयोजनाचे एक उत्कृष्ट उदाहरण होते. नाविक व वैमानिक दल यांच्यातील संयोजन व हल्ल्याची योजना साऱ्याच गोष्टी अतिशय हुशारीने केलेल्या होत्या. पर्ल हार्बरवरील हल्ला ही अतिशय गुंतागुंतीची मोहीम होती. ताशी शेकडो मैल वेगाने जाणारी विमाने, ताशी १०–१५ मैल वेगाने जाणाऱ्या टँकर्स बोटी, अशी वेगवेगळी वाहने एकाच हल्ल्यात भाग घेणार होती. शिवाय हवाई व फिलिपाईन्स या दोन्ही ठिकाणच्या अमेरिकन सैन्य दलांच्या छावण्यांना या सगळ्या हालचालींची कुणकुणहि लागून उपयोग नव्हता. आरमारी दलाच्या हालचाली, विमानांच्या ताफ्यांचे उड्डाण, या सर्व गोष्टी गुप्त ठेवणे ही फार अवघड गोष्ट होती. पण जपानी लष्कराने ही अत्यंत अवघड कामगिरी आश्चर्यकारक कार्यक्षमतेने पार पाडली. हुकूमशाही निर्णयाच्या पद्धतीत न सुधारता येणाऱ्या चुका करण्याची अपरिहार्य प्रवृत्ति आढळते असे म्हटले त्याचा पुरावा इथे आपल्याला सापडतो. ज्या जपानी दर्यासारंगाने पर्ल हार्बरवरील हल्ल्याची यशस्वी योजना आखून पार पाडली त्याच दर्यासारंगाने जपानी मंत्रिमंडळाला एक टिपण सादर केले होते. या टिपणात तो म्हणतो की पर्ल हार्बरवरील हल्ला शंभर टक्के यशस्वी झाला तरी फार तर त्यानंतर वर्षभर जपानला आपला विस्तार करता येईल. वर्षाभरानंतरहि जर अमेरिका युद्धाच्या आखाड्यात शिल्लक राहिली ( आणि अमेरिका एकाएकी माघार घेईल असे मानायला काहीच जागा नव्हती, ), तर वर्षाभरानंतर जपानी सैन्याला पराभवच पत्करीत जावे लागेल. आपल्या निष्णात आणि अनुभवी दर्यासारंगाचा अभिप्राय इतका प्रतिकूल व स्पष्ट असतानाहि जपानी मंत्रिमंडळाने पर्ल हार्बरवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला ! हुकूमशाही राजवटी कोणत्या प्रकारच्या चुका करतात त्याचे हे दुसरे उदाहरण आहे. तांत्रिक तपशिलाच्या व मुद्यांच्या बाबतीत त्यांची योजकता, कार्यक्षमता व हुशारी श्रेष्ठ दर्जाची असली तरी एकंदर शहाणपणा कमी असतो. दूरवर विचार करून समंजस धोरणे आखण्याला लागणारा शहाणपणा

हुकूमशाही राजवटीमध्ये आढळत नाही. उदाहरणार्थ, या एका चुकीमुळे, चार वर्षानंतर जपान अक्षरशः धुळीला मिळाला.

साम्यवादी हुकूमशाही राजवटींनी केलेल्या घोडचुका बघा. जर्मनी आणि जपान या देशातील हुकूमशाही राजवटींच्या हातून जितके आत्मघातकी निर्णय घेतले गेले तितका आत्मघातकी गद्धेपणा साम्यवादी हूकूमशाही राजवटींच्या हातून अद्याप घडलेला नाही. आणि मी अशी आशा करतो की त्यांची दृष्टि इतकी आंधळी बनणार नाही. कारण आपलेच राष्ट्र उध्वस्त करणाऱ्या जर्मनी आणि जपान यांच्या हातून झालेल्या चुका युद्धकालातच होतात; आणि आता जर का पुन्हा युद्ध झाले तर बहुतेक आपण सगळेच उद्ध्वस्त होऊ. शांततेच्या काळातली साम्यवादी हुकूमशाहीची कारकीर्द पहा. रशियाने केलेल्या प्रगतीबद्दल आदर बाळगणारी मंडळी विशेषतः जगाच्या या भागात अनेक आहेत. त्यांना वाटणारा हा आदर अनाठायी आहे असे नाही. पदार्थविज्ञानशास्त्र, गणित आणि इंजिनिअरिंग या शास्त्रात रशियाने इतकी आघाडी मारलेली आहे की, अंतराळात माणूस पाठविण्याच्या शर्यतीत ते पहिले आले. रशियाच्या दृष्टीने ही अत्यंत गौरवाची बाब आहे. पण राज्यक्रांतीनंतरच्या गेल्या चाळीस वर्षांत रशियाने घेतलेल्या सर्वांत महत्त्वाच्या निर्णयाचा विचार करा (युद्धकालीन निर्णयांबद्दल मी म्हणत नाही. शांतताकालीन निर्णयातील महत्त्वाचा निर्णय मी म्हणतो आहे.). रशियन शेतीचे जबरदस्तीने सामुदायीकरण करण्याचा १९३० च्या सुमारास घेतलेला निर्णय हा गेल्या चाळीस वर्षांतील अत्यंत महत्त्वाचा निर्णय होता. या निर्णयाचा परिणाम म्हणून पन्नास लाख शेतकरी उपासमारीने मेले. रशियातील शहरातून अन्नधान्याची फार मोठी टंचाई ह्या काळात निर्माण झाली. १९३० साली मी रशियात माझ्या डोळ्यांनी पाहिलेली ही गोष्ट आहे. अन्न ही एक अत्यंत दुर्मिळ वस्तु झालेली होती. आणि या मानवनिर्मित आपत्तीतून जे राजकीय मतभेद निर्माण झाले त्यांना वैमनस्याचे रूप आले. या वैमनस्यातून जो तीव्र राजकीय संघर्ष रशियन कम्युनिस्ट पक्षात निर्माण झाला त्या संघर्षातच १९३० नंतरच्या कालातील, दर काही वर्षांनी संघटित केलेल्या, अमानुष शुद्धीकरणाची बीजे होती. प्रत्येक वेळच्या शुद्धीकरणात कम्युनिस्ट पक्षातील नेतृत्व, कारभारयंत्रणेतील अधिकारी वर्ग, सैन्यदलातील

अधिकारीवर्ग आाणि अगाणित निरपराध व्यक्ती यांचे शिरकाण होत गेले.

## लोकशाहीचे मूलभूत वैशिष्टय

लोकशाही राजवटींच्या हातून होणाऱ्या कोणत्याही घोडचुकांपेक्षा रशियन सरकारने जबरदस्तीने शेतीचे सामुदायिकीकरण करण्याचा घेतलेला निर्णय हा हजार पटीने अधिक विघातक आहे. किंबहुना हा फरक इतका मोठा आहे की, तो गुणात्मकच आहे असे म्हटले तरी चालेल. अशा प्रकारची चूक लोकशाही राज्यव्यवस्थेत होणारच नाही. (ख्रुश्चोव्हच्या आदेशाने प्रकाशित झालेल्या 'सोव्हिएट रशियातील कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास' या पुस्तकाच्या सुधारलेल्या आवृत्तीत जुलमाने केलेले सामुदायिकीकरण ही स्टालिनच्या अनेक घोडचुकांपैकी एक होती असे कबूल केले असल्याचे मला कळते.). लोकशाही व्यवस्थेतील सरकार हे मुळातच अधिक शहाणे असल्यामुळे अशी चूक त्यांच्या हातून होत नाही अशातला भाग नाही. कोणतीही चूक आपोआप सुधारून घेतली जावी अशा प्रकारची अंतःस्थ रचना लोकशाही कार्यपद्धतीत आहे म्हणून लोकशाही राज्यव्यवस्थेत अशी चूक होऊ शकणार नाही. शेतीचे सामुदायिकीकरण रशियातील बऱ्याच मोठ्या लोकसंख्येला नको होते. सार्वत्रिक विरोध असलेला एखादा कार्यक्रम हाती घेऊन पार पाडण्याचा हट्ट जर एखाद्या लोकशाही सरकारने दाखविला तर काय होईल? साधी गोष्ट आहे; पुढच्या निवडणुकीत लोक त्या पक्षाच्या हातातील सत्ता काढून घेतील. लोक विरोधी पक्षाला निवडून देतील. त्या नावडत्या कार्यक्रमाची अंमलबजावणी फार पुढे गेलेली नाही तोवरच तो कार्यक्रम रद्द केला जाईल. कोणत्याही सरकारच्या हातून अशा चुका होतात. पण या चुका दुरुस्त केल्या जाव्या या साठी अशा प्रकारची काही अंतस्थ रचना राज्यव्यवस्थेच्या कार्यपद्धतीत आली पाहिजे. अशी अंतस्थ रचना ज्या व्यवस्थेत असेल त्या व्यवस्थेखाली कोणत्याही चुकीचे परिणाम सबंध राष्ट्रालाच धोक्यात आणण्याच्या व्यापक थराला जाऊच शकणार नाहीत. लोकशाही कार्यपद्धतीत अशी अंतस्थ रचना आहे हे **लोकशाहीचे एक मूलभूत वैशिष्टय** आहे. वरवर पाहता न दिसणारे असे हे रहस्य आहे. लोकशाही राज्यव्यवस्था रामराज्य निर्माण करू शकते की नाही हा प्रश्न महत्त्वाचा नाही. लोकशाही राजवटीत

रावणराज्य प्रस्थापित होऊ शकत नाही. लोकशाहीची ही प्रतिबंधक शक्ती महत्त्वाची आहे.

राज्यसत्तेच्या वापरासंबंधी माझा दृष्टिकोन निराशेतून उद्भवलेला, नकारात्मक, आहे असे म्हणता येईल. या अभिप्रायाशी मी वाद घालणार नाही. राज्यकर्ता म्हणून राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव मी थोडा घेतलेला आहे. जे कोणी राज्यावर बसतात ते आपल्या कारकीर्दीत मधून मधून भयंकर चुका केल्याशिवाय राहत नाहीत अशी अनुभवाने माझी भावना झाली आहे. अशा प्रसंगी राष्ट्राला तुम्ही भलत्याच रस्त्याने घेऊन जात आहात हे राज्यकर्त्यांना लोक प्रभावीपणे सांगू शकतील अशी व्यवस्था असण्याची गरज म्हणून महत्त्वाची आहे. तुम्ही ज्या रस्त्याने घेऊन चालला आहात त्या मार्गाने जाण्यास पुष्कळ लोकांचा तीव्र विरोध असल्याने तो रस्ता चुकीचा आहे आणि फरफटत नेल्याशिवाय आम्ही त्या रस्त्याने चालायला तयार नाही हे परिणामकारकरीत्या लोक सांगू शकले पाहिजेत.

## निर्णय पद्धतींत असलेला भेद आणि विरोध

साम्यवादी चीनमधील राजवट ही जगातली दुसरी मोठी हुकूमशाही. तिचे उदाहरण घ्या. चिनी साम्यवाद्यांबद्दल काही निर्णायक मत देण्यास अजून अवकाश आहे. त्यांच्या रावजवटीला नुकतीच कोठे सुरवात झाली आहे. शेतीविकासाबाबत आणि शेतीच्या पुनर्रचनेबाबत चिनी साम्यवाद्यांनी अवलंबिलेल्या धोरणाबद्दल मला काय वाटते ते मी वर सांगितले आहेच. १९३० च्या सुमारास रशियन लोकांनी केलेली चूक जशीच्या तशी चिनी लोक परत करीत आहेत असे मला वाटते. माझे चुकतही असेल कदाचित्. त्यांनीही शेतीचे सामुदायीकरण लोकांवर जुलमाने लादलेले आहे. रशियन राज्यकर्त्यांपेक्षा अधिक आत्यंतिक असा नमुना त्यांनी डोळ्यांपुढे ठेवला आहे, असेही वर दिसते. दुष्काळाच्या व उपासमारीच्या गंभीर परिस्थितीचे कारण वाईट हवापाण्यात नसून जुलमाने शेतीचे सामुदायीकरण केल्यामुळे ही दुर्दशा झाली असा निवाडा भावी इतिहासकार देतील. केवळ राजकीय दृष्ट्याच नव्हे तर, तांत्रिकदृष्ट्या देखील त्यांचा हा निर्णय चुकीचा आहे असे मला वाटते. त्याची कारणेही मी वर दिलेली आहेत. जर चीनमध्ये लोकशाही

कार्यपद्धती अस्तित्वात असती तर ही शोकांतिका घडू शकली नसती. कारण ही चूक सुधारून घ्यायला असंतुष्ट जनतेने राज्यकर्त्यांना भाग पाडले असते. लोकशाहीची माझी कल्पना ही अशी आहे. चिनी राज्यकर्ते ज्याला लोकशाही म्हणतात त्याला मी लोकशाही म्हणायला तयार नाही.

लोकशाही आणि हुकूमशाही या दोन राज्यव्यवस्थांमधील निर्णयपद्धतीत असलेला भेद आणि विरोध असा आहे. पण अशा भयंकर चुका लोकशाहीत होऊ शकत नाहीत आणि म्हणून तुम्ही लोकशाहीच्या बाजूने कौल द्या असे म्हणण्याइतकी लोकशाहीची बाजू दुबळी आहे असा तुमचा मी समज करून दिला तर ते चुकीचे होईल. या पेक्षा अधिक कर्तृत्व आणि गुण लोकशाही पद्धतीत असले तरच तिचा पक्ष घेऊन भांडण्यात अर्थ आहे. मागासलेला आणि संपन्न असे जगाचे दोन भाग आहेत. या प्रत्येक भागात लोकशाहीचा टिकाव लागायचा असेल तर दोन कामे लोकशाहीच्या हातून पार पडली पाहिजेत.

## लोकशाही सरकारांवरील दोन जबाबदाऱ्या

संपन्न पाश्चिमात्य राष्ट्रांत, आर्थिक मंदी आणि बेकारी या दोन अरिष्टांपासून त्या देशांतील अर्थव्यवस्थांना दूर ठेवण्यात लोकशाही यशस्वी झाली पाहिजे. सार्वत्रिक बेकारी पाश्चिमात्य राष्ट्रांतील जनता इतःपर कधी सहन करणार नाही. आणि त्यांनी बेकारी सहन करू नये हेच योग्य आहे. त्या अवस्थेत लोकशाहीचीही मग धडगत उरणार नाही. भांडवलशाहीचे समाजवादाच्या दिशेने सतत परिवर्तन करीत राहणे हा आर्थिक स्थैर्य कायम ठेवण्याचा एकमेव मार्ग लोकशाहीला उपलब्ध आहे असे माझे निश्चित मत आहे. आर्थिक संपन्नता टिकवून ठेवायची असल्यास काय करायला हवे त्या संबंधी वादात शिरण्याची गरज नाही. पाश्चात्य राष्ट्रातील कामगार वर्गाला सतत **वाढत्या जीवनमानावर कायम ठेवण्याइतकी रोजंदारी निर्माण करणे आणि आर्थिक मंदीचे अरिष्ट टाळणे** या दोन जबाबदाऱ्या लोकशाही सरकारांवर अनिवार्यपणे येऊन पडलेल्या आहेत. इतके भाग्य झाले म्हणजे पुरे. परिस्थिती एकदम गंभीर होईल असे नाही. ज्या सरकारच्या कारकीर्दीत आर्थिक मंदीचा तडाखा बसेल आणि सार्वत्रिक बेकारीची परिस्थिती निर्माण होईल

त्या विरुद्धची पहिली उपाययोजना तशी सोपी आहे. लोक त्या पक्षाचा पराभव करून विरोधी पक्षाच्या हाती सत्ता देतील. आता समजा त्याही पक्षाच्या हातून परिस्थितीत सुधार होऊ शकला नाही तर लोक पुन्हा पहिल्या पक्षाला निवडून देतील. पण तरीही त्या पक्षाला आर्थिक मंदी दूर करून सर्वांना काम देणे शक्य झाले नाही असे समजा, तर मग लोकशाहीचे जीवित धोक्यात येईल. देशातले दोन्ही पक्ष चुकीचेच आर्थिक धोरण चालवीत राहतील तर असे होईल. दोन महायुद्धांच्या मधल्या काळात जर्मनीमध्ये याच क्रमाने घटना घडत गेल्या आणि शेवटी लोकांनी लोकशाहीद्वेष्ट्या पक्षाच्या हाती सत्ता दिली. १९२९ साली जर्मनीमध्ये बेकारीचे प्रमाण अल्प होते. त्यानंतरच्या दोन वर्षांच्या काळात ते झपाट्याने वाढत जाऊन बेकारांची संख्या सत्तर लाखांवर गेली. जर्मन कामगारांचे जीवनमान निम्म्यावर आले. तिथे जर्मन लोकशाहीचा अंत झाला. नैतिकदृष्ट्या लोकशाही राज्यव्यवस्था श्रेष्ठ आहे म्हणून जनता लोकशाहीला उचलून धरील हे शक्य नाही. दुसऱ्या कोणत्याही राज्यसत्तेप्रमाणे लोकशाहीनेही लोकांचे दैनंदिन जीवन संपन्न करण्यात यश मिळविले तरच लोकशाहीला जनतेचा पाठिंबा टिकून राहील.

मागासलेल्या देशातून देशाचे औद्योगीकरण करण्यात आणि सामान्यपणे देशाचा विकास घडवून आणण्यात लोकशाही राज्यपद्धती यशस्वी झाल्या पाहिजेत. आपल्या देशाचे औद्योगीकरण करण्यात साम्यवादी हुकूमशाहींना जितके यश येते तेवढेच यश, त्यांच्या इतक्या झपाट्याने जरी नसले तरी तितक्याच पूर्णपणाने आणि भरीवपणे लोकशाही राज्यव्यवस्थांनाही मिळते हे दाखवून द्यावे लागेल. मागासलेल्या राष्ट्रातून लोकशाही जिवंत राहण्याची अंतिमतः ही शर्त आहे.

आजच्या जगात राज्य चालविण्याच्या दोनच पद्धती उपलब्ध आहेत. एकात हाल मोजले जातात आणि दुसऱ्या पद्धतीत डोकी कापली जातात. एका पद्धतीत खुल्या लढविलेल्या निवडणुकांद्वारा लोकांना काय हवे आहे याचा शोध घेतला जातो. दुसऱ्या पद्धतीत राज्यकर्ते आपल्या इच्छा लोकांवर लादतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राज्य करण्याची तिसरी पद्धत नाही.

## लोकशाही राजवटीपुढील धोक्याची रेषा

बरेच वेळा माझ्या मनात एक कल्पना घोळत असते; एका विशिष्ट अवस्थेपर्यंत समाजाचा विकास झालेला नसला तर, त्या देशात तो समाज यशस्वीरीत्या लोकशाही राज्यव्यवस्था राबवू शकेल अशी खरोखरच आपण अपेक्षा करू शकत नाही असे मला वाटते. विकास हा शब्द वापरीत असताना प्रामुख्याने कल्पना आर्थिक संपन्नतेचीच आहे; पण शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार, पुढारलेली सभ्यता आणि प्रगत संस्कृती या काही गोष्टींचाही त्यात समावेश आहे. बोटीवर काढल्या जाणाऱ्या 'प्लिमसोल रेषे'शी माझ्या या कल्पनेची तुलना करतो. तुमच्या शहरातल्या बंदरात लागलेल्या जगाच्या पाठीवरील लहान–मोठ्या जहाजांकडे बघा; त्यापैकी प्रत्येक जहाजावर एक रेषा काढलेली तुम्हांला दिसेल. ही रेषा पाण्यात बुडेपर्यंत बोटीत माल भरणे हा गुन्हा आहे. कारण बोटीला न पेलेल इतके वजन भरले गेल्याची ती खूण आहे. अशी जास्त भरलेली बोट बुडण्याचा धोका असतो. जगातल्या सर्व राष्ट्रांच्या बाबतीत अशी एक 'प्लिमसोल रेषा' काढायला हवी असे मला कधी कधी वाटते. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या अज्ञान, दारिद्र्य आणि सर्वसाधारण मागासलेपण यांचा भार ज्या राष्ट्रांवर फाजील असेल त्या राष्ट्रात लोकशाही राज्यव्यवस्था काम करू शकेल अशी अपेक्षा करणे धाष्ट्याचे ठरेल. त्या राष्ट्राचे जहाज निसर्गतःच इतके भरलेले असते की, 'प्लिमसोल रेषा' पार बुडून गेलेली असते.

या माझ्या म्हणण्याचे सगळ्यात उत्तम उदाहरण युरोपातील एका राष्ट्राचेच आहे. सर्वसाधारण इतर देशाहून इटालीचे वैशिष्ट्य आहे की उत्तर इटाली हा उद्योगधंद्याच्या दृष्टीने अतिशय विकसित भाग असून तेथील लोकांचे जीवनमान सतत भरभराटत आहे. एकंदरीत विचार केलात तर इटाली हा विकसित, संपन्न देश आहे. पण दक्षिण इटालीत मात्र कमालीचे दारिद्र्य आहे, सार्वत्रिक बेकारी आहे आणि तेथील शेतकरी अडाणी आणि गरीब आहे. उत्तरेत लोकशाही राज्यव्यवस्था यशस्वीपणे काम करते तर तीच लोकशाही राज्यपद्धति दक्षिणेत अजिबात यशस्वी होत नाही. इटालीच्या

बाबतीत 'प्लिमसोल रेषा' इटालीच्या मध्यातून जाते, इटालीचे दोन भाग करते.

सामान्यतः अर्थात् समाजव्यवस्थेच्या दृष्टीने सगळा देशच्या देशच या आपल्या 'रेषे'च्या वर किंवा खाली असतो. हे रूपक मी फार ताणूहि इच्छित नाही. या बाबतीत अगदी दगडावरची रेघ ठरेल असा नियम करणेहि शक्य नाही. भारत हा या रेषेखाली आहे असे कोणी सहजपणे प्रतिपादन करू शकेल. भारताचे दर डोई वार्षिक उत्पन्न सुमारे ३९० रु. आहे. आणि साक्षरतेचे प्रमाण अवघे तीस टक्के आहे. तेव्हा लोकशाही राज्यव्यवस्था टिकवून स्वतःचा विकास साधणे भारताला शक्य नाही अशी भूमिका कोणी घेऊ शकेल. आणि मी तर असे आग्रहाने मांडीत आहे, निदान आतापर्यंत तरी, की लोकशाही राज्यव्यवस्थेत राहून भारत आपला विकास यशस्वीपणे साधीत आहे. भारताची पांच हजार वर्षांची प्राचीन संस्कृति आणि त्या संस्कृतीतून भारतीय लोकांच्यामध्ये निर्माण झालेली सभ्यता यामुळे अज्ञान आणि दारिद्र्य असूनही भारताला लोकशाही मार्गाने आपला विकास साधण्यात यश येत आहे असे याबाबतचे माझे मत आहे. तरीदेखील माझ्या मते, लोकशाही राज्यव्यवस्था आणि आर्थिक विकासाची भारताने घातलेली सांगड ही एक आश्चर्यकारक सिद्धि आहे. कारण भारतातील अज्ञान आणि दारिद्र्य या दोन्ही गोष्टींची तीव्रता आणि सार्वत्रिकता लक्षात घेता भारतीय परिस्थितीत वास्तविक लोकशाहीने काम देता कामा नये. आणि म्हणून भारताने आज मिळविलेले यश उद्याहि टिकेलच असे गृहीत धरून चालता येणार नाही.

एका अर्थी हे निष्कर्ष फारसे आशादायक नाहीत. मी त्यांच्या बाजूने एवढेच म्हणेन की एखाद्या नवोदित आशियाई वा आफ्रिकी राष्ट्रात लोकशाहीचा लोप झाल्याची घटना घडली तर त्यांमागील कारणपरंपरा तरी वस्तुनिष्ठ दृष्टीने समजू शकेल. अनेक आशियाई-आफ्रिकी राष्ट्रांत लोकशाही अपयशी ठरली आहे. पण त्यावरून लोकशाही राज्यव्यवस्थाच कुचकामी आहे अशा निर्णयाला येण्याची घाई करता कामा नये, त्या घटनेचा इतर अर्थ असा की लोकशाही राज्यव्यवस्था यशस्वीपणे राबविता येईल इतका तेथील समाज प्रगत झालेला नाही.

## लष्करी राजवटीमधील एक फार मोठा धोका

अशी राष्ट्रे एक तर लष्करी हुकूमशाहीचा किंवा साम्यवादी हुकूमशाहीचा आश्रय घेतात ही मोठी दुर्भाग्याची गोष्ट आहे. काही काळ लष्करी हुकूमशाही राजवट देशाची प्रगति घडवून आणण्यात यशस्वी होऊ शकेल यात दुमत व्हायचे काही कारण नाही. नासेर सत्तेवर येण्यापूर्वी ईजिप्तमध्ये लोकशाहीच्या नावाखाली जो फार्स चालला होता त्यापेक्षा नासेरची हुकूमशाही कितीतरी अधिक कर्तृत्ववान व कार्यक्षम सरकार आहे. पण या सर्व लष्करी राजवटींमध्ये एक फार मोठा धोका असा की, त्यांनी चुकीचा रस्ता धरला तर ती चूक सुधारण्याची काही सोय या राजवटींमध्ये उरलेली नसते. सुरवातीला जी व्यक्ति आपल्या हाती सर्वाधिकार घेते ती बहुधा कर्तबगार व्यक्ति असते. त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर कोणी राज्यावर यावे याविषयी काहीहि सर्वमान्य संकेत वा तडजोडीचा मार्ग, हुकूमशाहीमध्ये नसतो. त्यामुळे त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर बहुधा यादवी युद्ध होते. एकपक्षीय हुकूमशाही पेक्षाहि लष्करी हुकूमशाही ही राज्य करण्याची अधिक मागासलेली पद्धति आहे. पक्षीय हुकूमशाहीत राज्यकारभारात सातत्य राखले जाण्याची काही तरी व्यवस्था असते. राज्यव्यवस्थेच्या या समस्येवर तत्काळ लागू पडेल असा कोणताही इलाज नाही. सर्वसामान्य जनतेची आर्थिक व सांस्कृतिक स्थिति उंचावत नेत नेत एक दिवस लोकशाही राज्यव्यवस्था राबविता येईल इतकी वर नेणे, राष्ट्र 'प्लिमसोल रेषे'च्या वर नेणे, हा एकच उपाय त्यावर आहे.

## रशियाला लोकशाही संस्थांची निकड भासणार आहे

एकदा ही लक्ष्मणरेषा ओलांडली की लोकशाही राज्यव्यवस्थेतील फायदे अनेक पटींनी अधिक आहेत ही गोष्ट लक्षात यायला फार अवधि लागणार नाही. आज रशिया अशा अवस्थेपर्यंत येऊन पोचलेला आहे की लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार करणे रशियाला अतिशय फायद्याचे ठरेल. १९२० च्या सुमारास ज्या दुर्दशेत रशिया होता, त्या वेळी लोकशाही राज्यपद्धति रशियन लोकांना फार लाभदायक ठरली असती असे म्हणता येईलच असे नाही. मला स्वतःला वाटते की त्यावेळच्या रशियात लोकशाहीने काम दिले नसते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ७३६७० वि: मिंधा
क्रमांक १६७६ नों दि: 2-3-69


आज रशियन नागरिकाचे जीवनमान उंचावलेले आहे, ते सतत वाढते आहे. रशियात फार मोठा सुशिक्षित वर्ग निर्माण झालेला आहे. शिक्षणाचा अतिशय सार्वत्रिक प्रसार करण्यात रशिया यशस्वी झालेला आहे. अशा वेळी लोकशाही संस्थांच्याद्वारा राज्यकारभार चालविणे त्यांना अतिशय फायदेशीर ठरेल. ही गोष्ट हळूहळू त्यांच्याहि ध्यानात येईल असा माझा समज आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांतील विशिष्ट लोकशाही संस्थांची त्यांनी हुबेहूब नक्कल केली पाहिजे असे अर्थातच नाही. पार्लमेंटरी पद्धतीत काही दिव्य जादू भरलेली आहे असे नव्हे. मुळात राज्यक्रांतीनंतर रशियात **सोव्हिएट्स** स्थापन करण्यात आली होती. या सोव्हिएटसचे पुनरुज्जीवन त्यांनी केले तरी त्यांच्या देशातील लोकशाही समाधानकारकरित्या चालू शकेल अशी मी कल्पना करू शकतो. भाषणस्वातंत्र्य, वेगवेगळे प्रतिस्पर्धी पक्ष स्थापन करण्याचे स्वातंत्र्य आणि खुल्या निवडणुका या तीन गोष्टींची आवश्यकता खरी आहे. या फार पुढच्या गोष्टी आहेत. आज रशियात यातले काहीच नाही. पण त्यांची सामाजिक स्थिती ' प्लिमसोल रेषा ' ओलांडण्याच्या नजिक येऊन पोचलेली आहे आणि त्यांना पुढील वाटचालीकरता लोकशाही संस्थची निकड पडणार आहे या विषयी माझ्या मनाची खात्री आहे. एक दिवस ते या संस्था निर्माण करतील.

तुमच्या लक्षात एव्हाना आले असेल की माझा दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या पुस्तकात आढळणारा नाही. मी एक दैनंदिन राजकारणात भाग घेणारा राजकारणी माणूस आहे. वस्तुनिष्ठ आणि व्यवहार्य दृष्टिकोनातून मी लोकशाही राज्यव्यवस्थेचा विचार करतो. परिस्थिति काय आहे आणि घडणाऱ्या घटनांमागील कारणपरंपरा काय आहे यांचा शोध प्रत्यक्ष निरीक्षणातून देण्याचा माझा प्रयत्न आहे.

आतापर्यंत लोकशाहीच्या जीविताच्या दृष्टीने मी ज्या काही कसोट्या सांगितल्या त्या मलाया सिंगापूरमधील परिस्थितीला लावून दाखविण्याची मला मुळीच इच्छा नाही. ' प्लिमसोल रेषे 'च्या माझ्या कल्पनेच्याच संदर्भात बोलायचे तर त्या रेषेच्या तुम्ही चांगलेच वर आहात असे मला वाटते. तुमचे राहणीमान, साक्षरतेचे प्रमाण आणि सर्वसाधारण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

परिस्थिति लक्षात घेता लोकशाही राज्यपद्धति यशस्वीपणे राबविणे तुम्हाला मुळीच जड जाऊ नये.

या व्याख्यानांच्या ओघात तुम्हाला काय सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे ? लोकशाहीसमाजवादी आणि साम्यवादी या दोन भिन्न दृष्टिकोनातून जग कसे दिसते ते पाहण्यात, त्यांच्या वेगवेगळ्या उत्तरातील विरोध पाहण्यात, व त्यांची सत्यासत्यता तपासण्यात, बराच भाग खर्ची पडला. कम्युनिस्ट दृष्टिकोनाबद्दलची अडचण नेमकी ही आहे की, त्यात अतिशय एकसूत्रीपणा, तार्किकता आणि सुसंगति आढळते. मानवी समाजाच्या व्यवहारांमागील कारणांबद्दल आपल्याला वास्तविक जितके ज्ञान आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक ज्ञान आपल्याला आहे असे साम्यवादी गृहीत धरून चालतात. आपण सर्वज्ञ आहोत आणि आपल्या हातून चूक होणेच शक्य नाही ही त्यांना सर्वस्वी आंधळे बनविणारी पोथीनिष्ठा आहे. त्या आंधळ्या पोथीनिष्ठेतूनच साम्यवाद्यांनी केलेल्या घोडचुकांचा जन्म झालेला आहे. हंगेरियन कामगारांची रणगाड्यांखालील कत्तल आणि चीनमधील अन्नान्नदशा या दोन्ही गोष्टी या आंधळ्या पोथीनिष्ठेतूनच जन्माला आलेल्या आहेत.

लोकशाही समाजवादी दृष्टिकोनात सर्वज्ञतेचा दावा नाही. साम्यवाद्यांप्रमाणे तार्किकता, संगति आणि एकसूत्रीपणा यांचा अतिरेक त्यात नाही. सगळ्याच गोष्टींबद्दल अधिकृतपणे भूमिका घेण्याचा प्रयत्न नाही. अर्थात साम्यवाद्यांइतकी प्रथमदर्शनीची भव्यता लोकशाही समाजवाद्यांनी मांडलेल्या चित्रात असत नाही. जगातील सर्वच समस्यांवर आपल्याजवळ उत्तरे आहेत असा दावा ते करीत नाहीत. त्यांचा दृष्टिकोन वस्तुनिष्ठ, व्यवहार्य आणि प्रयोगशील आहे. लोकांना स्फूर्ति देण्यात तो कामी पडत असल्याची शक्यता आहे. साम्यवाद हा धार्मिक पंथ असल्याने त्याला सर्वस्वी वाहून घेणे अधिक सोपे आहे. लोकशाही समाजवादी दृष्टिकोनातून रेखाटलेले जगाचे चित्र हे वस्तुस्थितीला अधिक धरून आहे असे दाखविण्याचा प्रयत्न मी केला आहे. उदाहरणार्थ, साम्राज्ये अस्तंगत झाल्यामुळे पूर्वीच्या वसाहतीतील लोकांची स्थिति सुधारलेली आहे; साम्राज्यांचे युग संपलेले आहे; मिश्र अर्थव्यवस्थेच्या मार्गाने भारत हा चीनमधील साम्यवादी अर्थव्यवस्थेपेक्षा

मंद्गतीने असेल पण सातत्याने व स्थिरपणे प्रगति करीत आहे; हुकूमशाही राजवटीच्या कारकीर्दीशी तुलना करता लोकशाही पद्धती दूरवर विचार करता अधिकच कार्यक्षम ठरली आहे; निदान हुकूमशाहीप्रमाणे तिची अकार्यक्षमता भयंकर विध्वंसक राहिलेली नाही; हे निष्कर्ष प्रत्यक्ष जगातील परिस्थितीशी अधिक जुळते आहेत.

नेमकी ही शेवटची गोष्ट स्पष्ट करण्याचा, सांगण्याचा मी या व्याख्यानात प्रयत्न केला.

भाग दुसरा

# लोकशाहीचे आव्हान

# १ विद्यमान जगातील वाद?

पाश्चिमात्य राष्ट्रांचे पुरस्कर्ते आणि कम्युनिस्ट समाजव्यवस्थेचे पुरस्कर्ते यांच्यात जगभर वादविवाद चालू आहे. ही व्याख्याने त्याच वादाचा एक भाग आहेत.

मानवी जीवनाच्या सर्व-अंगांना हा वाद स्पर्श करतो. या प्रतिस्पर्धी समाजव्यवस्थांची राजकीय व आर्थिक वैशिष्ट्ये, त्यांची कामगिरी आणि त्यांचे यशापयश, अर्थव्यवस्थेचे संघटन आणि त्या त्या समाजातल्या नागरिकांचे राजकीय जीवन, या व इतर सर्व बाबी या वादातले वेगवेगळे मुद्दे होत.

जगभर चाललेला हा वाद ही अत्यंत स्वागतार्ह घटना आहे. मानवजातीचे भवितव्य ठरत असताना जगातील सर्व लोकांचा त्यात जागरूक सहभाग असावा असा हा प्रयत्न मानवेतिहासात प्रमथच होत आहे. सर्वसामान्य लोकांचा सहभाग इष्ट आहे अशा ध्येयवादी व सैद्धान्तिक निश्चयातून हा प्रयत्न साकार झालेला नाही. अधिकात अधिक लोकांची मने आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न दोन्ही पक्ष करीत असता त्यांच्यामधील स्पर्धेतून हा जागतिक वाद उत्पन्न झाला आहे. पाश्चिमात्य राष्ट्रे आणि कम्युनिस्ट, दोघांनाहि प्रथम आपापल्या देशातील जनतेची मने वळविण्याचा प्रयत्न करावा लागला; आणि आता, जगातील दुफळीत सामील नसलेल्या बहुसंख्यांक जनतेला आपल्या बाजूने करून घेण्यासाठी त्यांना प्रयत्न कराव लागत आहे.

हे सगळे छानच आहे. पण ज्या प्रकारे हा वाद चालविला जात आहे, तो प्रकार काही चांगला आहे असे मला म्हणता येणार नाही. खरे म्हणजे, याहून अधिक चुकीच्या मार्गांनी वाद चालणे काही शक्य नाही. परस्परांनी एकमेकांवर केलेली शिवीगाळ असेच आजवर या वादाचे प्रामुख्याने स्वरूप राहिलेले आहे. आपल्या पक्षातल्या जनतेला दुसऱ्या बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यापासून बंदी करणे, त्यात सर्व प्रकारचे अडथळे उत्पन्न करणे, यातच उभयपक्षाच्या सरकारांचे अधिकांश प्रयत्न खर्ची पडले आहेत. या बाबतीत पाश्चिमात्य राष्ट्रांपेक्षा कम्युनिस्ट राष्ट्रे धिक्कारास पात्र आहेत असे माझे मत आहे. यात माझा पाश्चिमात्य पूर्वग्रह असेलहि कदाचित. कम्युनिस्ट जगातील लोकांपुढे पाश्चिमात्यांना आपली बाजू मांडू न देण्याचा पद्धतशीर प्रयत्न करणे—उदाहरणार्थ, नभोवाणीवरील माझी ही भाषणे आवाजाचा 'बोळा' कोंबून मारून टाकणे—हे केवळ मूलतः चूक आहे, इतकेच नाही तर कम्युनिस्टांच्या दुर्बलतेची ती एक ठळक खूण आहे. दुसऱ्या बाजूला पाश्चिमात्य राष्ट्रांतहि काही गट इतकेच आंधळे व बहिरे आहेत; कम्युनिस्ट राष्ट्रांचे ध्वनिक्षेपण ते ऐकू शकतात, कम्युनिस्ट पुस्तके वाचू शकतात, पण त्यांची मानसिक अवस्था अशी झालेली आहे की एक आपली भूमिका सोडून दुसऱ्याची भूमिका ते पाहू शकत नाहीत, दुसऱ्याचे विचार ते ऐकू शकत नाहीत. विशेषतः सर्वसाधारण अमेरिकन जनता आणि काही पाश्चिमात्य युरोपीय अशा आंधळ्या व बहिऱ्या अवस्थेत जाऊन पोचले आहेत असे मला वाटते. सुखवस्तू, बूर्झ्वा अमेरिकन व पाश्चिमात्य युरोपीय मंडळींचीच विशेषतः अशी मनोवस्था आहे असे नसून, अनेक सर्वसामान्य अमेरिकन व युरोपियन कामगारांच्या मनाची कवाडेहि अशीच बंद आढळतात हे विशेष ध्यानात घेण्यासारखे आहे.

हा शेवटचा मुद्दा कम्युनिस्ट प्रचारकांनी नीट ध्यानात घेण्यासारखा आहे. त्यात त्यांचेच हित आहे. या परिस्थितीच्या संभाव्य परिणामांचा विचार केल्यास त्यांना असे दिसेल की जगात अगदी अनपेक्षित अशी गोष्ट घडत आहे. उभयपक्षी परस्परांच्या विचाराबाबत आढळणारा बहिरेपणा, आंधळेपणा आणि शून्य समज यामुळे उभयतात चालू असलेल्या वादाचा बराचसा भाग हा कंटाळवाणा आणि अर्थहीन ठरत आहे. परस्परांच्या प्रतिपादनाशी

झटपट होतच नाही. अण्वस्त्र स्फोटात जगाची वाफ होऊन जात नाही तोवर हा वाद असाच चालत राहणार. आणि, कितीहि निष्फळ आणि हीन पातळीवरून वाद चालत असला तरी, जग उडवून देण्यापेक्षा वाद चालत रहावा हे बरेच.

## सर्व वादात महत्त्वाची गोष्ट लोकशाही

या सर्व वादात आपल्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट लोकशाही ही आहे. एक गंमतीची गोष्ट लक्षात घ्यायची ती अशी की, दोन्ही पक्ष म्हणतात की त्यांच्या राष्ट्रात लोकशाही व्यवस्था नांदत आहे; त्याचप्रमाणे, प्रतिपक्षाच्या गोटातली राष्ट्रे लोकशाही नाहीत या विषयीहि उभयतांचे तितकेच ठाम मत आहे. या विशेष घटनेतून एक गोष्ट निष्पन्न होऊ शकते. दोघेहि आपण लोकशाहीवादी असल्याचा दावा करतात त्याअर्थी लोकशाही ही अत्यंत महत्त्वाची व इष्ट अशी गोष्ट आहे याबद्दल सर्वांचे एकमत आहे. असे नसते तर स्वतःकरता लोकशाहीचा दावा करून दुसऱ्याला ती नाकारण्याबद्दल इतका आग्रह दोन्ही पक्षांनी दाखविला नसता. लोकशाही म्हणजे काय असेल ते असो—पण लोकशाही या नावाची चीज मानवी समाजाने आपल्याजवळ बाळगण्याजोगी आहे असे प्रत्येकाला वाटत असावे हे उघड आहे. पण प्रत्येकजण लोकशाहीचा अर्थ काही वेगळा करीत असावा हीहि तेवढीच स्पष्ट गोष्ट आहे. कारण प्रत्येक पक्षाच्या राष्ट्रातील राजकीय व आर्थिक संस्था व पद्धती यांची वैशिष्ट्ये परस्परांहून मूलतः भिन्न अशी आहेत. लोकशाहीच्या कोणत्याहि एका व्याख्येनुसार दोन्ही बाजूची राष्ट्रे एकाच वेळी लोकशाहीवादी निश्चितच असू शकणार नाहीत.

या वादात वादी–प्रतिवादी असलेले जे पाश्चिमात्य व कम्युनिस्ट त्या दोघांचेहि आरोप–प्रत्यारोप तपासून पहाण्याची भूमिका या व्याख्यानमालेत मी ठेवणार आहे. मी एक राजकारणी माणूस आहे, राज्यशास्त्राचा प्राध्यापक नाही. लोकशाहीची ऐतिहासिक परंपरा, प्राचीन जगातील लोकशाही, ग्रीक शहर राज्ये किंवा 'लोकेच्छे'ची रूसोप्रणीत कल्पना या विषयांची विद्वत्तापूर्ण चर्चा आपणास ऐकावयास मिळेल अशी अपेक्षा असल्यास तुमची निराशा होणार आहे. विसाव्या शतकाच्या मध्यावर लोकशाहीला जो एक अर्थ प्राप्त झाला आहे तो मी इथे स्वीकारलेला आहे.

अमुक देशात लोकशाही आहे, तमुक देशात लोकशाही नाही असे आपण नेहमी म्हणत असतो; त्याअर्थी लोकशाहीचा काही स्पष्टसा अर्थ आपल्या मनात असला पाहिजे. पण एका बाजूला आपण पाश्चिमात्य, आणि दुसरीकडे कम्युनिस्ट, वेगवेगळ्या प्रकारच्या राष्ट्रांना उद्देशून लोकशाही नामाभिधान वापरतो. मग, आपण सर्वच जण नेहमी तोंडात घोळवत असतो त्या लोकशाही शब्दाचा अर्थ आहे तरी काय ?

एखाद्या राष्ट्रात लोकशाही आहे असे म्हणत असताना माझ्या मनात जो अर्थ आहे तो मी तुम्हाला सांगू शकतो. लोकशाही राष्ट्रातले प्रौढ नागरिक हे राज्य स्वतः चालविण्याचा **प्रयत्न** करतात; **प्रयत्न** या शब्दातील मर्यादेकडे मी लक्ष वेधू इच्छितो. ज्या अधिसत्तेवर त्यांचे कोणत्याहि प्रकारचे नियंत्रण असत नाही त्या अधिसत्तेच्या राजवटीखाली ते जगत नाहीत.

लोकांचे स्वराज्य ही अत्यंत कठीण गोष्ट आहे हे मला सुरवातीलाच सांगितले पाहिजे. आजच्या विराट, व्यामिश्र आधुनिक समाजांमध्ये अप्रत्यक्ष मार्गांनी तेवढे स्वराज्य चालविणे लोकांना शक्य झाले आहे, निदान आजवर तरी, असे मला पुढे जाऊन सांगावयाचे आहे. आपणाला हवे असलेले सरकार ते निवडून देऊ शकतात या अर्थानेच केवळ ते स्वतःवर राज्य करीत आहेत. या अप्रत्यक्ष स्वराज्यासाठी देखील सामाजिक व राजकीय शिष्टाचारांची व संस्थांची अतिशय काळजीपूर्वक आणि नाजूक बांधणी करण्याची आवश्यकता असते. इतके सांगितल्यावर मला हे सांगितले पाहिजे की, हे अंशतः अप्रत्यक्ष स्वराज्य प्रस्थापित करणे, आणि याहून अधिक स्वराज्य कोणास संपादन करता आलेले नाही, हे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. खरे म्हणजे, या अर्थाने लोकशाहीची प्रस्थापना, संरक्षण आणि विकास हा, कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था सर्वोत्तम आहे या चर्चेपेक्षा, मानवजातीच्या सार्वजनिक आयुष्यातला सर्वप्रथम महत्त्वाचा प्रश्न बनला आहे अशी माझी श्रद्धा बनलेली आहे.

वर जिला मी लोकशाही म्हटले आहे त्या व्यवस्थेला सर्वसामान्य परिभाषेत प्रातिनिधिक राज्यव्यवस्था हा शब्दप्रयोग रूढ आहे. तुम्ही म्हणाल की प्रातिनिधिक राज्यपद्धति हा लोकशाहीचा केवळ एक विशेष झाला. तुमचे

म्हणणे बरोबर आहे. असे असले तरी, लोकशाहीचा सर्वांगाने विचार केला तर प्रातिनिधिक राज्यपद्धति हा तिचा मूळ गड्डा आहे असे म्हणता येईल. या मध्यवर्ती वैशिष्ट्यावर लोकशाहीची इतर सारी वैशिष्ट्ये अवलंबून आहेत. भाषणस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, कायद्याचे अधिराज्य हे सारे लोकशाहीचे विशेष आपल्या अस्तित्वासाठी अखेरीस प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेवर अवलंबून आहेत.

## प्रातिनिधिक राज्यवस्थेत अभिप्रेत असलेल्या तीन गोष्टी

प्रातिनिधिक राज्यव्यवस्था असा शब्दप्रयोग आपण वरील परिच्छेदात वापरला. या शब्दांमागील आशयाकडे आपण नजर टाकू या. खुल्या, निःपक्षपाती निवडणुकात उभ्या असलेल्या वेगवेगळ्या मतांच्या पक्षांमधून आपल्याला हवे ते सरकार निवडण्याची मुभा राष्ट्रातील प्रौढ नागरिकाना असली पाहिजे; आधीच्या निवडणुकात निवडून दिलेल्या सरकारला पदच्युत करून त्या जागी मतदारांना दुसऱ्या सरकारला निवडून देता आले पाहिजे; आणि एखादे सरकार निवडून दिल्यावरहि, नंतरच्या काळात त्या सरकारच्या कृतीवर नागरिकांना काही किमान नियंत्रण ठेवता यायला हवे; प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेत या तिन्ही गोष्टी मला अभिप्रेत आहेत. आपल्या बरोबरीच्या इतर नागरिकांशी संघटन करून आपल्या वेतनासंबंधी मागण्या प्राप्त करून घेण्याचा हक्क ही व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाच्या दृष्टीने अत्यंत व्यवहारी व महत्त्वाची असलेली बाब (संघटनास्वातंत्र्य) एक प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेतच सुरक्षित राहू शकते. कारण न दाखविता अटक करता येणार नाही, अटक झाल्यास इतर नागरिकांच्या समोर खटला चालून न्याय मिळेल (म्हणजे कायद्याचे राज्य), या गोष्टींची हमीहि प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेतच मिळू शकते. एका व्यापक मर्यादेच्या आत आपली मते मोकळेपणाने बोलणे, सांगणे वा लिहून प्रकाशित करणे (म्हणजे भाषणस्वातंत्र्य) आपणास प्रातिनिधिक राज्यपद्धतीतच शक्य होऊ शकते. भाषणस्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, कायद्याचे राज्य यासारखे मूलभूत मानवी हक्क मिळविण्यासाठी प्रथम हा दुसरा हक्क, आपले सरकार कोणते राहील याची खुली निवड करण्याचा हक्क, संपादित केल्याशिवाय दुसरा मार्ग नाही हे अनुभवाने सिद्ध झाले आहे.

## लोकशाहीला विरोध करणाऱ्यांचा दृष्टिकोन

लोकशाहीला विरोध करणाऱ्यांचा दृष्टिकोन काय आहे तो समजावून घेऊ या. आपल्याला हवे ते सरकार निवडण्याचा, ठराविक मुदतीनंतर त्या सरकारला पदच्युत करण्याचा, निवडून दिलेल्या सरकारवर अंकुश ठेवण्याचा हक्क सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने का म्हणून इतका महत्त्वाचा असावा ? मूलभूत स्वातंत्र्ये व हक्क प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेवरच अवलंबून कशी ? सर्ववेळ व्यावसायिक राज्यकर्त्यांच्या हाती, तंत्रज्ञांच्या हाती समाजाची व्यवस्था सोपविणे अधिक इष्ट का नाही ? लोकांच्या बहुधा गोंधळात सापडलेल्या व पुष्कळदा परस्परविरोधी, इच्छांनी प्रत्येक प्रसंगी राज्यकर्त्यांना अडचणीत टाकण्याऐवजी राज्यकर्त्यांना जर त्यांच्यावरील नियंत्रण काढून टाकून खुला परवाना दिला तर राज्यकारभार अधिक चांगला चालणार नाही का ? कोट्यावधि सर्वसामान्य जनतेची परिस्थिति तंगीची असल्याने, त्यांचे फारसे शिक्षण झालेले नसल्याने त्यांना सामाजिक बाबींकडे लक्ष द्यायला फारशी फुरसत नसते. अशा परिस्थितीत सर्वसामान्य लोकांऐवजी उच्च शिक्षित, अनुभवी तज्ज्ञांच्या हाती राज्यकारभार सोपविणे शहाणपणाचे ठरणार नाही का ?

या प्रश्नांना उत्तरे देण्यास उपयोगी पडेल असा पुष्कळ अनुभव आपल्या गाठीशी आहे. प्राचीन कालापासून बहुसंख्य समाजात राज्यशकट हाकण्याचे काम हे याच तत्त्वानुसार पिढीजात, व्यावसायिक राज्यकर्त्यांच्या हाती कित्येक शतके राहिलेले आहे. या राज्यकर्त्यांवर कोणत्याहि प्रकारचे नियंत्रणहि नव्हते. राजे, सरदार, धर्मगुरू, जमीनदार, व्यापारी, सनदी नोकर, भांडवलदार,—नाव कोणतेहि घ्या,—अगदी अलीकडील काळापर्यंत याच मंडळींचे तर राज्य होते. आपल्या राज्यकर्त्यांवर कोणत्याहि प्रकारचे नियंत्रण ठेवण्याचा वा राज्यकर्ते बदलण्याचा हक्क जनतेला नव्हताच. राज्यकर्त्यांच्या हुकुमांचे पालन करण्याचे कामच प्रजा करीत असे. लोकशाहीविरोधी राज्यव्यवस्थांचा मानवजातीला चांगला पुरेपूर अनुभव आहे. लोकशाहीविरोधी राज्यव्यवस्थेच्या विरुद्ध असलेल्या निर्णायक हरकती एव्हाना स्पष्ट व्हायला हव्यात.

अनियंत्रित सर्वाधिकारशाहीविरुद्ध असलेली हरकत स्पष्ट झालेलीहि पण

आहे. सर्वाधिकारशाही राज्ये काही काळात तुलनेने अधिक सुरळीत व सुव्यवस्थित चाललेली अनुभवास येत असली तरी, सर्वसामान्य जनतेच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास या राज्यातून सगळा सावळागोंधळ व भ्रष्टाकार आढळून येई. पण, राज्य सुव्यवस्थित चालेल की नाही हा मुद्दा सोडला तरी, या सर्व राज्यांना एक गोष्ट समान होती. राजे, सरदार, धर्मगुरू, जमीनदार, व्यापारी, भांडवलदार, सनदी नोकर हे जे वेगवेगळया नावाने वावरणारे राज्यकर्ते ते सर्व अशा राज्यातून कमीअधिक प्रमाणात आपल्या प्रजेचे शोषण करीत. शोषण करीत याचा अर्थ असा की, ही मंडळी राज्य चालवीत ते स्वतःच्या स्वार्थासाठी, प्रजेच्या हितासाठी नव्हे. अनियंत्रित सर्वाधिकारशाही-विरुद्धची ही निर्णायक हरकत आहे. पोथीनिष्ठ कम्युनिस्ट तत्त्वज्ञान्यापासून ते निष्ठावंत पाश्चिमात्य लोकशाहीवाद्यापर्यंत सर्व मंडळींचे या एका हरकती-बाबत एकमत व्हावे असे मला वाटते. पण हा निवाडा तुम्हांला मान्य असल्यास त्यातूनच आणखी दोन निष्कर्ष निष्पन्न होतात तेहि तुम्हांला मान्य केले पाहिजेत.

राज्य आपल्या हिताकरता चालविले जावे असे जर लोकांना वाटत असेल तर, लोकांनी आपले राज्य स्वतःच चालविण्याची काही युक्ति शोधून काढली पाहिजे. कारण, लोकांच्या हितासाठी राज्य चालवायला भाडोत्री राज्यकर्ते काही मिळावयाचे नाहीत. तात्पर्य, स्वराज्याची जागा दुसरे कोणते राज्य घेऊ शकत नाही. त्रयस्थाने राज्य चालवायचे म्हणजे, शेवटी, ते त्रयस्थाच्या हिताकरताच चालणार. राज्य चालविण्याची कामगिरी तुम्ही एका माणसावर, किंवा समाजातील एका वर्गावर, सोपविलीत तर, ती व्यक्ति वा तो वर्ग तुमचे शोषणच करणार. तेव्हा, लोकांनी आपले राज्य आपणच चालविणे ही गोष्ट फार कठीण असली, आणि फार फार तर अप्रत्यक्ष मार्गानेच राज्य आपले आपण चालविणे शक्य आहे असे अनुभवाला आले तरी, अखेरीस, तीच व्यवस्था इतर सर्व व्यवस्थांहून अधिक सुसह्य व फलदायी आहे असे अनुभवाला येणार आहे. आपले हित कशात आहे हे कळण्यासाठी जनता सुजाण झालेली असल्याने दुसऱ्याच कोणाचा स्वार्थ साधण्यासाठी आपल्याला राबविले जात आहे ही अवस्था कोणतीच प्रजा फार काळ सहन करणार नाही.

लोकशाहीचा प्रयोग, प्रातिनिधिक राज्यपद्धति हा ज्या प्रयोगाचा गाभा आहे, हा मानवसमाजाच्या इतिहासातील अगदी नवा आणि धाडसी प्रयोग आहे हा दुसरा निष्कर्षहि तुम्हांला मान्य करावा लागेल. विराट व व्यामिश्र समाजांनी मोठ्या प्रमाणावर स्वराज्य साधण्याचा प्रयत्न करणे या दिशेने लोकशाहीचा चाललेला विकास ही आधुनिक जगातली सर्वांत महत्त्वाची व साहसी घटना आहे. तिचे यश लिहून ठेवलेले नाही; पण या प्रयोगाच्या यशापयशावर जगाचे भवितव्य ठरणार आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

## लोकशाही प्रस्थापित होऊन दोनशे वर्षेच झाली आहेत

या अर्थाने लोकशाही प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नास सुरवात करून अवघी दोनशे वर्षेच काय ती झाली आहेत. प्राचीन काळच्या ग्रीक शहर राज्यांकडे लोकशाही राज्ये म्हणून मी कधी पाहू शकलेलो नाही. अथेन्सच्या सुवर्णयुगात देखील अथेन्सचे राज्य ही एक गटशाहीच होती. आईकडून आणि वडिलाकडून तीन पिढ्या अथेन्सचे रहिवासी असलेल्या स्वतंत्र पुरुष नागरिकांनाच फक्त मतदानाचा अधिकार अथेन्समध्ये होता. एकूण लोकसंख्येपैकी नऊ-दशांश लोक मुळी गुलामच होते. त्याशिवाय परकी रहिवासी वेगळेच. एकूण पुरुष लोकसंख्येच्या एक-दशांशाहूनहि कमी पुरुषांना अथेन्समध्ये मतदानाचा अधिकार होता. या व्यवस्थेला गटशाहीच म्हणावे लागेल; ही कोणत्याहि अर्थाने लोकशाही नव्हे.

लोकशाही शब्द ज्या अर्थाने मी वापरीत आहे त्या अर्थाने लोकशाहीच्या उत्क्रांतीला प्रारंभ होऊन दोनएकशे वर्षेच झाली. लोकशाहीच्या उदयाच्या दृष्टीने १७७६ मधील अमेरिकन राज्यक्रांती, १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांती व १८३२ मधील इंग्लिश पार्लमेंटरी सुधारणा कायदा या तीन क्रांतिकारक महत्त्वाच्या घटना आहेत. प्रौढ मतदानाने निवडलेली प्रातिनिधिक राज्यपद्धती यापैकी कोणत्याही घटनेने अस्तित्वात आली नाही; यापैकी कोणत्याच घटनेने देशातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला नाही. त्या दिशेने पावले टाकण्यास या घटनांनी सुरवात केली. त्यानंतरच्या कालात क्रमाक्रमाने विकास पावत आजच्या लोकशाही राज्य-

पद्धतीपर्यंत आपण येऊन पोचलो आहोत. माझ्या मातृभूमीबाबत, इंग्लंडबाबतच बोलायचे तर आजच्या अर्थाने १९१८ पर्यंतच्या राज्यव्यवस्थेला लोकशाही म्हणता आले नसते. (आणि खरे म्हणाल तर मतदानाच्या अधिकाराचा शेवटचा विस्तार १९२९ पर्यंत झाला नाही.) एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेच्या काही प्रदेशात आणि फ्रान्समध्ये, अधून मधून, इंग्लंडपेक्षा अधिक पूर्णार्थाने लोकशाही राजवट अस्तित्वात होती. त्या देशात देखील केंद्रीय राज्यसत्तेच्या स्थानी खऱ्याखुऱ्या प्रातिनिधिक राज्यपद्धतीची प्रस्थापना अगदी अलीकडच्या काळातच झाली आहे.

अमेरिका, फ्रान्स, पश्चिम जर्मनी आणि इंग्लंड या देशातून, किंवा जगातील इतर कोणत्याही लोकशाही देशातून, लोकशाही राज्यव्यवस्था आज पूर्णावस्थेस गेली आहे असा दावा करणाऱ्यांपैकी मी नाही. लोकशाही संस्थांचा, रीतिरिवाजांचा, विकास आजही चालू आहे; वेगवेगळ्या संस्था, कार्यपद्धती, नियम यांचे प्रयोग करून आपण पहात आहोत; त्यांना निर्दोष बनवीत आहोत. आजही लोकशाहीच्या संस्था कायमच्या धोका रेषेच्या पलीकडे गेल्या आहेत असे नाही. जोरदार हल्ला झाल्यास, वा संकटपरंपरा कोसळल्यास लोकशाही संस्था ढासळणार नाहीतच असे खात्रीलायक म्हणता येत नाही. त्या अर्थाने लोकशाही अद्यापीही दुर्बल आहे. ही मर्यादा लक्षात ठेवली तर आपल्याला असे म्हणता येईल की, अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स या तीन प्रमुख व आद्य लोकशाही राष्ट्रांनी यशस्वीरित्या लोकशाही संस्थांचा विकास केला आहे. त्यांना आलेल्या या यशामुळे इतर राष्ट्रे आपापल्या राष्ट्रात लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारताना या आद्य लोकशाहीचे अनुकरण करीत आहेत.

पृथ्वीवरील पाचही खंडात ठिकठिकाणी आज लोकशाहीची प्रतिष्ठापना करण्याचे प्रयत्न चालू आहेत ही सत्य परिस्थिती स्वीकारावीच लागेल. जे सरकार नागरिक निवडून देऊ शकतात, पदच्युत करू शकतात, त्यावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवू शकतात असे प्रातिनिधिक सरकार उभे करण्याचा प्रयत्न देशामागून देश करीत आहेत. ही घटना विशेष आहे. लोकशाहीच्या प्रतिष्ठापनेचे हे सर्व प्रयत्न सफळ होणार आहेत असे मी मुळीच म्हणत

नाही. उलट या पैकी अनेक प्रयत्न फसणार आहेत, अपयशी होणार आहेत. ही गोष्ट कोणालाही उघड दिसण्यासारखी आहे. हे दिसत असूनही लोक लोकशाही संस्था उभ्या करण्याचा प्रयत्न करतात त्याअर्थी लोकशाही संस्थांची त्यांना अत्यंत निकड जाणवत असली पाहिजे. लोकशाही संस्था निर्माण करणे आणि त्या कार्यान्वित करणे यात ते सफल होतील किंवा होणार नाहीत; लोकशाही संस्था राबविणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. इतके उघड दिसते की, लोकशाही ही एक मौल्यवान चीज त्यांना वाटत असावी.

## लोकशाही संस्थांचा प्रसार ही सर्वांत महत्त्वाची घटना

लोकशाही संस्थांचा प्रसार जगभर करण्याचा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील प्रयत्न ही या काळातील सर्वांत अधिक महत्त्वाची घटना होती असा निष्कर्ष भावी इतिहासकार काढतील अशी शक्यता आहे. दोन प्रतिस्पर्धी भिन्न प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये चाललेल्या आजच्या रस्सीखेचीपेक्षा वरील घटना अधिक अर्थपूर्ण होती असा निवाडा भावी काळ देईल. कोणती अर्थव्यवस्था ही अधिक श्रेयस्कर आहे हा प्रश्न कमी महत्त्वाचा आहे असे नाही; उलट, व्यवहार्य अर्थव्यवस्था देशात उभी करणे ही गोष्ट राष्ट्र तगून राहण्यास अत्यावश्यक आहे. त्यात यश मिळाल्याशिवाय कोणत्या पद्धतीची राज्यपद्धती आपण निवडावी हा प्रश्नही एका अर्थाने उपस्थित होऊ शकत नाही. अर्थव्यवस्था काम करीत नसेल तर तुम्ही उपाशीच मराल. तेव्हा, लोकशाही, हुकूमशाही — कोणत्या का प्रकारची राज्यव्यवस्था असू दे, कामचलाऊ — आर्थिक पायावर ती उभी नसेल तर ती कुचकामी आहे. या म्हणण्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. साम्यवादी आणि पाश्चिमात्य राष्ट्रांतील मिश्र अर्थव्यवस्था, या ज्या जगातल्या दोन प्रमुख अर्थव्यवस्था त्या दोन्हीही व्यवहारात यशस्वी ठरतील असे मी तुम्हांला सांगतो. दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्था कशा काम करतात त्याची चर्चा मी पुढे करणार आहे. सामान्यतः आपण असे म्हणू शकतो की, एखाद्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत समाजाला आपले आर्थिक व्यवहार, साम्यवादी किंवा पाश्चिमात्य, कोणत्याही एका पद्धतीने चालविता येतील; आणि, कोणत्याही पद्धतीखाली अर्थव्यवहार

समाधानकारकपणे चालतील, अर्थव्यवस्था कोलमडून पडणार नाही. आणखी पंचवीस वर्षांनंतर या दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थातून प्राप्त होणारे ऐहिक जीवनमान सारखेच सुखवस्तु असल्याचे आढळेल अशा मताचा मी आहे.

ज्या देशातुन यापैकी एका प्रकारची अर्थव्यवस्था अत्यंत असमाधानकारक-रीत्या काम करीत आहे त्या देशाच्या नागरिकांना हा निष्कर्ष वेडगळ वाटेल. उदाहरणार्थ, साम्यवाद्यांच्या पक्षातील चीन किंवा पूर्व जर्मनी या देशातील लोकांना आणि पाश्चिमात्यांच्या बाजूला दक्षिण अमेरिकेतील भ्रष्ट प्रजसत्ताक राष्ट्रातील नागरिकांना आज येणारा अनुभव काही वेगळाच आहे. या वर्गात मोडणाऱ्या देशातील नागरिकांना आर्थिक व्यवस्था कोलमडण्याची आज सारखी भीती वाटत असते; आर्थिक परिस्थिती झोके घेत असताना त्यांना गचके खावे लागत असल्याने त्यांच्या मनावर या भीतीचे दडपण असणे स्वाभाविक आहे. पण दोन्ही पक्षातील बड्या व पुढारी राष्ट्रात, लोकांचे जीवनमान, कमीअधिक प्रमाणात, मंदगतीने व चढउतार अनुभवत का होईना पण, निश्चितपणे वाढत गेले नाही तर मी आश्चर्यचकित होईन. हे खरे मानले तर, त्या देशातील लोकांचे लक्ष, अर्थव्यवस्था बरोबर काम करते की नाही, ती कोलमडणार तर नाही, या गोष्टींवर केंद्रित न होता, खऱ्याखुऱ्या प्रभावी लोकशाही संस्था उभारण्यावर केंद्रित होईल. अशा रीतीने, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, लोकांचे लक्ष आर्थिक प्रश्नांवरून दूर होऊन, समाजाचे सार्वजनिक व्यवहार कोणत्या राजकीय पद्धतीने चालवेत या प्रश्नावर केंद्रित होईल. आपले राज्य चालविण्यासाठी सरकारची निवड, पदच्युती व सरकारवरील नियंत्रण लोक खुलेपणाने व प्रभावीपणे करू शकतील अशा संस्था आपण उभ्या केल्या आहेत की नाही याकडे त्यांचे लक्ष विशेषेकरून वळेल. कारण या गोष्टी हा लोकशाहीचा गाभा आहे.

• • •

# २ पाश्चिमात्य समाजांची वैशिष्टये

सर्व लोकांना जबाबदार असलेले सरकार असण्यावर लोकशाहीची इतर वैशिष्टये तरणार की नाही हे अवलंबून असते. असे मी पहिल्या प्रकरणात म्हटले. देशातील सर्व प्रौढ नागरिक वेगवेगळ्या उमेदवार पक्षातून खुल्या निवडणुकांसारख्या एखाद्या मार्गाने आपल्या आवडीचे सरकार जर निवडू शकत असतील तर त्या सरकारला लोकांचे प्रातिनिधिक सरकार म्हणता येईल. तसेच, ठराविक पण फार दीर्घ नाही, अशा मुदतीनंतर वाटल्यास ते सरकार पदच्युत करून त्या जागी दुसरे सरकार प्रस्थापित करण्याचा शिष्टमान्य मार्ग त्या राज्यपद्धतीत असला पाहिजे. सरकार बदलण्याचा प्रयत्न केल्यास रक्तपात होईल किंवा यादवी माजेल असे भय वाटता कामा नये. तिसरी गोष्ट, अधिकारारूढ सरकारवर लोकांना काही नियंत्रण ठेवता आले पाहिजे. या तीन गोष्टी जिथे शक्य असतील तिथेच प्रातिनिधिक राज्यपद्धति काम करीत आहे असे मी म्हणेन. ब्रिटिश पार्लमेंटरी पद्धतीची ती आहे की अमेरिकन अध्यक्ष व काँग्रेस अशी दोन ध्रुवात्मक ती आहे, की अलीकडच्या काळात फ्रान्समध्ये त्यांनी प्रयोग करून पाहिलेल्या पद्धतींपैकी ती एक आहे याला फारसे महत्त्व नाही. या तिन्ही देशातील वेगवेगळ्या पद्धति प्रातिनिधिक राज्यपद्धतीच्याच वेगवेगळ्या तऱ्हा आहेत.

प्रातिनिधिक जबाबदार राजवटींहून पाश्चिमात्य देशातील लोकशाहींचा आशय अर्थातच अधिक विशाल व खोल आहे. आपण असेहि म्हणू शकतो की, सामान्य नागरिकांना, दैनंदिन जीवनात, मतदानाच्या हक्काहून अधिक

मूल्यवान वाटणाऱ्या अशा काही गोष्टी आहेत आणि या गोष्टी त्यांना मिळवून देण्यासाठी प्रातिनिधिक सरकार हे एक आवश्यक, प्राथमिक साधन आहे.

## जबाबदार प्रातिनिधिक राजवटीद्वाराच व्यक्तिमात्राचे राजकीय स्वातंत्र्य अबाधित राखले जाते

या दृष्टीने पाहता, जबाबदार प्रातिनिधिक राजवटीद्वारा व्यक्तिमात्राचे राजकीय स्वातंत्र्य अबाधित राखले जाते. स्वातंत्र्य या महत्त्वाच्या कल्पनेशी आपण आता येऊन ठेपलो. स्वातंत्र्य ही एक मूलभूत पण अत्यंत सूक्ष्म कल्पना आहे. या व्याख्यानांच्या ओघात आपणास वेगवेगळ्या अंगांनी स्वातंत्र्य या कल्पनेसंबंधी चर्चा करावी लागेल. 'स्वातंत्र्य' या शब्दाभोवती एक वलय आहे; पण या शब्दाचा खोटारडा व दांभिक उपयोग फार होत असतो. तेव्हा, स्वातंत्र्य या कल्पनेची फोड मी काही विशिष्ट, मर्यादित आशयांच्या, वेगवेगळ्या **स्वातंत्र्या** मध्ये करून घेतो. चार प्रधान स्वातंत्र्याचे संरक्षण करणे, ती सर्वसामान्य माणसाकरता संपादित करणे हे जबाबदार प्रतिनिधिक राज्याचे उद्दिष्ट आहे. या चार स्वातंत्र्यापैकी प्रत्येक स्वातंत्र्याचे आधुनिक जगात अतिशय महत्त्व आहे.

## कामगार संघटनात एकजूट करण्याचे स्वातंत्र्य असा स्वातंत्र्याचा मुख्य अर्थ

संघटना स्वातंत्र्य मी प्रथम विचारात घेतो. पाश्चिमात्य उद्योगप्रधान समाजातील श्रमजीवी लोकांच्या दृष्टीने– ज्यांची समाजात बहुसंख्या आहे,– कामगार संघटनांत एकजूट करण्याचे स्वातंत्र्य असा स्वातंत्र्याचा मुख्य अर्थ आहे. मजूरी, कामाचे तास, आणि रोजगारीसंबंधी इतर सर्वसाधारण अटी यांच्या बाबतीत मालकांशी वाटाघाटी करण्याच्यादृष्टीने कामगार संघटना असणे अत्यावश्यक आहे असे अनुभवाने सिद्ध झाले आहे. पाश्चिमात्य भांडवलशाही समाजातील कामगारांना संघटना स्वातंत्र्य आणण्याचे महत्त्व कोणताहि साम्यवादी नाकारील असे मला वाटत नाही. या बाबतीत आपले

एकमत व्हायला निश्चितच हरकत नाही. कामगारांना संघटना स्वातंत्र्य नसले तर त्यांचे अनन्वित शोषण केले जाते हे पुनः पुन्हा दीर्घ अनुभवाने सिद्ध झाले आहे. स्वतःच्या श्रमांनी जे मूल्य ते उत्पादन करतात त्या मूल्याचा एक फार अल्पसा वाटाच त्यांच्या पदरात त्या परिस्थितीत टाकला जातो. या उलट, संघटनेचे स्वातंत्र्य असेल तर पाश्चिमात्य समाजातील कामगार आपल्या श्रमांनी निर्माण होणाऱ्या संपत्तीतील एक मोठा वाटा स्वतःला मिळवून घेऊ शकतो, तसा तो त्याला मिळतहि आहे, हे मी दाखवून देईनच.

येथपर्यंत आपले सर्वांचे एकमत. ज्यांच्यावर फक्त कामगारांचेच नियंत्रण आहे अशा स्वतंत्र कामगार संघटना उभारण्याचा अधिकार हे साम्यवादी समाजातील श्रमजीवींच्या दृष्टीनेहि एक अत्यंत मौल्यवान स्वातंत्र्य आहे; किंवा, असे म्हणू की, तसे स्वातंत्र्य मिळाले तर ते फार मौल्यवान ठरेल. सर्व साम्यवादी या विधानाला हरकत घेतात. तेव्हां, साम्यवादी राष्ट्रातील कामगार संघटनाबद्दल साम्यवादात जो विचार मांडलेला आहे त्याचा इतिहास जरा नजरेखालून घालू.

रशियन राज्यक्रांतीनंतरच्या सुरवातीच्या दिवसात समाजवादी वा साम्यवादी समाजात कामगार संघटनांचे स्थान व भूमिका काय असावी यासंबंधी खुलमखुली चर्चा झाली होती. काही आद्य रशियन साम्यवादी नेत्यांनी, प्रथमदर्शनी तर्कशुद्ध अशी, भूमिका घेतली की "साम्यवादी समाजात कामगार संघटनांची गरजच उरत नाही, कारण त्यांना करण्यासारखे काही कार्य उरलेले नाही. एकदा भांडवलदारांचा नायनाट केला आणि उत्पादनाची सर्व साधने लोकांच्या मालकीची झाल्यावर कामगार संघटना सौदा कोणाशी व कशासंबंधी करणार ? 'स्वतःशीच माणसाने सौदा करावयाचा हे आवश्यकच नाही' असे आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण त्यांनी केले.

उत्पादनाची सर्व साधने सार्वजनिक मालकीची झाल्यानंतरहि कामगार संघटना असणे हे प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे असे लेनिन आणि रशियन कम्युनिस्ट पार्टीच्या बहुसंख्य नेत्यांनी चर्चेच्या शेवटी मान्य केले. पण या कामगार संघटना राज्ययंत्रणेच्या नियंत्रणापासून मुक्त असाव्यात, या अर्थाने स्वायत्त असाव्यात, याला दुर्दैवाने त्यांची संमति मिळाली नाही. निदान प्रत्यक्ष व्यवहारात तरी कामगार संघटनांना रशियन स्वायत्तता

मिळाली नाही ही घटना आहे. आणि, साम्यवादी जगाशी परिचय असलेल्या सर्वांना ठाऊक आहे की, राज्यसंस्थेच्या नियंत्रणापासून मुक्त या अर्थाने रशियातील कामगार संघटना आजहि स्वायत्त नाहीत. उलट, सरकारी राज्ययंत्रणेचाच त्या एक भाग आहेत. मालकांवर, जे स्वत:देखील त्या राज्ययंत्रणेचाच भाग आहेत, रशियातील कामगार संघटना कामगारांच्या बाजूने स्वतंत्रपणे फारसे दडपण आणू शकत नाहीत. विशेषत:, रोजगारी देणाऱ्या मालक संघटनाविरुद्ध संपाचे, आपल्या श्रमशक्तीचा असहकार पुकारण्याचे, अखेरचे अस्त्र ते वापरू शकत नाहीत; वापरत नाहीत.

साम्यवादी समाजातील कामगारांचे प्रचंड प्रमाणावर शोषण होण्यात या पद्धतींचा परिणाम होतो. त्यांच्या श्रमातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा फार लहानसा वाटा त्यांना मिळतो. ( आता, जो वाटा त्यांना दिला जात नाही तो, खाजगी भांडवलदाराच्या खिशात न जाता, राज्यसंस्थेला जमा होतो; आणि राज्यसंस्था त्याचा विनियोग उद्योगधंद्यात भांडवल गुंतवणुकीसाठी, शस्त्रास्त्रनिर्मितीवर, शिक्षणावर किंवा अन्य कोठल्या उपक्रमावर खर्च करते. यापासून त्यांचे सांत्वन होत असेल किंवा नसेलहि. )

आपल्या काळातीलच या अनुभवांवरून मी असे तात्पर्य काढतो की, राज्यसंस्था मालक असो की खाजगी व्यक्ति मालक असो. संघटनेचे स्वातंत्र्य असणे हे श्रमजीवींच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. या स्वातंत्र्याच्या अभावी कामाचे तास, मजुरीचे दर, कामाच्या अटी–सुखसोयी या कामगारांच्या दृष्टीने त्यांच्या हिताशी निगडित असलेल्या, गोष्टींबाबत आपल्या हितसंबंधांची जपणूक करणे कामगारांना शक्य होत नाही.

भाषण स्वातंत्र्य हे जबाबदार प्रातिनिधिक राज्याने नागरिकांना मिळवून द्यायचे दुसरे स्वातंत्र्य होय. किंबहुना भाषण–स्वातंत्र्य आणि जबाबदार प्रातिनिधिक राज्य यांचा संबंध अविभाज्य व अन्योन्याश्रयी आहे. भाषण–स्वातंत्र्य नसेल तिथे वेगवेगळ्या राजकीय पक्षातून आपणास हवे ते सरकार लोक मोकळेपणाने निवडूच शकणार नाहीत. लोकांची मने आपल्या बाजूने वळविण्यासाठी या वेगवेगळ्या राजकीय पक्षांना, जे भावी राज्यकर्तेहि आहेत, खुलेपणाने आपल्या ध्येय-धोरणांसंबंधी, कार्यक्रमांसंबंधी लिहिता–बोलता येणे खुल्या निवडणुकांच्या दृष्टीने आवश्यक आहे. अर्थातच, भाषण–

स्वातंत्र्य हे निवडणुकातील प्रचारापुरते मर्यादित नाही. त्याची व्याप्ति या पेक्षा अधिक आहे. व्यवहार समाजधारणेच्या आड येणार नाही इतके कमाल भाषण-स्वातंत्र्य लोकांना असण्यावर कोणत्याहि समाजातील बौद्धिक जीवनाची उंची अवलंबून राहते असे मला वाटते. 'व्यवहारतः समाज-धारणेच्या आड येणार नाही इतके' असा शब्दप्रयोग मी जाणूनबुजून केला आहे. कारण पूर्ण, अनिर्बंध, अमर्याद भाषण स्वातंत्र्य कधीच कोणाला मिळू शकत नाही. कोणत्याही समाजात काही गोष्टी लिहिण्या-बोलण्यास सर्वांस बंदी असेल हे खरे आहे. उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या खुनास लेखणी वा वाचेद्वारा प्रोत्साहन देण्याचे स्वातंत्र्य कोणत्याहि सभ्य समाजात दिले जाणार नाही. भाषण-स्वातंत्र्य या अर्थाने सीमित, सापेक्ष स्वरूपाचेच राहणार. स्वातंत्र्य सीमित, सापेक्ष वा मर्यादित स्वरूपातच व्यवहारात उपभोगता येणार असेल तर त्याची विशेष किंमत नाही ही समजूत राज्यशास्त्रीय विचाराच्या दृष्टीने एक मूलग्राही व गंभीर चूक आहे.

जमावाचे स्वातंत्र्य हे तिसरे स्वातंत्र्य आहे. एकत्र जमून सभा घेण्याचे, चर्चा करण्याचे, निदर्शने करण्याचे, अशा प्रकारे एकत्र जमाव करून सार्वजनिक धोरणावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करण्याचे स्वातंत्र्य असा याचा अर्थ आहे. ऐतिहासिकदृष्ट्या जमावाचे स्वातंत्र्य हे एकेकाळी सर्वांत महत्त्वाचे स्वातंत्र्य होते. विचाराच्या आदान-प्रदानाच्या नभोवाणी, दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे इत्यादी आधुनिक साधनांमुळे या स्वातंत्र्याचेही आज काल महत्त्व कमी झाले असले तरी ज्या समाजात जमावाचे स्वातंत्र्य नाही असा समाज 'स्वतंत्र' या पदाला पोचूच शकणार नाही.

'कायद्याचे अधिराज्य' हे चौथे स्वातंत्र्य म्हणता येईल. समजाने कायद्याच्या ज्या गोष्टींवर बंदी घातली नसेल अशा सर्व गोष्टी करण्यास स्त्री वा पुरुष मोकळा असला तर त्या ठिकाणी कायद्याचे अधिराज्य अस्तित्वात आहे असे ढोबळ मानाने म्हणता येईल. हे स्वातंत्र्य प्राचीन कालापासून परिचित असलेले व साधेच आहे. पण, ते अत्यंत मौल्यवान आहे ही गोष्ट, अलीकडच्या इतिहासाने लक्षात आणून दिली आहे. कायद्याच्या अधिराज्यावर अतिक्रमण करून शासनसंस्था जेव्हा समाजाने केलेले कायदेकानू धाब्यावर बसवून नागरिकांना आपल्या लहरीप्रमाणे अटक करू लागते, तुरुंगात डांबते,

त्यांचा छळ करते वा त्यांना मारून टाकते तेव्हा इतर कोणत्याही स्वातंत्र्यांची जपणूक शक्य उरत नाही. तुरुंगवास, छळ किंवा मरण या शिक्षांना आपल्याला तोंड द्यावे लागेल अशी भीती जर नागरिकांना वाटली तर, शासनसंस्थेला नावडणाऱ्या अशा कोणत्याही गोष्टी ते करणार नाहीत हे उघड आहे. संघटना उभारणे, मोकळेपणी आपले विचार बोलून दाखविणे किंवा प्रसिद्ध करणे, जाहीर सभा भरविणे इत्यादी सर्वच गोष्टी शासनसंस्थेच्या नजरेस संशयित ठरणार आणि मग लोक या स्वातंत्र्याचा निर्वेधपणे उपभोग घेऊ शकणार नाहीत.

## धीट व समर्थ न्यायासनांचे महत्त्व मोक्याचे

कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी उभारली जाणारी यंत्रणा कशी आहे, यावर कायद्याचे अधिराज्य या स्वातंत्र्याची सुरक्षितता अवलंबून असते असे आढळून आले आहे. समाजाने आपल्या सोईसाठी वेळोवेळी केलेले नियम म्हणजेच कायदे होत. पण या विशिष्ट घटनांच्या संदर्भात कायद्यांचे पालन झाले आहे की नाही हे पाहण्याचे काम शेवटी कोणातरी व्यक्तीलाच करावे लागते. आपल्या इच्छेप्रमाणे जर या कायद्यांची अंमलबजावणी सरकार करू लागले तर, प्रत्यक्ष व्यवहारात नागरिक त्या सरकारचे अधिक लाचार बनून राहतील. म्हणून, शासनसंस्थेपासून जास्तीत जास्त स्वायत्तता असलेली न्यायासने असावी या गोष्टीला निर्णायक महत्त्व आहे. निःपक्षपाती व निस्पृह भूमिकेतून कायद्यांची अंमलबजावणी करणारी, आणि लहरीनुसार, कायद्याचा भंग केला नसतानाही, नागरिकाला अटकेत टाकून त्याचा छळ करण्यास शासनसंस्थेला धीटपणे व समर्थपणे मनाई करणाऱ्या न्यायासनांचे महत्त्व मोक्याचे आहे.

पाश्चिमात्य भांडवलशाही समाजांच्या संदार्भत या स्वातंत्र्याचे महत्त्व आहे ही गोष्ट कोणी नाकारील असे मला वाटत नाही. साम्यवादी समाजातही कायद्याचे अधिराज्य असावे या गोष्टीला कमालीचे महत्त्व असल्याचे आपल्या निदर्शनास आले आहे. व्यवहारात साम्यवादी समाजातील शासनसंस्था ही एक बलाढ्य संस्था बनते आणि सर्वसामान्य जनतेपासून ती फार दूर व अलिप्त राहते हा आपला खेदजनक अनुभव आहे. (साम्यवादाच्या

तत्त्वज्ञानाशी ही वस्तुस्थिती विसंगत आहे म्हणून वस्तुस्थिती काही बदलत नाही. ) नागरिकांवर साम्यवादी शासनसंस्थेने जुलूम-जबरदस्ती करू नये यासाठी स्पष्ट, निःसंदिग्ध कायदेकानू असण्याची अत्यंत तातडीची निकड आहे. आज परिस्थिती अशी आहे की, साम्यवादी तत्त्वज्ञानात कायद्याचे अधिराज्य असण्याची गरज सैद्धान्तिकदृष्ट्या अजून समाधानकारकपणे मान्य झालेली नसताना, साम्यवादी राष्ट्रांच्या व्यवहारात मात्र कायदेकानूंची आवश्यकता दिवसेदिवस अधिकाधिक मान्यता पावत आहे. रशियन कम्युनिस्ट पार्टीच्या विसाव्या व बाविसाव्या काँग्रेसपुढे ख्रुश्शोव्हने स्टालिनचा अत्यंत कडक शब्दात जो धिक्कार केला त्यातला मुख्य टीकेचा मुद्दा, शेवटी, स्टालिनने सोव्हिएट रशियाचे कायदे धाब्यावर बसविले हाच होता. आणि ही गोष्ट खरीच आहे. विसाव्या शतकाच्या तिशीत स्टालिनने रशियात आपल्या विरोधकांचे केलेले शिरकाण हे शासनसंस्थेच्या बेकायदेशीर गुंडगिरीचे आपल्या काळातील अत्यंत भयानक उदाहरण आहे.

'कायद्याचे अधिराज्य' हे स्वातंत्र्य किती थोडी मागणी करते ते पाहणे उद्‌बोधक ठरेल. कायद्याची योग्यायोग्यता ते पहात नाहीत. समाजाने न्याय, सुष्ट कायदे करावेत ही आकांक्षा मूलतः अधिक उच्च पातळीवरची आहे. कायदे स्पष्ट व निःसंदिग्ध असावेत; त्यांची अंमलबजावणी करणारी न्यायासने प्रामाणिक चारित्र्याची असावीत; आणि खुल्या न्यायासनासमोर कायदेभंगाचा गुन्हा शाबीत होत नाही तोवर राज्यसत्तेला कोणत्याही नागरिकाला शासन करता येऊ नये; इतकी साधी व मर्यादशील अशी ही मागणी आहे. किमान हे स्वातंत्र्य तरी प्रस्थापित झालेच पाहिजे; एरवी, कोणतीही लोकशाहीसंस्था काम करू शकत नाही. कारण, या स्वातंत्र्याच्या अभावी, सर्व नागरिक शासनसंस्थेच्या लहरीचे ताबेदार राहतात.

## चार स्वातंत्र्ये ही स्वतंत्र समाजाचे आधारस्तंभ

ही चार स्वातंत्र्ये हे स्वतंत्र समाजाचे आधारस्तंभ आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील जगात ही स्वातंत्र्ये कोठे व किती प्रमाणात लोकांना हस्तगत झालेली आहेत असा प्रश्न आहे. पुष्कळ लोक पाश्चिमात्य जगाला 'स्वतंत्र' जग आहे असे संबोधतात. 'पाश्चिमात्य' जग असा शब्दप्रयोग

सोयीसाठी मीहि केला आहे. पण तो सदोष आहे. पाश्चिमात्य जग स्वतंत्र आहे हे काही आपल्या प्रश्नाला उत्तर होऊ शकत नाही. म्हणून ‘ स्वतंत्र ’ जग असा शब्द मी पाश्चिमात्य जगाच्या संदर्भात वापरलेला नाही. पण, असे असले तरी, पाश्चिमात्य जगातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रात जगातील इतर कोठल्याहि भागापेक्षा जबाबदार प्रातिनिधिक राज्यपद्धतीवर आधारित ही चार स्वातंत्र्ये अधिक अंशाने लोक उपभोगू शकतात असे मला दिसते.

पण म्हणून या देशातील लोक खरेखुरे स्वतंत्र आहेत का असे कोणी मला विचारेल. कोणी मला सांगेल की, पाश्चिमात्य जगात लोक ‘ स्वतंत्र ’ आहेत म्हणजे काय तर ‘ उपाशी राहायला स्वतंत्र ’ आहेत. या उपहासात भूतकाळात निश्चितच जोर व तथ्य होते. पण, मला नाही वाटत, आज या उपहासात काही जोर राहिला आहे. स्वातंत्र्यात जशी उपासमार शक्य आहे तशी तुरुंगात कैद भोगत असतानाहि उपासमारीला माणूस बळी पडू शकतो असे मला वाटते. माणसाला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे आर्थिक सुरक्षितताहि आपोआप मिळेल अशी हमी घेता येत नाही, किंवा सुखवस्तु रहाणीमान मिळेल असे नाही हे खरे; पण त्याचवेळी, हेहि खरे की, गुलामीत, या गोष्टी मिळण्याची खात्री तर सोडाच, पण या गोष्टी प्राप्त करून घेणे जवळपास अशक्य आहे.

म्हणून मी असे म्हणेन की, ही चार विशिष्ट स्वातंत्र्ये बऱ्याच अंशी ज्या समाजात सिद्ध झालेली असतील त्या समाजातील नागरिकाला मानवी समाजाच्या आजवरच्या इतिहासात शक्य झालेले कमाल स्वातंत्र्य उपभोगायला मिळेल. या स्वातंत्र्यातहि काही महत्त्वाच्या उणीवा असतील, नाही असे नाही; पण राजकीय गुलामगिरीत राहण्यापेक्षा हे अपूर्ण स्वातंत्र्य उपभोगणे कितीतरी बरे. आजवरच्या प्रयत्नांनी मानवजातीने गांठलेले ते शिखर आहे.

सद्यःकालीन पाश्चिमात्य लोकशाही आपल्या नागरिकांकरता या आशयाचे आणि इतक्या प्रमाणात स्वातंत्र्य संपादन करण्याचा प्रयत्न करीत आहे. ‘ बूर्झ्वा लोकशाही ’ म्हणून ज्या लोकशाहीचा साम्यवादी उपहास करतात त्या लोकशाहीचे हे ध्येय आहे. माणसाच्या दृष्टीने हे ध्येय किती मोलाचे हा प्रश्न उरतोच.

## पाश्चिमात्य लोकशाहीवरील साम्यवाद्यांची टीका

पाश्चिमात्य, किंवा साम्यवाद्यांच्या भाषेत 'बूर्झ्वा', लोकशाहीची स्पष्टता मी वर केली आहे. या लोकशाहीवर साम्यवादी काय टीका करतात ते आपण समजावून घेऊ.

सारांशाने साम्यवाद्यांचे म्हणणे पुढीलप्रमाणे आहे.

पाश्चिमात्य समाजात असलेल्या आर्थिक-सामाजिक वर्गांमुळे 'बूर्झ्वा लोकशाही' ही नामधारी आहे, ढोंग आहे असे साम्यवादी म्हणतात. भांडवलशाही समाज मुख्यतः दोन वर्गांत विभागलेला असतो. उत्पादनाच्या साधनांवर मालकी असलेले एका बाजूला आणि बाकीचे सर्व दुसऱ्या बाजूला अशी ही विभागणी आहे. मालक आणि मजूर असे हे दोन वर्ग. पाश्चिमात्य राष्ट्रात लोकशाही व स्वातंत्र्य असल्याचा जो दावा केला जातो तो समाजाच्या या विषम रचनेमुळे खोटा पडतो; लोकशाही व स्वातंत्र्य ही मजूर वर्गाच्या वाट्याला येतच नाहीत. लेनिनने त्याच्या नेहमीच्या स्पष्ट शैलीत ही गोष्ट सांगितली आहे. १९१७ सालच्या ऑगस्टमध्ये, रशियन राज्यक्रांतीच्या अवघे दोन महिने अगोदर, लेनिनने 'स्टेट अँड रेव्होल्यूशन' हा साम्यवादी तत्त्वज्ञानातील एक आद्य ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथात — 'बूर्झ्वा लोकशाही'वर टीका करीत असता लेनिन लिहितो,

> 'भांडवलशाही शोषणामुळे या लोकशाहीची चौकट नेहमीच फार अरुंद राहते; परिणामी, ही लोकशाही प्रत्यक्षांत, नेहमीच, अल्पसंख्यांकांची, मालक वर्गाची, धनिकांची, लोकशाही राहते. प्राचीन ग्रीक शहरराज्यात गुलामांच्या मालकांनाच तेवढे स्वातंत्र्य होते; भांडवलशाही समाजातहि, त्याचप्रमाणे, स्वातंत्र्य हे मालकापुरतेच मर्यादित असते. भांडवलशाही शोषणामुळे आधुनिक रोजगारी-गुलामदेखील दारिद्र्य आणि उपासमार यांनी इतके पिचून गेलेले असतात की, 'लोकशाहीबद्दल त्यांना कशाची आली आस्था', 'राजकारणाबद्दल त्यांना कशाची आली आस्था' हे वाक्प्रयोग याहि प्रकारच्या गुलामांना लागू पडावेत. सर्वसाधारण शांततेच्या काळात बहुसंख्य लोकांना राजकीय आणि सामाजिक जीवनात भाग घेण्यास मोकळीक नसते.'

'बूझ्वी लोकशाही' वरील लेनिनच्या टीकेतले मर्म शेवटच्या वाक्यात साठविले आहे. पाश्चिमात्य समाजातील कामगार हा इतका गरीब नि अडाणी आहे की, त्याला जे लोकशाही स्वातंत्र्य कागदोपत्री बहाल केलेले आहे, त्याचा लाभ घेण्याच्या परिस्थितीत तो नाही; त्यामुळे, प्रत्यक्षात, 'राजकीय-सामाजिक जीवनापासून ते वगळले जातात.' लेनिनची मुख्य टीका ही आहे. या टीकेच्या आधारावर लेनिन (आणि इतर सर्व साम्यवादी तत्त्वज्ञ) असा निष्कर्ष काढतो की, आपल्याला हवे ते सरकार निवडण्याचा हक्क, ते सरकार पदच्युत करून त्या जागी दुसरे सरकार निवडण्याचा हक्क आणि वर उल्लेखिलेली चार स्वातंत्र्ये, यांचा उपयोग भांडवलशाही समाजात सामान्य जनतेला नावापुरताच आहे, हे सगळे ढोंग आहे. हे हक्क व ही स्वातंत्र्ये कागदावर लोकांना दिली जातात; पण व्यवहारात 'दारिद्र्य व उपासमार यांनी भरडले गेल्याने' त्यांचा वापर करता येण्याची शक्यता उरलेली नसते; पाश्चिमात्य समाजांवरील साम्यवाद्यांची ही टीका आहे.

'बूझ्वी लोकशाही'वरील साम्यवाद्यांच्या या टीकेला आपणाजवळ काही उत्तर आहे काय? भांडवलशाहीच्या प्रारंभीच्या कालात या टीकेत तथ्य होते ही गोष्ट इतिहासाशी अपरिचित असलेला माणूसच नाकारील. बिगर साम्यवादी जगातील काही ठिकाणी आजही या म्हणण्यात तथ्य आहे. पण, उत्तर अमेरिका, ब्रिटन, पश्चिम युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि इतर प्रगत भांडवलशाही राष्ट्रांच्या बाबतीत, आजच्या विसाव्या शतकाच्या साठीतील या समाजांना लेनिनचे वरील विश्लेषण लागू करण्याचा प्रयत्न अयशस्वी होतो हेही सुबुद्ध माणसाच्या चटकन् ध्यानात आल्याखेरीज रहात नाही.

या प्रगत राष्ट्रातून राजकारणात भाग घेणाऱ्या माझ्यासारख्या राजकारणी माणसाला तर, 'दारिद्र्य व अज्ञान यांच्यामुळे कामगार आज सार्वजनिक जीवनातून वगळले जातात' या म्हणण्यावर एक क्षणभर देखील विश्वास ठेवायची सोय नाही. पाश्चिमात्य समाजातील कामगार राजकीय जीवनात क्रियाशील भाग घेतात ही वस्तुस्थिती आहे. कामगार वर्ग जर राजकारणात भाग घेत नसता तर ब्रिटिश पार्लमेंटमध्ये गेली वीस वर्षे मी निवडूनच येऊ शकलो नसतो. सधन वर्गातील व्यक्तींच्या मानाने सर्वसाधारण कामगार-

वर्गांचे शिक्षणमान निकृष्ट असते आणि या गोष्टीचा त्यांना अडथळा होतो ही गोष्ट काही खोटी नाही. उच्च वर्गीयांच्या पाठिंब्यावर उभ्या असलेल्या राजकीय पक्षाइतका निधी कामगारवर्गाच्या वर्गण्यांवर अवलंबून असलेल्या पक्षाला उभा करणे कठीण जाते हीही वस्तुस्थिती आहे. उच्च, मालक वर्गीयांच्या तुलनेने रोजगारीवर काम करणारे कामगार हे अर्थातच गरीब आहेत, पण शिक्षण, पैसा या प्रकारचे अडथळे आज काही प्रमाणात असले तरी ते दूर करण्याच्या दिशेने दिवसेंदिवस प्रगती होत आहे. पाश्चिमात्य समाजातील लोकशाहीवरील साम्यवाद्यांची मुख्य टीका ही उघडच बाद झाली आहे हा निष्कर्ष काही नाकारता येणार नाही.

## साम्यवाद्यांची अधिक अद्ययावत् टीका

'बूझ्वा लोकशाही'वर एवढीच टीका करून कम्युनिस्ट थांबत नाहीत. उत्पादनांच्या साधनांवर धनिकांची मालकी असल्याने, बूझ्वा समाजात इतर सर्व बाबींवरही धनिक लोकांचीच मिरासदारी प्रस्थापित होत असते असे साम्यवाद्यांचे म्हणणे असते. उत्पादनाच्या साधनांवरील मालकीमुळे विचारनिर्मितीच्या साधनांवरही भांडवलदारांची मालकी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रस्थापित होते. देशातील शिक्षणपद्धती व यंत्रणा, वृत्तपत्रे, नभोवाणी, दूरचित्रवाणी, आणि लोकमानसाला आकार देणारी इतर आधुनिक शक्तिशाली साधने, या सर्वांचा समावेश विचारनिर्मितीच्या साधनांमध्ये होतो. कामगार वर्ग हा सुस्थितीत असला, आणि सार्वजनिक जीवनात भाग घेण्याइतका शिक्षित व स्वतंत्र असला, तरी उत्पादनाच्या साधनावरील आपल्या मालकीच्या साहाय्याने कामगारांची मने नियंत्रित करणे उच्चवर्गीयांना शक्य असते असे यातून सुचविले जाते. या सिद्धान्तानुसार, आपल्या गुलामीच्या अवस्थेतून स्वतःची सुटका करून घेण्याची इच्छा करण्याची संधीच कामगार वर्गाला कधी मिळणार नाही, कारण कशाची इच्छा करायची तेही त्यांना नेहमीच पढविले जाणार.

ही टीका कितीतरी अधिक अद्ययावत् आहे. 'बूझ्वा लोकशाही' समाजाच्या राजकारणात भाग घेणारा राजकारणी याही टीकेत थोडे तथ्य आहे हे अमान्य करणार नाही. पण, याही ठिकाणी, या टीकेचा काटा

निश्चितपणे असत्याच्या बाजूला चांगलाच कलता आहे ही अनुभवाने स्पष्ट होणारी गोष्ट आहे. उत्पादनाच्या साधनांवर मालकी असलेला वर्ग आपल्या हितसंबंधांना पुष्टि देणारे विचार लोकांमध्ये रुजविण्यासाठी सर्व तऱ्हेच्या शक्तिशाली साधनांचा वापर करतात हे उघड आहे. पण कामगार वर्गावर विचार नियंत्रण लादण्यात त्यांना विशेष यश येत असल्याचा प्रत्यय येत नाही. उलटपक्षी, दिवसेदिवस कामगार वर्गाचा वैचारिक दृष्टिकोन हा पाश्चिमात्य समाजात अधिक प्रभावी बनत चालला आहे. समाजाच्या विचारांना तो आकार व वळण देत आहे (या दीर्घकालीन, सूक्ष्म, पण अत्यंत महत्त्वाच्या प्रक्रियेचे पुढे एक ठिकाणी मी चित्रण करीन).

'बूर्झ्वा लोकशाही'वर टीका करीत असताना साम्यवादी लोकशाही व स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींचे कमालीचे महत्त्व गृहीततत्त्व म्हणून स्वीकारतात ही गोष्ट नजरेआड करू नका. लोकशाही व स्वातंत्र्य यांचे अतिशय महत्त्व आहे ही गोष्ट लेनिन पुनः पुन्हा सांगतो. क्रांतीनंतर लोकशाही व स्वातंत्र्य साकार होतील असे अभिवचन तो 'स्टेट अँड रेव्होल्युशन' या आपल्या ग्रंथात लेखी देत नाही; क्रांतीचा हा परिणाम तो मुळी गृहीतच धरून चालतो. आणि, माझ्या मते, या ठिकाणी लेनिन प्रामाणिक आहे. कामगारांच्या दृष्टीने आदर्श लोकशाहीच्या प्रस्थापनेच्या तीन शर्ती लेनिनने सांगितल्या.

## लेनिन प्रणीत आदर्श लोकशाहीच्या तीन शर्ती

१. सर्व अधिकाऱ्यांची निवडणूक.

२. अधिकाऱ्यांना परत बोलावण्याचा अधिकार. ज्या अधिकाऱ्याच्या कामाबद्दल कामगारांना समाधान नसेल त्या अधिकाऱ्यांना केव्हाही पदच्युत करून त्यांच्या जागी दुसरे अधिकारी नेमण्याचा अधिकार.

३. अधिकाऱ्यांचे वेतन 'कमी करून ते सर्वसाधारण कामगारांच्या मिळकतीच्या पातळीवर' आणून ठेवले पाहिजे.

एकदा का या तीन शर्ती क्रांतीनंतर पूर्ण झाल्या की, पाश्चिमात्य

समाजातील कामगारांनी कधी अनुभवली नव्हती अशी परिपूर्ण, आदर्श, लोकशाही मूर्त होईल असे लेनिनने म्हटले आहे.

क्रांतीच्या द्वारा अशी आत्यंतिक व लेनिनचेच शब्द वापरायचे तर रांगडी प्राच्य ( Primitive ), स्वरूपाची लोकशाही प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट लेनिनने आपल्या डोळ्यांसमोर ठेवले होते हे माहीत असणे महत्त्वाचे आहे. सर्व अधिकाऱ्यांच्या निवडणुका व्हाव्यात, मतदारांना अधिकाऱ्यांना परत बोलावण्याचा अधिकार असावा, अधिकाऱ्यांना कामगाराइतकाच पगार असावा, या तिन्ही गोष्टींवर लेनिनची प्रामाणिक श्रद्धा होती असे माझे मत आहे. **फक्त** कामगारांना सरकारी अधिकाऱ्यांच्या निवडीत भाग घेता येईल एवढी एक मर्यादा लेनिनने घातलेली होती, एरवी बाकी सर्व बाबतीत पूर्ण लोकशाहीचे तत्त्व लेनिनला मान्य होते. अशा प्रकारच्या रांगड्या लोकशाहीवर आधारित सरकारची सत्ता वैयक्तिक मालमत्तेच्या मालकांवर जबरदस्ती करण्यासाठी वापरली जाण्याची शक्यता त्याने गृहीत धरलेली होती.

साम्यवादी लोकशाही कल्पनेच्या गाभ्याशी इथे आपण येऊन भिडतो. वर्गविग्रहावर अधिष्ठित समाजात सर्वसमावेशक लोकशाही कधीच अस्तित्वात येऊ शकणार नाही या विषयी लेनिनचे मत अगदी ठाम होते. उत्पादनाच्या साधनांवर मालकी असलेला एक वर्ग, आणि या मालकांसाठी मजुरीवर काम करणारा कामगारांचा दुसरा वर्ग, असे दोन वर्ग असणाऱ्या समाजात मालकवर्गाची मालकांपुरती लोकशाही असू शकते; किंवा, श्रमिक क्रांतीनंतर कामगारांची कामगारांसाठी लोकशाही असू शकते. पण मालक व मजूर दोघांकरिता एक समान लोकशाही नावाची चीज असूच शकत नाही.

‘ बूर्झ्वा लोकशाही ’ हा अल्पसंख्य वर्गाने प्रच्छन्नपणे बहुसंख्य वर्गावर हुकुमत चालविण्याचा प्रकार आहे असे लेनिनला वाटले. बहुसंख्य कामगार वर्गाची मालमत्ता जप्त झालेल्या माजी अल्पसंख्य मालक वर्गावर हुकुमत असलेली लोकशाही त्याला अभिप्रेत होती. त्या प्रकारच्या लोकशाहीवर त्याचा विश्वास होता. क्रांतीनंतर, आजवर मानवी समाजाने अनुभवले नव्हते इतके, पूर्ण स्वातंत्र्य कामगार वर्गांतर्गत उपभोगता येईल अशी त्याची कल्पना होती.

## आधुनिक युगातील सर्वोच्च शोकांतिका

क्रांतीनंतरच्या लोकशाही समाजासंबंधीची लेनिनच्या सिद्धान्ताची प्रत्यक्षात काय गत झाली, व ती का झाली याची चर्चा आपण पुढे करणार आहोतच. क्रांतीनंतर रशियात हुकूमशाही प्रस्थापित झाली. ही हुकूमशाही देखील बहुसंख्य कामगार वर्गाची अल्पसंख्य माजी मालक वर्गावरील हुकूमशाही नसून, मूठभर अधिकाऱ्यांची इतर सर्व रशियन लोकांवरील निरंकुश व सर्वंकष हुकुमत आहे. आधुनिक युगातील ही सर्वोच शोकांतिका आहे.

या शोकांतिकेची सखोल चिकित्सा करण्यास सुरवात करण्याआधी, बूर्झ्वा लोकशाहीवर साम्यवाद्यांनी केलेल्या या दोन आरोपांची अधिक तपशीलवार छाननी केली पाहिजे. माझ्या व्यक्तिगत अनुभवावरून मी असे सांगितले की, 'दारिद्र्य व उपासमार यांच्यामुळे देशाच्या सार्वजनिक व राजकीय जीवनातून वगळले जावेत इतके कामगार भरडले गेलेले आहेत' ही लेनिनची टीका आधुनिक पाश्चिमात्य समाजांना लागू होऊ शकत नाही. हा आरोप खोटा आहे. पण लेनिनचा आरोप खोटा का, आणि तो खोटा का झाला, याचे दिग्दर्शन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. पाश्चिमात्य लोकशाहीमध्ये जीव ओतण्याची क्रिया कामगार वर्गाच्या हातून घडण्यामागची दीर्घ व गुंतागुंतीची प्रक्रिया उकलून बघणे आवश्यक आहे.

• • •

# ३ पाश्चिमात्य समाजांची कामगिरी

पाश्चिमात्य देशातील लोकशाही निव्वळ ढोंग आहे असे साम्यवादी सरळ सरळ म्हणतात. हे खरे आहे का ? राजकीय संस्था या सच्च्या की खोट्या हे ठरविण्यासाठी काही कसोट्या लावून पाहता येणे शक्य आहे का ? या प्रश्नाचे उत्तर राज्यशास्त्रांतील सैद्धान्तिक विवेचनाचा आधार घेऊन देता येईल. पण मी ते तसे देणार नाही. पाश्चिमात्य देशात लोकशाही व्यवहारात राबविता येते या अर्थाने ती सच्ची आहे, असे मला म्हणायचे आहे. लोकशाहीच्या राजकीय संस्था, वेगवेगळी स्वातंत्र्ये आणि लोकांना असणारे अधिकार हे पाश्चिमात्य देशात राबविले जाऊ शकतात या अर्थाने ते खरे आहेत.

पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रातील जनतेने हे हक्क व ही स्वातंत्र्ये यांचा वापर पूर्वीहि केला आहे, आजहि करीत आहेत, भविष्यातहि अधिकाधिक प्रमाणात त्यांचा वापर होईल; आणि विशेषतः, पाश्चिमात्य राष्ट्रातील बहुसंख्य कामगार वर्ग हा तर या हक्कांचा व स्वातंत्र्याचा वापर **विशेषकरून** करीत आले आहेत. आपल्या भौतिक जीवनात समृद्धि प्राप्त करून घेण्यासाठी कामगार वर्गांनी त्यांचा प्रभावीपणे उपयोग करून घेतला असून त्यांना मिळालेले फायदे हे दृश्य आहेत, रोजच्या आयुष्यात अनुभवता येण्यासारखे आहेत. भौतिक सुखसमृद्धीची साधना हा लोकशाही स्वातंत्र्याचा व संस्थांचा काही एकमेव उपयोग नाही. भौतिक सुखाइतकेच जीवनातील इतर गोष्टींनाहि महत्त्व आहे, असे असले तरी, भौतिक सुखसमृद्धीचे महत्त्व निःसंशय असून प्रत्यक्ष व्यवहारात पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगार वर्गांना

आर्थिक लाभ वाढत्या प्रमाणावर मिळवून देण्यात पाश्चिमात्य लोकशाही यशस्वी झाली आहे. आजच्या पाश्चिमात्य लोकशाही संस्था या आदर्श व पूर्ण आहेत असे म्हणावयाचे नाही; किंवा, लोकशाही संस्था आपल्या लाभासाठी राबवून घेणे कामगारांना फार सोपे जाते अशातलाहि भाग नाही. उलट, पाश्चिमात्य राष्ट्रांतील लोकशाही निःसंशय अपूर्णावस्थेत असून साम्यवादी उल्लेख करतात त्या बाबींमुळे आपले हक्क पदरात पाडून घेण्यात कामगारांच्या मार्गात अडथळेहि उत्पन्न होतात. एक काळ होता ज्या वेळी काही देशांमधील कामगार वर्ग इतका अज्ञानी, दरिद्री व पीडित होता की लोकशाही अस्तित्वात असूनहि लोकशाही संस्थांचा वापर हुशारीने, समंजसपणे, करण्याची कुवत कामगार वर्गात नव्हती (आजहि जगात काही ठिकाणी काही कालखंडात कामगार वर्गाची परिस्थिति इतकी हीनदीन आढळते.). पण हेहि विसरून चालणार नाही की पाश्चिमात्य लोकशाहीवर लेनिनने टीका केली त्याला पन्नास वर्षे होऊन गेली; त्याच्या अपेक्षेबाहेर या मध्यंतरीच्या काळात पाश्चिमात्य कामगार वर्ग लोकशाही संस्थांचा वापर करण्याच्या कामी पार पुढे गेलेला आहे.

## लोकशाही राज्यव्यवस्थेची आर्थिक फलिते

लोकशाही राज्यव्यवस्थेच्या आर्थिक फलितांचा प्रथम विचार करू. भांडवलशाही समाजातील कामगार वर्ग 'दिवसेंदिवस अधिकाधिक विपन्न होत जाईल' असे भविष्य मार्क्सने वर्तविल्याचे साम्यवाद्यांनी आठवावे. मार्क्सने असे काही भविष्य वर्तविले हे खरे नाही असे म्हटले जाते. पण मार्क्स काय म्हणाला ते त्याने अतिशय स्पष्टपणे लिहून ठेवले आहे. मार्क्सची दोन अवतरणे मी देतो. मार्क्सने आपला जगाविषयीचा दृष्टिकोन तरुणपणात प्रथम ज्या पुस्तकात अत्यंत परखड व स्वच्छ शब्दात मांडला त्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टोतून' पहिले अवतरण घेतलेले आहे. दुसरे अवतरण मार्क्सच्या 'कॅपिटल' या प्रौढ, परिपक्व अवस्थेत लिहिलेल्या ग्रंथातून घेतले आहे.

'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'त मार्क्स लिहितो, 'उद्योगधंद्यांच्या विकासाबरोबर राहणीमान वरचेवर सुधारण्याऐवजी आधुनिक उद्योगधंद्यांतील कामगाराची स्थिति त्याच्या सर्वसाधारण श्रमजीवी वर्गाच्या स्थितिहूनहि

वाईट होत जाते. तो भिकारी बनतो; त्याचे भिकारीपण लोकसंख्या व संपत्ति यांच्या वाढीच्या वेगाहूनहि अधिक वेगाने वाढत जाते.'

आता 'कॅपिटल' या ग्रंथातले अवतरण बघा. आपल्या सर्व विवेचनाचे नवनीत मार्क्सने ज्या भागात वाचकांपुढे ठेवले आहे त्या 'कॅपिटल'मधील शेवटशेवटच्या भागातून हे अवतरण निवडलेले आहे. मार्क्स म्हणतो, 'भांडवलशाहीचा विकास होत जातो तसतशी भांडवलशहांची संख्या क्रमशः कमी होत: जाते ( उत्पादनतंत्र व साधने यांच्यातील परिवर्तनाचा फायदा उठवून, त्या शोधांवर·आपली मिरासदारी प्रस्थापित करून इतर लहानसहान भांडवलदारांना बडे भांडवलदार गिळंकृत करीत जातात. ). लोकांचे दारिद्य, शोषण, दास्य, अधःपतन व जुलूम यात क्रमशः होत जाणारी वाढ ही या भांडवलशाहीच्या विकासाच्या प्रक्रियेची दुसरी बाजू आहे. एकाच नाण्याच्या या दोन बाजू होत.'

सतत वाढत जाणाऱ्या विपन्नावस्थेच्या भविष्याला मुरड घालणारे, त्यात काही शर्ती उपस्थित करणारे, परिच्छेद मार्क्सच्या ( व फ्रेडरिक एंगल्सच्या ) लिखाणात मार्क्सवादाचे अभ्यासक शोधून काढू शकतात याबद्दल वाद नाही. पण वरील दोन महत्त्वपूर्ण व निर्णायक अवतरणे पाहिल्यावर, भांडवलशाहीचा विकास होत जाईल त्याबरोबर कामगारांचे जीवनमान आहे तितकेच दरिद्री राहील, व अधिकतर ते बिघडत जाण्याचाच संभव अधिक, असे मार्क्सचे मत होते याविषयी खरे म्हणजे कोणाच्या मनात शंका राहू नये.

१८४८ साली 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' लिहिला त्या वेळी, किंवा नंतर १८६० च्या पुढच्या काळात 'कॅपिटल'च्या पहिल्या खंडात वरील विधान केले त्या वेळी, हे भविष्य अचाटहि नव्हते की मूर्खपणाचेहि नव्हते. पुढील काळ, असा वाईट निघणार असे त्या वेळी मार्क्सला 'दिसत' होते हे निश्चित. भांडवलशाहीखाली होत असलेली उत्पादनसाधनातील सुधारणा आणि सतत वाढत चाललेले एकूण उत्पादन या दोन्ही गोष्टी मार्क्सने नाकारल्या नाहीत. या सर्व प्रगतीचा लाभ हा सर्वस्वी उत्पादन साधनांवरील मालकी असलेल्यांना मिळेल आणि कामगारांना वाढत्या समृद्धीतला काहीहि भाग मिळणार नाही अशी मार्क्सच्या मनाची खात्री होती. प्रत्यक्षात असे घडले नाही. मार्क्सने भाकित केल्यापासूनच्या शंभर वर्षांत सर्व प्रमुख व यशस्वी पाश्चिमात्य

लोकशाही राष्ट्रात कामगारांचे जीवनमान उंचावले आहे, ते खालावत गेलेले नाही; आणि ते नुसतेच वाढले नसून हिशेबात घेण्याइतके वाढले आहे. आता त्याची कारणमीमांसा काहीहि करा.

## इंग्लंडमधील कामगारांचे जीवनमान उंचावले आहे

१८५० वा १८६० नंतरच्या काळात इंग्लंडमधील कामगारांचे जीवनमान किती उंचावले आहे त्याची संख्याशास्त्रीय अचूक मोजणी करणे अवघड, जवळजवळ अशक्य आहे. पण ज्या कोणी संख्याशास्त्रज्ञांनी व अर्थशास्त्रज्ञांनी या प्रश्नाचा अभ्यास केला आहे त्या सर्वांचे एकमत असे आहे की आजचा कामगार हा शंभर वर्षांपूर्वीच्या कामगाराच्या तुलनेत आज दुप्पट ते तिप्पट प्रमाणात वस्तु विकत घेऊ शकतो. त्या अर्थी, 'दारिद्र्य, शोषण, दास्य, अधःपतन व जुलूम' वाढत गेलेला नसून त्याचे प्रमाण पुष्कळच कमी झालेले आहे.

एकट्या इंग्लंडच्या बाबतीतच अशी परिस्थिती नसून ही सुधारणा सर्वच प्रगत पाश्चिमात्य भांडवलशाही राष्ट्रात घडून आलेली आहे. अमेरिकन कामगारांचे जीवनमान तर ब्रिटिश कामगारांपेक्षा कितीतरी अधिक जलद गतीने उंचावत गेले आहे; हीच गोष्ट स्वीडनमधील कामगारांबाबतहि खरी आहे. पश्चिम युरोपीय राष्ट्रात कामगारांचे जीवनमान या प्रमाणात उंचावलेले नसले तरी त्याची दिशा तीच आहे. विशेषतः गेल्या वीस वर्षांत कामगारांच्या परिस्थतीत या देशात चांगलीच सुधारणा झालेली आहे. ही सुधारणा डोळ्यांनाहि दिसते आणि आंकडेमोडीनेहि सिद्ध केली जाऊ शकते.

## भविष्याचे साम्यवाद्यानी केलेले निदान सुधारून घेणे नितांत आवश्यक

या मुद्द्यावर मी भर देण्याचे कारण या मुद्द्यासंबंधी जो निष्कर्ष उत्पन्न होईल त्यावर पुढील सर्व प्रतिपादन अवलंबून आहे. देशातील बहुसंख्य लोकांच्या जीवनमानाची घसरगुंडी सुरू झाली तर परिस्थतीचे निदान सर्वस्वी व पूर्णपणे पालटते ही गोष्ट साम्यवाद्यांना समजावून सांगायला नको. कामगारांचे जीवनमान खालावत जाण्याची अपेक्षा असताना ते जर प्रत्यक्षात सुधारत

चालले तर या निष्कर्षाशी संबंधित इतर सर्व सिद्धान्तहि बदलण्याची आवश्यकता निर्माण होते. कामगारांचा सामाजिक – राजकीय दृष्टिकोन पार बदलणार. भविष्याचे साम्यवाद्यांनी केलेले निदान त्यांनी सुधारून घ्यावे याची नितांत आवश्यकता आहे. त्याखेरीज त्यांचे पाऊल पुढे पडणार नाही. माझ्या पुढील सर्व विवेचनाच्या दृष्टीने हा मुद्दा निर्णायक महत्त्वाचा असल्याकारणाने हे अर्थशास्त्रीय विवेचन इथेच न संपविता आणखी दोन मुद्द्यांचा मी ऊहापोह करतो.

## राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप : काही आकडेवारी

राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप हा पहिला मुद्दा होय. मार्क्सवादातील एका पंथाचे, ऑस्ट्रियन मार्क्सवाद्यांचे, प्रतिपादन असे की, कामगारांचे जीवनमान उंचावत आहे हे खरे; उत्पादनक्षमतेतील वाढ व संपत्तीची वृद्धि इतकी प्रचंड आहे की या प्रचंड ओघाचा हा एक अपरिहार्य परिणाम आहे; पण या सर्व-साधारण वाढीच्या काळातहि कामगार वर्गांना मिळणारा एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाचा **हिस्सा** वास्तविक कमी कमीच होत चालला आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीच्या दृष्टीने विचार केलात तर भांडवलशाहीच्या विकासा-बरोबर कामगारांच्या शोषणाची तीव्रताहि वाढत चालली आहे हे निदान खरेच ठरत आहे असे त्यांचे म्हणणे होते. वीस वर्षांपूर्वीपर्यंतचे उपलब्ध आकडे तपासले तर त्यातून कोणताच स्पष्ट निवाडा निष्पन्न होत नाही असे माझे मत आहे. काही देशात कामगारांचा राष्ट्रीय उत्पन्नातला वाटा वाढला नाही किंवा तो घटला असे म्हणता येईल, अलिकडच्या वर्षांतील आकडेवारी पाहिलीत तर, उदाहरणार्थ, इंग्लंड व अमेरिकेत कामगारांच्या वाट्याला येणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिश्शातहि वाढ झाली आहे आणि एकंदर कामगारांच्या पदरात पडणाऱ्या **रकमेतहि** वाढ झाली आहे असे दिसून येते. हिश्शात झालेली वाढ इंग्लंडच्या उदाहरणात फार झपाट्याने झालेली नाही, पण झालेली आहे. 'कंडिशन्स ऑफ इकॉनॉमिक प्रोग्रेस' या आपल्या ग्रंथात कॉलिन क्लार्क यांनी वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या काळी 'नक्त राष्ट्रीय उत्पन्नातील कामगारांचा हिस्सा' काय होता ते मोजण्याचा प्रयत्न केला आहे. १८६२ साली अमेरिकेत या वाट्याची टक्केवारी ६२ होती.

१८६३ ते १९११ या दरम्यान ती घसरत जाऊन ५९.५ टक्क्यांवर आली. त्यानंतरच्या काळात ती परत वाढत जाऊन १९५३ साली कामगारांना मिळणारा वाटा ७२.६ टक्के होता. अमेरिकेच्या बाबतीत आणखीहि अलिकडची आकडेवारी कॉलिन क्लार्क देतात. १९१९ साली कामगारांचा वाटा ७१.९ टक्के होता तर १९५२ मध्ये तो ८०.१ टक्के इतका वाढला होता. सर्वच पाश्चिमात्य समाजात कामगारांना मिळणारा नक्त राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिश्शात अशीच क्रमशः वाढ होत आलेली आहे. मी उद्धृत केलेली आकडेवारी अचूक आहे असे गृहीत धरू नका. या बाबतीत मोजमाप करणे ही गोष्ट अतिशय अवघड आहे. पण विकासाची साधारण दिशा स्पष्ट करण्यास हे आकडे पुरेसे आहेत.

'ॲफ्लूअंट सोसायटी' या आपल्या पुस्तकात ख्यातनाम अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जॉन केनेथ गॅलब्रेथ यांनी अमेरिकन राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटपासंबंधी पुढील आकडेवारी दिली आहे. ही आकडेवारी काळजीपूर्वक व काटेकोरपणे जमविलेली आहे.

> 'देशातील सर्वोच्च उत्पन्न असलेल्या एक टक्का लोकांचे करआकारणीनंतरचे एकूण उत्पन्न १९२८ साली राष्ट्रीय उत्पन्नाच्या १९ टक्के होते; १९४६ मध्ये ते ८ टक्क्यांहून थोडेसे कमी होते. १९२८ साली सर्वोच्च उत्पन्न असलेल्या ५ टक्के लोकांचे उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नाच्या एकतृतीयांश होते; १९४६ साली राष्ट्रीय उत्पन्नातील त्यांचा वाटा १८ टक्केच होता. युद्ध व युद्धोत्तर कालात निकृष्ट उत्पन्न असलेल्या वर्गांच्या उत्पन्नात झपाट्याने वाढ होत गेली. १९४१ ते १९५० या दरम्यान सर्वांत निकृष्ट उत्पन्न असलेल्या २० टक्के लोकांच्या एकूण उत्पन्नात ४२ टक्क्यांनी वाढ झाली; त्यांच्यापेक्षा वरील २० टक्के लोकांच्या उत्पन्नात ३७ टक्क्यांनी वाढ झाली.'

तीस वर्षांपूर्वीच्या मानाने आज अमेरिकेत उत्पन्नाचे वाटप हे ठळकपणे कमी विषम आहे ही गोष्ट वरील आकड्यांनी निर्विवाद सिद्ध होते. यापेक्षा जास्त दावा मी करणार नाही. ऑस्ट्रियन मार्क्सवाद्यांनी दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या दारिद्र्याच्या सिद्धान्तावर जो नंतर 'कलम' केला तो सिद्धान्तहि खरा नाही ही गोष्ट मात्र या वरून सिद्ध होते.

कामगारांची कार्यशक्ति एकंदरीने व सापेक्षता वाढली आहे किंवा नाही हा एकच मुद्दा विचारात घेऊन भागते असे नाही. कामाचे तास, पगारी सुट्या, शिक्षणात सवलती, औषधपाण्याची, डॉक्टरी इलाजाच्या सोयी, या व इतर गोष्टींनाहि महत्त्व आहे. कामगाराच्या राहणीमानात या सर्व गोष्टींमुळे म्हणण्यासारखा फरक पडतो. क्रयशक्तीमध्ये वाढ होत आहे हे निर्विवादपणे मान्य करायचे टाळता येईल, पण या बाकीच्या गोष्टी गेल्या शंभर वर्षांत कामगारांना वाढत्या प्रमाणात उपलब्ध होत गेल्या आहेत ही गोष्ट नाकबूल करताच येणार नाही. मार्क्सच्या काळात लोभी भांडवलदार कामाचे तास वाढवीत होते, माणसाच्या शारीरिक सहनशक्तीचा अंत पहात होते. या लोभी प्रवृत्तीवर मार्क्सने भांडवलशाहीवरील आपल्या टीकेत फार भर दिलेला आहे. त्याच्या काळात ही प्रवृत्ति प्रत्यक्षात आढळून येत होती हे खरेच आहे. ' सिनियर्स लास्ट अवर ' या कॅपिटलच्या पहिल्या खंडातल्या प्रकरणातील मार्क्सची याविषयीची आवेशपूर्ण टीका वाचा. सिनियर हा मार्क्सच्या काळातील एक ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ होता. (खरे तर तो माझा पणजोबा लागतो.) कामगारांचे कामाचे तास कमी केले, ते आधीच फार अधिक होते, तर ब्रिटिश उद्योगधंदे किफायतशीर राहणार नाहीत अशा अर्थाचे प्रतिपादन करणारे चोपडे त्याने भांडवलदारांच्या वतीने प्रसिद्ध केले होते.

या घमेंडखोर व निर्घृण प्रतिपादनावरून मार्क्सने सिनियरचे वाभाडे काढले ते योग्यच केले. पण आज, कामगारांच्या जवळची क्रयशक्ति वाढल्याच्या घटनेने वाटणार नाही इतके आश्चर्य कामगारांचे कामाचे तास कमी होत चाललेले पाहूनच मार्क्सला वाटेल असे मला वाटते. भांडवलशाही अर्थव्यवस्था कायम असतानाहि कामाचे तास कमी करून घेण्यात, आठवड्यातून दोन दिवस पूर्ण सुट्टी मिळविण्यात, भरपगारी वार्षिक सुट्या पदरात पाडून घेण्यात, कामगारांनी यश मिळविलेले पाहून मार्क्सला अचंबा वाटेल. आज सर्वांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळत असलेले पाहून, कामगार वर्गातील अल्पसंख्य मुलांना का होईना माध्यमिक व उच्च शिक्षणाची संधि मिळत असताना पाहून, मार्क्सला चमत्कार वाटेल. शंभर वर्षांपूर्वीच्या परिस्थितीत भांडवलशाही व्यवस्थेतील आजच्या या परिवर्तनाची कल्पना देखील मार्क्स-एंगल्सच नव्हे तर इतरहि कोणी करू शकले नसते.

## पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगारांचे राहणीमान साम्राज्यवादी शोषणावर आधारलेले असे म्हणणे निराधार

हे परिवर्तन कसे व का घडून आले? या परिवर्तनाचे साम्यवादी जे स्पष्टीकरण देतात त्याचा विचार मी प्रथम करतो. त्यांच्या मते भांडवलशाहीच्या कार्यपद्धतीत परिवर्तन घडून आल्यामुळे कामगारांच्या राहणीमानात या वेगवेगळ्या सुधारणा घडून आलेल्या नसून साम्राज्यवादी शोषणातून जो अतिरिक्त नफा भांडवलदारांना होत असतो त्यांचा हा परिणाम आहे. या अतिरिक्त नफ्यातला काही भाग झिरपून पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगारांपर्यंत पोचला आहे. हा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असून त्याची तपशीलवार चिकित्सा करणे आवश्यक आहे. ( 'एन्ड ऑफ एम्पायर' हे माझे पुस्तक मी विशेषेकरून या मुद्द्याला धरूनच लिहिलेले आहे. ) साम्यवाद्यांचे हे प्रतिपादन चुकीचे असल्याविषयी माझी खात्री पटलेली आहे. त्याची सिद्धता करायला इथे पुरेशी जागा नाही. पण पुढील एकच घटना लक्षात घ्या. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत, ज्या कालात पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगारांच्या राहणीमानात सतत वाढ होत होती त्याच कालात जगातील सर्व मोठाली साम्राज्ये लयास गेली. वीस वर्षांपूर्वी आम्हा ब्रिटिश लोकांचे साठ कोटी लोकांवर राज्य होते. आज फक्त अडीच कोटी लोक ब्रिटिश साम्राज्याखाली आहेत आणि आणखी काही वर्षांत तर यास आणखी गळती लागून तो अगदीच शून्यापर्यंत जरी गेला नाही तरी नावापुरताच राहील. पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगारांचे राहणीमान हे 'साम्राज्यवादी शोषणां'वर आधारलेले आहे हे प्रतिपादन निराधार आहे कारण साम्राज्यांवरील सूर्य मावळत असतानाच कामगारांचा भाग्योत्कर्ष होत होता.

यालाहि साम्यवाद्यांजवळ प्रत्युत्तर आहे. साम्राज्ये लयास गेली हे खरे नसून राजकीय साम्राज्यांचा अस्त करीत असतानाच एक प्रच्छन्न साम्राज्यवाद अस्तित्वात आला आणि पूर्वीच्या वसाहतींचे आर्थिक शोषण तसेच आजहि चालू आहे असे त्यांचे म्हणणे. भारत व ब्रिटन यांच्यामधील आर्थिक व्यवहारांचे स्वरूप या प्रकारचे आहे असे खासच म्हणता येणार नाही. आजच्या स्वतंत्र भारताचे शोषण करायला आम्हाला मुक्तद्वार आहे असे म्हणणे

म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. साम्राज्यवादाचे अवशेष थोडेफार कोठे ना कोठे राहिले आहेत हे मान्य केले तरी या अवशिष्ट साम्राज्यवादी शोषणातून प्राप्त होणारा नफा हा साम्राज्यवादाच्या उत्कर्षकाळच्या नफ्याहून अधिक आहे असे म्हणणे कसे वस्तुनिष्ठ होऊ शकेल मला कळत नाही. पूर्ण वस्तूच्या पेक्षा तिच्या अवशिष्ट भागाचे मूल्य, महत्त्व अधिक असते असे म्हणण्यासारखे हे आहे. थोडक्यात 'प्रच्छन्न साम्राज्यवादा'चा मुद्दा हा अर्थशून्य युक्तिवाद आहे.

## औद्योगिक व राजकीय संघटना उभारण्यातील यशाचे फलित

गेल्या वीस वर्षांत पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगाराचे जीवनमान निर्विवादपणे उंचावले आहे या घटनेचे दुसरेच काही स्पष्टीकरण शोधण्याची आवश्यकता आहे. काय याचे स्पष्टीकरण असावे? मार्क्सच्या हयातीत जे भाकित योग्य व समंजस वाटले ते भाकित खोटे का ठरावे? पाश्चिमात्य समाजातील बहुसंख्य कामगारवर्ग लोकशाही संस्था आपल्या हितासाठी प्रभावीपणे राबवीत आहे या घटनेत त्याचे स्पष्टीकरण सापडते. हे लोकशाहीचे फलित आहे. पाश्चिमात्य देशातील भांडवलदारांचे हृदयपरिवर्तन झालेले नाही. आजहि ते अधिकाधिक नफा मिळविण्याच्या वृत्तीने आपले उद्योगधंदे चालवितात. कामगारांच्या कामाचे तास कमी करणे, वा कामगारांना अधिक वेतन देणे त्यांना आजहि आवडत नाही. या सवलती देण्यास कामगारांनीच त्यांना सामान्यतः भाग पाडले आहे. औद्योगिक व राजकीय संघटना उभारण्यात कामगारांना लोकशाही राष्ट्रात जे यश आले त्या यशाचे हे फलित आहे.

आपल्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे कामगाराना नेमके कशामुळे शक्य झाले, आणि या बाबतीत, आपल्या इच्छेप्रमाणे सरकार निवडून देण्याचा हक्क हा अधिक महत्त्वाचा की, स्वायत्त कामगार संघटना उभारण्याचा हक्क महत्त्वाचा, या सर्वच मुद्दयाची चर्चा मी पुढे करणार आहे. साधारणतः वेतनवाढ व इतर सवलती या कामगारांनी मजूर संघटनेच्या साधनाचा वापर करूनच मिळविल्या आहेत. उदरभरणास जेमतेम पुरेल, ज्या निकृष्ट किमान पातळीच्यावर कधी कामगारांचे वेतन जाणारच नाही असे

मार्क्सने म्हटले त्यात भर घालण्याचे कामी मजूर संघटना आणि संघटनेचे दडपण आणून केलेल्या वाटाघाटी यांचाच उपयोग मुख्यत्वेकरून झाला आहे. पण, असे असले तरी, मतदानाचा हक्क आपण गौण लेखता कामा नये. कारण हा हक्क बजावून, मजूर संघटनांना अधिकृत मान्यता देऊन, त्यांना काम करण्यास मोकळीक देणारे सरकार निवडून देण्याचे स्वातंत्र्य नसलेल्या समाजात मजूर संघटना कायमच्या दुर्बल व असहाय राहिल्या असत्या. अशा मजूर संघटनांचा मालकांशी सौदा करण्यासाठी उपयोग होऊ शकला नसता.

## अप्रत्यक्ष वेतनाची भर बरीच मोठी

कामगारांचे जीवनमान उंचावण्याचे कामी करांनी महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे. कामगारवर्गाने सातत्याने आणलेल्या दडपणामुळे करांच्या साहाय्याने राष्ट्रीय उत्पन्नाचे समान फेरवाटप करण्याचे धोरण आस्ते आस्ते सर्व पाश्चिमात्य लोकशाही राजवटींना स्वीकारावे लागले आहे. ब्रिटिश आकडेवारी पहा. शंभर वर्षांपूर्वी, मार्क्सच्या हयातीत बरीच वर्षे आयकर या नांवाची काही चीजच नव्हती. त्याच्या वृद्धापकाळी पौंडामागे सहा पेन्स असा आयकर बसविलेला होता. आज पौंडामागे साडेसात शिलिंग असा आयकराचा दर असून वार्षिक ५००० पौंडाहून अधिक उत्पन्न असणाऱ्यां-करता कराचा दर याहून अधिक व वाढता आहे. मार्क्सच्या हयातीत धनी माणूस आपली सर्व जायदाद आपल्यामागे मुलाला ठेवून जाऊ शकत असे. आज क्रोडोपति माणसाला आपल्या संपत्तिपैकी ऐंशी टक्के संपत्ति मरणा-नंतर सरकारच्या हवाली करावी लागते. (या करापैकी काही भाग चुकवि-ण्याचे बरेच मार्ग आहेत.) कंपन्याना होणाऱ्या नफ्यावर मार्क्सच्या काळी कर नव्हता. आज ब्रिटनमधील सर्व कंपन्यांना आपल्या नफ्याचा जवळपास पन्नास टक्के भाग सरकारात कराच्या रूपाने भरावा लागतो. या वेगवेगळ्या करांमुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप होण्याच्या दृष्टीने पुष्कळच मदत होते. कारण या करांमुळे सरकारला होणाऱ्या उत्पन्नाचा बराच मोठा भाग वेगवेगळ्या समाज कल्याणाच्या योजना, राष्ट्रीय आरोग्य विमा योजना, निवृत्तिवेतने, व अशा प्रकारच्या अन्य बाबींवर खर्ची पडतात. कामगाराला

मिळणाऱ्या वेतनात या प्रकारच्या अप्रत्यक्ष वेतनाची पडणारी भर ही बरीच मोठी आहे.

भौतिक लाभांवर साम्यवादी स्वतः अतिशय भर देत असल्याकारणाने पाश्चिमात्य देशांतील कामगारांनी संपादित केलेल्या भौतिक लाभांवर मीहि भर दिला. याचा अर्थ भौतिक सुखसमृद्धि म्हणजेच सर्व काही असे नव्हे. पाश्चिमात्य लोकशाहींचा टीकाकार असे म्हणू शकेल की, खाऊनपिऊन मजेत असले तरी पाश्चिमात्य देशातील कामगार हे शेवटी मजुरीवर जगणारे गुलामच राहिले आहेत. भौतिक सुखात वाढ झाल्याने बूझ्र्वा लोकशाहीतील कामगारांना खरे स्वातंत्र्य अधिक उपभोगायला मिळणार नाही या लेनिनच्या टीकेचा तो पुनरुच्चार करील. या टीकेत तथ्य आहे. आजहि अल्पसंख्य असून गैरवाजवी प्रमाणात अधिकार व सत्ता हाती असणारा एक राज्यकर्ता वर्ग पाश्चिमात्य लोकशाही देशात आहे. अमेरिकेपेक्षा इंग्लंडला वरील विधान अधिक लागू पडते. पण थोड्या कमी अधिक प्रमाणात सर्वच पाश्चिमात्य देशांना हे विधान लागू पडावे.

## आर्थिक पाया व राजकीय इमला यांच्या द्वंद्वात्मक गतिमान क्रिया–प्रतिक्रियेतून होणारा विकास

या संदर्भात दोन गोष्टी विचारात घेण्याची आवश्यकता आहे. लोकशाही संस्थांचा वापर वर उल्लेखिलेली वेगवेगळी भौतिक सुखसमृद्धि स्वतःसाठी प्राप्त करून घेण्यासाठी कामगारांनी मुख्यत्वेकरून केला. पण या प्रयत्नात जे जसजसे यशस्वी होत आहेत तसतशी लोकशाही संस्थांचा अन्य गोष्टींसाठी उपयोग करून घेण्याची त्यांची कुवतहि वाढत आहे. भौतिकदृष्ट्या जीवनमान उंचावले की स्वातंत्र्याचा उपभोग ते अधिक प्रमाणात घेऊ शकतात आणि अधिक स्वतंत्र कामगार वर्ग आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग भौतिक सुखसमृद्धीत वाढ करवून घेण्यासाठी करतो असे हे चक्र आहे. भौतिक समृद्धि आणि राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य या दोन्हीत क्रिया-प्रतिक्रिया या पद्धतीने वाढ होत जाते. आर्थिक पाया व राजकीय इमला यांच्यातील द्वंद्वात्मक गतिमान क्रिया-प्रतिक्रियेतून होणारा विकास हा साम्यवाद्यांना वास्तविक अधिक चटकन् मान्य होणारा आहे. धीरे धीरे, अडखळत, मागे-

पुढे होत पण निश्चितपणे पाश्चिमात्य देशातील कामगार हे अधिक स्वतंत्र व अधिक संपन्न होत चालले आहेत ही गोष्ट मी निर्विवादपणे दाखवून देईनच. आपल्या देशाचा कारभार कसा चालविला जावा यासंबंधी कामगार वर्गाच्या मताला अधिक वजन प्राप्त होत आहे या अर्थाने कामगार हा स्वतंत्र होत आहे.

लोकशाहीचा जो अर्थ मी इथे केला आहे त्या अर्थाने लोकशाही ही फार अलिकडील घटना आहे हे सहसा ध्यानात घेतले जात नाही. इंग्लंडमधील लोकशाही 'अनेक शतकांची जुनी' असे सामान्यतः मानले जाते. कायद्याचे राज्य, परिमित प्रमाणात भाषण स्वातंत्र्य, आणि अशीच लोकशाहीची इतर काही वैशिष्ट्ये इंग्लंडमध्ये गेल्या काही शतकांपासून अस्तित्वात आहेत हे खरे. पण प्रौढ मताधिकाराधिष्ठित लोकशाही, जिथे सर्व प्रौढ लोकांना आपल्या देशाचे सरकार निवडण्यात सहभागी होता येते, ही लोकशाही अगदी अलीकडची आहे. माझ्या राजकारणी आयुष्यातच ती अस्तित्वात आली. इतकी ती नवी आहे. स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्रथम १९१८ सालच्या निवडणुकात मिळाला. ही निवडणूक मला चांगली आठवते. आणि स्त्रियांची संख्या तर एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ निम्मी असते. तरुण स्त्रियांना तर मतदानाचा अधिकार १९२९ मध्ये मिळाला, ज्या निवडणुकीत मी प्रथम पार्लमेंटमध्ये निवडून आलो. ब्रिटनमधील मजूर संघटना गेल्या वीस वर्षांतच बलाढ्य व प्रभावी बनल्या आहेत. तेव्हा इंग्लंडमध्येहि माझ्या अर्थाने लोकशाही ही फार नवी चीज आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेचे परिणाम आत्ता कोठे पूर्णपणाने दृग्गोचर होत आहेत. लोकशाहीचे परिणाम शेवटी जाऊन काय होतील हे मी आज सांगू शकत नाही पण ते कल्पनातीत क्रांतिकारी राहतील याविषयी मला खात्री आहे. इंग्लंडमध्ये लोकशाही सुरक्षित राहिली, आणि तिचे संरक्षण करण्याचा बहुसंख्य इंग्लिश जनतेचा निर्धार आहे, तर या शतकाच्या अखेरीपर्यंत ब्रिटिश समाजाचे आमूलाग्र परिवर्तन लोकशाहीने घडवून आणलेले बघावयास मिळेल. सार्वजनिक जीवनाच्या सर्व क्षेत्रात कामगारांचा प्रभाव हा वाढत जाईल. ब्रिटनमधील श्रमजीवी लोकांच्या इच्छेनुरूप येत्या चाळीस वर्षांत ब्रिटिश समाजाची उभारणी झालेली आढळेल.

• • •

# ४ लोकशाहीची कार्यपद्धति

लोकशाहीच्या आर्थिक फलितांचा विचार करीत असताना आपण असे पाहिले की, लोकशाही संस्थांचा उपयोग अतिशय व्यवहारी दृष्टीने पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगारांनी स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी करून घेतला आहे.

या भौतिक लाभांचे महत्त्व मला स्वतःला फार वाटते. सुखवस्तू माणूस हा कर्मदरिद्री माणसापेक्षा सामान्यतः अधिक स्वतंत्र असतो. पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगारवर्गाच्या सुखवस्तूपणाला नाक मुरडण्याची हल्ली फॅशन पडली आहे म्हणून हे मुद्दाम सांगायचे. टेलिव्हिजन, मोटार, कपडे धुलाई यंत्र, इत्यादि नवनवी साधने कामगार वापरू लागले आहेत. पाश्चिमात्य समाजात हा जो सधन समाज अस्तित्वात येत आहे त्या समाजाची संस्कृती भडक, उथळ आणि कवडी किंमतीची आहे असे काही लोक सुचवीत असतात. त्यांना सुचवायचे असते की कामगारवर्गाचे वाढते स्वातंत्र्य म्हणजे नुसता भोगवाद आहे; हे कसले स्वातंत्र्य?

या दृष्टिकोनाशी मी थोडाहि सहमत नाही. टेलिव्हिजन, मोटार, धुलाई यंत्र आणि आधुनिक पाश्चिमात्य घरातून आढळणारी नवनवी यंत्रे आपल्याकडे असावीत असे वाटणाऱ्यांपैकी मी एक आहे. आणि केवळ या वस्तूच म्हणजे काही पाश्चिमात्य समाजाचे संपन्न जीवनमान नव्हे. राह्यला चांगल्यापैकी घर, वाढता फुरसतीचा वेळ, चांगले शिक्षण, या सर्व गोष्टीहि या संपन्न जीवनमानात येतात. या सगळ्या गोष्टी मला हव्या आहेत. तुम्हाला का त्या नकोत

खरी गोष्ट अशी आहे की कामगाराला या सर्व गोष्टींचे अतिशय महत्त्व वाटते. फक्त उपभोगावर भर देण्यात हीण आहे, संकुचितपणा आहे याविषयी आपले एकमत असायला हरकत नाही. लोकशाही म्हणजे टेलिव्हिजन, मोटारी, धुलाई यंत्रे व अशी सर्व यंत्रे असेच जर समीकरण असते तर लोकशाही ही एक फार मर्यादित गोष्ट आहे असे आपण म्हटले असते. या वस्तू नसतात तोवर त्या मिळण्याला महत्त्व असते; एकदा त्या मिळाल्या म्हणजे त्यांचा वापर शहाणपणाने करता येणे या गोष्टीला महत्त्व असते. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने आपल्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंद करण्याकरता भौतिक संपन्नतेचा उपयोग करायला शिकावा लागतो. आपले राहणीमान संपन्न करण्यासाठी लोकशाही संस्थांचा कामगारांकडून होणारा वापर आणि मानवी स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्यासाठी करावयाचा लोकशाही संस्थांचा उपयोग या दोहोंमध्ये एक द्वंद्वात्मक क्रिया-प्रतिक्रियेची प्रक्रिया चालते असे मी म्हणूनच वर सुचविले आहे. भौतिक सुखांच्या वृद्धीपेक्षा स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्यासाठी लोकशाहीचा वापर हा अधिक अर्थपूर्ण व महत्त्वाचा आहे म्हणून तो भौतिक सुखाच्या वृद्धीशी विसंवादी आहे असे नाही.

## पोथीनिष्ठ श्रद्धेमुळे आंधळेपण येते

पाश्चिमात्य राष्ट्रातील कामगारांची भौतिक परिस्थिती खऱ्या अर्थाने सुधारलीच नाही असे अट्टाहासाने मांडणारी काही साम्यवादी मंडळी आजहि आहेत. आठच वर्षांपूर्वी फ्रान्समधील साम्यवादी कामगार संघटना 'सतत वृद्धिंगत होत जाणाऱ्या दारिद्र्या'च्या मार्क्सिस्ट सिद्धान्तावर गंभीरपणे वाद घालीत होत्या. हा सिद्धान्त खरा ठरला आहे की नाही, हा वादाचा मुद्दा नव्हता हे ध्यानात घेण्यासारखे आहे. ते मुळी त्यांनी गृहीतच धरले होते. फ्रेंच कामगारांना कामगार चळवळीत अधिक क्रियाशील कसे बनवावे या मुद्दयावर त्यांचा वाद केंद्रित झालेला होता. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर कामगारांचे दारिद्र्य वाढत जाणे हा **अटळ इतिहासक्रम** आहे असे एकीकडे सांगत असता, पगारवाढीसाठी, कामाचे तास कमी करून घेण्या-

साठी, इतर सोयी सवलतीसाठी झगडण्यास कामगाराना कसे प्रवृत्त करता येईल हा त्यांच्यापुढील यक्षप्रश्न होता. या कूटप्रश्नाला उत्तर शोधण्याचा फ्रेंच साम्यवाद्यांनी हरएकप्रकारे प्रयत्न करून पाहिला. आपल्या कामगार चळवळीमुळे कामगारांचे जीवनमान समृद्ध बनविण्यात आपण यशस्वी होत आहोत ही साधी उघड दिसणारी गोष्ट मान्य करण्यास मात्र ते काही तयार नव्हते ! कारण ही वस्तुस्थिती स्वीकारायची म्हणजे मार्क्स चूक होता यालाच कबूली द्यावी लागणार होती.

पोथीनिष्ठ श्रद्धेमुळे आंधळेपण येते ते असे. राजकीय वा आर्थिक सैद्धान्तिक निष्ठेविरुद्ध मी नाही. उलट मी वर म्हणेन की समाजधारणेविषयी सिद्धान्त मांडण्याची नेहमीच आवश्यकता असते. एरवी सामाजिक-राजकीय कार्याला कोणतीच व्यापक बैठक उरणार नाही. पण त्याचबरोबर हेहि लक्षात ठेवले पाहिजे की, कितीहि हुशारीने मांडलेला सिद्धान्त असो शेवटी सामाजिक जीवनातील दृश्य घटनांवरून काढलेले दूरगामी अभ्युपगम वा निष्कर्ष हेच त्याचे खरे स्वरूप असते. ज्या क्षणी दृश्य सामाजिक जीवन हे त्या निष्कर्षांना सोडून बाजूला जाईल त्याक्षणी तो समाजधारणाविषयक सिद्धान्त टाकला पाहिजे. हे साधे पथ्य जर सर्वांनी पाळले असते तर किती संकटे टळली असती ! प्रत्येकजण आपापल्या सिद्धान्ताला घट्ट कवटाळून बसत असतो. या बाबतीत साम्यवाद्यांनी इतर सर्वांवर कढी केलेली आहे. सैद्धान्तिक निष्ठेने त्यांना आलेले 'आंधळेपण' इतक्या थराला गेले आहे की काही वेळा वास्तव जग ते बघतच नाहीत, बघू इच्छित नाहीत. या त्यांच्या आंधळेपणाची शिक्षा, त्यांनाच नाही तर, आपणा सर्वांनाही भोगावी लागत आहे. उपलब्ध सर्व पुरावा विरुद्ध जात असताहि पाश्चिमात्य राष्ट्रांतील कामगारांचे जीवन दिवसेंदिवस अधिकाधिक दरिद्री होत जाणार या सिद्धान्ताला साम्यवादी घट्ट कवटाळून बसतात त्याचे जगाला भोगावे लागत असलेले दुष्परिणाम हे या घटनेचे सर्वात ठळक उदाहरण आहे.

आपली परिस्थिति सुधारण्यासाठी लोकशाही संस्था कामगारांनी **कशा** राबविल्या, आणि भौतिक सुस्थितीचा उपयोग पुन्हा लोकशाही संस्था सदृढ करण्यासाठी कसा होतो या गोष्टीची चर्चा आता मी करणार आहे. ठराविक मुदतीनंतर उमेदवाराला नाकारून त्या उमेदवाराला निवडून देण्याचा

अधिकार आणि भौतिक परिस्थितीतील सुधारणा यांच्यामध्ये अन्योन्यसंबंध असल्याचे प्रथमदर्शनी तरी काही दिसत नाही. पण असा संबंध असल्याचे दीर्घ अनुभवाने सिद्ध झाले आहे.

लोकांचे राहणीमान लोकशाही व्यवस्थेखाली कसे उंचावले, व आजहि कसे उंचावत आहे, ते समजून घेण्यासाठी पाश्चिमात्य देशातील लोकशाहीचा उगम आणि कार्यपद्धति यांच्या मुळाशी गेले पाहिजे. लेनिनचा पाश्चिमात्य लोकशाहीवर अजिबात विश्वास नव्हता. पण लोकशाहीची मूळ घटना त्याने अतिशय अचूकपणे वर्णिली आहे. ' बूर्झ्वा लोकशाही 'मध्ये दर चार पाच वर्षांनी राज्यकर्त्या वर्गातून कोण राज्य करणार ते कामगार ठरवितात असे ' स्टेट अँड रेव्होल्यूशन 'मध्ये लेनिनने लिहिले आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील ब्रिटिश निवडणुकांचे हे मार्मिक वर्णन आहे. राज्यकर्त्या वर्गातील साधारणतः जमीनदारांचे प्रतिनिधित्व करणारा कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष किंवा साधारणपणे कारखानदारांचे प्रतिनिधित्व करणारा लिबरल पक्ष यापैकी कोणी राज्य करावे हे ठरविण्याचा निर्णय फक्त त्या काळी व्यवहारात कामगारांच्या हाती होता. बूर्झ्वा लोकशाहीतील हा दोष दाखवून दिल्याने बूर्झ्वा लोकशाही ही एक आत्मवंचना आणि ढोंग आहे हे आपण सिद्ध केले असे मार्क्स व लेनिन यांना वाटले. कॉन्झर्व्हेटिव्ह किंवा लिबरल यांच्यातूनच कोणा एकाची निवड करावयाची असली तर त्या निवडीच्या स्वातंत्र्याला काय अर्थ, अशा अर्थाची त्यांची टीका होती. कोणी का निवडून येईना, कामगारांचे शोषण हे तेवढ्याच तीव्रतेने चालू राहणार असे त्यांचे म्हणणे.

प्रथमदर्शनी वस्तुनिष्ठ वाटणारा हा अंदाज अनुभवाने खोटा ठरला आहे. मार्क्स आणि लेनिन दोघांनाहि लोकशाही संस्था कशा काम करतात यात रस नसल्याने त्यांच्या लक्षात आले नाही की, एकदा मतदानाचा हक्क मिळाला की अपरिहार्यपणे दोन्ही राज्यकर्त्या पक्षांना कामगारांच्या हितसंबंधाची पूर्ति करण्याकडे लक्ष देण्यावाचून गत्यंतर नाही. राज्यकर्त्यावर्गापैकी कोणता गट राज्य करणार हे कामगार वर्गाच्या मतदानावर अवलंबून राहिले, कामगार वर्गाला हे निर्णायक स्थान प्राप्त झाले की, कामगारवर्गाची मते आपल्या बाजूला पडावीत यासाठी दोन्ही गटात चुरस सुरू होणे अटळ

बनेल; आणि या चुरशीच्या पोटी कामगारांच्या मागण्या वाढत्या प्रमाणात पुरविल्या जाणार; ही शक्यता मार्क्स-लेनिनच्या नजरेतून सुटली. इंग्लंडमध्ये तरी घटना निदान या क्रमाने घडल्या आहेत.

## इंग्लंडमधील कामगार संघटनांच्या गेल्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आढावा

१८६७ च्या रिफॉर्म ॲक्टान्वये कामगार वर्गांतील बहुसंख्यांना मतदानाचा अधिकार मिळाला. याच काळात संघटना स्वातंत्र्यासाठी कामगार वर्ग निकराची झुंज देत होता. १८२४ पासून कामगार संघटना उभारणे ही गोष्ट कायद्याने मान्य झालेली होती. १८६० च्या सुमारास मालकवर्गाला जाच व्हावा इतके कामगार संघटनांचे सामर्थ्य वाढले. ही वस्तुस्थिति लक्षात येताच त्यांवेळी अधिकारारूढ असलेल्या लिबरल सरकारने कामगार संघटना बेकायदेशीर न ठरताहि प्रत्यक्षात निरुपद्रवी बनतील अशा अर्थाचे कायदे, कारभारविषयक फेरबदल करण्यास सुरुवात केली. संघटनात्मक दडपणाने मालकांशी सौदा करण्यात नुकताच कोठे कामगार वर्ग प्रभावी होतो न होतो एवढ्यात कामगारांचा हा हक्कच हिरावून घेतला जातो की काय अशी परिस्थिति निर्माण झाली.

पण या सर्व हालचाली चालू असताना १८७४ ची सार्वत्रिक निवडणूक आली. आपणास प्रथमच प्राप्त झालेल्या मतदानाच्या हक्काचा आपल्या संघटनात्मक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी वापर करण्याचा एक अत्यंत निकराचा संघटित प्रयत्न कामगारांनी केला. त्यात त्यांना यशहि आले. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाला आपल्या हाती सत्ता यावी अशी इच्छा होती. लोकांनी आपल्याला निवडून दिल्यास कामगार संघटनांचे सर्व हक्क त्यांना परत मिळवून देण्याचे आश्वासन कॉन्झर्व्हेटिव्ह उमेदवारांनी दिले. निवडणुकात कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा जय झाला आणि त्यांनी दिलेले आश्वासनहि पाळले. १८७५ च्या 'क्रॉस ॲक्ट्स' द्वारा कामगार संघटनांच्या हक्कांना कायदेशीर स्थान परत प्राप्त झाले.

इथे हा झगडा कायमचा मिटला असे नाही. १९०१ मध्ये मालकांच्या पक्षाच्या कायदेपंडितांनी कामगार संघटनांच्या सामर्थ्याला खीळ घालण्याची

एक नवी तोड शोधून काढली. संपाने मालकांचे झालेले सर्व नुकसान भरून देण्यास कामगार संघटना कायद्याने बांधून टाकण्याची ही शक्कल होती. 'टॅफ व्हेल डिसीजन' या नावाने हे वळण प्रसिद्ध आहे. यामुळे संघटितरीत्या संप करणे कामगार संघटनांना परवडेनासे झाले. पुन्हा एकदा आपल्या मतांचा वापर करून कामगारांनी हा निर्णय फिरवून घेतला. या वेळी त्यांनी कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाविरुद्ध लिबरल पक्षाला पाठिंबा दिला; आणि या वेळी त्यांनी आपला स्वतःचा मजूर पक्षही स्थापन केला. १९०६ च्या ट्रेड युनियन ॲक्टने 'टॅफ व्हेल डिसीजन' अशा रीतीने कामगारांनी उलटवून घेतला. इथेही हा झगडा कायमचा संपुष्टात आला नाही. १९०९ साली 'ऑसबोर्न निवाड्या'ने न्यायालयांनी कामगार संघटनांचे राजकीय कार्य बेकायदेशीर ठरविले. हा निवाडाही रद्द करून घेण्यासाठी कामगार संघटनांना कामगारांच्या मतांचे दडपण वापरावे लागले; १९१३ साली हा निवाडा रद्द करवून घेण्यात त्यांना यश आले. माझ्या स्वतःच्या डोळ्यांदेखत १९२६ सालच्या सार्वत्रिक संपानंतर त्या वेळच्या टोरी सरकारने कामगार संघटनांच्या राजकीय चळवळींवर बंधने घालणारा कायदा पास केला. १९४५ साली प्रचंड बहुमताने मजूर पक्षाचे सरकार अधिकारावर आले तेव्हा ही बंधने काढून टाकण्यात आली.

इंग्लंडमधील कामगार संघटनांच्या गेल्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा हा धावता आढावा घेण्यातले महत्त्व असे की, आपले हितसंबंध प्राप्त करून घेण्यासाठी कामगारांनी लोकशाही व्यवस्थेतील मतदानाच्या हक्काचा वापर कसा केला ते इथे स्पष्ट दिसते. कामगारांचे उंचावलेले राहणीमान व त्यांना आज प्राप्त असलेले इतर हक्क व सोयी यांचा लोकशाहीशी असलेला संबंध वरील आढाव्यावरून स्पष्ट होतो. इतर पाश्चिमात्य देशात हा झगडा वेगवेगळ्या कालखंडात लढविला गेला; त्या लढ्यांचे तपशीलही प्रत्येक राष्ट्राच्या बाबतीत स्वतंत्र आहेत. पण लढ्यातील मुख्य सूत्र आणि परिणाम समान आहेत. आपल्याला मिळालेल्या मतदानाच्या हक्कांचा वापर करून, प्रदीर्घ व निकराचा लढा देऊन कामगारांनी मजुरीचे दर, कामाचे तास व सोयी-सवलती या बाबतीत मालकांशी सामूहिक सौदा करण्याचा व त्यासाठी संघटना उभारण्याचा हक्क पदरात पाडून घेतला.

एका बाबतीत या सर्व देशातील चळवळींचा सारखेपणा राहिलेला आहे. राज्यकर्त्या वर्गापैकी कामगार संघटना व कामगार चळवळी यांना कायदेशीर स्थान देण्याचे आश्वासन देणाऱ्या गटाला निवडून येण्यासाठी कामगारांनी सुरवातीच्या काळात आपल्या मतांचा वापर केला. असे होता होता युरोपीय देशातून अशी एक वेळ आली की, या पद्धतीची मर्यादा असमाधानकारक वाटून कामगारांनी आपल्या हितसंबंधांची जपणूक करणारे स्वतःचे स्वतंत्र पक्ष स्थापन केले व त्यांना आर्थिक पाठबळ दिले. अमेरिकेचाच काय तो याला अपवाद आहे. तिथे १९३२ पर्यंत कामगार संघटनांनी त्या त्या वेळी ज्या पक्षाची आपणास अधिक अनुकूलता आहे ते पाहून डेमोक्रॅटिक किंवा रिपब्लिक पक्षांना पाठिंबा दिला. पण १९३२ नंतरच्या रूझवेल्ट यांच्या 'न्यू डील' कारकीर्दीनंतर अमेरिकन कामगार चळवळ ही राजकीयदृष्ट्या डेमॉक्रॅटिक पक्षाशी, आणि मला वाटते कायमचीच संलग्न झालेली आहे. कालांतराने इंग्लंडमधील मजूर पक्ष किंवा युरोपीय राष्ट्रातील सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाप्रमाणे अमेरिकेतील डेमॉक्रॅटिक पक्षही, त्याचा पूर्वेतिहास भिन्न असूनहि, प्राधान्येकरून कामगारांचा पक्ष बनेल असे मला वाटते.

आपल्या मतांचा वापर करून कामगारांनी फक्त कामगार-संघटना-स्वातंत्र्य मिळविले असे समजणे चूक होईल (या स्वातंत्र्याचे महत्त्व इतर गोष्टींहून कितीतरी पटीने महत्त्वाचे आहे हे वेगळे). ज्या भौतिक व बिगर-भौतिक स्वातंत्र्याचा ऊहापोह मी केला त्यांची प्राप्तीही अंतिमतः आपणास हवे ते सरकार निवडून देण्याच्या वा पदच्युत करण्याच्या अधिकाराशी निगडित आहे.

अमेरिकन सामाजिक जीवनातले एक दुसरेच उदाहरण घेऊ. अमेरिकन लोकसंख्येपैकी दहा टक्के लोक निग्रो आहेत. या निग्रोंना समाजात समान दर्जा मिळवून देण्याची समस्या गंभीर आहे. अमेरिकेतील वर्णविद्वेषी दक्षिणी राज्यातून निग्रोंना मिळणारी अन्याय्य, सापत्न भावाची वागणूक पुढे करून साम्यवादी म्हणतात की, 'पहा, बूर्झ्वा लोकशाही हे ढोंग आहे की नाही?' वांशिक समानतेसाठी अमेरिकेत चाललेल्या संघर्षावरून नेमका उलटा निष्कर्ष निघतो. बऱ्याच मोठ्या पण अल्पसंख्य गटाला सापत्नभावाने, दुय्यम दर्जा देऊन वागवावयाचे असेल तर, **त्यांना मतदानाचा हक्क नाकारूनच**

असा अन्याय कायम राखता येतो या विधानाला हे बरोबर उदाहरण आहे. दक्षिणी राज्यांपैकी सर्वात अधिक वर्णविद्वेषी चार-पाच राज्यांमध्ये निग्रोंवर वरवंटा फिरविण्याचे धोरण चालविण्याकरिता मुळी ही युक्ती केली जाते. घटनेच्या पुस्तकात निग्रोंना मतदानाचा हक्क दिलेला आहे; पण मतदारांच्या यादीत मात्र निग्रोंची नावे येणार नाहीत हे हरप्रकारे युक्त्याप्रयुक्त्यांनी पाहिले जाते. यासाठी निग्रोंना दमदाटी केली जाते, मतदारांवर जबर 'मतदान कर' बसविला जातो, मतदारांच्या यादीत नाव नोंदविणाऱ्या निग्रोंना बेकार केले जाते, नाना तऱ्हांनी घटनेत दिलेला हा हक्क हिरावून घेतला जातो. हा हक्क गमावून बसलेल्या निग्रोंना न्यायासनासमोर समान दर्जा व वागणूक, शिक्षणाची संधी, संघटना स्वातंत्र्य, अशा इतर स्वातंत्र्यापासून वंचित ठेवण्यात ही राज्ये यशस्वी झालेली आहेत.

हेच जर या राज्यातील निग्रो प्रत्यक्षात मतदानाचा हक्क बजावीत असते तर गोऱ्या लोकांना निग्रोंवर दडपशाहीचा वरवंटा फिरविताच आला नसता. अगदी मुंगीच्या गतीने का होईना पण निश्चितपणे या वर्णविद्वेषी दाक्षिणी राज्यातही वाढत्या प्रमाणावर निग्रो मतदारांच्या यादीत आपले नाव नोंदवून घेत आहेत. यावरूनही ही गोष्ट सिद्ध होते. मध्यवर्ती सरकार निग्रोंबाबतचे आपले कर्तव्य पार पाडण्यास बद्धपरिकर आहे असे पाहिल्यावर एकामागून दुसऱ्या राज्यात निग्रो समाज मतदानाचा आपला हक्क बजावू लागला आहे. आणि त्यांचा पाठिंबा निवडणुकात निर्णायक महत्त्वाचा आहे असे स्पष्ट झाल्यावर वर्णभेदाचे अगदी निर्लज्ज आणि उद्वेगजनक प्रकार संपुष्टात यायला सुरवात झाली आहे.

अमेरिकन निग्रोंनी चिवटपणे व निर्भयपणे दिलेल्या तेजस्वी लढ्यांनीच त्यांच्या स्वातंत्र्याची वृद्धि होत चालली आहे; सुखासुखी काही त्यांचे हक्क त्यांच्या पदरात पडलेले नाहीत. मुद्द्याची गोष्ट अशी की, त्यांना यश येत आहे. आपल्या मतांचा वापर करून आपल्याला दुय्यम दर्जाची वागणूक देणाऱ्या सरकारला पदच्युत करून आपणास समान दर्जा देणाऱ्या सरकारला निवडून देण्याइतकी निग्रोंची ताकद अमेरिकेत वाढली आहे. याला काय तो दक्षिणेकडील चार की पाच राज्यांचा अपवाद असेल. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्यासारख्या समंजस पण अतिशय खंबीर नेत्यांना, काही वर्षांच्या अवधीतच

आपण वर्णविद्वेषी गटांचे हे उरलेसुरले बालेकिल्लेही जिंकून घेऊ असा आत्मविश्वास आहे. निग्रोंना घटनेने दिलेला मतदानाचा हक्क प्रत्यक्षात हस्तगत करण्यावर त्यांनी आपली मोहीम केंद्रित करावी या गोष्टीला माझ्या लेखी फार अर्थ आहे.

'बूर्झ्वा लोकशाही'ची मार्क्स-लेनिनने केलेली हेटाळणी फार भुसभुशीत ठरली आहे या निष्कर्षावर आपण येतो. 'ठराविक मुदतीनंतर राज्यकर्त्या वर्गातून कोणातरी एका गटाची निवड करण्याचा हक्क' प्रत्यक्षात कुचकामाचा तर ठरला नाहीच; उलट, दिवसेंदिवस अधिकाधिक राजकीय सत्ता प्राप्त करून घेण्याचे हा हक्क हे महाद्वार ठरले आहे. आपला स्वतःचा स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याच्याहि आधी, राज्यकर्त्या वर्गातील दोन गटात आपल्या मतांसाठी चुरस लावून त्यांनी कामगार संघटना स्वातंत्र्य, संपाचा कायदेशीर हक्क, या सारखे मौलिक व मूलभूत हक्क पदरात पाडून घेतले. आपला स्वतःचा स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याइतकी त्यांची शक्ति वाढली व त्यांची दृष्टि प्रगल्भ झाली म्हणजे मग त्यांच्या राष्ट्रातील राज्यसत्तेवर त्यांचा प्रभाव वाढीस लागतो; आणि, कालांतराने, काही प्रमाणात राज्यसत्तेचे नियंत्रणहि काही अंशी कामगारवर्गाच्या हाती येते.

मजूर पक्ष किंवा सोशल डेमोक्रॅटिक पक्ष कामगार वर्गाच्या पाठिंब्यावर हमखास बहुमत मिळवून आपले सरकार प्रस्थापित करू शकतात आणि म्हणून कामगारांचे राज्यसत्तेवरील नियंत्रण व प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे असे नव्हे. मधूनमधून कामगार वर्गाने आपल्या पक्षाचे सरकार स्थापन करण्यात यश मिळविले आहे. १९४५ साली इंग्लंडमध्ये असे यश कामगार वर्गाने संपादन केले. पण कामगार आणि कामगार संघटना यांच्या पाठिंब्यावर उभारलेल्या पक्षाकडे प्रदीर्घ काल सत्ता राहिलेल्या स्वीडन या एका राष्ट्राचेच उदाहरण आहे. पण आपल्या पक्षाचे सरकार स्थापन करण्यास कामगार वर्गाला दरवेळी यश आलेले नाही या घटनेवरून स्वतःचा स्वतंत्र पक्ष उभारणे व्यर्थ ठरले असा निष्कर्ष कोणी काढला तर ती फार मोठी चूक होईल. उलट, आपला एक स्वतंत्र पक्ष स्थापन करण्यात कामगारांनी राजकीयदृष्ट्या आपण प्रौढ व प्रगल्भ झाल्याचे दाखवून दिले आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेचा अधिक प्रभावी उपयोग ते यापुढील काळात करणार

असल्याची त्यात खूण सापडते. कामगारांनी आपला स्वतःचा पक्ष स्थापन केला म्हणजे निवडणुकात आपल्या मतांच्या संघटित सामर्थ्याचा उपयोग करण्याचे प्रयोजन संपले असेहि नाही.

माझ्या स्वतःच्या राजकारणी आयुष्यात मी इंग्लंडमध्ये वरील म्हणण्याचा प्रत्यय घेतो आहे. इंग्लंडमध्ये आजवर तीन मजूर मंत्रिमंडळे होऊन गेली. पहिले १९२४ साली, दुसरे १९२९ साली व तिसरे १९४५ साली अधिकारारूढ झाले. कामगारांचे जीवनमान सुधारण्याच्या दिशेने या मजूर मंत्रिमंडळांच्या कारकीर्दीत खूपच कामगिरी झाली. पण गेल्या चाळीस वर्षांच्या राजकारणाच्या अनुभवानंतर मला असे वाटते की, मजूर पक्ष अस्तित्वात असल्यामुळे आणि मजूर पक्षाचे संघटित दडपण असल्यामुळे, राज्यकर्त्या वर्गाच्या प्रतिस्पर्धी पक्षांच्या सरकारांच्या हातूनच कामगारांच्यासाठी अधिक गोष्टी झाल्या आहेत. ब्रिटनमधील कामगारांनी मजूर पक्षाच्या बाजूने शंभर टक्के मतदान करू नये म्हणून ब्रिटिश कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाला आपल्या राजकीय ध्येयधोरणात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणावे लागले आहे! ब्रिटनमधील कामगार वर्गापैकी सामान्यतः एक-तृतीयांश कामगार कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाला मतदान करतात. या घटनेमुळे कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष मजूर पक्षापेक्षा अधिक वेळा निवडून आलेला आहे. आपल्या कार्यक्रमात व धोरणात दूरगामी बदल करण्याची जबर किंमत त्यासाठी कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाला चुकवावी लागली आहे. उदाहरणार्थ, पूर्वीच्या काळी राज्यकर्त्या वर्गाकडून कामगार संघटनांच्या मार्गात अडथळे निर्माण केले जात, त्यांच्यावर बंधने घातली जात; कामगार संघटनांचा हा छळ थेट १९४५ पर्यंत चालू होता. आज कामगार संघटनांच्या कार्यावर बंधने घालण्याचा विचारदेखील कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षात होत नाही. राज्यव्यवस्थेतील एक अधिकृत सत्ताकेंद्र म्हणून युद्धोत्तर कॉन्झर्व्हेटिव्ह सरकारे आज कामगार संघटनांना मान्यता देतात आणि त्यांच्याशी व्यवहार करतात. कामगार संघटनांना बरोबरीने वागवावे लागते हे त्यांना मनापासून आवडत नाही आणि कामगार संघटना 'शिरजोर' बनल्याची तक्रार त्यांच्याकडून मधून मधून केली जाते. पण 'टॅफ व्हेल डिसीजन', 'ऑसबोर्न निवाडा' किंवा १९२७ चा ट्रेड युनियन ॲक्ट, यासारख्या धोरणांनी कामगार संघटनांना

दडपून टाकण्याचा प्रयत्न केल्यास सार्वत्रिक निवडणुका जिंकण्याची आशा त्यांना कायमचीच सोडावी लागेल याची त्यांना चांगली जाणीव आहे.

कामगार वर्गाला मिळालेल्या मताचा कामगारांनी वाढत्या प्रभावीपणे उपयोग करायला लागल्याने, राजकीय पक्षांचे कार्यक्रम बदलले वा एखादा नवा पक्ष अस्तित्वात आला एवढेच घडले नाही, तर ब्रिटिश राजकीय जीवनाचा पटच सारा बदलून गेला.

या सगळ्याचा शेवट कोठे होणार आहे याची कल्पना तुमच्याइतकीच मला आहे. सगळेच राजकीय पक्ष कामगारांच्या मतःसामर्थ्याच्या दडपणाखाली आपले रंगरूप अपरिहार्यपणे बदलत जातील असे खात्रीपूर्वक म्हणता येते. फार मोठी आपत्ति राष्ट्रावर एकाएकी कोसळणार नाही हे मी अर्थात् इथे गृहीत धरलेले आहे. राजकीय पक्षांचे रंगरूप इतके बदलेल की सत्ता आपसुकच कामगारांच्या हाती येणार. साम्यवादी राजकीय तत्त्वज्ञानानुसार अर्थात् यापैकी कोणताच परिणाम संभवत नाही. तेव्हा प्रत्यक्ष परिस्थितीचे माझे चित्रण जर बरोबर असेल तर साम्यवादात कोठेतरी गंभीर दोष असला पाहिजे. साम्यवादी राजकीय तत्त्वज्ञान, आणि विशेषतः राज्यसंस्थाविषयक लेनिनचा सिद्धान्त, यांची आपण चिकित्सा करू या.

• • •

# ५ समाजरचनेविषयी साम्यवादी भूमिका

राज्यसंस्थाविषयक लेनिनच्या सिद्धान्ताचा मी अधून मधून उल्लेख केला आहे. हा सिद्धान्त काय आहे ते पाहू. १९१७ मध्ये झालेल्या रशियन राज्यक्रांतीच्या अगोदर काही आठवडेच लेनिनने आपले 'स्टेट अँड रेव्होल्यूशन' हे सुप्रसिद्ध पुस्तक लिहिले. या पुस्तकात लेनिनने आपल्या नेहमीच अजोड स्पष्ट शैलीत आपल्या सिद्धान्ताची मांडणी केली आहे. तुम्हांला आठवत असेल की लेनिनचे हे हस्तलिखित अपूर्ण आहे. रशियात १९०५ साली व मार्च १९१७ साली झालेल्या क्रांत्यांची चिकित्सा आपण करणार आहोत असे लेनिनने आपल्या पुस्तकात म्हटले आहे. पण आपली इच्छा पूर्ण करण्याअगोदरच रशियात ऑक्टोबर १९१७ मध्ये झालेल्या क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी त्याला आपले लेखन अर्धवट सोडावे लागले. 'अशा व्यत्ययाचे नेहमी स्वागतच असेल' असे लेनिनने म्हटले आहे. लेनिन पुढे म्हणतो, 'क्रांतीबद्दल लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष क्रांतीत भाग घेणे नेहमीच अधिक लाभदायी आणि उत्साहवर्धक आहे.' पण 'स्टेट अँड रेव्होल्यूशन'चे हस्तलिखित जेवढे पुरे झाले आहे त्यात राजकीय अधिसत्तेविषयी लेनिनची प्रमाणमते समाविष्ट झालेली आहेत.

समाजाची धारणा वर्गाधिष्ठित असते हे, मार्क्सप्रमाणेच लेनिनच्याहि मते, समाज व्यवस्थेविषयीचे एकमेव सत्य होय. एकमेव म्हणजे अगदी शब्दशः एकमेव या अर्थाने घ्यायचा. मार्क्सिस्ट माणसापेक्षाहि याविषयी लेनिनवाद्यांचे

मत पक्के की वर्गविग्रहापेक्षा अधिक महत्त्वाची दुसरी गोष्ट मानवी जीवनात नाही. वेगवेगळ्या वर्गांतील सत्तास्पर्धा हेच राजकारण; आणि या वर्गांतील स्पर्धा राजकीय अधिसत्तेसाठीच चाललेली असते. सत्तेपासून वंचित राहिलेल्या वर्गांना सत्ताधारी वर्ग दंडुक्याच्या जोरावर आपल्या ताबेदारीत ज्या दंड-सत्तेच्या यंत्रणेचा वापर करून ठेवतो ती म्हणजेच राज्यसंस्था होय. मार्क्स-एंगल्स यांच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या पुस्तकातील या विषयाच्या विवेचनावरूनच ही कल्पना उचललेली आहे. 'राज्यकार्त्यावर्गाची कार्य-कारिणी' अशा शब्दात राज्यसंस्थेची व्याख्या मार्क्स–एंगल्सनी केलेली आहे.

## वेगवेगळ्या सामाजिक वर्गांतील सत्तास्पर्धा हाच राजकारणाचा गाभा

हीच लेनिनवादी गृहीतकृत्ये स्वीकारून आपण चर्चा करू या. प्रत्यक्ष वस्तुस्थिति अवास्तव सोपी करून सांगण्याचा दोष राजकीय अधिसत्तेविषयी लेनिनच्या सिद्धान्तात निर्माण होतो असे मला वाटते. तथापि, या सिद्धान्तात बरेच तथ्य आहे. वेगवेगळ्या सामाजिक वर्गांतील सत्तास्पर्धा हाच राज-कारणाचा गाभा आहे; मग ही स्पर्धा शांततापूर्ण, पार्लमेंटरी आणि लोक-शाही मार्गांनी चालविली जावो किंवा क्रांति आणि हिंसेच्या मार्गाने खेळली जावो; हे मर्म ज्याला उमगले नाही त्याला राजकारणाविषयी फारच कमी समज आहे असे म्हणावे लागेल.

पाश्चिमात्य देशात राज्यसंस्था ही 'राज्यकर्त्या वर्गाची कार्यकारिणी' आहे हे घटकाभर चर्चेसाठी मान्य करू. पण उदाहरणार्थ, इंग्लंडसारख्या देशात राज्यकर्ता वर्ग आज कोणाकोणाचा मिळून बनलेला आहे? जमीनदार आणि भांडवलदार हे मार्क्सवादी परिभाषेतील जुने राज्यकर्ते खानदानी वर्ग अद्यापीहि राज्यकर्त्या वर्गात मोडतात हे आजहि खरे आहे. प्राचीनकाली त्यांना जे विशेष हक्क व सवलती होत्या त्या सर्वच्या सर्व आज हे वर्ग उपभोगीत आहेत असे नाही; तरी पण इतर वर्गांच्या मानाने आजहि या वर्गाजवळ खूप अधिक संपत्ति आहे; त्यांना परंपरागत विशेष हक्क व सवलती उपभोगायला मिळतात. इतके आपण मान्य केले तरी, आजची

ब्रिटिश राज्यसंस्था ही राज्यकर्त्या वर्गांची 'कार्यकारिणी' आहे असे म्हणणे अर्थपूर्ण ठरते काय?

सर्व उपलब्ध पुरावा असे दाखवितो की इंग्लंडमधील राज्यसंस्था हे ब्रिटिश समाजातील इतर वर्गांवर जुलूम करण्याचे परंपरागत राज्यकर्त्या वर्गांचे साधन आहे, या वर्गांची ती कार्यकारिणी आहे, असे म्हणता येत नाही. या म्हणण्याने प्रत्येक साम्यवाद्याला आश्चर्याचा धक्का बसणार असला तरी हे विधान खरे आहे. मागच्या प्रकरणात ज्या लोकशाही दडपणाची मी चर्चा केली त्या दडपणामुळे परंपरागत राज्यकर्त्या वर्गांच्या हिताकरिता आज ब्रिटिश राज्यसंस्था जितकी काम करते तितकीच ती कामगार वर्गांच्या हिताकरता काम करते. विद्यमान ब्रिटिश राजकीय जीवनाचा थोडा जरी प्रत्यक्ष परिचय असलेल्याला माझे वरील प्रतिपादन कसे नाकारता येईल हे माझ्या समजशक्तीच्या बाहेरचे आहे. वरील विधानाला पुरावाच हवा असला तर तो यात सापडतो की, राज्यसंस्थेने सार्वजनिक व आर्थिक जीवनात हस्तक्षेप करण्यास कडवा विरोध आज जुन्या, परंपरागत, राज्यकर्त्या वर्गांकडून होत असतो. राज्यसंस्था ही जर राज्यकर्त्या वर्गांची कार्यकारिणी असती तर असा विरोध खचितच झाला नसता.

राज्यसंस्थेच्या कार्याला मर्यादा घालण्यात, ते कार्य बंदिस्त करण्यात, राज्यसंस्थेचा संक्षेप व संकोच करण्यात ब्रिटनमधील प्रतिगामी शक्ति आज आपली सर्व शक्ति केंद्रीत करीत आहेत. राज्यसंस्था त्यांचीच असती तर हा खटाटोप करण्याचे त्यांना काय कारण? ब्रिटिश राज्यसंस्थेवरील त्यांची पकड जर पूर्वीइतकी पक्की असती तर उलट त्यांनी राज्यसंस्था अधिकाधिक बलाढ्य होणे स्वागतार्ह मानले असते; आर्थिक व सामाजिक क्षेत्रात राज्यसंस्थेने जास्तीत जास्त हस्तक्षेप करावा याबद्दल त्यांचा आग्रह असता. कारण राज्यसंस्थेचा हस्तक्षेप आपल्या बाजूनेच होणार याविषयी त्यांची निःशंक खात्री असती. वस्तुस्थिति नेमकी उलटी आहे. राज्यसंस्थेने जबर कर बसवू नये असा त्यांचा प्रयत्न असतो; त्यांना कल्पना आहे की अशा कराच्या बोजापैकी मोठा हिस्सा आपल्या डोक्यावर बसेल. सेवानिवृत्ति वेतन, आरोग्य विमा, यासारख्या समाजकल्याणकारी योजना सरकारने हाती घेण्यास त्यांचा विरोध असतो. कारण त्यांना पुरेपूर ठाऊक आहे की अशा योजनेकरता लागणाऱ्या पैशातला

मोठा हिस्सा आपल्यालाच द्यावा लागणार आहे. उद्योगव्यवसायात सरकारने हस्तक्षेप करू नये असा त्यांचा आग्रह असतो. असा हस्तक्षेप केलाच तर तो कामगारांच्या हिताचा अधिक असणार, मालक वर्गाच्या बाजूने क्वचित वेळीच त्यात पक्षपात केला जाईल, हे त्यांना पक्के ठाऊक आहे. राज्यसंस्थेवरील आपली पकड सावकाशपणे, उत्तरोत्तर अधिक प्रमाणात सुटत चालली आहे, असे परंपरागत ब्रिटिश राज्यकर्त्या वर्गाला वाटत असल्याचाच हा पुरावा नव्हे काय ? आणि त्यांची भावना बरोबरच आहे. राज्यसंस्थेवरील त्यांची मिरासदारी संपुष्टात येत आहे आणि लोकशाहीविरोधी प्रतिक्रांतीखेरीज राज्यसंस्था पुनश्च आपल्या मालकीची करण्याचा दुसरा कोणताही मार्ग त्यांच्यापाशी नाही.

मार्क्स आणि लेनिन यांचा राज्यसंस्थाविषयक सामान्य सिद्धान्त मर्यादित अर्थाने आपण मान्य केला तरी, आणि तसा मी तो करतो हेहि मी पुन्हा इथे सांगतो, आधुनिक पाश्चिमात्य समाजाला तो लावून वस्तुनिष्ठदृष्टया आजच्या राज्यसंस्थेची चिकित्सा करण्याची, आपल्या कर्तव्यात विद्यमान लेनिनवादींनी कसूर केली आहे अशी पुस्ती आपण लगोलग जोडली पाहिजे. काही दशकांच्या कालावधीत ब्रिटन आणि अमेरिका यांसारख्या लोकशाही संस्था रुजलेल्या देशात एका वर्गाच्या हातातील सत्ता दुसऱ्या वर्गाच्या हातात जाऊ शकते ही गोष्ट त्यांच्या नजरेतून सुटली आहे. राज्यसंस्था कामगार वर्गाच्या हाती शंभर टक्के आलेली नाही तोवर ही प्रक्रिया शांततामय मार्गांनी पूर्णत्वाला जाईलच याविषयी कोणीच खात्री देऊ शकत नाही. पण ही प्रक्रिया आजच फार पुढे गेली असून, या देशात लोकशाही राज्यव्यवस्था सुरक्षित राहिली तर, ती अशीच पुढेहि प्रगत होत जाईल अशी आपणास खात्री बाळगायला हरकत नाही.

लेनिनचा राज्यसंस्थाविषयक सिद्धान्त या आपल्या मूळ विषयाकडे वळू या. लेनिनचा सिद्धान्त हा जवळजवळ शुद्ध मार्क्सवाद आहे. पण लेनिनने त्या सिद्धान्तात एक नवीन भर घातली. उत्तर आयुष्यात केलेल्या स्वतः मार्क्सच्याहि लेखनात हे विचार येतात. उदाहरणार्थ १८७० मधील पॅरिस कम्यूनच्या इतिहासाचे 'द सिविल वॉर इन फ्रान्स' नांवाचे पुस्तक मार्क्सने लिहिले त्यात लेनिनने नंतर मांडलेला विचार येऊन जातो. पण लेनिनने जो

त्यावर भर दिला आहे तो मात्र नवीन आहे. आज असलेली राज्यसंस्था ही राज्यकर्त्या बूझ्र्वा वर्गाची कार्यकारिणी आहे. जुन्या राज्यकर्त्या वर्गाने ही राज्यसंस्था निर्माण केलेली असल्याने, आणि हा वर्ग कामगार वर्गाचा शत्रु असल्याने, या राज्यसंस्थेवर कब्जा मिळविणे कामगार वर्गाला शक्य होणार नाही. कामगार वर्गाचे हित साधावे या दृष्टीने मुळी या राज्यसंस्थेची उभारणीच केलेली नाही; ते हितसंबंध साधण्याच्या दृष्टीने त्याची रचना आणि उभारणी दोन्ही अयोग्य आहेत. काही दशकांच्या कालावधीत या राज्यसंस्थांवर कामगार अधिकाधिक नियंत्रण प्रस्थापित करतील या कल्पनेनेंच लेनिनला हसू लोटले असते. लेनिनला पाश्चिमात्य लोकशाही कार्यपद्धती-विषयी नीट पुरेशी समज नव्हती. पण तो इतकेच म्हणून थांबला नाही. त्याच्या मताप्रमाणे, अस्तित्वात असलेली राज्यसंस्था आपल्या कब्जात घेणे हे कामगारांनी आपले ध्येय न ठेवता, प्रचलित भांडवलशाही संस्थांचे 'तुकडे तुकडे' करण्याचे ध्येय कामगार वर्गाने आपल्या डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. प्रचलित राज्यसंस्थेचा चक्काचूर केल्यावर आपल्या गरजांना अनुरूप अशी नवी व सर्वस्वी वेगळी राज्यसंस्था कामगार वर्गाला उभारावी लागेल असे लेनिनचे म्हणणे होते.

या नव्या राज्यसंस्थेचा लेनिनच्या मते हेतू कोणता होता? परंपरागत राजकर्त्या वर्गावर हुकुमत गाजवून त्यांना जरबेत ठेवण्यासाठी, आणि त्यासाठी आवश्यक तर बळाचा वापर करण्यासाठी, ही नवी राज्यसंस्था प्रस्थापित करावयाची असे लेनिनचे म्हणणे. पूर्वीच्या राज्यसंस्थेतील लोकशाही संस्था या शोभेच्या व पोकळ असल्याबद्दल लेनिनची खात्रीच होती; या बुरख्याखाली ही राज्यसंस्था प्रत्यक्षात कामगार वर्गांना साम-दाम-दंड-भेद सर्व मार्गांचा वापर करून दास्यात ठेवण्यासाठी भांडवलदार वापरीत असेच तो म्हणत असे. त्याच्या मते कामगारांच्या राज्यसंस्थेचाहि हेतु नेमका असाच; फरक एवढाच की या वेळी जरबेत ठेवायचे ते भांडवलदार राज्यकर्त्या वर्गांना. नव्या राज्यव्यवस्थेत ते वर्ग जोपर्यंत संपूर्ण नामशेष होत नाहीत तोवर त्यांना पायाखाली दाबून ठेवणे यासाठीच कामगारांची राज्यसंस्था आहे असे लेनिन म्हणत असे. या राज्यसंस्थेला 'मजुरांची हुकूमशाही' असेच मुळी त्याने नाव दिले होते.

लेनिनने कधीच लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला नसता, त्याला आजच्या साम्यवादी राष्ट्रातील अनियंत्रित व हुकूमशाही राजवटींच्या उदयाची कल्पना होती व या राजवटी त्याने उचलून धरल्या असत्या, असे म्हणावयाचे का ? माझ्या वरील म्हणण्याचा हा निष्कर्ष नाही. १९१७ साली तो आणि त्याचे बोल्शेविक सहकारी रशियात जी राज्यसंस्था निर्माण करीत होते ती (त्याच्या व्याख्येनुसार) लोकशाही राज्यसंस्था (भविष्यात) ठरणार नाही, असे कोणी नुसते सुचविले असते तरी लेनिनला अगदी प्रामाणिकपणे धक्का बसला असता. आजवरच्या कोणत्याहि लोकशाही राज्यापेक्षा रशिया हे अधिक सच्चे लोकशाही राष्ट्र होईल असे उलट त्याने आग्रहाने म्हटले असते. आणि असे म्हणत असतानाच, हे नवे राज्य जुन्या राज्यकर्त्या वर्गाच्या उरलेल्या अवशेषाविरुद्ध जुलूमजबरदस्ती करेल हेहि त्याने नाकबूल केले नसते. सच्ची, अधिक व्यापक लोकशाही आणि ही जुलूम-जबरदस्ती यात त्याने विसंगति पाहिली नसती. रशियाच्या एकूण लोकसंख्येच्या ९५ टक्के असलेल्या रशियन शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या दृष्टीने आपण उभारीत असलेले राज्य हे अगदी शुद्ध लोकशाही राज्य असेल असा दावा त्याने केला असता; नव्हे, त्याने तसा दावा केलाहि आहे.

इथेहि त्याने आपण उलथून पाडत असलेल्या भांडवलशाही समाजाचेच उदाहरण घेतले असते. पाश्चिमात्य देशातली भांडवलशाही समाजरचना ही **राज्यकर्त्या वर्गाच्या दृष्टीने** खरीखुरी लोकशाही व्यवस्थाच होती या म्हणण्याशी तो सहमत झाला असता असे मला वाटते. या वर्गापुरतेच बोलावयाचे तर, कोणी राज्य करावे याबाबतीत त्यांना खरोखरीच खुली निवड करता येत होती. पण ही बूर्झ्वा लोकशाही ही वस्तुतः कामगार वर्गावरील हुकूमशाहीच होती हे म्हणणे त्याने पुढे मांडले असते. याच पद्धतीने विचार करीत असता त्याचे म्हणणे असे की, आपण उभारीत असलेले नवे राज्य हे कामगार व शेतकरी वर्गाच्या दृष्टीने लोकशाही राज्य असून, जुन्या राज्यकर्त्या वर्गासाठी मात्र ती पोलादी हुकूमशाही असेल.

पुढे जाऊन लेनिन असेहि म्हणत असे की तो प्रस्थापित करीत असलेल्या राज्यात जनतेला प्रत्यक्ष लोकशाहीचा लाभ घेता येईल की जसा जुन्या जमान्यात राज्यकर्त्या वर्गानाहि आपल्या बूर्झ्वा लोकशाहीखाली घेता येत

नव्हता. जनतेच्या दृष्टीने लोकशाहीची तत्त्वे अगदी शब्दशः नव्या राज्यात मूर्त होतील या दृष्टीने त्याची जी तीन कलमी योजना होती ती पुन्हा उद्धृत करतो. कामगारांच्या हाती राज्यसत्ता आली की, या तीन तत्त्वांची बिलकूल कुचराई न करता अंमलबजावणी केली जाईल असे ' स्टेट अँड रेव्होल्यूशन '-मध्ये लेनिनने आवर्जून सांगितले आहे. लेनिन लिहितो :

> सर्व अधिकाऱ्यांची, कोणाचाहि अपवाद न करता, निवडणुकीने नेमणूक होईल, व त्यांना केव्हाहि परत बोलाविण्याचा जनतेला अधिकार असेल; कामगारांच्या वेतनश्रेणीइतकीच सर्व अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी खाली आणली जाईल. या साध्या आणि स्वयंसिद्ध लोकशाही उपाययोजनांनी, एकीकडे कामगार आणि बहुसंख्य शेतकरी यांच्या हितसंबंधांचा मिलाफ होऊन, त्याच वेळी भांडवलशाही आणि समाजवाद या दोहोंमध्ये एक पूलहि निर्माण होईल.

लेनिनच्या दिव्य दृष्टीला दिसलेले हे चित्र प्रत्यक्षात जवळजवळ त्याच्या नेमके उलटे कसे निघाले ? पंचाण्णव टक्के लोकांसाठी प्रत्यक्ष व आदर्श लोकशाहीचा मूर्त अनुभव आणून देण्याची प्रतिज्ञा करणारे हे राज्य, जगातील आजवरच्या इतिहासात पाहिले नव्हते असे एक अत्यंत लहरी व सर्वंकष हुकूमशाही राज्य कसे झाले ? सोव्हिएट रशिया हे जगातील एक अत्यंत लहरी आणि सर्वंकष हुकूमशाही राज्य आहे, असे म्हणत असताना आजवर होऊन गेलेल्या राज्यांहून ते वाईट आहे असे मला सूचित करावयाचे नाही. उलट, सोव्हिएट रशियन सरकारची कामगिरी व कारकीर्द भरीव झालेली आहे. इतिहासातील इतर लहरी आणि हुकूमशाही राजवटींच्या तुलनेने सोव्हिएट रशियन राजवट ही कितीतरी सर्जनशील राहिलेली आहे. अगदी तात्कालिक-दृष्ट्या पाहता, लोकशाही ही एकच गोष्ट काही समाजजीवनाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची नाही. काही वेळा अनियंत्रित राजवट ही काही बाबतीत चांगली असते ही गोष्ट काही मी नाकारीत नाही. पण बहुसंख्य लोकांच्या इच्छेचा मान ठेवून राज्य चालवायचे असेल तर लोकशाही संस्थांखेरीज हे साधण्याचा दुसरा मार्ग नाही, असे आजवरचा अनुभव सांगतो एवढेच माझे म्हणणे.

सोव्हिएट सरकारवर आपल्या मतांचे प्रभावी दडपण आणण्याचे रशियन जनतेला कोणतेच मार्ग उपलब्ध नाहीत या विशिष्ट अर्थाने सोव्हिएट राजवटीत लोकशाहीचा जवळजवळ पूर्ण अभाव आहे. बाकीच्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत समाजांशी तुलना करता हा फरक फार स्पष्टपणे जाणवतो. आपल्याला हवे ते सरकार निवडण्याचा, नको असलेले सरकार पदच्युत करून त्या जागी दुसरे हवे असलेले सरकार निवडून देण्याचा, अधिकार रशियन लोकांना नाही. ही वस्तुस्थिति कोणीहि कसा नाकारू शकेल हे मला कळत नाही. खुल्या निवडणुकात वेगवेगळ्या उमेदवारातून आपणांस हवे ते उमेदवार मोकळेपणाने निवडण्याची संधि जोवर लोकांना मिळत नाही तोवर त्यांच्या हाती ही सत्ता येऊ शकेल हे संभवत नाही. कामगार वर्गाच्या लोकशाहीमध्ये अत्यावश्यक म्हणून ज्या तीन शर्ती लेनिनने सांगितल्या त्यांपैकी एकहि शर्त सोव्हिएट रशियात पूर्ण झालेली नाही. त्या सर्व शर्ती धाब्यावर बसवून रशियातील राज्य चालले आहे. रशियन अधिकाऱ्यांची निवडणुकीने नेमणूक होत नाही; मतदार त्यांना वाटेल तेव्हा परत बोलावू शकत नाहीत; आणि कुशल, तंत्रज्ञ कामगारांच्या मजुरीच्या कितीतरी पट पगार या अधिकाऱ्यांना मिळतो.

लेनिन आणि त्याचे बोल्शेविक सहकारी यांची या तत्त्वांवर प्रामाणिक व सच्ची निष्ठा होती. असे असताना हा उफराटा प्रकार कसा व का घडला ? पुष्कळ कारणे यासाठी सांगता येतील. पण त्यातले एक कारण पुढीलप्रमाणे आहे. एकदा राज्यक्रांति झाली. आणि भांडवलदार आणि जमीनदार यांच्याकडील उत्पादनाची साधने हिसकावून घेऊन समाजातील वर्ग नष्ट केले, की राजकीय जीवन हे सुतासारखे सरळ होईल असे साम्यवाद्यांनी मानले. ‘ इस्टेट अँड रेव्होल्यूशन ’ या पुस्तकात नेमके हेच प्रतिपादन करणारा एक उतारा आढळतो :

> मोठ्या प्रमाणावरील उत्पादन, कारखानदारी, रेल्वे, पोस्ट-टेलिफोन इ. दळणवळणाच्या सोयी, या गोष्टी भांडवलशाही संस्कृतीने निर्माण केल्या. राज्यसंस्थेचे प्रमुख कार्य या सर्व नव्या गोष्टींमुळे इतके सुकर झाले आहे की, सामान्य लिहितावाचता येणाऱ्या कोणालाहि राज्यकारभार सहजपणे चालविता येईल. कामच इतके सोपे झाल्याने मजूरांना

मिळणाऱ्या वेतनश्रेणीवर राज्यकारभार चालविण्याचे काम करावयास लोक तयार होतील. काम सरळ व सोपे असल्याने, अधिकारी वर्गाभोवती एरवी जे अधिकाराचे वलय निर्माण होते, त्याबरोबर ज्या वेगवेगळया सवलती व हक्कांचे जाळे निर्माण होते, ती सर्व जाळीजळमटी काढून टाकता येतील; नव्हे ती काढूनच टाकली पाहिजेत.

'वेगवेगळ्या कागदपत्रांच्या नोंदी करणे, फॉर्म्स भरणे, त्यांचे रेकॉर्ड ठेवणे' म्हणजेच नव्या राज्यातील राज्यकारभार, असे चित्र रंगविणाऱ्या लेनिनला जर आजच्या सोव्हिएट रशियात अवतरण्याचा प्रसंग आला तर तो स्वतःशी काय म्हणेल ? वस्तुस्थिति जर इतकी शोकात्म नसती तर खचितच लेनिनला आपल्या अडाणीपणाचे हसू लोटले असते, बिल्ल्यांवर बिल्ले लटकावून मिरविणारे रशियन सेनाधिकाऱ्यांचे थवेच्या थवे त्याने पाहिले असते; अलिशान ऐश्वर्याचे प्रदर्शन करणारे उच्चपदस्थ सेनाधिकाऱ्यांचे दर्शन त्याला झाले असते; रशियावर हुकुमत गाजविणाऱ्या कर्तुमकर्तुम् शक्ति असलेल्या, उच्चपदस्थ सनदी नोकरांच्या फौजा सगळ्या जागा काबीज करून बसल्याचे त्याने पाहिले असते; त्यांना मिळणारा लठ्ठ पगार त्याला खुपला असता; अनेक प्रकारच्या गुप्त पोलिसी जाळ्यात लोक जीवे तडफडताना त्याने पाहिले असते. 'कागदपत्राच्या नोंदी ठेवणे, फॉर्म्स भरणे, रेकॉर्ड ठेवणे' या असल्या साध्या गोष्टीत काही ही ऑफिसर मंडळी खासच गुंतलेली नाहीत. रशियावर राज्य करण्यात ही सारी मंडळी गुंतलेली असून त्यांचा एक राज्यकर्ता वर्गच बनलेला मला दिसतो. पाश्चिमात्य देशातील परंपरागत राज्यकर्त्या वर्गाहून या राज्यकर्त्या वर्गाची घडण वेगळी असेल, पण हाहि एक वर्गच बनलेला आहे हे नाकारता येणार नाही असे मला वाटते.

खरे म्हणजे 'प्रशासकीय–लष्करी यंत्र' निर्माण केल्याबद्दल सोव्हिएट राज्यकर्त्यांना दूषण देणाऱ्यांपैकी मी नाही. मानवी समाजाच्या आजच्या अवस्थेत अशा कोणत्या तरी 'प्रशासकीय लष्करी यंत्रा' शिवाय राज्यशकट हाकणे शक्य कोटीतले नाही. क्रांतीने चुटकीसरसे राज्यकारभाराचे काम सुतासारखे सरळ होईल हे संभवनीय नाही. सैन्याचे आधिपत्य, राज्यकारभार, उद्योगधंद्याची व्यवस्था यासारखी गुंतागुंतीची व जबाबदारीची कामे कुशल

तंत्रज्ञ कामगाराएवढाच पगार घेऊन करायला माणसे मिळतील हेही संभवत नाही.

रशियन बोल्शेविकांनी राज्ययंत्र निर्माण केल्याबद्दल मला दुःख होत नाही; हे राज्ययंत्र पाश्चिमात्य देशातील राज्ययंत्रापेक्षा अधिक मोठे, अधिक भव्य, अधिक ऐश्वर्यसंपन्न निर्माण केल्याबद्दल मला दुःख होते. पाश्चिमात्य राष्ट्रातील परंपरागत राज्यकर्त्या वर्गापेक्षाही या साम्यवादी राज्यकर्त्या वर्गाला अधिक विशेष हक्क असावेत, अधिक लठ्ठ पगार असावेत याची मला खंत वाटते.

'राज्यसंस्था अखेरीस विलय पावेल' असे साम्यवाद सांगतो. क्रांतीनंतर राज्यकारभार हा अगदी सोपा आणि लोक त्यात सहभागी होतील इतका प्रत्यक्ष होईल, इतकेच नाही तर कालांतराने या साध्या सीमित शासनाचीही आवश्यकता नव्या समाजात न उरून, राज्यसंस्था विलय पावेल असे मार्क्स व लेनिन यांचे म्हणणे होते हे तुम्हास ठाऊक आहे. त्या अवस्थेत समाजातील कोणत्याच वर्गाला वा गटाला जरबेत ठेवणाऱ्या शासनयंत्रणेची गरज उरणार नाही; आणि म्हणून अशी हुकुमत गाजविणारी शासनयंत्रणाही नाहीशी होईल. उरेल ती उत्पादनाची क्रिया चालू ठेवणारी तंत्रज्ञांची टोळी, राज्यसंस्था विलयास जाईल. रशियातील राज्यसंस्था विलय पावली नाही म्हणून रशियन सरकारची हेटाळणी करणे हे अयोग्य व मूर्खपणाचे आहे. राज्यसंस्था विलय पावण्यास किती काल लागेल, त्याचा आपण अंदाज करू शकत नाही असे लेनिनने स्पष्टपणे लिहून ठेवले आहे. 'द स्टेट ॲंड रेव्होल्यूशन' या ग्रंथात लेनिन लिहितो :

> 'आज ना उद्या पण अपरिहार्यपणे राज्यसंस्था विलय पावेल इतकेच म्हणण्याचा अधिकार आपल्याला आहे; ही प्रक्रिया दीर्घ मुदतीची असणार यांवरही इथे भर दिला पाहिजे ... ही प्रक्रिया पूर्ण होण्यास किती काळ लागेल? हा प्रश्न आपण अनिर्णित सोडू ...'

प्रत्यक्षात सोव्हिएट राज्यसंस्थेच्या बाबतीत विलयाच्या दिशेने कुठे सुरवातही झालेली नाही; उलट जगात तिच्या एवढी गुंतागुंतीची, प्रचंड, अतिव्याप्त राज्ययंत्रणा दुसरी आढळणार नाही. बरे ही राज्यसंस्था कशी आहे? तर, आपल्या राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनावर अगदी बारीक सारीक

बाबतीतही पूर्ण नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणारी आणि त्यात यशस्वी झालेली; आपल्या देशातील नागरिकांवर अनियंत्रित हुकुमत गाजविणारी. जप एका गोष्टीचा आणि करणी उलटी. हे जे ढोंग रशिया करीत आहे ते धिक्कारणीय आहे.

पण, खरे म्हणाल, तर रशियन राज्यसंस्था जगड्व्याळ आहे, किंवा सिद्धान्ताला अनुसरून गेल्या पंचेचाळीस वर्षांत तिच्या विलयाची प्रक्रिया सुरूही झालेली नाही, या गोष्टी मला फारशा महत्त्वाच्या वाटत नाहीत. नव्या धर्तीवर संपूर्ण अर्थव्यवस्थेची उभारणी करण्यासाठी, उभारणीच्या प्रथम कालखंडात अशा अतिव्याप्त व सर्वंकष राज्ययंत्रणेची आवश्यकता वाटली असेल. तशी आवश्यक होतीही असे मला वाटते. आता इतकी अतिव्याप्त व सर्वंकष यंत्रणा जर आवश्यक होती, तर माझ्या मते जगड्व्याळ व राक्षसी यंत्रणेवर लोकनियंत्रण ठेवण्यासाठी लोकशाही संस्थांची काळजीपूर्वक उभारणी करणे हे शंभरपट अधिक महत्त्वाचे होते. सरकारवर लोकशाही नियंत्रण प्रस्थापित करण्याचा मार्ग रशियन राज्यकर्त्यांनी शोधून काढला असता तर, इतके जगड्व्याळ राज्ययंत्र असूनही सोव्हिएट रशिया हा एक पुरोगामी समाज बनू शकला असता. सामान्य, प्रभावी, लोकशाही संस्थांची उणीव रशियाला आज पदोपदी नडते आहे.

अशा लोकशाही संस्थांचा तोंडवळा पाश्चिमात्य देशातील लोकशाही संस्थांसारखाच असता असे मानायचे काही कारण नाही. पार्लमेंटरी किंवा अध्यक्षीय प्रकारची लोकशाहीच रशियात अस्तित्वात यायला हवी होती असे काही नाही. उद्योग व्यवसायातून अप्रत्यक्ष निवडणुकांद्वारा निर्वाचित स्थानिक सोव्हिएटस् हा लोकशाहीचा एक अभिनव व आकर्षक प्रकार ठरेल असे मला नेहमी वाटत आले आहे. स्टालिनच्या कारकीर्दीत बनविलेल्या घटनेने ही स्थानिक सोव्हिएटस बरखास्त करण्यात आली. अशा सोव्हिएटस-वर आधारलेल्या लोकशाहीचा प्रयोग करण्यासारखा आहे. पण रशियात अशी संधीच दिली गेली नाही. कारण आपल्या पक्षाचे अधिकृत उमेदवार सोडून आणखी कोणास निवडणूक लढविण्याची संधी रशियन कम्युनिस्ट पार्टीने कधी कोणाला दिली नाही. सोव्हिएट रशियात आजपर्यंत खरी निवडणूक कधी झालेलीच नाही.

आज रशियन समाज पुढारलेला असून सरकारविषयी प्रभावीरीत्या पसंती-नापसंती दाखविता येईल, आपल्या इच्छेनुरूप राज्यकर्त्यांची निवड करता येईल अशा प्रकारची काही लोकशाही पद्धत ही त्या समाजाची आजची गरज आहे. अशी लोकशाही व्यवस्था यशस्वीरीत्या राबविण्याइतकी सामान्य रशियन जनता सुशिक्षित आहे. प्रौढ शिक्षण आणि माध्यमिक व उच्च शिक्षण यांचा अत्यंत सार्वत्रिक प्रसार ही सोव्हिएट रशियाची सर्वश्रेष्ठ कामगिरी आहे. या कामगिरीत मिळविलेल्या यशामुळेच रशियातील राज्यकारभाराची पद्धत या बदललेल्या समाजाच्या दृष्टीने टाकाऊ ठरलेली आहे. रशियातील जनता लोकशाही व्यवस्था, कशी आणि केव्हा निर्माण करतील?

नजिकच्या भविष्यात, या ना त्या प्रकारची लोकशाही व्यवस्था निर्माण करण्यात रशियन जनतेला यश मिळण्यावर जगाचे जीवित अवलंबून आहे असे मला वाटते.

• • •

# ६ साम्यवादी समाजांची शोकांतिका

आपल्या राज्यकर्त्यांना निवडण्याचा, पदच्युत करण्याचा, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा काही मार्ग शोधून काढण्याची, आज साम्यवादी समाजामध्ये तांतडीची गरज आहे या निष्कर्षाला आपण मागच्या प्रकरणात आलो. पाश्चिमात्य देशातहि हा तिहेरी अधिकार आपण अपूर्ण स्वरूपात उपभोगतो, त्याचा निर्दोष वापर आपण करू शकत नाही, हे आपल्याला चांगले माहीत आहे. आपल्याला हा अधिकार आहे मात्र. आपल्या देशातील बहुसंख्य जनतेच्या इच्छेविरुद्ध, सामान्य दृष्टिकोनाविरुद्ध जाऊन कोणतेहि पाश्चिमात्य सरकार राज्य करू धजत नाही. जनतेच्या कलाविरुद्ध राज्य करण्याचा प्रयत्न कोणी केलाच तर लोक त्या सरकारला पदच्युत करतात आणि आपल्या इच्छेला मान देण्यास तयार असलेले सरकार निवडून देतात.

अशा प्रकारची राज्यसंस्थेला वेसण घालण्याची कोणतीच रीत उपलब्ध नव्हती ही साम्यवादी जगाची गेल्या चाळीस वर्षांची शोकांतिका आहे. या उणीवेतूनच गेल्या चाळीस वर्षांतील वेगवेगळ्या निर्घृण शोकांतिकांचा जन्म झालेला आहे. सैद्धान्तिकदृष्ट्या अशा नियंत्रणाची आवश्यकता साम्यवादी अर्थातच मान्य करतात. एरवी त्यांनी निवडणुका घेण्याचे नाटक केले नसते; पण ठराविक मुदतीनंतर खुल्या निवडणुका घेण्यामागचा जो मुख्य हेतू तो साम्यवादी जगातील निवडणुकांनी सफल होत नाही. कम्युनिस्ट पार्टीच्या

अधिकृत उमेदवारांखेरीज दुसरे कोणी निवडणुका लढवूहि शकत नाहीत. या एकाच कारणाने निवडणुकांच्या मार्गाने राज्ययंत्रणेवर नियंत्रण ठेवण्याचे काम रशियात सफल होत नाही. प्रत्यक्ष निवडणुकांचे वेळी एकच उमेदवार उभा केला जातो, म्हणजे मतदारांना निवड करण्याची संधि एक टक्का देखील असत नाही. साम्यवादी देशातल्या निवडणुका म्हणजे 'एका घोड्याच्या शर्यती' आहेत असे आमच्या मजूर पक्षाचे नेते क्लेमंट ॲटली म्हणत असतात.

साम्यवादी राजवटींच्या गेल्या चाळीस वर्षांच्या अनुभवावरून आपण असे निश्चितपणे म्हणू शकतो की उद्योगप्रधान, प्रगत आणि व्यामिश्र, गुंतागुंतीच्या समाजांमधील राजवटीखाली खुल्या लोकशाही निवडणुका घेण्याची काही राजकीय यंत्रणा असण्याची नितांत आवश्यकता आहे. साम्यवादी राष्ट्रातील राज्यकर्ते मूर्ख किंवा दुष्ट होते म्हणून साम्यवादी राष्ट्रातील जनतेवर आपत्ति कोसळल्या असे नाही. उलट, माझ्या मते, देशाचे राज्य चांगल्या प्रकारे चालविण्याची आपल्याकडून त्या त्या राष्ट्रातील राज्यकर्त्यांनी पराकाष्ठा केली आहे. त्यापैकी काही नेते हे मर्यादशील होते तर काही जण हे निलाजरे, लहरी होते हेहि खरे. पण पाश्चिमात्य देशातील नेत्यांवरहि हे आरोप करता येतील. पुष्कळ साम्यवादी राज्यकर्ते कर्तृत्ववान होते. स्टालिनची एकेकाळी साम्यवादी भक्ति करीत होते; आज स्टालिनच्या कीर्तीवर कोणीहि थुंकतो. पण हा स्टालिनही कर्तृत्ववान होता. स्टालिनजवळ राजकीय कर्तृत्व अव्वल दर्जाचे होते हे कोणीहि निःपक्षपाती निरीक्षक नाकबूल करू शकणार नाही. स्टालिनने लोकांची कत्तल केली, धादांत असत्य गोष्टींचा प्रचार केला, लोकांना लुचाडले, अनन्वित अत्याचार केले; ख्रुश्शोव्हने वाचलेला स्टालिनच्या दुष्कृत्यांचा पाढा कोणीहि अमान्य करीत नाही. एक हिटलरचे उदाहरण सोडले तर, आधुनिक काळात आपल्या मातृभूमीची स्टालिनने केली इतकी पिळवणूक दुसऱ्या कोणत्याच राज्यकर्त्याने केली नसेल. ख्रुश्शोव्हच्या आरोपपत्रावरून असे वाटते की स्टालिनने पिळवणूक, गांजणूक, कत्तली या सर्व गोष्टी स्वतःच्या मौजेखातर केल्या, किंवा आपल्या हातात सत्ता कायम ठेवण्यासाठी केल्या. पूर्वीच्या काळच्या लहरी सुलतानांनी वरील दोन्ही उद्दिष्टांसाठी या सर्व गोष्टी केल्याची इतिहासात उदाहरणे आहेत. त्यांच्या वर्तनामागे व्यापक सामाजिक हेतू क्वचितच असे. त्यांना सत्तेची अपरंपार लालसा असे आणि जो कोणी

या त्यांच्या लालसापूर्तीच्या आड येईल त्याचा उच्छेद करण्यास ते टपून बसलेले असत.

पण स्टालिनची गोष्ट अशी नव्हती. रशियाचे औद्योगिकरण करण्यासाठी, जगातील पहिल्या क्रमांकाचे बलाढ्य राष्ट्र रशियाला बनविण्यासाठी रशियातील सामाजिक-राजकीय जीवनातील पिळवणूक, कत्तली, अत्याचार व भयांचे दुःस्वप्न या साऱ्या गोष्टी टाळणे शक्य नव्हते असे स्टालिनचे प्रामाणिक मत होते. ही दोन्ही उद्दिष्टे झपाट्याने साध्य केली नाहीत तर आपल्या सभोवतीच्या भांडवलशाही राष्ट्रांपैकी कोणीतरी रशियावर हल्ला करील आणि रशियातील साम्यवादी राजवट उलथून पाडील अशी त्याची मनोमन समजूत होती. ही त्याची समजूत व भय निराधार होते हे वेगळे. पण, शेवटची काही वर्षे सोडली, ज्या काळात स्टालिन हा विकृत मनाचा रोगी होता असे आता सिद्ध झाले आहे, तर त्याच्या कृत्यांमागे ही दोन व्यापक उद्दिष्टे होती असे मला वाटते.

स्टालिनची गोष्ट वेगळी म्हणून सोडून देऊ. पण विसरू नका, स्टालिनने केलेल्या सगळ्या गोष्टी लेनिननेदेखील केल्या, आणि लेनिनच्या बाबतीत तरी त्याच्या कृति या विशुद्ध ध्येयनिष्ठेने प्रेरित झालेल्या होत्या यावरून कोणी शंका घेऊ शकणार नाही. आपली कृत्ये योग्य व अत्यावश्यक आहेत याविषयी त्याची शंभर टक्के खात्री नसती तर लेनिन ती कृत्ये कदापिहि करू शकला नसता. लेनिन हा स्टालिनपेक्षा कितीतरी अधिक सुसंस्कृत माणूस होता.

बोल्शेविक राजवटीवर ज्यांची उत्कट निष्ठा होती अशा गटांवर दडपशाहीचा वरवंटा खुद्द लेनिनच्या हयातीत फिरू लागला होता हे आपण विसरता कामा नये. ऑक्टोबर क्रांतीच्या वेळी ज्या क्रॉन्स्टॅट तळावरील नाविक दलाच्या तुकड्यांनी नेतृत्व केले होते त्यांचेच बंड १९२१ साली अत्यंत निर्दयपणे मोडून काढण्यात आले. त्या घटनेपासून रशियन क्रांतीच्या इतिहासाला अघोरी वळण मिळाले याविषयी बहुतेक सर्व इतिहासकारात एकमत आहे. त्या वेळी रशियात यादवी युद्धाचा भडका उडालेला होता. भांडवलशाही राष्ट्रांनी यादवी युद्धात राजेशाही गटाच्या बाजूने हस्तक्षेप, (तो अगदीच निष्प्रभ ठरला ते सोडा,) केलेला होता. सत्ता हाती ठेवण्यासाठी लेनिनने दयामाया न ठेवता शर्थ करावी याबद्दल त्याला दूषण देणे

मूर्खपणाचे ठरेल. पण ज्या क्षणी भांडवलदारराज्यकर्त्या वर्गाच्या विरुद्ध वापरावयाचे राज्यसंस्थेजवळील दंडसत्तेचे शस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या रशियन कामगार वर्गाच्या विरुद्धच वापरले गेले, ज्या क्षणी साम्यवादी आरमारातील खलाशांना चिरडण्यासाठी लाल सेनेचा वापर केला, त्या क्षणी ' द स्टेट अँड रेव्होल्यूशन ' मध्ये लेनिनने इतक्या काळजीपूर्वक उभ्या केलेल्या साम्यवादी लोकशाहीचा इमला कोसळला.

साम्यवादी लोकशाहीवर हा मर्माघात झाला असे मी म्हणतो. कारण, क्रॉन्स्टॅटचे बंड मोडून काढल्यानंतरच्या काळातील सोव्हिएट रशियन सरकारने केलेला दंडसत्तेचा वापर हा जुन्या राज्यकर्त्यावर्गाच्या अवशेषांविरुद्ध होता असे दूरान्वयानेदेखील म्हणता येणार नाही. रशियन जनतेच्या विरुद्ध दंडसत्तेचा वापर केला नाही, असा कोणताच कालखंड त्यानंतरच्या रशियाच्या इतिहासात दाखविता येणार नाही; आणि म्हणून मी वरील विधान केले. रशियन जनतेमधील काही गटांची वेळोवेळी ' दिशाभूल ' केली गेली, आणि ती सुधारून घेण्यासाठी उपाय योजना दर वेळी करावी लागली, असे या गोष्टीचे स्पष्टीकरण साम्यवादी देतात. साम्यवादी राष्ट्रांची शोकांतिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीने साम्यवाद्यांचे हे स्पष्टीकरण विशेष अर्थपूर्ण आहे. लोकांच्याहिपेक्षा जनहित आपल्यालाच अधिक कळते याविषयी साम्यवाद्यांची भलतीच खात्री असते. इतिहास मात्र असे सांगत नाही.

आपल्या हातून चूक होऊ शकत नाही या साम्यवाद्यांच्या फाजील आत्मविश्वासामुळेच गेल्या चाळीस वर्षांत साम्यवाद्यांच्या हातून इतके भयंकर प्रमाद घडू शकले. मानवी प्रगतीच्या चळवळीत आघाडीवर असण्याचा दावा साम्यवादी करतात. मुळात त्यांच्या म्हणण्यात तथ्यांशहि होता. याच माणसांनी पक्षाला केवळ तत्त्वाचे रूप देऊन त्याची प्रतिष्ठापना करावी याचे नवल वाटते. पूर्वीच्या काळी लोकांनी स्वनिर्मित केवल कल्पनांचे दास्यत्व पत्करून स्वतःचा छळ करून घेतला. आपण मानवजातीचे बिनीचे शिलेदार आहोत असे ज्यांनी म्हटले त्याच साम्यवाद्यांनी या चुकीची पुनरुक्ति करावी आणि ' पक्षा 'च्या नांवाने मानवी इतिहासात ज्याला तोड नाही अशी कृष्णकृत्ये करावीत ही केवढी शोकांतिका आहे! राजसत्ता ही अशीच एक कल्पना होती. ' राजाचे ईश्वरदत्त अधिकार ' या सिद्धांतातहि ईश्वराचे

पृथ्वीवरील प्रतिनिधित्व करणारा राजा, कधीच चूक करू शकत नाही असेच प्रतिपादन केलेले होते. समाजाच्या वाटचालीत एखादे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य राज्यसत्ता, ‘ पक्ष ’ किंवा अशा इतर संस्थांकरवी पार पडायचे असले म्हणजे त्या संस्थांमागे अशा अविवेकी केवल कल्पनेचे वलय निर्माण होते, आणि त्या स्वरूपात समाजात त्या संस्था प्रभावी होतात, असे मला वाटते. पांचशे वर्षांपूर्वी युरोपच्या इतिहासात राष्ट्राधारित राज्यसत्तांचे संघटन करण्याचे मध्यवर्ति कार्य निरंकुश राजसत्तेकडून घडले. त्या काळात अशा मध्यवर्ति सत्तेची ऐतिहासिक गरज होती आणि ती राजसत्तेने भरून काढली. आजच्या काळात आर्थिक संघटनांचे काम पूर्ण करण्यासाठी सर्वाधिकारवादी बलिष्ठ पक्ष किंवा समर्थ लोकशाही व्यवस्था या दोहोंपैकी कोणत्या तरी एका संस्थेची आवश्यकता आहे. हे कार्य पार पाडण्यासाठी ‘ पक्ष ’ या मानवनिर्मित संस्थेला साम्यवाद्यांनी दैवी अवताराचे रूप दिले आहे. ‘ पक्ष ’ कधीच चूक असू शकत नाही. कारण ईश्वरासमान तो सर्वज्ञ आहे अशी कल्पना त्यांनी रुजविलेली आहे. पण प्रत्यक्षात अनेक स्त्रीपुरुषांचा मिळून पक्ष ही संघटना बनलेली असते; आणि आपणा सर्वांप्रमाणेच पक्षात पुढारीपण करणारे स्त्रीपुरुषहि स्खलनशील असतात; पक्षाच्या हातून प्रमाद घडू शकतो; तसा तो घडतहि असतो. आणि अगदी भयंकर प्रमाद देखील पक्षाच्या हातून घडलेले आहेत.

प्रगत उद्योगप्रधान समाजांचे आर्थिक संघटन समाधानकारकरीत्या केले जाण्याची आज आवश्यकता खरोखरीच आहे. हे ऐतिहासिक कार्य पार पाडण्याचे सर्वंकष पक्षसत्ता हे एकच साधन वा मार्ग नव्हे. साम्यवाद्यांचा मार्ग हा अनेक मार्गांपैकी एक मार्ग असून तो सर्वोत्तम आहे असेहि नाही. पक्षाला ‘ ईश्वरदत्त ’ अधिकार प्रदान करण्याने ऐतिहासिक कार्य साधत नसून तो एक राक्षसी प्रकार बनलेला आहे. त्यातून संकटपरंपरा आणि भयंकर गुन्हे यांचीच निपज झाली आणि अद्यापहि होत आहे. आणि या गोष्टीला कोठे अंत आहेसे दिसत नाही.

साम्यवादी समाजांना आपल्या खाती काहीच भरीव कामगिरी दाखविता यायची नाही असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाही. त्यांची कामगिरी मोठी आहे आणि त्या अंगाची चर्चा मी विस्ताराने पुढेही करणार आहे. पण

पक्षाला, आणि पर्यायाने पक्षाधीन सरकारला, 'ईश्वरदत्त अधिकार दिले गेल्याने या कामगिरीचे रेकॉर्ड दर काही वर्षांनी संकटांनी आणि कृष्ण-कृत्यांनी डागळले जात आहे. कम्युनिस्ट पार्टी ही कधीच चूक करू शकत नाही या फाजील आत्मविश्वासातून अधिक गंभीर दोष निर्माण होतो; या दोषामुळे साऱ्या जगाचे जीवित धोक्यात येण्याचा संभव आहे. मार्क्स-वादाची मांडणी करणाऱ्या एका आद्य स्मृतिकाराच्या वचनाचा विसर साम्यवाद्यांना पडला आहे. एंगल्सने आपल्या म्हातारपणी विचाराच्या परिपक्व अवस्थेत लिहिले की, 'जबरदस्तीने लोकांना सुखी करणे' हे केव्हाही चूकच ठरेल. मानव जातीच्या कल्याणासाठी आपल्याजवळ असलेले औषध अगदी रामबाण इलाज आहे असा स्वतःचा भ्रम करून घेऊन साम्यवाद्यांनी आजवर लोकांना 'जबरदस्तीने सुखी' करण्याचे प्रयत्न पुनः पुन्हा चालविलेले आहेत. का तर, पक्ष कधीच चूक करू शकत नाही असे ते मानतात. आणि म्हणून, लोकांनी आपली नाराजी दाखविली तरी लोकांच्या घशात आपले औषध ओतून त्यांना बळेच बरे करण्याचा प्रयत्न साम्यवाद्यांचा चाललेला असतो. पूर्व युरोपीय देशातील बिचाऱ्या लोकांना याचा गेली पंधरा–वीस वर्षे चांगला अनुभव येत आहे.

देशाचे राज्य कसे चालवावे यासंबंधीची आपली कल्पना परराष्ट्रावर लादण्याचा रशियन सरकारचा प्रयत्न चक्षुर्वैसत्यं पाहण्याची संधी मला मिळाली आहे. ऑक्टोबर १९५६ मधील रशिया व पोलंड यांच्यातील बेबनावाच्या दिवसात मी पोलंडची राजधानी वॉर्सा येथे होतो. या प्रसंगी रशियन सरकारने शेवटी माघार घेतली, तडजोड केली आणि परकीय सरकारला स्वतःच्या इच्छेप्रमाणे थोडेसे वागण्याची मुभा दिली; पण हे जवळपास एकच उदाहरण की ज्या वेळी रशियन सरकारने माघार घेतली. पोलंडच्या या अपवादाने सर्वसाधारण नियम सिद्धच होतो असे म्हणावे लागते. शेवटी, तडजोडीनंतर अस्तित्वात आलेले नवे पोलिश सरकारही साम्यवादीच होते. आणि पोलंडचे हे नवे सरकार देखील सर्व मुख्य प्रश्नांवर सनातन मार्क्सवादी भूमिकाच घेणारे आहे हे अनेक प्रसंगात दिसून आले आहे. इतर साम्यवादी राजवटींमध्ये प्रभावी असलेले भ्रम आणि पूर्वग्रह पोलिश राजवटीतही ओतप्रोत भरलेले आढळतात.

## पोलिश सरकारच्या दोन साध्या मागण्या

रशियाशी असलेला लष्करी करार रद्द करावा, पोलंडच्या भूमीवर असलेले रशियन सैन्य काढून घेतले जावे, म्हणजेच पोलंडचे रशियावरील परावलंबन संपवावे, अशी नव्या पोलिश सरकारची मुळीच इच्छा नव्हती. पोलिश सरकारच्या दोन साध्या मागण्या होत्या. पोलिश शेतकऱ्यांवर सामुदायीकरण सक्तीने लादले जाऊ नये, आणि पोलंडमधील साम्यवाद हा रशियन छापाचा न करता पोलिश छापाचा असावा, या त्या दोन मागण्या होत्या. शेतीच्या सामुदायीकरणास विरोध अगदी व्यवहार्य भूमिकेवरून असावा. कारण सामुदायीकरणाने पोलिश शेतीचा बट्ट्याबोळ वाजायची वेळ येऊन ठेपली होती. तेव्हा रशियन पद्धतीने समाजाचा कारभार न चालविता आपल्या स्वतःच्या बुद्धीप्रमाणे तो चालविण्याचे स्वातंत्र्य, अतिशय कर्तबगार व निष्णात पोलिश अर्थशास्त्रज्ञांच्या योजनांनुसार औद्योगीकरण करण्याचे स्वातंत्र्य, आणि सांस्कृतिक क्षेत्रात रशियनांचे अनुकरण करण्याऐवजी पोलिश बनण्याचे स्वातंत्र्य, इतके साधे मागणे पोलिश जनतेचे होते.

या साध्या मागण्यानाही रशियन राज्यकर्त्यांनी तीव्र व संतत विरोध केला. मी तेथे असताना ख्रुश्शोव, मार्शल कोनीव्ह आणि इतर रशियन श्रेष्ठी वॉर्सात विमानाने आले आणि आपण म्हणू तसे पोलिश नेत्यांनी वागले पाहिजे अशी मागणी करू लागले. रशियन सेनेच्या ज्या दोन डिव्हिजन्स पोलंडमध्ये होत्या त्यांना वॉर्सावर चाल करून जाण्याचा आदेश देण्यात आला हे लक्षात घेण्यासारखे आहे. या वेळी पोलिश नेते ज्या थंडपणाने, समंजसपणाने व अत्यंत खंबीरपणे वागले त्याचे कौतुकच करायला हवे. रशियन श्रेष्ठींचा आदेश अमान्य करीत असतानाच दुसरीकडे रशियाशी असलेले सर्व संबंध तोडण्याचाही मार्ग त्यांनी अवलंबिला नाही. पण रशियनांनी युद्धास तोंड फोडले तर आपलीही युद्धाची तयारी आहे हीही गोष्ट त्यांनी स्पष्ट केली. याची तयारीही त्यांनी केली होती हे मी पाहिले आहे. शेवटी रशियन श्रेष्ठी तडजोडीला तयार झाले. या त्यांच्या समंजस निर्णयाबद्दल त्याना मार्क द्यायला हवे. त्यांनी गोमुल्कांच्या नव्या पोलिश सरकारला राज्याची सूत्रे हाती घेऊ दिली. पोलिश उठाव मोडून काढण्यात आला

नाही. त्यानंतरच्या काळात मवाळ सुधारणावादी साम्यवाद पोलंडमध्ये अस्तित्वात असल्याचे आपण पहात आहोत.

पण एकंदर सोव्हिएट रशियाचे आजवरचे रेकॉर्ड पाहिले तर पोलिश उठावाची घटना हा मुख्य नियमाला एक अपवाद होता असे म्हणावे लागते. थोडी मवाळ सुधारणावादी साम्यवादी राजवट प्रस्थापित करण्याचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी पोलिश लोकांना जिवावर उदार होऊन लढाईसाठी सज्ज व्हावे लागावे हा प्रकार भयावहच नाही का? असामान्य मुत्सद्देगिरी आणि पोलिश लोकांचे दैव उजळले म्हणूनच हे मर्यादित यश त्यांच्या पदरात पडले हे स्वच्छ आहे.

त्यानंतरच्याच आठवड्यात घडलेल्या हंगेरियन क्रांतीच्या फलितावरून वरील म्हणण्याचा प्रत्ययच आणून दिला. हंगेरियन क्रांतीच्या शोकांतिकेवर अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. पण मला वाटते की, आपल्या हातून चूक होत आहे हे रशियन नेत्यांना प्रामाणिकपणे उमगले नाही यात खरी हंगेरीची शोकांतिका आहे. आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या राज्यास आकार देण्याचे स्वातंत्र्य हंगेरियन लोकांना द्यावे ही गोष्ट ते आपल्या स्वतःलाच पटवून देऊ शकले नाहीत. लाल सेनेच्या चिलखती दलांसाठी हंगेरियन कामगारांची क्रांति चिरडून टाकण्याखेरीज दुसरा पर्याय नाही असे त्यांना अगदी प्रामाणिकपणे वाटले असले पाहिजे. हंगेरियन क्रांतीच्या इतिहासावरून अगदी स्पष्ट होते की हंगेरियन क्रांति चिरडून टाकण्याचा आदेश देण्याच्या आधी त्यांनी हजारदा विचार केला; क्रांति दडपून टाकण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण अखेरीस 'पक्ष कधीच चूक करू शकत नाही' या भ्रमाचा विजय झाला आणि सैन्याला त्यांनी खुला परवाना दिला. हंगेरियन कामगारांना हजारोंनी ठार मारीत असतानाहि, हे सर्व आपण हंगेरियन कामगार वर्गाच्या भावी हितासाठीच कर्तव्यबुद्धीने करीत आहोत याची त्यांना खात्री होती. स्वतःच्या सर्वज्ञतेवरील साम्यवाद्यांची निष्ठा शुद्ध गूढवाद आहे. हंगेरियन शोकांतिकेनंतर काही दिवसांनी रशियन वृत्तपत्रात आलेल्या एका उताऱ्यात या गूढगुंजनाचे चांगले दर्शन घडते. 'क्रासनाइया वेझ्दा'मध्ये कोणा कर्नल फेदेरॉरने २२ मार्च १९५७ रोजी लिहिले :

'कम्युनिस्ट पार्टीकडून शिकवण मिळालेल्या रशियाच्या सेना आपले आंतरराष्ट्रीय कर्तव्य बजावण्यास नेहमीच तयार असतात. हंगेरीच्या कामगारांना रशियन सैन्याने केलेल्या साहाय्यावरून हीच गोष्ट सिद्ध होते...'

## पक्ष निष्ठेमुळे येणारे ठार आंधळेपण

वरील वाक्यात दडलेला उपरोध कर्नल फेदेरॉर यांना कळला नसेल अशी मला आशा आहे. पक्षाच्या हातून कधीच चूक होणार नाही या तत्त्वावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती : त्याअर्थी बूडापेस्टच्या रस्त्यांवर कामगाराना पक्ष गोळ्या घालीत होता तेव्हाहि तो कामगारांनाच साहाय्य करीत असला पाहिजे, पोथीनिष्ठेमुळे येणारे आंधळेपण हे किती ठार आंधळेपण असते ते या उदाहरणावरून स्पष्ट होईल.

साम्यवाद्यांची स्वतःच्या सर्वज्ञतेविषयी भ्रामक निष्ठा, आणि लोकशाही संस्थांच्या अभावी या भ्रमावर साम्यवादी समाजांजवळ नसलेला उतारा, या दोहोतून जे शोकात्म प्रमाद घडले त्यांची अधिक उजळणी करण्याआधी मला स्पष्ट केले पाहिजे की पाश्चिमात्य राज्यकर्ते अशा प्रमादांपासून मुक्त आहेत किंवा अशी भयंकर कृष्णकृत्ये त्यांच्या हातून घडत नाहीत असे मी सुचवू इच्छित नाही. पाश्चिमात्य देशातील राज्यकर्तेहि स्खलनशील आहेत. पाश्चिमात्य देशात राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, सदोष व स्थूल का होईना, एक पद्धत उपलब्ध आहे; लोक राज्यकर्त्यांना ठराविक मुदतीनंतर निवडून देऊ शकतात किंवा घालवून देऊ शकतात; त्यामुळे पाश्चिमात्य राजवटींच्या हातून होणाऱ्या चुका व प्रमाद यांना मोठी मर्यादा पडते इतकेच मला सुचवावयाचे आहे.

## साम्यवाद्यानी स्वतःच्या देशाचा कारभार चालविताना केलेल्या चुका अधिक गंभीर

पोलंड किंवा हंगेरी यासारख्या परकीय राष्ट्रातील लोकांच्या इच्छा दंडसत्तेचा वापर करून दडपून टाकल्या ही साम्यवादी राजवटींच्या हातून घडलेली

सर्वांत गंभीर चूक नाही. आपल्या देशाचा कारभार चालवीत असता त्यांनी ज्या चुका केल्या त्या सर्वांत अधिक गंभीर होत्या असा निर्वाळा इतिहास देईल याविषयी मला शंका नाही. आणि या गंभीर चुकांमध्ये शेतीचे सामुदायीकरण करण्याचे धोरण ही पहिल्या क्रमांकाची चूक होती असे मला वाटते. अर्थव्यवहाराच्या संकुचित भूमिकेवरून पाहिले तर साम्यवादी अर्थव्यवस्था औद्योगिक क्षेत्रात यशस्वी आणि शेतीच्या क्षेत्रात पराकोटीच्या अयशस्वी ठरल्याचे सामान्यतः म्हणता येते.

१९३० सालानंतर रशियावर कोसळलेल्या दुष्काळ, कत्तली आणि दडपशाहीचे सत्र या संकटपरंपरांचे मूळ कारण शेतींच्या सामुदायीकरणात आढळते इतकेच नाही तर आजहि रशियन अर्थव्यवस्थेचा विकास शेतीच्या सामुदायीकरणामुळे अडून राहिलेला आहे असे माझे मत आहे. चीनमध्ये तर, मला वाटते, रशियाच्यापेक्षा अनेक पटींनी शेतीच्या सामुदायीकरणाचे परिणाम भयंकर होणार आहेत. चीनमधील परिस्थिति शेतीच्या सामुदायीकरणाला रशियापेक्षा कमी अनुकूल असतानाहि सामुदायीकरणाचा कम्यून्स हा आत्यंतिक प्रकार चिनी साम्यवाद्यांनी निवडला आहे. आणि सामुदायीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याची त्यांची गतीहि अवास्तव वेगवान आहे. या धोरणाचे परिणाम आज दिसत आहेतच. चीनमधील दुष्काळ किती भीषण आहेत त्याचा नेमका अंदाज अर्थात आपल्याला नाही. पण चिनी सरकारनेच दुष्काळी परिस्थिति असल्याचे जाहीर केले आहे, तेव्हा दुष्काळ पडले आहेत इतके तर उघडच झाले. जागतिक बाजारपेठेत कोट्यावधि टन गहू चिनी सरकारने विकत घेतला आहे. आपल्याजवळ असलेले तुटपुंजे परकी चलन त्यांनी औद्योगिकरणाला अत्यावश्यक उत्पादक यंत्रसामुग्री सोडून इतर कोणत्याहि खरेदीकरता सामान्यतः वापरले नसते. त्यांनी ते अन्नधान्य विकत घेण्यासाठी वापरले त्याअर्थी एकंदर लोकसंख्येपैकी राज्यकर्त्यांना ज्या वर्गांच्या शक्ति-बुद्धीची गरज आहे त्या वर्गांनाहि एरवी उपासमार पडली असती इतके दुष्काळ भीषण होते हे उघड आहे. १९५८ पर्यंत चीनचा औद्योगिक विकास अतिशय वेगाने होत होता. शेतीच्या क्षेत्रातील या घोर अपयशाने त्यात एकाएकी खीळ पडली.

## सरकारवर दडपण आणण्याचा मार्ग व साधन लोकाजवळ असते तर जबरदस्तीने शेतीचे सामुदायीकरण करता आले नसते

पोथीनिष्ठ साम्यवादी राजवटींनी शेतीचे सामुदायीकरण करण्याचे धोरण दोन कारणांनी स्वीकारलेले आहे. सर्व प्रश्नांवरचे उत्तर आपल्यापाशी आहे या विषयी साम्यवाद्यांना असलेली खात्री हे एक कारण झाले. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी एकत्र कराव्यात यासाठी शेतकऱ्यांवर अनन्वित जुलूम करावा लागला तरी आपण शेतकऱ्यांच्याच खऱ्या व दूरगामी हितासाठी सामुदायिक शेती त्यांच्यावर लादीत आहोत याविषयी साम्यवाद्यांच्या मनाची पक्की खात्री. सरकारच्या ध्येयधोरणांवर बहुसंख्य जनतेच्या इच्छांचे, मतांचे दडपण पडेल यासाठी कोणत्याच प्रकारची, अगदी स्थूल लोकशाही यंत्रणादेखील या राजवटींमध्ये अस्तित्वात नाही हे याचे दुसरे कारण होय. लोकांजवळ आपल्या सरकारांवर दडपण आणण्याचा काही जरी मार्ग वा साधन उपलब्ध असते तरी या देशातील राज्यकर्त्यांना जबरदस्तीने शेतीचे सामुदायीकरण करता आले नसते ही गोष्ट उघड आहे. आणि, या देशातील बहुसंख्य जनता, व एकजात सर्व शेतकरी वर्ग, हे सामुदायिक शेतीच्या कट्टर विरोधी आहेत याविषयी तिळमात्र शंका कोणाला असू शकत नाही.

इतिहासातील सर्व राजवटींच्या हातून चुका झालेल्या आहेत. आणि गुन्हे घडले नाहीत अशा राजवटीहि इतिहासात फार थोड्या आढळतात. विद्यमान साम्यवादी राजवटींइतक्याच लहरी व क्रूर राजवटी इतिहासात अनेक होऊन गेल्या. त्यांच्यात पद्धतशीरपणा एखादेवेळी कमी असेल. पूर्वीच्या जुलमी राजवटींजवळ साम्यवाद्यांप्रमाणे त्यांच्या कृष्णकृत्यांचे समर्थन करता येईल असे व्यापक सामाजिक उद्दिष्टहि नव्हते. मानवी विकासाच्या उच्च हेतूच्या पूर्तीसाठी आपणांस हे कटू कर्तव्य पार पाडावे लागत आहे असे साम्यवादी आपल्या कृत्यांचे निदान समर्थन करू तरी शकतात. स्टालिनच्या राजवटीने जुलमाचा तळ गाठला त्या काळाशी तुलना करता येईल अशा राजवटी

इतिहासात कमीच; या मानाने त्या पुष्कळच सौम्य होत्या. पण त्या राजवटींना कोणताच सामाजिक आशय नव्हता. साम्यवाद्यांवर हा आरोप तरी खासच कोणी करू शकणार नाही. अलिकडच्या काळातील फासिस्ट हुकूमशाहींचा विचार मनात येणे स्वाभाविकच आहे. त्यापैकी हिटलरच्या नाझी राजवटीने केलेल्या गुन्ह्यांना इतिहासात तोड नाही; इतकी अमानुष कृष्णकृत्ये कोणी आजवर केली नाहीत. विसाव्या शतकातील या फासिस्ट हुकूमशाहींच्या अमानुष अत्याचारांनाहि सामाजिक आशयाचे अधिष्ठान नव्हते. लष्करी सामर्थ्याच्या जोरावर जग जिंकण्याचा जुनापुराणा आणि निष्फळ हेतू सोडून दुसरा कोणताच व्यापक वा उच्च हेतू हिटलरच्या डोळ्यांपुढे नव्हता.

## पण साम्यवाद्यांचा हेतु व प्रेरणा चांगली होती

या कारणास्तव साम्यवादी हुकूमशाही राजवटी पूर्वीच्या सुल्तानी राजवटींहून, आणि विसाव्या शतकातील गुन्हेगार फासिस्ट राजवटींहूनहि, वेगळ्या जातीच्या आहेत असे मला वाटते. साम्यवादी राजवटींच्या मागच्या प्रेरणा व हेतू चांगले होते; पण मार्क्सवाद्यांनीच म्हटल्याप्रमाणे, इतिहासात प्रेरणा व हेतू या गोष्टींना फारच थोडा अर्थ असतो. साम्यवाद्यांचा हेतू आणि प्रत्यक्ष कृति यात पडलेले अंतर यात साऱ्या शोकांतिकेचे मर्म दडलेले आहे.

इथे मी परत मूळ मुद्द्याशी येतो. आजच्या जगातील नवी निर्णायक महत्त्वाची चिंतेची बाब साम्यवाद आणि भांडवलशाही यांच्यातील शीतयुद्ध ही नसून औद्योगिक दृष्ट्या अत्यंत प्रगत, विराट, आधुनिक समाजांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविण्याच्या प्रयत्नाचे यशापयश ही चिंतेची बाब आहे. अशा समाजातील जनतेला आपल्या राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार देण्याच्या प्रयत्नात येणाऱ्या यशापयशावर जगाचे भवितव्य अवलंबून आहे.

माझ्या श्रोत्यांपैकी मंत्री म्हणून सरकारमध्ये काम करण्याचा प्रसंग आलेले फारच थोडे असतील. ब्रिटनमधील युद्धोत्तर कालातील मजूर मंत्रिमंडळातील मी एक मंत्री होतो. सद्भावनेने प्रेरित झालेल्या ध्येयनिष्ठ निःस्वार्थी सरकारच्याहि कारभारावर जनतेचे नियंत्रण असण्याची अतिशय जरूर आहे हे

मी स्वानुभवाने सांगतो. प्रजाहितदक्ष मंत्र्यांनाहि, लोकांच्या इच्छेविरुद्ध आपण स्वतःच्या मनाने लोकांचा लाभ करायला गेलो, तर लोक आपल्याला मंत्रिपदावरून हुसकावून लावतील याची सतत जाणीव असणे अत्यावश्यक असते. विशेषतः मंत्र्यांना हे भान असणे महत्त्वाचे आहे. ही जाणीव मंत्र्यांना असली तर सरकारवर लोकांचे खरोखरच नियंत्रण आहे असे म्हणता येईल. जर ही जाणीव नसेल तर असे नियंत्रण नाही असे म्हणावे लागेल. हीच लोकशाही. आणि लोकशाही ही मानवजातीची उद्याची आशा आहे.

● ● ●

# ७ साम्यवादी समाजांची कामगिरी

क्रांतीनंतर रशियाचे परिवर्तन एका अजस्त्र आद्योगिक राष्ट्रात होऊ शकले हा एक अद्‌भुत चमत्कारच होय; दुसऱ्या कोणत्याहि समाजाला न साधणारा हा चमत्कार एक साम्यवादी समाजच करू शकला; अशी समजूत रूढ आहे. रशियन साम्यवादाची ही कामगिरी मोठी खरी; पण मला वाटते या गोष्टीसाठी रशियाचे फाजील कौतुक केले जाते. १९१७ साली रशिया अर्धवट मागासलेला, औद्योगिकरणास नुकतीच सुरवात केलेला देश होता. त्या अवस्थेतून झपाट्याने रशियाला जगातले प्रगत औद्योगिक राष्ट्र बनविण्याची कामगिरी लहानसहान नव्हे. दुसऱ्या कोणत्याच राष्ट्राने ही मजल मारलेली नाही, ही जी काही समजूत करून देण्यात येते ती मात्र चुकीची आहे. आर्थिक विकासाच्या इतिहासाच्या क्षेत्रातील अलिकडील साहित्य काळजीपूर्वक वाचले असता असे दिसते की वेगवेगळ्या अर्थव्यवस्थांखाली वेगवेगळी राष्ट्रे शेतीधिष्ठित मागासलेपणापासून औद्योगिकरणाची वाटचाल अशीच करीत आहेत.

## जपानचा औद्योगिकरणाचा वेग डोळ्यात भरण्यासारखा

रशियाने ज्या गतीने औद्योगिकरण केले ती गतीहि अजोड होती असे नाही. १९१७ सांली रशिया ज्यां ठिकाणी होता तेथपासून आजच्या अवस्थे-

पर्यंत यायला सामान्यतः कोणत्याहि राष्ट्राला एवढाच काळ लागतो असे आढळून आले आहे. १९१७ साली रशियात अजिबात कारखानदारी उद्योगधंदे नव्हते अशी परिस्थिति नव्हती हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. जपानने रशियाप्रमाणेच औद्योगिकरणाची वाटचाल केली, आणि, अगदी वेगळ्या अर्थव्यवस्थेखाली, तेवढेच अंतर कापायला जपानलाहि साधारण तितकाच काळ लागला. रशियाच्या आर्थिक विकासाने डोळे दिपून गेलेल्या मंडळींना जपानची कहाणी दुसऱ्या एका मुद्दयावरहि उद्‌बोधक आहे. दोन अतिविध्वंसक महायुद्धांचा तडाखा सहन करूनहि रशियाने एवढी मोठी मजल मारली असे म्हटले जाते. जपानच्या बाबतीतहि ही गोष्ट खरी आहे. पहिल्या महायुद्धाची झळ जपानला रशियाच्या मानाने अगदीच कमी लागली हे खरे; या उलट, दुसऱ्या महायुद्धात, रशिया हे जेत्या राष्ट्रांपैकी एक होते तर जपानचा संपूर्ण पाडाव झालेला होता. दुसरे असे की, दोन महायुद्धांदरम्यानच्या काळात, चीनचा भला मोठा घास गिळंकृत करण्याच्या प्रयत्नात जपानच्या अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण झालेला होता. असे असूनहि ठोकळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या मोजणीवरून आर्थिक विकासाची गति मोजता रशियापेक्षा जपानची आर्थिक प्रगति अधिक वेगाने झाली असल्याचे आढळते.

या बाबतीतली आंकडेवारी उद्‌धृत करून मी तुमचा वेळ घेऊ इच्छित नाही. खरे म्हणाल, तर ती आंकडेवारी बिनचूक आहे यावर माझा विश्वास नाही. वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक विकासाचा वेग मोजण्याचा प्रयत्न अर्थशास्त्रज्ञ मोठ्या हिंमतीने करतात; आणि वेगवेगळ्या राष्टात तुलना करण्याच्या दृष्टीने असे काही मोजमापाचे साधन आपल्या हाती असणे महत्त्वाचेहि पण आहे. वस्तुस्थिति, अशी आहे की ठोकळ उत्पन्नाची आंकडेवारी ही बिनचूक असत नाही, ती गोळाबेरीज बरोबर असते.

एकट्या जपाननेच झपाट्याने आपला विकास करून घेतला आहे असे नाही. याच कालखंडात वेगाने दौड करणारा मेक्सिको हा दुसरा एक देश आहे. जगातील अशा कोणत्याहि राष्टापेक्षा मेक्सिकोच्या वाढीचा वेग अधिक आहे अशी अनेक वर्षे अर्थशास्त्रज्ञांच्या फूटपट्टीवर नोंदलेली आहेत.

## पश्चिम युरोपातील राष्ट्रेंहि काही मागे नाहीत

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सतरा वर्षात पश्चिम युरोपनेहि स्वतःचे आर्थिक पुनरुत्थान आश्चर्यकारक वेगाने केले आहे. युरोपने आपल्या पुनरुत्थानाची सुरुवात देखील १९१७ सालच्या रशियाहून अधिक वरच्या पायरीवरून केली हे अर्थात् लक्षात ठेवले पाहिजे. ब्रिटन आणि अमेरिका या देशांचाहि आर्थिक विकास हा चढउतार होत, अडखळत, चाललेला असला तरी, तोहि गेल्या सतरा वर्षात इतराशी तुलना करण्याएवढा वेगाने झालेला आहे.

आर्थिक विकासाच्या चढणीत भारत पुष्कळच पायथ्याशी असूनहि वर्षाला चार टक्के दराने भारताची आर्थिक वाढ होत असून, नजिकच्या काळात हा वेग सहा टक्क्यांपर्यंत वाढेल असा अर्थशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. भारतीय जनतेच्या छपन्नशेसाठ मागण्यांच्या हिशेबाने ही गति फार मंद वाटत असली तरी भारतीय उपखंडात या वेगाने आर्थिक विकास यापूर्वी कधी झाला नव्हता.

ऑक्टोबर क्रातीनंतर रशिया ज्या वेगाने विकास पावत आहे. त्या वेगाने वाढत जाणारे अनेक देश दाखविता येतील. या देशातून भिन्न भिन्न प्रकारच्या अर्थव्यवस्था काम करीत आहेत. हा सर्व विविध अनुभव लक्षात घेता आपण अशा निष्कर्षाला येतो की, एकदा औद्योगिकरणाच्या रस्त्यावर कोणत्याहि देशाची वाटचाल स्थिरावली की आजवरच्या इतिहासात मानव समाजांना ठाऊक नाही इतक्या वेगाने तो देश स्वतःचा आर्थिक विकास करून घेतो. त्या देशात खुल्या बाजारपेठेवर आधारलेली भांडवलशाही अर्थव्यवस्था असली काय, साम्यवादी अर्थव्यवस्था असली काय, किंवा भारताप्रमाणे दोन्ही पद्धतींचे मिश्रण असले काय, आर्थिक विकासाबाबतीत काही फरक पडत नाही. देशात कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था आहे त्याला महत्त्व आहेच. प्रत्येक अर्थव्यवस्थेचे काही फायदे तर काही तोटे असतात. मला पूर्वी वाटत असे की कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था देशात आहे यावरच सर्व काही अवलंबून असते. पण आज अनुभवाने वाटते की अर्थव्यवस्थेच्या प्रकाराला फारसे महत्त्व नाही.

## रशियन आणि अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांच्या आकडेवारीचे निष्कर्ष तेच येतात

लौकरच रशिया सर्व राष्ट्रांना मागे टाकील, १९७० ते १९८० मध्ये रशियाचे ठोकळ राष्ट्रीय उत्पादन अमेरिकेच्याहिपेक्षा अधिक असेल, अशा ज्या नेत्रदीपक घोषणा रशियन राज्यकर्ते अधून मधून करीत असतात त्याचे काय? असे कोणी विचारेल. या दोन देशांचे आर्थिक विकासाचे आजचे वेग कायम राहतील हे गृहीत धरून जर तुम्ही आलेख लाढलेत तर त्यावरून भविष्याविषयी असा काही अंदाज निष्पन्न होतो हे कबूल. रशियन आणि अमेरिकन, दोन्ही देशातील अर्थशास्त्रज्ञांनी या बाबतीतल्या आंकडेवारीचा अभ्यास करून काढलेल्या निष्कर्षांमध्ये तपशीलावरून तफावत असली तरी सारांशाने दोघांचेहि निष्कर्ष तेच येतात. पण हा निष्कर्षहि फार क्रांतिकारक महत्त्वाचा आहे अशी जी काही एक हवा निर्माण केली गेली आहे त्यात मला फारसा दम दिसत नाही. औद्योगिकरणाच्या शर्यतीत उशीरा उतरलेल्या देशाने इतर सर्व गोष्टी बाजूला सारून, सतत, न विश्रांति घेता पळत राहायचे ठरविले तर तो इतरांना मागे टाकून पुढे जाईलहि; विशेषतः, ठोकळ राष्ट्रीय उत्पादनासारख्या स्थूल कसोट्या लावून जर आपण परीक्षा करणार असलो तर असे घडणे मोठे आश्चर्यकारक नाही. रशियाच्या बाबतीत हेच घडले आहे. पण अमेरिका वा पाश्चिम युरोपीय देशांमधील संपन्नतेची पातळी एकदा एखाद्या राष्ट्राने गाठली की समस्त राष्ट्रीय उत्पादन ही विकास मोजण्याची एक अत्यंत ढोबळ व स्थूल कसोटी ठरते व तिला विशेष महत्व उरत नाही.

थोडे तपशीलात जाऊन माझे म्हणणे मी स्पष्ट करतो. समस्त राष्ट्रीय उत्पादनाची मोजणी रशियन आणि पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञ अगदी वेगवेगळ्या पद्धतींनी करतात. मार्क्सवादी अर्थशास्त्रीय परंपरेला शोभेल अशा प्रकारे रशियन अर्थशास्त्रज्ञ समस्त राष्ट्रीय उत्पादनात फक्त उद्योगधंदे, शेती व अन्य उत्पादक व्यवसायातील उत्पादनच समाविष्ट करतात. अमुक इतके पोलाद, अमुक इतका गहू, अमुक इतके ॲल्युमिनियम, इतके बुटांचे जोड, इतकी यंत्रे, इ. इ. अशी मोजणी ते करीत जातात. पण वेगवेगळ्या सेवा

व्यवसायांची मोजणी समस्त राष्ट्रीय उत्पादन मोजताना ते करीत नाहीत. उदाहरणार्थ, दुकानदारी व्यवसाय, केशभूषा व्यवसाय, अशा व्यवसायातले उत्पादन हे साम्यवाद्यांच्या भाषेत उत्पादनच नव्हे.

समस्त राष्ट्रीय उत्पादन म्हणजे वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंचा एक महाप्रचंड ढीग अशी भूमिका घेण्यात आपण मार्क्सवादाशी प्रामाणिक राहतो अशी रशियन अर्थशास्त्रज्ञांची समजूत आहे यात शंका नाही. ही त्यांची समजूत थोडीशी खरीहि पण आहे. कॅपिटलमध्ये मार्क्सने म्हटले आहे की दुकानदारी व एकंदरीतच व्यापारी व्यवसायांनी वस्तूंच्या उत्पादनात भर पडत नाही. रिकार्डोपासून वारशाने मार्क्सकडे चालत आलेल्या, ज्यामध्ये मार्क्सने काही आपली भर घातली, त्या श्रममूल्य सिद्धान्ताला ( वस्तूंचे मूल्य हे त्यात समाविष्ट असलेल्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमशक्तीएवढे असते ) अनुरूप असाच हा निष्कर्ष आहे. पण मार्क्स सूक्ष्मदर्शी विचारवंत होता आणि भौतिक दृश्य गोष्टीं पुरत्याच त्या उपभोग्य वस्तू ( Commodities ) मर्यादित नाहीत याची त्याला चांगली जाणीव होती. कॅपिटलच्या पहिल्या खंडाच्या पहिल्या पानावरच तो ही गोष्ट स्पष्ट करतो. मानवी गरजेचे समाधान करते ती उपभोग्य वस्तू, मग ही गरज 'बेंबीपासून निर्माण झालेली असो वा डोक्यातून बाहेर आलेली असो,' असे मार्क्सने स्वच्छ म्हटलेले आहे.

कोणताही समाज जसजसा संपन्न होत जातो तसे बेंबीपासून उत्पन्न होणाऱ्या गरजा भागविण्यापेक्षा, डोक्यापासून निर्माण होणाऱ्या गरजा भागविण्याकडे त्या समाजाच्या उत्पादन व्यवस्थेचा प्रयत्न अधिकाधिक प्रमाणात लागतो. यात अस्वाभाविक काही नाही. पोटाची भूक भागल्या-खेरीज इतर गरजा, भुकांकडे बघायला फुरसत नसावी हे स्वाभाविक आणि अपरिहार्य आहे. पण एकदा का पोटोबा भरला की, माणसाला नाना प्रकारच्या इच्छा होतात व भुका लागतात. आणि त्यांच्यापैकी बऱ्याचशा भुका वस्तूंनी भागणाऱ्या नसून वेगवेगळ्या प्रकारच्या सेवांनी भागणाऱ्या असतात. अशी सेवा घेण्यासाठी आपण मग पैसे मोजायलाही तयार असतो. पोटाच्या भुकेपेक्षा या सेवेच्या भुका दरवेळीच अन्नक्षुधेपेक्षा अधिक उच्च वा बौद्धिक वा नैतिक असतील असे नाही. उलट, काही गरजा या निश्चितपणे

बौद्धिक व सांस्कृतिक स्वरूपाच्या असतात, आणि त्या भागविणे अतिशय खर्चाचेही असते. नृत्य कार्यक्रमांची तिकिटे किंवा चित्रकला प्रदर्शनांची तिकिटे विकत घेऊन कलांचा आस्वाद घेता येणे हे चांगलेच खर्चिक असते.

प्रगत व संपन्न समाजांच्या संदर्भात भौतिक दृश्य गोष्टींचा एक प्रचंड ढिगारा या स्वरूपात उपभोग्य वस्तुंचा (Commodities) विचार करणे हे फारसे लाभदायी ठरणार नाही. स्त्रियांच्या केशभूषेचे उदाहरण घ्या. फॅशन जशी बदलते तशी गरज बदलते. काही वर्षे सगळ्या बायकांना नाना प्रकारचे शिरटोप घालण्याची हौस असते; तेच फॅशन बदलली की सगळे टोप कचऱ्याच्या टोपलीत टाकून बायका जास्तीत जास्त पैसे नाना-प्रकारच्या केशभूषा करण्यात खर्च करतात. शिरटोप घालणे किंवा केसांची रचना नाना प्रकारांनी करणे, या दोन्ही गरजा बेंबीपासून काही निर्माण झालेल्या नाहीत; दोन्ही सुपीक डोक्यातूनच निघालेल्या गरजा आहेत. या गरजा भागविण्याच्या प्रक्रियेत समाजाजवळील उपलब्ध साधन संपत्तीचा काही भाग खर्ची पडतो. पहिल्या काही वर्षांत तो कारखान्यातून नाना आकारांचे शिरटोप तयार करण्यात खर्ची पडेल तर नंतरच्या काळात केशभूषालयातील व्यक्तींच्या सेवेच्या रूपाने मनुष्यबळाचा उपयोग होईल. आता जर आपण समस्त राष्ट्रीय उत्पादन मोजीत असता संकुचित भूमिका घेऊन फक्त दृश्य भौतिक गोष्टींचाच समावेश करावयाचे ठरविले तर, शिरटोप तयार करण्यासाठी खर्ची पडणाऱ्या साधनसंपत्ती आपण विचारात घेऊ आणि केशभूषा करण्यात खर्ची पडणाऱ्या साधनसंपत्तीचा समावेश करणार नाही. ही पद्धत उघडच तर्कदुष्ट आहे आणि या पद्धतीच्या वापराने चुकीच्या निष्कर्षांप्रत आपण येतो. समाज संपन्न होत जातो तसतसा साधनसंपत्तीचा विनियोग वाढत्या प्रमाणात दुसऱ्या प्रकारच्या व्यवसायां-साठी, वा उत्पादनासाठी होऊ लागतो. लोकांचे जीवनमान अधिक सुखाचे, सुखसोयींसंपन्न करण्यासाठी समाजाचे आर्थिक बळ खर्च होऊ लागते. जास्त गोष्टींचे उत्पादन करण्याऐवजी **अनेक प्रकारच्या, उत्तम दर्जाच्या** गोष्टी बनविणे, जीवनातील सोयी व सेवा वाढविणे याकडे समाजाचे लक्ष वळते.

## आर्थिक उत्पादनाच्या क्षेत्रात अमेरिकेला रशिया मागे टाकेल हे विधान सापेक्ष व अनियमित

एका विशिष्ट क्षणी अमेरिकेला रशिया आर्थिक उत्पादनाच्या क्षेत्रात मागे टाकेल हे विधान किती सापेक्ष व अनियमित अर्थाचे आहे ते आता स्पष्ट होईल. अमेरिकेपेक्षा लाखो टन अधिक पोलाद रशिया एक दिवस निर्माण करू लागेल. लागेल; मग काय? त्याने काही फारसा फरक पडणार नाही. त्या वेळपर्यंत उत्पादन व्यवस्थेत पोलादाचे महत्त्व व उपयोग कमी होऊन अल्युमिनियमच्या उत्पादनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असले तर पोलादाच्या टनावारीत केलेली तुलना कुचकामी ठरणार. कदाचित् त्या अवस्थेस समाजात अव्वल दर्जाचे निष्णात इंजिनिअर्स, तंत्रज्ञ, डिझाइनर्स अधिक संख्येने असणे या गोष्टीलाच महत्त्व येईल. संपन्न अवस्थेतील दोन समाजांचे समस्त राष्ट्रीय उत्पादन, जीवनमान, साधारण आर्थिक विकासाची अवस्था या गोष्टीवरून तुलना करणे ही, अत्यंत अवघड गोष्ट आहे व तिला फार किंमत आहे असेहि नाही. आर्थिक वृद्धीचे महत्त्वच नाही असा माझ्या म्हणण्याचा आशय नाही. गरीब व मागासलेल्या समाजांच्या दृष्टीने अर्थातच सर्वसाधारण आर्थिक विकासाचेहि फार महत्त्व आहे. वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक विकासाची, आर्थिक अवस्थांची तुलना करण्यातल्या मर्यादा स्पष्ट करणे हाच माझा हेतु आहे.

रशियाच्या लष्करी बलाढ्यतेनेहि लोक चकित होतात. या क्षेत्रातील रशियाची कामगिरी लोकांच्या नजरेसमोर आहे. स्पुटनिक, क्षेपणास्त्रे, अतिविध्वंसक दहाशे पन्नास मेगॅटन शक्तीची अण्वस्त्रे, प्रचंड सैनिकी संचलने, या सर्व गोष्टी रशियाचे लष्करी सामर्थ्य अतिबलाढ्य असून ते अद्ययावत् शास्त्रीय ज्ञानावर आधारलेले आहे ही गोष्ट स्पष्ट करतात. या कामगिरीची भव्यता कमी लेखण्याचा वा ती उपेक्षणीय आहे असे म्हणण्याचे पातक माझ्या हातून घडणार नाही.

त्यावरून मी जे तात्पर्य काढतो ते मात्र पुढीलप्रमाणे आहे. तुम्ही तुमच्याजवळील साधनसंपत्तीचा मोठा भाग जर लष्करी सामर्थ्याच्या वाढीवरच केंद्रित केलात; तुमची उपलब्ध श्रमशक्ती, कुशल कामगार, उत्तमोत्तम

शास्त्रज्ञ, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील बिनीवरची माणसे आणि आवश्यक ती भौतिक साधनसंपत्ती जर तुम्ही लष्करी सामार्थ्याच्या निर्मितीवर खर्च करण्याचे ठरविलेत; समाजाच्या इतर सर्व गरजा बाजूला सारून एका लष्करी बळालाच तुम्ही अग्रक्रम दिलात; तर या प्रकारचा चमत्कार करून दाखविणे कोणालाच अशक्य नाही.

रशियन राज्यकर्त्यांनी लष्करी बळ वाढविण्यासाठी आपली सर्व शक्ती का पणास लावली असावी ही गोष्ट समजण्यासारखी आहे. क्रांतीनंतर थेट आजपावेतो, आपल्याभोवती शत्रू राष्ट्रांचा कायमचा वेढा पडलेला आहे अशी त्यांची भावना राहिलेली आहे. आपले लष्करी सामर्थ्य अतुलनीय करण्यात यश आले तरच आपले स्वातंत्र्य सुरक्षित राहील अशी त्यांची श्रद्धा. त्यामुळे इतर सर्व गोष्टी बाजूला सारून त्यांनी लष्करी बळ वाढविण्यावर आपली सर्व शक्ती केंद्रित केली. रशियाभोवतीची राष्ट्रेहि मूर्ख अशी की, आपल्या वागणुकीने रशियन राज्यकर्त्यांच्या मनात या भीतीला त्यांनी घर करायला संधी दिली. पहिल्या महायुद्धानंतर बोल्शेविक राजवटीविरुद्ध त्यांनी राजेशाही गटाला रशियन यादवी युद्धात सैनिकी साहाय्य केले; दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीने रशियावर हल्ला केला. आपल्या राष्ट्राभोवती शत्रू राष्ट्रांचा वेढा पडलेला आहे ही भावना रशियन राज्यकर्त्यांच्या मनात आजहि प्रबळ आहे. आज ती भावना योग्य व आवश्यक आहे का, तिचे खरोखरीच प्रयोजन आहे का, असा खरा प्रश्न आहे.

रशियाने संपूर्ण निःशस्त्रीकरण करावे अशी अपेक्षा कोणीच ठेवत नाही. बाकीच्या जगात इतर राष्ट्रे फौजफाटा बाळगून असताना कोणत्याच राष्ट्राने मग ते भांडवलशाही असो, की साम्यवादी असो, की सरंजामदारी असो, की आणखी कोठलेहि असो — असे एकतर्फी निःशस्त्रीकरण केलेले नाही. ही गोष्ट आपण स्वीकारून विचार केला तरी असे वाटते की लष्करी सामर्थ्य वाढविण्याच्या रशियाच्या प्रयत्नात काही तरी पागलपणा आहे. अर्थशास्त्रीय आकडेवारीचाच आश्रय घ्यायचा झाला तर, आम्ही असे म्हणतो की समस्त राष्ट्रीय उत्पादनापैकी ( म्हणजेच राष्ट्राच्या एकूण साधनसंत्तीपैकी ) जवळजवळ सात टक्के उत्पादन आज इंग्लंडमध्ये शस्त्रास्त्रनिर्मितीवर खर्ची पडत आहे. अमेरिकेत हे प्रमाण दहा टक्के, तर रशियात पंधरा टक्के आहे. आर्थिक

विकासाच्या मार्गात अनेक तीव्र अडचणींना रशियाला तोंड द्यावे लागत असताना पंधरा टक्क्यांइतकी साधनसंपत्ति शस्त्रास्त्रनिर्मितीवर खर्च करणे हे चांगलेच अधिक आहे. रशियाची लष्करी बलाढ्यता ही नेत्रदीपक असली, आणि त्यावर लक्ष केंद्रित करण्यास काही ऐतिहासिक कारणेहि घडली; या दोन्ही गोष्टी खऱ्या असल्या तरी रशियाचे लष्करी सामर्थ्य हा शेवटी एक चमत्कार नसून जुन्या काळपासून राष्ट्रसत्ता जशा वागत आल्या आहेत तसेच रशियाच्याचे वर्तन घडले, थोडे अधिकच घडले, इतकेच! सगळ्याच राष्ट्रसत्ता शस्त्रास्त्रनिर्मितीच्या शर्यतीत आजवर भाग घेत आल्या; त्यातल्या त्यात रशिया इतरांपेक्षा अधिकच हिरीरीने त्यात भाग घेत आहे.

## साम्यवादी रशियाची कामगिरी खरी व भरीव असली तरी त्यात अद्वितीय असे काही नाही

येथवरच्या विवेचनाचे सार असे की आर्थिक व लष्करी क्षेत्रातील साम्यवादी रशियाची कामगिरी ही खरी व भरीव असली तरी त्यात अद्वितीय असे काही नाही. वेगळ्या प्रकारच्या अर्थव्यवस्था असलेल्या इतरहि राष्ट्रसत्तांनी आपला विकास साधताना या दोन्ही प्रकारची कामगिरी बजावलेली आहे. रशियाचा विशेष असा की लष्करी सामर्थ्य आणि औद्योगिकरण ही दोन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ज्या नेटाने व निकराने रशियाने प्रयत्न केला तो इतर राष्ट्रात आढळत नाही.

इथे दोन प्रश्न उपस्थित होतात. एक तर, असा नेटाचा व निकराचा प्रयत्न इष्ट होता का? आणि या कामगिरीचा आणि लोकशाही संस्थांचा (जो आपला खरा चर्चेचा विषय आहे,) संबंध नेमका काय? रशियाने या दोन उद्दिष्टांच्या सिद्धीकरता आपली शक्ति पणाला लावली ते चूक केले असे व्यक्तिशः मला वाटते. ज्या पिसाटपणे रशिया औद्योगिकरणाच्या आणि लष्करी बळाच्या पाठीमागे लागला त्याने ना जगाचे कल्याण झाले ना रशियाचे भले झाले आहे. पायाभूत उद्योगधंद्यांची गोष्ट प्रथम घेऊ. गेल्या पंचेचाळीस वर्षात पायाभूत उद्योगधंद्यावरील अतीव भर कमी करून उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर व शेतीवर रशियाने आपले काही लक्ष वळविले असते तर एकंदरीने रशियाचा विकास आजच्यापेक्षा कमी गतीने

झाला असता यावर माझी श्रद्धा नाही. अर्थशास्त्रीय चिकित्सेच्या तपशीलात जाण्याची ही जागा नाही; पण मला वाटते, जर रशियाने आपली अर्थव्यवस्था संतुलित राखली असती तर आज उलटपक्षी रशियाची अर्थ-व्यवस्था अधिक सामर्थ्यवान बनलेली दिसली असती. पोलादाचे उत्पादन, यंत्रसामुग्रीचे उत्पादन कदाचित आजच्यापेक्षा कमी असते आणि दूध, गहू, बुटांचे जोड, अशा वस्तूंचे उत्पादन आजच्यापेक्षा अधिक असते. त्याने सर्वांनाच अधिक आराम पडला असता असे म्हणण्याचे धाडस मी करतो.

## अर्थव्यवस्था जर संतुलित असती तर रशियाची प्रतिकार शक्ति अधिकच राहिली असती

माझ्या या प्रतिपादनाला साम्यवाद्यांचे उत्तर असे येईल की, 'ते सगळे ठीक आहे हो; पण आम्ही पायाभूत उद्योगधंद्यावरचा भर कमी केला असता तर आम्ही लष्करीदृष्ट्या दुर्बल राहिलो असतो.' एकतर दुसऱ्या महायुद्धोतर कालात रशियाला इतक्या प्रचंड लष्करी बळाची जरुरी आहे हेंच प्रतिपादन मला मुळात मान्य नाही. पण दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळातहि, ज्या काळात लष्करी बलाढ्यतेची गरज होती, रशियाची अर्थव्यवस्था संतुलित असती तर रशियाची प्रतिकारशक्ति कमी राहण्याऐवजी अधिकच राहिली असती असे मला वाटते.

खरी वस्तुस्थिति अशी आहे की १९४१ साली पहिल्याच सलामीत हिट-लरच्या सैन्याकडून रशियन सैन्याने हग्या मार खाल्ला. जर्मन चढाईच्या पहिल्या काही आठवड्यांच्या आत जवळपास शंभर रशियन डिव्हिजन्स आणि त्याच्याजवळचे सर्व युद्धसाहित्य हे साफ कापून निघाले. स्टालिनच्या चुकीच्या लष्करी पवित्र्यांमुळे इतकी प्रचंड हानि झाली हे ख्रुश्चोव्हचे म्हणणे अंशतः खरे आहे. पण पायाभूत उद्योगधंदे आणि शस्त्रास्त्रनिर्मिति यांच्यावर स्टालिनने दिलेला पिसाट भरहि या फटफजीतीला कारणीभूत होता. शेती व उपभोग्य वस्तूंच्या उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष केल्याने १९३० नंतरच्या काळात रशियावर संकटपरंपराच कोसळली. या दुष्काळातून, संकटांतून त्या कुप्रसिद्ध कत्तली उद्भवल्या. एक ते दोन कोट रशियन लोकांची त्या काळात 'वेठ-बिगारी कैद-छावण्यात' रवानगी झाली. रशियन कम्युनिस्ट पार्टीचे असंख्य

कार्यकर्ते या शुद्धीकरणात मारले गेले. रशियन लाल सेनेचा अधिकारी वर्गहि ( अगदी थेट कर्नलच्या हुद्द्यापर्यंतचे सर्व अनुभवी अधिकारी ) मोठ्या संख्येने या कत्तलींच्या सत्रांना बळी पडला. या अस्थिर व अमानुष राजवटीचा ताण रशियन समाजाला सहन करावा लागल्यामुळे रशियन सेनेची प्रतिकाराची **इच्छाशक्ति** क्षीण होऊन गेली. एकीकडे पायाभूत उद्योगधंद्यांवर व शस्त्रास्त्रनिर्मितीवर शक्ति केंद्रित केल्यामुळे शस्त्रागारात पडलेली भर आणि दुसरीकडे **इच्छाशक्तीला** आलेले दौर्बल्य ताजव्यात घालून तोलले तर काय कमी पडले असेल याची कल्पना करता येते. ताळेबंद काढला तर या सर्वांचा नक्त परिणाम रशियन सेनेची लढाईची तयारी दुर्बल होण्यात झाला याविषयी कोणाला शंका आहे का? रशियाजवळ रणगाडे आणि इतर अवजड युद्धसाहित्य कमी असते आणि रशियन सेनेचा अनुभवी अधिकारी वर्ग जिवंत असता तर जर्मन हल्ल्याच्या पहिल्या तडाख्यास रशियन सेनेचा धुव्वा उडून जर्मन सैन्य मॉस्कोच्या वेशीवर येऊन थडकले नसते.

या सगळ्याचा लोकशाहीशी काय संबंध असे तुम्ही विचाराल. लोकशाही राजवट असती तर रशियन राज्यकर्त्यांना पायाभूत उद्योगधंदे व शस्त्रास्त्रनिर्मिति यांच्यावर असे अघोरी केंद्रीकरण करताच आले नसते. १९३० नंतरच्या काळात स्टालिनने, किंवा १९५० नंतरच्या काळात ख्रुश्शोव्हने, रशियन जनतेला सक्तीने फाजील त्याग करायला भाग पाडले; अशी सक्ति करणाऱ्या सरकारला रशियन जनतेने लोकशाही व्यवस्थेत अधिकारावर ठेवलेच नसते. आपले सरकार निवडण्याचा मूलभूत लोकशाही हक्क रशियन जनतेला असता तर, आपल्या सरकारने औद्योगिकरणाच्या वेगाचा झपाटा कमी करावा, शस्त्रास्त्रनिर्मिति कमी करावी, आणि अन्न-वस्त्र-निवारा यासारख्या गरजा भागविण्यावर अधिक साधनसंपत्ति खर्च करावी असा आग्रह धरला असता; या दिशेने आपल्या धोरणात बदल करण्यास राज्यकर्त्यांना भाग पाडले असते.

त्यांचे हे करणे शहाणपणाचे ठरले असते किंवा नसतेहि, योग्य असते वा अयोग्य असते, पण ते असे वागले असते हे मात्र निश्चित आहे. तात्पर्य असे की, रशियाच्या विकासाचा विशिष्ट प्रकार हा रशियन लोकांवर जबरदस्ती करता येण्याची सत्ता साम्यवादी रशियन सरकारच्या हाती होती या घटनेशी

अविभाज्यपणे निगडित आहे. अत्याचार व छळ या मार्गांनी सरकार आपल्या इच्छेनुसार रशियात लोकांना राबवून घेऊ शकले म्हणूनच विकासाचा हा विशिष्ट मार्ग शक्य झाला. स्वतःच्या राष्ट्रातील जनतेवर सरकारने इतक्या सर्वंकष प्रमाणावर जुलुम-जबरदस्ती करणे हा केवळ गुन्हा नसून ते चुकीचेहि ठरते असा निर्वाळा इतिहास देईल असे मला वाटते. भौत्तिक शक्ति आणि **विजीगीषा** ( Morale) या दोन्ही घटकांचा एकत्रित विचार केल्यास लोकांना सक्तीने बलाढ्य बनविण्याच्या प्रयत्नातून शेवटी राष्ट्राचे लष्करी सामर्थ्य किती वाढते, आणि खरोखर वाढते का, याची शंकाच आहे. या मार्गाने वाटचाल करण्याचा आग्रह राखणारा समाज सडत चालल्याची चिन्हे दृग्गोचर होऊ लागतात.

जनतेवर अनिर्बंध जुलूम करण्याचे परिणाम काय होतात ते रशियाच्या उदाहरणावरून तर आपण पाहू शकतोच. पण रशियाची अंकित असलेली पूर्व युरोपीय राष्ट्रे, आणि त्यातल्या त्यात अधिक अपयशी असलेल्या पूर्व जर्मनीमध्ये हे परिणाम आपण विशेषत्वाने पाहू शकतो.

बर्लिन शहरात उभी केलेली तटबंदी तुम्ही पाहिली आहे ? बहुसंख्य वाचकांना ही संधि प्राप्त झालेली नसणार. तुम्ही सर्वजण बर्लिनची ' तटबंदी ' पाहू शकला असतात तर—बर्लिनची ' तटबंदी ' ही प्रेक्षणीय वास्तू नाही. ही एक घाईधाईत उभी केलेली, विटांची खुजी, घाणेरडी भिंत आहे. पुष्कळ ठिकाणी तिची उंची छातीएवढीच असून वर काटेरी तारा उभ्या केल्या आहेत. तिच्यावरून चढून जायचे म्हटले, किंवा ती पाडून टाकायची म्हटले तर चुटकीसरसे ते काम बनेल, परंतु त्यात एक ' पण ' आहे. प्रत्येक पन्नास यार्डांवर भरलेल्या बंदुका घेतलेले पूर्व जर्मन सैनिक या भिंतीचे रक्षण करीत अहोरात्र उभे असतात !

ही भिंत पाहिल्यावर तुमच्या मनात जी भावना जागृत होते तिचा भिंतीची उंची वा ताकद या गोष्टीशी काही संबंध नाही. चीनमधील प्राचीन काळची सुप्रसिद्ध प्रचंड तटबंदी, किंवा उत्तर इंग्लंडमध्ये प्राचीन काळी रोमन सम्राट हेड्रियन याने उभारलेली तटबंदी ही आक्रमकांना रोखून धरण्यासाठी तयार केलेली होती. बर्लिनची ही तटबंदी आक्रमकांना अडविण्यासाठी बांधलेली नाही. प्राचीन काळच्या ज्या सम्राटांनी या तटबंदी उभारल्या ते

सम्राट प्रजेचे कल्याणकर्ते होते की दुष्ट होते माहीत नाही; पण, निदान, एक गोष्ट तरी स्पष्ट आहे की आपल्या जनतेचे परचक्रापासून संरक्षण करण्यासाठी त्यांनी त्या तटबंदी उभारलेल्या होत्या. या भिंतीचे तोंड बाहेरच्या बाजूला होते. बर्लिनच्या तटबंदीचे तोंड आतल्या दिशेने आहे : आपल्याच जनतेवर ते रोखलेले आहे. बर्लिनची भिंत ही संरक्षक तटबंदी नाही. तुरुंगाभोवतीची ती भिंत आहे; आणि पूर्व बर्लिनची लोकसंख्या ही या तटबंदीच्या आत कैद केलेली आहे. पूर्व जर्मनीतल्या जनतेचे परचक्रापासून संरक्षण करण्यासाठी ही भिंत बांधलेली नसून, पूर्व बर्लिनचे रहिवासी पूर्व जर्मन राज्याच्या कैदेतून निसटून जाऊ नयेत म्हणून बांधलेली ती भिंत आहे.

बर्लिनच्या तटबंदीकडे नुसते पाहिले तरी ही गोष्ट स्पष्ट होते. काही ठिकाणी तर प्रत्यक्षात भिंत नाहीच : घरांची मागची भिंत हीच तटबंदी. रस्त्याच्या एका बाजूची घरे पश्चिम बर्लिनमध्ये आहेत, मध्ये रस्ता आणि पलिकडच्या घरांची भिंत म्हणजेच ही तटबंदी ! या घरांच्या मागच्या भिंतीत असलेल्या सर्व खिडक्या विटांनी चिणून टाकलेल्या आहेत. त्या इमारतींच्या खालीच असलेल्या पश्चिम बर्लिनमध्ये मोडणाऱ्या रस्त्यावरून तुम्ही चालू लागलात की या खिडक्या डोळे काढल्यानंतर दिसणाऱ्या विद्रूप खांचा वाटतात. या अंध घरांच्या छपरावरून उडी मारून निसटण्याचा प्रयत्न करताना ज्या जागी लोक मेले वा मारले गेले त्या जागी फुले ठेवलेली जागोजाग दिसतात.

हा सर्व प्रचार आहे असे तुम्ही म्हणाल. या परिस्थितीचा फायदा उठवून प्रचार न करणे फार अवघड आहे. पूर्व जर्मन साम्यवादी सरकारच्या लोकांवर अनिर्बंध जुल्म करण्याच्या निर्धाराची ही तटबंदी एक अपरिहार्य व स्वाभाविक परिणति आहे. लोकशाहीचा इथे मुडदा पाडला गेला आहे. लोकांचे स्वातंत्र्य पूर्णपणे हिरावून घेतले असल्याची ती खूण आहे. भिंत बांधून लोकांना कोंडून घातले नाही तर लोक पळून जातील, तेव्हा घाला भिंत आणि करा आपल्या देशाचा एक राष्ट्रव्यापी तुरुंग, अशी ही भूमिका आहे.

• • •

# ८ लिलींची फुले

वेगवान आर्थिक विकास किंवा प्रचंड लष्करी सामर्थ्य या दोन्ही कामगिऱ्यांहून साम्यवादी समाजाची खरी महत्त्वाची कामगिरी वेगळीच आहे. रशिया बलवान आहे पण पंचेचाळीस वर्षांत रशियाने जे बळ प्राप्त केले आहे त्यात विशेष गौरव करावा असे काही नाही. रशियन सरकारची, व काही प्रमाणात इतरहि साम्यवादी सरकारांची, सर्वांत गौरवास्पद कामगिरी माझ्या मते शिक्षणाच्या क्षेत्रात आहे. समस्त राष्ट्रीय उत्पादनाचा कितवा हिस्सा रशियन सरकार शिक्षणावर खर्च करीत आहे याची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही पण पाश्चिमात्य देशांपेक्षा हे प्रमाण अधिक असावे असे मला वाटते. इंग्लंडमध्ये समस्त राष्ट्रीय उत्पादनाच्या तीन ते चार टक्के इतका खर्च शिक्षणावर सरकार खर्च करते. हे पुरेसे नाही.

## शिक्षण क्षेत्रातील कामगिरीमुळे सर्व प्रमादांची भरपाई होऊन जगात साम्यवादी आघाडीवर राहतील

अनेक वर्षे शिक्षण ही एक चैन मानली जात होती. संरक्षण, रस्ते, वा असेच देशाच्या विकासाचे अन्य भौतिक कार्यक्रम इत्यादि बाबींवर खर्च करून झाल्यावर उरलेल्या पैशातून शक्य असेल तेवढी रक्कम शिक्षणावर खर्च करायची असा सरकारांचा रिवाज असे. हा दृष्टिकोन सर्वस्वी चुकीचा आहे. अगदी आर्थिक विकासाच्या मर्यादित दृष्टिकोनातून जरी तुम्ही पाहिलेत तरी,

देशाची संपत्ति व बळ झपाट्याने वाढविण्याच्या दृष्टीने पाहिले तरी शिक्षणावर किती पैसा खर्च केला जातो त्याला इतर सर्व गोष्टींहून अधिक महत्त्व आहे असे मला वाटते. साम्यवादी राजवटींनी इतर अनेक चुका केल्या आहेत; पण ही गोष्ट त्यांना पक्की उमजलेली आहे. इतर कोणत्याहि राष्ट्रांनी शिकविले नव्हते इतक्या मुलांना व नागरिकांना ते शिकवीत आहेत, आणि ते देत असलेले शिक्षणहि अधिक सर्वांगीण, भरीव, पद्धतशीर आहे. याचा त्यांना फार मोठा लाभ होणार आहे. त्यांच्या अनेक गंभीर व भयावह चुकांची भरपाई करून देईल इतकी ही एक गोष्ट त्यांच्या उपयोगाची ठरेल असे मला वाटते. पुढे जाऊन मी असे म्हणतो की, बिगर साम्यवादी देशांनी जर शिक्षणाकडे साम्यवाद्यांच्या इतकेच लक्ष दिले नाही तर, त्यांच्या सर्व प्रमादांची भरपाई होऊन साम्यवादी शेवटी जगात आघाडीवर राहतील.

वरील म्हणण्यात एक विरोधाभास आहे. साम्यवादी राष्ट्रातून होत असलेला शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार त्या राष्ट्रांना जगाचे नेतृत्व मिळवून देईल; पण, त्यांच्या इतर सर्व अनर्थावह चुकांची भरपाई या एका गोष्टीने होऊ शकेल तर, शेवटी ही भरपाई होईल असे मला वाटते. सुरक्षित व सुविद्य स्त्री-पुरुष केव्हा ना केव्हा आजच्या जाचक आणि जुलमी राजवटीखाली राहण्याचे धुडकारून लावणारच. वैयक्तिक व राजकीय स्वातंत्र्याचा या राजवटीत असलेला अभाव सुविद्य माणसे खचितच दीर्घकाळ सहन करणार नाहीत. त्यांच्या देशातील राजवटीवर अंतिम नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक त्या राजकीय संस्था निर्माण करण्याचा आग्रह ते धरतील. यात ते यशस्वी झाले तर त्यातून जी राज्यव्यवस्था निर्माण होईल ती लोकशाहीच असेल.

इथे आपण विरोधाभासाच्या गाभ्याशी येतो. सार्वत्रिक शिक्षणाच्या सर्वश्रेष्ठ गौरवास्पद कामगिरीने शेवटी साम्यवादी राजवटींचे सर्व अपराध व प्रमाद धुऊन निघतील, पण ते धुऊन निघायचे असले तर आजच्या साम्यवादी राजवटींमध्ये मूलभूत परिवर्तन घडून यावे लागेल. पाश्चिमात्य देशांनी आपल्या शिक्षणाच्या कार्यक्रमाची जर वेग आणि व्याप्ति वाढविली नाही तर अजूनहि जगाचे पुढारीपण साम्यवाद्यांकडे येईल. पण साम्यवादी राजवटींचे रूपांतर हुकूमशाहीतून लोकशाहीमध्ये केल्याशिवाय काही त्यांच्याकडे नेतृत्व येणार नाही. एकदा साम्यवादी राजवटींचे रूपांतर लोकशाहीमध्ये झाले की

मग ही राष्ट्रे जगातील बलाढ्य समाज बनले तरी मला त्याबद्दल खंत वाटणार नाही.

## शिक्षण क्षेत्रातील कामगिरी हेच विघटनाचे मूळ ठरेल

साम्यवादी समाजांचे भूषण ठरत असतानाच शिक्षणाच्या क्षेत्रातील या समाजांची कामगिरी हे त्यांच्या आजच्या स्वरूपात विघटनाचे मूळ ठरेल असे भविष्य मी पाहत आहे. अशा विरोधाभासांचे मार्क्सवाद्यांना आश्चर्य वाटू नये. कारण हे विरोधाभास द्वंद्वात्मक, स्वयंचलित जडवादात बसणारे आहेत. आर्थिक विकास, सार्वत्रिक शिक्षण आणि लोकशाही संस्थांचा विकास यात असा द्वंद्वात्मक अन्योन्याश्रय आहे. कामगार वर्गाला जन्म देण्यात भांडवलशाही आपले थडगे खणीत आहे असे भविष्य मार्क्सने वर्तविले होते हे तुम्हाला आठवावे.

साम्यवादी राष्ट्रांच्या भविष्यात काय वाढलेले आहे? खरोखरीच या समाजांचा विकास 'शासनमुक्त वर्गविहीन समाजा'त होईल का? 'वर्गविहीन समाजा'च्या ध्येयावरील माझी निष्ठा पूर्वीइतकीच आज उत्कट आहे. शेतकरी विरुद्ध जमीनदार, मजूर विरुद्ध मालक, राज्यकर्ते विरुद्ध प्रजाजन, गरीब विरुद्ध श्रीमंत, शिक्षित विरुद्ध अडाणी, अशा वर्गांमध्ये समाजाची विभागणी होणार नाही, अशा प्रकारची सामाजिक व आर्थिक व्यवस्था निर्माण करता आली तर मानवजातीने आपल्या विकासाच्या दिशेने टाकलेले ते अत्यंत मंगल पाऊल असेल अशी माझी आजहि श्रद्धा आहे आणि म्हणूनच मी समाजवादी होतो आणि आहे.

युद्धात आपण साऱ्या जगाचा सर्वनाश केला नाही तर, प्रगत मानव समाज वर्गविहीन समाजव्यवस्थांच्या दिशेने वाटचाल करतील या विषयी माझी खात्री आहे. आणि ही गोष्ट विद्यमान साम्यवादी समाजांबाबतीतहि तेवढीच खरी आहे. खऱ्याखुऱ्या लोकशाही संस्था निर्माण करण्यात अपयशी ठरल्याने, किंवा असलेल्या लोकशाही संस्था नष्ट केल्याने, साम्यवादी समाज वर्गविहीन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या उद्दिष्टापासून फार फार दूर निघून गेले आहेत असा माझ्या आत्तापर्यंतच्या विवेचनाचा मथितार्थ आहे. त्या भोज्याशी ते सर्वप्रथम पोचतील असेहि आता दिसत नाही. वरकरणी इतर

काही बिगरसाम्यवादी समाजाची रचना तर्कदुष्ट आणि सरमिसळ दिसत असली तरी वर्गविहीन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या शर्यतीत ते साम्यवादी समाजांना हरवतील असे दिसते. वर्गविहीन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या मार्गावर वाटचाल करण्याच्या दृष्टीने त्यांच्या राजकीय संस्था या अधिक प्रभावी व कार्यक्षम आहेत.

## समाजवादी समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने लोकशाही राजकीय संस्था अधिक उपयोगाच्या

समाजवादी समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने उत्पादनसाधनांवरील सामाजिक मालकीचा जेवढा उपयोग होतो त्यापेक्षा लोकशाही राजकीय संस्था या अधिक उपयोगाच्या आहेत असे सिद्ध होत आहे. माझ्या म्हणण्याचा गैरसमज करून घेऊ नका. उत्पादनसाधनांवर कोणाची मालकी आहे ही गोष्ट महत्त्वाची आहेच. सामाजिक विकासाच्या एका अवस्थेत या घटकाला फार महत्त्व असते. मार्क्सच्या हयातीत या गोष्टीला ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्व होते. एकोणिसाव्या शतकात लोकशाही राजकीय संस्थांचा विकास झालेला नव्हता आणि आपल्या राज्यसत्तांवर कामगारांना प्रभावी नियंत्रण प्राप्त झालेले नव्हते. त्या काळात उत्पादन-साधनांवरील मालकीमुळे जमीनदारांना व भांडवलदारांना समाजाच्या व्यवहारांवर जवळपास संपूर्ण प्रभुत्व प्राप्त झालेले होते. आज शंभर वर्षांनंतर, सार्वत्रिक साक्षरतेचा प्रसार झालेल्या प्रगत औद्योगिक समाजात लोकशाही संस्थामुळे कामगारांना आपल्या राज्यकर्त्यांवर प्रभावी नियंत्रण प्राप्त होत आहे. लोकशाही प्रभावी झाली की, उत्पादन – साधनांवर कोणाची मालकी असावी हे लोकशाहीमध्ये ज्यांना प्रभावी आवाज असेल त्यांना ठरविता येईल.

## लोकशाही संस्थांचा उपयोग करून राष्ट्रीय उत्पानाचे समान फेरवाटप लोक करून घेतील

सगळ्याच पाश्चिमात्य लोकशाही देशात लोक आपल्या मतांचा उपयोग उत्पादनाची साधने सामाजिक मालकीची करण्यासाठी करतील, सध्याच्या

मालकवर्गाला निपटून काढतील असे मला म्हणावयाचे नाही. काही देशात लोक तसे करतीलही; इतर देशात करणारही नाहीत. इतके मात्र निश्चित की, लोकशाही संस्थांचा उपयोग करून या ना त्या प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाचे समानतेच्या दिशेने फेरवाटप प्रगत लोकशाही समाजातील लोक करून घेतील. राष्ट्रीय उत्पन्नाचे समवाटप करण्याचे मार्ग एकापेक्षा अधिक आहेत असे अनुभवाने सिद्ध झाले आहे. उत्पादनाचा लाभ हा मालकांच्या खिशात न जाता तो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या बहुसंख्य लोकात वाटला जाईल अशा प्रकारे करांची आकारणी करणे हा एक चटकन् लक्षात येण्यासारखा मार्ग आहे. राजकीयदृष्ट्या प्रगल्भ पाश्चिमात्य समाजात या मार्गाने उत्पन्नाचे समवाटप मोठ्या प्रमाणावर आज केले जात आहे.

आपण एक तुलना करू. एका बाजूला पाश्चिमात्य देशातील कामगार घ्या आणि दुसऱ्या बाजूला साम्यवादी देशातील कामगार घ्या. पाश्चिमात्य देशातील कामगार हा नफ्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून चालविल्या जाणाऱ्या खाजगी जॉईंट स्टॉक कंपनीत काम करतो. या कामगाराला लोकशाही राजवटीला मतदानाचा व कामगार संघटनेत भाग घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. साम्यवादी देशातील कामगार सरकारी मालकीच्या कारखान्यात काम करतो. त्याला आपल्याला हवे ते सरकार निवडून देण्याचा हक्क नाही, आपल्या हितसंबंधांसाठी राजकीय संघटना उभारण्याचा, वा कामगार संघटना उभी करण्याचा अधिकार नाही, वा पगारवाढीसाठी संप करण्याचा अधिकार नाही. आपल्या श्रमातून निर्माण होणाऱ्या मूल्याचा अधिक वाटा स्वतःच्या उपभोगासाठी या दोहोपैकी कोणत्या व्यवस्थेतील कामगार पदरात पाडून घेऊ शकेल असे तुम्हाला वाटते ? याचे उत्तर अनुभवाने स्पष्ट झाले आहे. खाजगी मालकीच्या, नफ्यासाठी चालविलेल्या कारखान्यात काम करणाऱ्या, पण लोकशाही हक्क प्राप्त असलेल्या कामगाराला आपले जीवनमान सुधारण्याची संधी अधिक राहील.

## साम्यवादी राज्यशास्त्र आणि पाश्चिमात्य उदारमतवादी राज्यशास्त्र याच्यांत असलेला भेद मूलगामी आहे

एकापेक्षा अधिक राजकीय पक्ष संघटित करण्याचे स्वातंत्र्य असल्याखेरीज

खऱ्या अर्थाने आपणास हवे ते सरकार निवडून देण्याचा लोकशाही अधिकार जनतेला प्राप्त होऊ शकत नाही अशी आम्हा पाश्चिमात्यांची धारणा आहे. प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांचे स्वरूप, कार्य व महत्त्व याविषयी साम्यवादी राज्यशास्त्र आणि पाश्चिमात्य उदारमतवादी राज्यशास्त्र यांच्यात असलेला भेद मूलगामी आहे. या विषयीची साम्यवादी भूमिका काय आहे ते प्रथम पाहू.

प्रत्येक राजकीय पक्ष हा कोणत्यातरी एका सामाजिक वर्गाचा, किंवा प्रसंगी उपवर्गाचा प्रतिनिधी असतो, त्या वर्गाच्या 'कार्यकारीमंडळा'सारखा असतो अशी भूमिका मार्क्सवादात घेतलेली आहे. हा सिद्धान्त एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश राजकीय जीवनाला लावल्यास असे म्हणता येईल की, टोरी पक्ष हे जमीनदारांचे, लिबरल पक्ष हे कारखानदारांचे, आणि चार्टिस्ट गट हे कामगार वर्गाचे 'कार्यकारीमंडळ' होते. राजकीय पक्षांविषयी यार्क्सवादी भूमिका ही फाजील स्थूल आहे हे वरील प्रतिपादनावरून स्पष्ट होते. आजच्या वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या घडणीचा अभ्यास केलात तर कोणता पक्ष कोणत्या सामाजिक वर्गातून उदयास आला ते काढता येते. लहान शेतकऱ्यांचा पक्ष, जमीनदारांचा पक्ष, कामगारांचा पक्ष, मध्यमवर्गीयांचा पक्ष, असे प्रत्येक पक्षाचे वेगवेगळे विश्लेषण करता येईल. आता ब्रिटन व अमेरिका या देशात, जिथे शेवटी दोनपेक्षा अधिक पक्षांना यशस्वी होण्याचा वाव नाही, प्रत्येक पक्ष हे वेगवेगळ्या वर्गांच्या वा उपवर्गांच्या हितसंबंधाचे कडबोळे असणार हे उघड आहे. ब्रिटिश मजूर व कॉन्झर्व्हेटिव्ह या दोन्ही पक्षांबद्दल ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती आहे. अमेरिकेतीलही रिपब्लिकन व डेमॉक्रॅटिक पक्षांची घडण अशीच भेसळीची आहे. अशा पक्षांच्या बाबतीत पुरेसे खणलेत तर या पक्षांची वेगवेगळी 'वर्ग'मुळे तुमच्या हाती लागू शकतील.

## साम्यवाद्यांचे म्हणणे, समाजात वर्ग एकच तर मग पक्षहि एकच

साम्यवादी पुढे मग असे म्हणतात की, 'असे जर आहे, आणि साम्यवादी क्रांतीनंतर देशात कामगारांचा एकच वर्ग अस्तित्वात राहणार असेल, तर

मग देशात एकापेक्षा अधिक राजकीय पक्षांची गरज कोठे उरते? जर समाजात वर्ग एकच तर मग पक्षहि एकच. म्हणूनच आम्ही कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर कोणत्याहि पक्षाला आमच्या देशात वाव देत नाही. साम्यवादी राष्ट्रातील लोकांना एकाहून अधिक राजकीय पक्षांमध्ये संघटित होण्याची गरज असल्याचे पाश्चिमात्य टीकाकार सारखे म्हणत असतात तो केवळ त्यांच्या अज्ञानाचा परिणाम होय.

## मर्मस्थानीच सदोष प्रतिपादन

हे साम्यवाद्यांचे प्रतिपादन मर्मस्थानीच सदोष आहे. प्रत्येक वर्ग हा आपले हितसंबंध साधण्यासाठी **एकच** पक्ष उभारतो. या गृहीत कृत्यामधून असे फलित निघते की, एकच सामाजिक वर्ग असलेल्या समाजात एकाहून अधिक राजकीय पक्ष संघटित करण्याची कोणाची इच्छाच असणार नाही. असे जर आहे तर मग प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या निर्मितीवर **बंदी** घालण्याची काय गरज? जे करण्याची कोणाला इच्छाच होणे संभवनीय नसल्याचे तुम्ही सैद्धान्तिकदृष्ट्या सिद्ध केलेत ते करणाऱ्याला कडक शासन करण्याचे भय दाखविण्याची गरज का वाटावी? साम्यवादी राज्यशास्त्र निर्दोष असेल तर रशियन लोकांनी कम्युनिस्ट पार्टीव्यतिरिक्त दुसरे राजकीय पक्ष उभे करण्यास **बंदी** घालण्याच्या धोरणाची गरजच रशियन सरकारला वाटायला नको होती.

आता सर्वांनाच हे ठाऊक आहे की, सुप्रीम सोव्हिएट या सर्वोच्च राजकीय संस्थेसाठी कम्युनिस्ट पार्टीच्या उमेदवाराविरुद्ध प्रतिस्पर्धी पक्षाचे उमेदवार उभे करण्याची मुभा दिली जाईल असे कळण्याचा अवकाश की रशियन जनता ताबडतोबीने प्रतिस्पर्धी राजकीय पक्ष संघटित करील. याचे एक कारण असे की, आद्यापहि रशियात एकापेक्षा अधिक वर्ग आहेत. शेतीचे सामुदायीकरण रद्द करावे या एकाच कार्यक्रमावर सर्व शेतकरी ताबडतोब आपला एक राजकीय पक्ष स्थापन करतील. रशियातील लोकसंख्येपैकी पन्नास टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शेतीवर गुजराण करीत असल्याने अशा राजकीय पक्षाची मागणी मंजूर होईल असे मला वाटते. अशी मागणी मंजूर होण्याने रशियाच्या आर्थिक विकासाला त्याचा खूप लाभ होईल. आज

अन्नधान्याचा तुटवडा ही रशियात कायमची समस्या बनलेली आहे. ती समस्याही सुटेल. पोलंडमध्ये त्यांनी शेतीचे सामुदायीकरण करण्याचा प्रयत्न सोडून दिल्यावर तिथल्या अन्नधान्य परिस्थितीत चांगलीच सुधारणा झाली.

पण पुढे जाऊन मला असेहि वाटते की, समजा जरी रशियात वर्गविहीन समाज प्रस्थापित झाला तरी तेथील जनता एकापेक्षा अधिक राजकीय पक्ष संघटित करेल. त्यांना तसे स्वातंत्र्य असले तर प्रत्येक राजकीय पक्ष हा विशिष्ट वर्गाचे प्रतिनिधित्व करतो हा राजकीय पक्षांविषयीचा सिद्धान्त फार ढोबळ व सदोष आहे असे अनुभवाने सिद्ध होत आहे. रशियातील कामगार वर्गातहि वेगवेगळे मतप्रवाह आढळतील आणि हे मतप्रवाह प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या झेंडयाखाली संघटित होतील असे उलट मला वाटते.

एकवर्गीय किंवा वर्गविहीन समाजातील प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांचे स्वरूप व कार्यक्रमभिन्नता काय असेल ? त्यांच्यात मतभिन्नता व्हावी अशा पुष्कळ गोष्टी असतील. वर्गविग्रह हेच लोकांमधील मतभेदाचे एकमेव कारण आहे अशी जी साम्यवाद्यांची समजूत आहे ती प्रत्यक्ष व्यवहारातले मार्गदर्शक तत्त्व म्हणून अतिशय दिशाभूल करणारी आहे. जगाचे व्यवहार यापेक्षा कितीतरी गुंतागुंतीचे आहेत.

## वर्गविहीन समाजात मतभेद शिल्लक राहणार नाहीत म्हणणे अत्यंत चुकीचे

वर्गविग्रह तीव्र असलेल्या समाजातून, गुलामांवर व भूदासांवर आधारलेल्या समाजातून, वेगवेगळ्या वर्गांचे हितसंबंध इतके परस्परविरोधी असतात की, लोकशाही संस्था समाधानकारकपणे काम करण्यासाठी जी परस्परसहिष्णुता आणि सामंजस्य भिन्नभिन्न वर्गात पाहिजे असते ते या समाजात असत नाही. आजहि, वर्गविग्रह पूर्वीच्या मानाने फार कमी असूनहि, काही काही वेळा परस्परविरोधी हितसंबंधांवर आधारलेले असल्यामुळे राजकीय मतभेदांना इतका पीळ पडतो आणि संघर्ष इतका कडवट बनतो की तडजोड होऊ शकत नाही. आणि तडजोडीच्या मार्गानेच तर शेवटी लोकशाहीचे कामकाज चालते. पण एवढ्यावरून वर्गविहीन समाजात कोणतेहि मतभेद शिल्लक राहणार नाहीत या निर्णयाला येणे अत्यंत चुकीचे होईल.

अनुक्रम 63870 वि: विवध
क्र. 9876 नों: दि: 2-3-79

उलटपक्षी, वर्गविग्रहाची तीव्रता कमी झाली आणि मतभेदाचे मुद्दे गौण बनले, किंवा वर्गविग्रह अजिबातच संपुष्टात आला, म्हणजे मग राजकीय मतभेद हे सौम्य बनतील, त्यांच्यात समझौता घडवून आणणे शक्य होईल; आणि तेथून मग लोकशाहीचा खरा लाभ मिळू लागेल. प्रतिस्पर्धी पक्ष हे विरोधी वर्गांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व न करता समविचाराच्या मंडळीतीलच भिन्न भिन्न प्रवाहांचे प्रतिनिधित्व करू लागतील तेव्हा लोकशाहीचे खरे दिवस येतील.

## वर्गविहीन लोकशाहीतील पक्षाना वेगळे ठेवणारे मतभेद कोणते

वर्गविहीन लोकशाही समाजातील पक्षांना वेगळे ठेवणारे असे कोणते मतभेद असतील? (वर्गविहीन लोकशाही समाज अजून कोठे अस्तित्वात आलेला नाही. हे इथे लक्षात ठेवायला हवे.) अलिकडेच एका भारतीय अधिकाऱ्याने काढलेल्या उद्गारांवरून अशा भावी समाजाची कल्पना येऊ शकेल. भारतात आज आर्थिक विकासाच्या वेगाचे प्रमाण किती असावे यावरून मतभेद असलेल्या राजकीय पक्षांची गरज आहे. एक पक्ष आर्थिक विकासाचा वेग ६ टक्के असावा असे म्हणेल; तर दुसरा ८ टक्केवाला असेल. भारताच्या दृष्टीने एकमेव निर्णायक महत्त्वाचा मुद्दा हाच आहे. ६ टक्के की ८ टक्के, या दोन टक्क्यांमध्ये जे अंतर आहे ते फार मोठे आहे. अत्यंत दूरगामी राजकीय व सामाजिक परिणाम होतील असे निर्णय क्षुल्लक दिसणाऱ्या या अंतरामध्ये दडलेले आहेत. ६ टक्क्यांऐवजी भारताच्या आर्थिक वृद्धीचा वेग ८ टक्के करायचा प्रयत्न केला तर सर्वसामान्य भारतीय जनतेच्या जीवनावर त्या निर्णयाचा फार खोलवर व दूरवर परिणाम होणार आहे. जास्त वेगाने आर्थिक वाढ साधावयाची असल्यास आजच्या घटकेला फार मोठा त्याग व बलिदान करायची तयारी करावी लागेल. भारतीय सामाजिक जीवनाची जी एक परंपरागत घडी आहे ती उध्वस्त करावी लागेल. जर वाढीचा वेग कमी केला तर आज त्यागहि फार करावा लागणार नाही, सामाजिक जीवनाची स्थिरताहि फार बिघडविली जाणार नाही. पण मग येत्या दहा वर्षांत आर्थिक विकासाच्या क्षेत्रात फार मोठी कामगिरीहि पण

हातून घडणार नाही. ज्यांना जलद गतीने देशाचा विकास व्हावा असे वाटते अशा उत्साही, जहाल मंडळींचा एक पक्ष बनेल; मवाळ आणि नेमस्त मंडळींचा दुसरा पक्ष बनेल. या दोन पक्षांतील सत्तास्पर्धेतून व विचार-विमर्शातून आर्थिक वृद्धीचा एक सम्यक् वेग हाती येईल इतकेच नव्हे, ( माझ्या मित्राच्या मते हे प्रमाण ७ टक्के इतके आहे ) तर आपल्यासमोर असलेल्या आव्हानाचीहि सम्यक् जाणीव भारतीय जनतेला त्यामधून प्राप्त होईल.

## आर्थिक समस्येवरून भिन्न मतांचे पक्ष निर्माण होतील

वर्गविहीन समाजात अशा स्वरूपाच्या आर्थिक समस्येवरून भिन्न मतांचे पक्ष निर्माण होतील आणि त्यांच्यात रस्सीखेच चालेल. पण समाजजीवनात केवळ आर्थिक प्रश्नच असत नाहीत. उलट परिस्थिति अशी आहे की, संपन्न समाजात आर्थिक क्षेत्राबाहेरील प्रश्नांचे महत्त्व समाजाला अधिक वाटेल. उदाहरणार्थ, मुलांना शिक्षण किती मिळावे, त्याचा भर कला व मानव्य विद्यांवर असावा की विज्ञानावर असावा, की दोन्हीचे समान मिश्रण असावे ? संघटित अर्थसंस्थेच्या बाबतीत राज्यसत्तेने तटस्थ, शत्रूत्वाची की साहाय्याची कोणती भूमिका घ्यावी ? राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्य हे कायम अगदी विशुद्ध राखायचे की राष्ट्रसत्तांचे विलीनीकरण अधिक बृहद संघराज्यात वा इतर कोणत्यातरी संघटनेत करायचे ? आंतरराष्ट्रीय संघ-टनेच्या नियंत्रणाची रक्षणरेषा कोणती ? वर्गविहीन समाजातहि मतभेदाला पुष्कळ जागा असेल आणि प्रतिस्पर्धी पक्षनिर्मितीला खूप वाव असेल हे थोड्या विचारांती स्पष्ट होते.

विसाव्या शतकातील साम्यवादी समाजांबद्दल भावी इतिहास काय म्हणेल ? आर्थिक विकास व लष्करी सामर्थ्य या क्षेत्रातील त्यांची कामगिरी वाखाणल्याजोगी होती, पण अद्वितीय नव्हे असा निवाडा इतिहास देईल. शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसाराला पुरेसे अग्रगण्य स्थान देणारा पहिला समाज म्हणूनहि श्रेय त्यांच्या वाट्याला येईल. पण आपल्याच समाजातील नाग-रिकांवर केलेल्या कमालीच्या जुलमजबरदस्तीमुळे या सर्व कामगिरीवर पाणी पडले असेहि इतिहास म्हणेल. विशेषतः १९३० नंतरची आठ-दहा वर्षे

रशियाला नरकाचेच स्वरूप प्राप्त झाले होते. आजवर इतर कोणत्याहि सरकारने केले नसतील असे भयंकर गुन्हे स्टालिनच्या कारकीर्दीत रशियात घडले आणि प्रजेला नरकयातना भोगाव्या लागल्या. आणि, आजहि पूर्व जर्मनीसारख्या देशातून लोकांनी आपली घरेदारे सोडून पळून जाऊ नये म्हणून साम्यवादी राजवटींना देशाभोवती भिंती उभाराव्या लागतात, आणि सबंध देशाचा एक तुरुंग बनवावा लागतो.

याच कालात जगातले जे दुसरे विराट कम्युनिस्ट राष्ट्र चीन तेहि आपल्या शेतीविषयक धोरणात अशा काही अघोरी चुका करीत आहे की, कोव्यावधि लोकांना उपासमार घडून ते मरणाच्या उंबरठ्यावर जीवन जगत आहेत.

या भीषण आपत्ति आहेत; पण, एक विसरू नका, या आपत्ति या साऱ्या मानवजातीवर कोसळलेल्या आपत्ति आहेत, केवळ साम्यवादी समाजांपुरत्याच त्या मर्यादित नाहीत. कारण अशा दुर्दशावस्थेत सापडलेली साम्यवादी राष्ट्रे उतावीळ व बेवर्तनखोर बनतात आणि त्यांच्या या वागण्यामुळे पाश्चिमात्य समाजात साम्यवादी समाजांबद्दलची घृणा ही अधिकच तीव्र बनते. या क्रियाप्रतिक्रियेतून संघर्ष उग्र बनत जातो; आजच्या आण्विक शस्त्रास्त्रांच्या युगात उग्र संघर्षाने मानवसंस्कृतीच्या विध्वंसक विनाशाची शक्यता जवळ येते. अंतिमतः, लोकशाही संस्थांच्या अभावामुळे साम्यवादी समाजांवर या अनर्थावह आपत्ति कोसळल्या आहेत. जनतेला तुम्ही मूलभूत स्वातंत्र्ये देणार नसलात तर मग लोकांना मेंढरांसारखे हाकण्याशिवाय दुसरा मार्ग नाही; आणि असे दिसते की लोकांना 'हाकून' जे सरकार राज्य करते ते त्या लोकांना आपत्तींच्या खाचखळग्यातूनच नेत राहते.

## साम्यवादी सरकारांनी साधने अघोरी वापरूनहि त्यांच्या हाती डोंगर पोखरून उंदीर लागला

आपल्यावर कोसळलेल्या सर्व आपत्तींवर मात करून रशिया हा अग्रेसर साम्यवादी समाज ही आज एक यशस्वी, बलाढ्य व संपन्न राष्ट्रसत्ता बनली आहे. असे जर आहे तर मग, रशियन लोकांना चुकवाव्या लागलेल्या या जबर किंमतीबद्दल आकांडतांडव करणे खरोखरच अनाठायी नव्हे का ? या प्रश्नाला तक्रार करणेच योग्य असे उत्तर आहे. कारण इतकी जबर किंमत

देऊन जे साधले ते फारसे अलौकिक नाही. इतरहि बिगर-साम्यवादी विकासशील राष्ट्रसत्तांनी रशियाच्या तोडीची कामगिरी केल्याची उदाहरणे आपणास देतायेण्यासारखी आहेत. सार्वत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रातील रशियाची कामगिरी सोडली तर बड्या व बलाढ्य राष्ट्रात रशियाच्या उत्कर्षाने आणखी एकाची भर पडली आहे एवढेच. या कामगिरीच्या मानाने द्यावी लागलेली किंमत अवाजवी आहे. साम्यवादी सरकारांनी साधने अघोरी वापरली; आणि एवढा डोंगर पोखरून त्यांच्या हाती उंदीर लागला असे झाले.

साम्यवादी राजवटीबद्दल निवाडा करताना इतिहास इतरांना लावील त्याहून अधिक उच्चतर कसोट्या लावील, आणि तशा कसोट्या लावणे हे अटळहि आहे. कारण स्वतः साम्यवाद्यांनी आपली ध्येये फार उच्च असल्याच्या घोषणा वारंवार केल्या आहेत. मानवी इतिहासात इतक्या उच्च ध्येयाने प्रेरित होऊन कोणत्याच राजवटीने आपल्या कारकीर्दीला प्रारंभ केला नव्हता. साम्यवाद्यांनी सुरवात तर प्रति स्वर्ग निर्माण करण्याची घोषणा करून केली. विशेष काही ध्येय डोळ्यांसमोर न ठेवता राज्य करणाऱ्या इतर सामान्य राजवटीपेक्षा आपली परीक्षा उच्चतर कसोट्यांवर आणि अधिक कसोशीने होईल हे साम्यवाद्यांनी मान्य केले पाहिजे. विसाव्या शतकात इतक्या लोकांचा इतका मोठा अपेक्षाभंग दुसऱ्या कोणी केला नसेल. त्यांच्या हातून घोर प्रमाद घडले म्हणून ते आपल्यापासून वेगळे पडत नाहीत. पण साम्यवाद्यांना क्षमा करणे लोकांना कठीण अशासाठी जाते की एकेवेळी साऱ्या जगाचे ते आशास्थान होते. शेक्सपिअरने म्हटले आहे: "Lilies that fester smell far worse than weeds..." (तणाचा नाही इतका सडलेल्या लिलींचा वास घाण मारतो.)

• • •

# ९ लोकशाहीच्या मर्यादा

साम्यवादी समाजात लोकशाही संस्थांचा अभाव असल्याकारणाने आधुनिक जगातील अनेक शोकांतिकांचा जन्म झाला असल्याचे मी म्हटले. मानवजातीला पिडणाऱ्या सर्व रोगांवर लोकशाही हे रामबाण औषध आहे असे मी सुचवीत आहे असा समज करून घेऊ नये. लोकशाहीमध्ये अशी काही जादू नाही.

याचे एक कारण असे आहे की लोकशाही राज्यव्यवस्था सर्व देशात काम दतेच असे नाही. लोकशाही संस्था यशस्वीपणे राबविण्यासाठी जी राजकीय प्रगल्भता आवश्यक आहे ती अद्यापहि बऱ्याच देशांच्या समाजातून आढळत नाही ही सत्य परिस्थिति आहे. असे म्हटले म्हणजे नवोदित राष्ट्रातल्या लोकांना राग येतो. त्यांना राग वाटणे मी समजू शकत असलो तरी, या राष्ट्रातून लोकशाही संस्था काम करू शकत नाही याचा पुरावा दर महिन्यागणिक आपणाजवळ गोळा होत आहे.

पूर्वीच्या वसाहतीतील जनता स्वराज्यास पात्र नाही असा हा निष्कर्ष नाही. उलटपक्षी, नवोदित राष्ट्रांपैकी अनेक राष्ट्रे आपला राज्यकारभार यशस्वीपणे चालवीत आहेत. पण यापैकी बहुतेक राष्ट्रात मूलतः लोकशाही-विरोधी राजवटी असून या राजवटी हटवायच्या असतील तर बेसनदशीर, हिंसक मार्गांनीच ते काम होऊ शकेल अशी परिस्थिति आढळते. या देशातील जनता लोकशाही स्वीकारीत नाही तेव्हा त्यांना स्वातंत्र्यच द्यायला नको होते असे म्हणणे चुकीचे होईल. तसाच विचार केला तर इतिहासकालातील अगदी

अलिकडेपर्यंतच्या सर्वच राजवटी लोकशाहीविरोधी, अनियंत्रित राजसत्ता राहिलेल्या आहेत. म्हणून या नवोदित राष्ट्रांना स्वातंत्र्य देणेच योग्य होते. पण स्वतंत्र झाल्या झाल्या या राष्ट्रातून लोकशाही स्थापन व्हायला हवी होती ही अपेक्षा आपण ठेवू शकत नाही, इतकाच याचा अर्थ होतो.

हे सर्व विस्ताराने मांडण्याची आवश्यकता अशासाठी की, साम्यवादी विचाराची मंडळी या राष्ट्रातील जनतेची राजकीय अप्रगल्भता ही त्या राष्ट्रांना स्वातंत्र्य न देण्यासाठी एक कारण म्हणून दाखवितात. आफ्रिका खंडातील गोरे वसाहतवाले विशेषकरून आपले अधिराज्य कायम ठेवण्यासाठी या भूमिकेचा आधार घेत असतात. लोकशाही मार्गांनी आपले स्वराज्य चालविता येत नाही म्हणून त्या लोकांवर परकीयांनी राज्य करीत रहावे या भूमिकेचे समर्थन कसे होऊ शकेल? एकीकडे हे जसे खरे तसेच हीहि गोष्ट खरी की, स्वातंत्र्य मिळाल्याक्षणी उत्साहाच्या भरात नवोदित राष्ट्रे लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार करतात; पण फार काळ लोकशाही राज्यव्यवस्था यशस्वीपणे ते राबवू शकत नाहीत.

तात्पर्य असे की तद्देशीय लोकांचे राज्य या मर्यादित अर्थानेच स्वराज्याची प्राप्ति या देशातील लोकांना होते. प्रगत लोकशाहीमध्ये लोक जितके अप्रत्यक्ष नियंत्रण ठेवतात तितक्या मर्यादित अर्थानेहि या देशातून लोकांचे सरकारवर नियंत्रण असत नाही. म्हणजे त्या अर्थाने लोकांना स्वराज्य मिळत नाही. पूर्वीच्या साम्राज्यवादी सत्तेची अनियंत्रित राजवट कायम ठेवायची की आपल्याच पक्षाच्या एखाद्या नेत्याची सर्वाधिकारशाही स्वीकारायची या दोन पर्यायांमधून फक्त निवड करण्याची संधी वस्तुतः या लोकांना उपलब्ध असते असे अनुभवान्ती दिसून येत आहे. स्वाभाविक या राष्ट्रांची जनता साम्राज्याची वसाहत म्हणून राहण्यापेक्षा स्वतःच्या नेत्याची सर्वाधिकारशाही पसंत करीत आहे. आणि त्यांचे ते करणे बरोबरहि आहे असे मला वाटते. जुन्या साम्राज्यवादी अनियंत्रित राज्यसत्तेपेक्षा हे नवे सरकार पुष्कळवेळा अधिक अकार्यक्षम शाबीत होते. पण ते सरकार **त्यांचे** असते. दुसरी गोष्ट अशीहि आहे की पूर्वीचे साम्राज्यवादी सरकार हे कार्यक्षम असले तरी या कार्यक्षमतेचा उपयोग साम्राज्यवादी सत्तेच्या वा गोऱ्या वसाहतवाल्यांच्या फायद्यासाठी

करून घेतला जाई. सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी जुनी साम्राज्यवादी सत्ता फारसे काहीच करीत नसे.

## लोकशाहीसाठी आवश्यक त्या प्राथमिक शर्ती पूर्ण झालेल्या नसल्या तर लोकशाही संस्थांचा कारभार असमाधानकारक ठरतो

लोकशाहीची एक फार मोठी मर्यादा यातून सूचित होते. जगाच्या एका मोठ्या भागाला ही राज्यपद्धति आज लागू करता येत नाही. या राज्य-पद्धतीच्या अस्तित्वासाठी ज्या प्राथमिक गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक आहे ती झालेली नाही. वेगवेगळ्या उदाहरणांवरून दोन प्रकारांनी ही गोष्ट सिद्ध झाली आहे. साम्राज्यवादी सत्तेचा अंत समीप येतो त्या काळात किंवा स्वातंत्र्य मिळाल्यामिळाल्या लोकशाही संस्थांची निर्मिति त्या देशात केली जाते. पण लोकशाहीसाठी आवश्यक त्या प्राथमिक शर्ती पूर्ण झालेल्या नसल्या तर या लोकशाही संस्थांचा कारभार अतिशय असमाधानकारक ठरतो. पुढील-पैकी कोणतीतरी एक गोष्ट मग घडते. मध्य पूर्वेतील देशात जेव्हा प्रौढ मतदानाचा अधिकार लोकांना देण्यात आला तेव्हा जमीनदारांची 'माल-गुजार'शाही किंवा मुखिया शेख लोकांची झब्बूशाही अस्तित्वात आली. मताचा हक्क सर्वांना मिळाला खरा पण बहुसंख्य अडाणी जनतेला मतदानाचा अर्थच समजू शकत नसल्याने आपल्या जमीनदाराचे किंवा मुखिया शेखचे ऐकायचे आणि मत द्यायचे असा प्रकार त्यांनी केला. त्यांचे मतदान हे शेख लोकांनी, सरंजामदार वर्गाने 'करवून' घेतले. अशा प्रकारे लोकशाही राज्य-पद्धतीने या देशांच्या विकासात अडथळाच निर्माण झाला. यापैकी अनेक देशात आधुनिक दृष्टि असलेला व देशाची प्रगति घडवून आणू इच्छिणारा एक मध्यमवर्ग अस्तित्वात आलेला आहे पण लोकशाही निवडणुकांमध्ये या वर्गाचे जुन्या सरंजामदारी वर्गापुढे काही चालत नाही.

## ईजिप्तचे उदाहरण

या घटनेचे ईजिप्त हे फार चांगले उदाहरण आहे. प्रौढ मतदानावर आधारलेल्या पूर्वीच्या राजवटीपेक्षा नासरची लष्करी सर्वाधिकारशाही ही

अधिक कार्यक्षम व प्रागतिक ठरत आहे याविषयी मला शंका वाटत नाही. कारण पूर्वी ईजिप्तमध्ये निवडणुका होत असल्या तरी ईजिप्तमधील कोणतीच राजवट ही खऱ्या अर्थाने जनतेची प्रतिनिधि राजवट नव्हती. जमीनदार वर्गाच्या हातातील कळसूत्री बाहुली, यापलीकडे मतदारांना काही स्थान त्या काळी प्रत्यक्षात नव्हते.

दुसऱ्या काही देशातून लोकशाही संस्था एका अधिक सोप्या पद्धतीने मोडकळीला येतात. कोणतातरी एक विशिष्ट वर्ग आपल्या परंपरागत प्रतिष्ठेचा व वर्चस्वाचा फायदा घेऊन राज्यसत्तेवर आपली मक्तेदारी प्रस्थापित करतो असे नाही तर किमान कार्यक्रम व चोख सरकारच निवडून देण्यास निवडणुकीचा मार्ग यशस्वी होत नाही. लोकशाही पद्धतीने सरकार कसे चालवायचे किंवा प्रस्थापित सरकारला विरोध कसा करावयाचा यापैकी कोणतीच गोष्ट त्या देशातील राजकीय पक्षांनी शिकलेली नसते; त्यासाठी आवश्यक ती पथ्ये वा शिस्त पाळण्याची त्यांची तयारी नसते.

## आफ्रिकी देशापुढील कठिण अडचणी

अलीकडे मी आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलो होतो. लोकशाही संस्था यशस्वी करण्याच्या प्रयत्नात या राष्ट्रांना कोणत्या कठीण अडचणीना तोंड द्यावे लागते त्याची मला कल्पना आली. 'विरोधी नेता' या वाक्प्रयोगाचे भाषांतर 'प्रमुख शत्रू' या खेरीज दुसऱ्या कोणत्याच प्रकारे होऊ शकत नाही अशी कित्येक भाषांची अडचण आहे ! भाषा माणसाचे विचार घडविते, बंदिस्त करते, आणि उलट, विचाराने भाषा घडते. जर विरोधी राजकीय पक्षाच्या नेत्याला 'प्रमुख शत्रू' या खेरीज दुसऱ्या संबोधनाने हाक मारणे शक्य नसेल तर देशाचा कारभार सुरळीत राखण्यासाठी आवश्यक ती देवाण-घेवाण, तडजोड विरोधी व सत्तारूढ पक्षात कशी घडून यावी ? इंग्लंडमध्ये 'राणी सरकारच्या स्वामिनिष्ठ विरोधी पक्षाचे पुढारी' असे विरोधी नेत्याचे संबोधन आहे. मी ज्या राजकीय पक्षाचा सभासद आहे तो राजकीय पक्ष आज ( १९६३ ) विरोधात आहे. आमच्या पक्षाच्या पार्लमेंटमधील नेत्याला उद्देशून वरील संबोधन वापरण्यात येते. आणि प्रस्थापित सरकारला विरोध करण्याचे कार्य पार पाडण्याबद्दल या नेत्याला सरकारकडून तनखाही पण

मिळतो. सरकारकडून पगार खातो तेव्हा सरकारच्या ध्येयधोरणांना या नेत्याचा विरोध हा कागदी, वरवरचा असणार, उत्कट व सच्चा असणार नाही अशी कोणी समजूत करून घेतली तर ती सपशेल चुकीची आहे. मजूर पक्षाचे आम्ही सर्व पार्लमेंटचे सभासद कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाला एकनिष्ठ नाही. ब्रिटिश लोकशाहीचे संरक्षण व जपणूक करण्यास मात्र आम्ही बांधलेले आहोत.

## राजकीय प्रगल्भतेची आवश्यकता

विरोध करीत असतानाही राज्यव्यवस्थेशी एकनिष्ठ राहणे, राज्यकारभार सुरळीतपणे चालावा म्हणून स्वतःवर बंधने घालून घेणे, या प्रकारची एक गुंतागुंतीची रचना समजण्यासाठी, ती राबविण्यासाठी राजकीय प्रगल्भतेची आवश्यकता असल्याचे तुम्ही मान्य कराल असे मला वाटते. ही राजकीय प्रगल्भता तत्काल प्राप्त होणार नाही. त्याला दीर्घ कालावधी लागेल. प्रस्थापित सरकारला असणाऱ्या विरोधाला काही मर्यादा व बंधने आहेत ही कल्पनाच मुळी अविकासित देशातील लोकांना समजू शकणार नाही. विरोध आणि मग त्यावर बंधने कसली? असा प्रश्न या लोकांना पडेल. सर्वंकष विरोध करावयाचा तर त्याला मग क्रांतिकारकाचीच भूमिका घ्यावी लागेल. क्रांतिकारक राजकारण हे गुप्त संघटना आणि हिंसक साधने या द्वाराच चालविले जाऊ शकते. अशा राष्ट्रात विरोधी पक्षांचे राजकारण अल्पावधीच गुप्त, हिंसक व उत्पातकारी होते, तर सरकारी पक्ष दडपशाहीचा मार्ग स्वीकारतो. यातून राजकीय अस्थैर्य निर्माण होते. या अस्थिर परिस्थितीत मग कोणीतरी एक पोलादी पुरुष उदयास येतो. आणि वरकरणी लोकशाहीचा सांगाडा त्याने कायम ठेवला तरी प्रत्यक्षात कमीअधिक प्रमाणात एक अनियंत्रित सर्वाधिकारशाही त्या राष्ट्रात आकार घेते. घाना आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रात असेच काही घडल्याचे आपण पाहतो.

## लोकशाही संस्था राबविण्यास आवश्यक ती पूर्व तयारी झालेली नाही एवढेच सिद्ध होते

या देशांकडे तुच्छतेने पाहणे, किंवा या राष्ट्रांना स्वातंत्र्य देण्यातच चूक केली असे म्हणणे, या दोन्ही प्रकारचा दृष्टिकोन चुकीचा ठरेल असे मला वाटते. लोकशाही संस्थांच्या अपयशामुळे ज्या काही अनियंत्रित राज्यसत्ता अलीकडच्या काळात उदयास आल्या आहेत त्यापैकी काही राज्यसत्ता या प्रागतिक व कार्यक्षम शाबीत होत आहेत. या राष्ट्रांनी आपला राज्यकारभार चालवण्याचा काही एक मार्ग शोधून काढला आणि राजकीय स्थैर्य टिकवून धरले याबद्दल खरोखर आपण समाधानी असले पाहिजे. आजच्या परिस्थितीत लोकशाही संस्था राबविण्यास हे देश असमर्थ आहेत, त्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी त्यांची झालेली नाही एवढेच यावरून सिद्ध झाले असे म्हणता येईल. भांडवलशाहीतील लेनिनने जे भाकित केले, भांडवलशाही राष्ट्रात नेहमीच खरे ठरेल असे लेनिनला वाटले, ते भाकित या राष्ट्रांच्या बाबतीत आज खरे आहे. प्रगत व संपन्न भांडवलशाही समाजांमध्ये लेनिनचे भाकित खरे ठरलेले नाही. ब्रिटन, अमेरिका आणि पाश्चिम युरोपीय राष्ट्रातील कामगारवर्ग लोकशाही संस्थांचा प्रभावीपणे उपयोग करू शकतात आणि करतात. लोकशाहीचा अगदी आदर्श उपयोग ते करतात, किंवा नेहमीच शहाणपणाने उपयोग करतात वा मागाहून अनिष्ट वा घातक ठरणारे सरकार निवडून देण्याची चूक करीतच नाहीत असे नाही. पण सामान्यतः लोकशाही संस्थांचा उपयोग ते समाधानकारकरीत्या करून घेऊ शकतात. तसा उपयोग ते कधीच करून घेऊ शकणार नाहीत असा आग्रह धरणे म्हणजे सैद्धान्तिक निष्ठेतून आंधळेपण पत्करणे आहे. पण लेनिनचे म्हणणे खोटे ठरले त्याचे कारण असे की, भांडवलशाहीच्या उत्कर्षाबरोबर कामगार-वर्ग अधिक दरिद्री व विपन्न न बनता त्याची आर्थिक स्थिती सुधारत गेली, त्याच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले. पण ज्या समजातील बहुसंख्य जनता कर्मदरिद्री, अडाणी आहे त्या समाजात लोकशाही संस्था काम करण्यात अयशस्वी ठरत आहेत. याला काही अपवाद कोठे असतील ते आपण सोडू; पण सामान्यतः हा अनुभव वस्तुस्थितीला धरून आहे.

## यशस्वीपणे लोकशाही राज्य चालविणारा एक देश--भारत

लोकशाही राज्यव्यवस्था यशस्वी होण्यासाठी कोणत्या प्राथमिक शर्ती पूर्ण होण्याची आवश्यकता आहे ? लोकशाही संस्था राबवून घेण्याची शक्ती एखाद्या राष्ट्राला कशी प्राप्त होते ? या प्रश्नाचे उत्तर देणे अत्यंत अवघड आहे असे आपल्या अनुभवाला येईल. लोकशाही यशस्वी होण्यासाठी अमुक एका गोष्टीची आवश्यकता आहे असे नेमके बोट ठेवता येत नाही असे अनुभव सांगतो. बहुसंख्य मतदार शिक्षित असावेत किंवा विशिष्ट उत्पन्न असणाऱ्यांनाच मतदानाचा हक्क द्यावा म्हणजे लोकशाही यशस्वी होईल असे तुम्हास वाटेल. पण आज यशस्वीपणे लोकशाही राज्य चालविणारा एक देश असा आहे की, ज्या देशातली दोनतृतीयांश जनता निरक्षर आहे आणि ज्या देशातील दरडोई उत्पन्न अत्यंत निकृष्ट आहे. हा देश म्हणजे भारत. या उलट, दक्षिण अमेरिकेत या मानाने कितीतरी अधिक संपन्न असलेले देश आहेत—अर्जेंटिनासारखे— ज्या देशामध्ये साक्षरतेचे प्रमाणही अधिक आहे आणि दरडोई उत्पन्नहि ज्यांचे अधिक आहे. या देशांमध्ये लोकशाहीसंस्था निर्माण होऊन जवळपास शंभर वर्षेहि झाली. आणि तरीहि या देशातून लोकशाही टिकून राहू शकलेली नाही.

असे काही देश आहेत, ज्या देशातील वर्णसंघर्ष तीव्र आहे. दक्षिण आफ्रिकेत वर्णभेद अत्यंत कडक पाळला जातो. दक्षिण आफ्रिकेतील गौरवर्णीय जनता सुशिक्षित आहे व त्यांच्यामध्ये संपन्न लोकांचे प्रमाणहि मोठे आहे. पण आफ्रिकेत लोकशाहीसंस्था यशस्वी होऊ शकणार नाहीत. कारण तेथला तीव्र वर्णसंघर्ष.

## लोकशाही यशस्वी व्हावयाची तर समाजाची सांस्कृतिक पातळी वरच्या दर्जाची असावी लागते

लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर त्या समाजाची सर्वसाधारण सांस्कृतिक पातळी वरच्या दर्जाची असावी लागते एवढेच खरे तर आपण म्हणू शकतो. भारतात लोकशाही चालली त्याचे माझ्या मते हेच कारण आहे.

भारतातील बहुसंख्य जनता निरक्षर असली तरी भारतीय जनता सुसंस्कृत आहे. सार्वजनिक जीवनात सक्रिय भाग घेणारा, पुढारीपण करणारा मोठा मध्यमवर्ग भारतात आहे. हा मध्यमवर्ग उच्चशिक्षित व बुद्धिमान आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा लोकशाही राजकीय संस्थांचे एक जाळेच देशभर विणले गेलेलें होते हीहि गोष्ट आपल्याला ध्यानात घेतली पाहिजे. भारतातील ब्रिटिशांचे राज्य अनियंत्रित होते, सर्वाधिकारवादी होते; आणि भारतातील ब्रिटिश सत्तेचा वापरहि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी वा भारतीय जनतेच्या इच्छाआकांक्षाचा मान राखून केला गेला नाही. पण लोकशाहीसाठी अत्यावश्यक असलेल्या काही संस्था ब्रिटिशांनी भारतात फार आधीपासून निर्माण केल्या होत्या. अव्वल दर्जाची न्यायालये व न्यायासनाची पद्धत भारतात अस्तित्वात होती आणि या न्यायासनांचा निवाडा निःपक्षपाती असे. शाळा आणि विद्यापीठे यांचा प्रसार प्रथमपासून भारतात केला गेला. या शिक्षणपद्धतीतून भारतीय मध्यमवर्ग निर्माण झाला. कामगार संघटनांचे कार्य चालण्यास परवानगी होती. ती परवानगी फार खुषीने दिली गेली नसली तरी परवानगी होती. ब्रिटिश सत्तेच्या शेवटच्या काही दशकात देशात राजकीय स्वातंत्र्यहि होते. या राजकीय स्वातंत्र्याचा लाभ घेऊन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस संघटित होऊ शकली व तिने भारतीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश सत्तेबरोबर लढा दिला. काँग्रेसवर मधून मधून निर्बंध घालण्यात आले वा काँग्रेसच्या पुढाऱ्यांना तुरुंगवास भोगावा लागला या दोन्ही गोष्टी खऱ्या. पण पूर्णपणे ती संघटना दडपून टाकण्याचा प्रयत्न झाला नाही आणि धीरे धीरे मतदानाच्या हक्काचाहि विस्तार झाला. प्रथमतः प्रांतीय पातळीवर काही प्रमाणात स्वायत्तता मिळाली आणि शेवटच्या कालखंडात केंद्रीय पातळीवरहि काही अधिकार भारतीयांना प्राप्त झालेले होते.

## भारतात लोकशाही यशस्वी व्हावी ही गोष्ट विशेष महत्वाची

जेव्हा १९४७ साली भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले त्या वेळी लोकशाही राज्यव्यवस्थेचा एक साचा भारतात अस्तित्वात होता, सुप्रतिष्ठित होता. ब्रिटिश लोक नेहमीच आत्मसंतुष्ट असतात व स्वतःची स्तुति करीत असतात असे तुम्ही म्हणाल. तुमचे म्हणणे खरेहि असेल. त्याबाबतीत मला

निर्णय करणे कठीणच. लोकशाही यशस्वीपणे राबविण्यात डझनावारी राष्ट्रांना अपयश आले असता भारतात लोकशाही यशस्वी व्हावी ही गोष्ट मला विशेष महत्त्वाची वाटते. याचे प्रमुख श्रेय अर्थात भारतीयांनाच आहे. पण या श्रेयात थोडा भाग ब्रिटिशांनी ठेवलेल्या वारशाचाहि आहे असे मला वाटते.

ते काही असो एक सीमारेषा अशी जरूर आहे, ज्या सीमारेषेच्या वर असलेला देश लोकशाही राबवू शकतो आणि त्या रेषेखालचा देश हा लोकशाही राबवू शकत नाही. अन्यत्र मी रेषेची ही कल्पना पुढीलप्रमाणे विशद केली आहे. सागरी जहाजाभोवती एक रेषा काढलेली असते. या रेषेला प्लिमसोल रेषा अशी संज्ञा आहे. प्लिमसोल नावाच्या एका एकोणिसाव्या शतकातील पार्लमेंटच्या सभासदाच्या नावाने ही रेषा ओळखली जाते. जहाजावर ही रेषा आखलेली कायद्याने बंधनकारक ठरविणारा कायदा त्याने पास करून घेतला. ही रेषा पाण्यात बुडेल इतका माल जो भरेल त्याला जबर दंडाची शिक्षा ठरविण्यात आली. त्यावेळचे भांडवलदार मालक लोभाने जहाजातून भरमसाठ माल भरीत आणि अशा बोझाने जड झालेली जहाजे वादळात टिकाव धरू शकत नसत. म्हणून हा कायदा करावा लागला.

प्रत्येक देशाच्याहि दृष्टीने अशी एक प्लिमसोल रेषा कल्पिता येईल. त्या रेषेच्या वर देशाचे जहाज तरंगत असेल तर त्या देशात लोकशाही काम देईल असे आपल्याला म्हणता येईल. जर देशाच्या बिकट परिस्थितीने देशाचे जहाज ही रेषा पाण्यात बुडण्याइतके जड झालेले असेल तर त्या देशात लोकशाही राज्यव्यवस्थेस यश येण्याची शक्यता फार कमी. देशाची सामान्य आर्थिक, सामाजिक अवस्था दिग्दर्शित करणारी ही रेषा असेल. ही रेषा जर परिस्थितीच्या बोझ्याखाली बुडत असेल तर त्या देशात लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न निष्फळ ठरेल; केवळ निष्फळ ठरेल इतकेच नव्हे तर प्रसंगी अपायकारकहि ठरेल. अशा राष्ट्रातून या ना त्या प्रकारची सर्वाधिकारशाही, आणि त्या सर्वाधिकारशाही सोबत येणारे तोटे या दोन्ही गोष्टी अपरिहार्य आहेत. अनियंत्रित सर्वाधिकारशाही प्रस्थापित होऊ दिल्याबद्दल या देशांना बोल लावणे निरर्थक आहे. तेच ज्या देशाचे तारू या रेषेच्या वर तरंगत असेल, निरक्षरता, दारिद्र्य, वर्गविग्रह किंवा अन्य अशा आपत्तींनी

ज्या राष्ट्रांची कंबर मोडेपर्यंत वाकलेली नसेल, त्या राष्ट्रांना लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार करण्याने फार लाभ होईल.

लोकशाहीबद्दल दुसरी एक गोष्ट लक्षात घ्यावयाची ती अशी की लोकशाही एक अविभाज्य गोष्ट नाही; म्हणजे एकतर लोकशाही आहे तरी किंवा नाही तरी अशी अटीतटीची काही ती गोष्ट नाही. म्हणून सर्वसाधारण लोकशाहीबद्दल न बोलता मी लोकशाही संस्थांबद्दलच विवेचन करीत होतो. कायद्याचे अधिराज्य, भाषणस्वातंत्र्य, कामगार संघटनेचे स्वातंत्र्य, प्रतिस्पर्धी राजकीय पक्ष संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, खुल्या मतदानाचे स्वातंत्र्य, अशा विशिष्ट गोष्टींबद्दलच मी चर्चा केली. या सर्व वेगवेगळ्या गोष्टी मिळून लोकशाही बनते. हे खरे की शेवटी या सगळ्या गोष्टी अन्योन्याश्रयी आहेत. पण असे प्रदीर्घ कालखंड असू शकतात ज्यावेळी यापैकी काही गोष्टी एखाद्या देशात अस्तित्वात असतील, बाकीच्या नसतील आणि तरीहि तो देश व्यापक अर्थाने लोकशाहीत बसेल. कायद्याचे अधिराज्य प्रभावीपणे प्रस्थापित केलेल्या देशात भाषणस्वातंत्र्य नाही, किंवा खुल्या मतदानातून निवडलेले सरकार नाही अशी परिस्थिति असू शकते. राजकीय, निवडणुकाधारित लोकशाही राबविण्यात अयशस्वी झालेल्या घाना, पाकिस्तान या देशात कायद्याचे अधिराज्य बऱ्याच प्रमाणात आजहि टिकून असल्याचे आपण पाहतो.

पश्चिम युरोपीय देश आणि अमेरिका यांच्यातील लोकशाही राज्यव्यवस्था या सर्वांत जुन्या आणि त्यातल्या त्यात अधिक परिपक्व आहेत. या देशातील लोकशाहींचा इतिहास जरी तुम्ही पाहिलात तरी तुम्हाला असे आढळेल की तेथेहि पायरीपायरीने लोकशाहीचा विकास होत आला आहे आणि लोकशाहीच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्थांपैकी एकेका संस्थेची उभारणी एकेका कालखंडात झालेली आहे. अनेक शतके इंग्लंडमध्ये कायद्याचे अधिराज्य प्रभावी होते पण मतदानाचा अधिकार हा फार थोड्या लोकांकरताच मर्यादित होता. गेल्या शंभर वर्षांत कामगार-संघटना-स्वातंत्र्य सुप्रतिष्ठित करण्यासाठी द्याव्या लागलेल्या लढ्याची हकीकत मी सांगितली आहेच. नवोदित राष्ट्रात आज जी परिस्थिति आढळते त्या परिस्थितीची प्रगत लोकशाहीतील माणसाने टवाळी केल्यास त्यात त्या माणसाचे इतिहासाचे अज्ञानच प्रकट होत असते. या देशातून लोकशाही वैशिष्ट्यांपैकी काही

वैशिष्ट्ये टिकवून धरण्यात जरी प्रारंभीच्या आणीबाणीच्या काळात ही राष्ट्रे यशस्वी झाली तरी त्यांना त्यासाठी शाबासकी द्यायला हवी.

या पार्श्वभूमीवर साम्यवादी देशातील परिस्थिति पाहृयला हवी. सगळ्या पूर्व युरोपीय देशातून लोकशाही संस्था यशस्वीपणे राबविण्यास आवश्यक शर्तींची पूर्तता झालेली असूनहि त्या देशात हुकूमशाही राजवटी अस्तित्वात आहेत ही खरी शोकांतिका आहे. पोलिश, हंगेरियन, चेकोस्लोवाकियन, रुमानियन, बल्गेरियन वा रशियन जनता ही लोकशाही राज्ये यशस्वीपणे चालविण्याच्या दृष्टीने पुरेशी शिक्षित नाहीत, सुसंस्कृत नाहीत असे प्रतिपादन मूर्खपणाचे ठरेल. जगातील अतिशय बुद्धिमान व हरहुन्नरी लोकात ते मोडतात. राजकीय, आर्थिक व सामाजिक जीवनास आपणास हवा असलेला आकार देण्याचा अधिकार या लोकांना साम्यवादी आपल्या पोथीनिष्ठेखातर देत नाहीत. साम्यवादी पोथीनिष्ठेमुळे त्या राष्ट्रांचा सामाजिक विकास थोपवून धरला जावा ही फार शोकात्म घटना आहे.

लोकशाहीचा जगभर प्रसार होणे शक्य आहे का? अनेक देशात आज लोकशाही काम देणार नाही असे मी म्हटले त्याचा अर्थ लोकशाही राज्यव्यवस्था ही एका संक्रमणकालातील, पाश्चिमात्य गौरवर्णीय राष्ट्रांपुरतीच मर्यादित, राज्यव्यवस्था आहे असा होतो का? लोकशाहीचा प्रसार जगभर कधी होणार नाही असा याचा अर्थ होतो का? असा माझ्या म्हणण्याचा अर्थ होत नाही.

## लोकशाही ही भावी जगाची राज्यव्यवस्था आहे.

जगात ज्या देशांना भविष्याच्या दृष्टीने निर्णायक महत्त्व आहे त्या देशात लोकशाही यशस्वी होत आहे, दृढमूल होत आहे. जगातील प्रगत, संपन्न आणि बलाढ्य राष्ट्रात लोकशाही यशस्वी झालेली आहे. लोकशाही ही भावी जगाची राज्यव्यवस्था आहे ही गोष्ट यावरून सिद्ध होते.

साम्यवादी राष्ट्रातील जनता संपन्न जीवन जगू लागली, ती सुविद्य झाली म्हणजे साम्यवादी राष्ट्रांनाहि या ना त्या स्वरूपात लोकशाहीचा स्वीकार करावा लागेल अशी माझी श्रद्धा आहे. ब्रिटनमधील पार्लमेंटरी लोकशाहीचाच नमूना साम्यवादी वा मागासलेली राष्ट्रे स्वीकारतील असे नाही. अमेरिकेतील

प्रचलित अध्यक्षीय लोकशाहीचा प्रकार ते स्वीकारतील असेहि नाही. नवीन प्रकारच्या लोकशाही राजकीय संस्था निर्माण होतील. भौगोलिक क्षेत्रानुवर्ती राजकीय मतदारक्षेत्रांची संघटना न करता उत्पादक संघटनानुवर्ती ( कारखाने, शेते, इ. ) मतदार क्षेत्रे बनविण्याची रशियन साम्यवाद्यांची मूळ कल्पना होती असे दिसते. मी वर एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे ही कल्पना प्रयोग करून पाहण्याइतकी आकर्षक व अर्थपूर्ण आहे. प्रत्यक्षात लोकशाहीचा हा प्रकारच तेवढा रशियन साम्यवाद्यांनी बाद ठरविला असे नाही तर लोकशाहीच बाद ठरविली. पण रशियन जनतेला जेव्हा 'मत' प्राप्त होईल, निवड करण्याची संधि मिळेल, तेव्हा रशियन जनता या मूळ 'सोव्हिएट्स' कल्पनेचे पुनरुज्जीवन करेल अशी शक्यता आहे.

लोकशाहीची रूपे वेगवेगळी असू शकतात. पाश्चिमात्य देशातून जी एकदोन रूपे उत्क्रांत झालेली आहेत तीच कायमची असे नाही. लोकशाहीचे एक रूप दुसऱ्या रूपाहून मुळातच अधिक श्रेष्ठ आहे असे खरोखरी कोणी म्हणू शकत नाही. लोकांना निवड करण्याची खुली संधि असावी ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे.

लोकशाही हे सर्व प्रकारच्या प्रश्नांवरील रामबाण औषध नसले तरी लोकशाही राज्यव्यवस्था उद्याची राज्यव्यवस्था आहे या निष्कर्षावर मी येतो. जगाच्या सर्व कोनाकोपऱ्यात आज लोकशाही राज्यव्यवस्था दृढमूल होऊ शकत नाही या अर्थानेहि लोकशाहीच्या मर्यादा आहेत; आणि, समजा जरी लोकशाही राज्यव्यवस्था यशस्वी करण्यात सर्वत्र यश आले, तरी आजच्या युगाचे सर्वच गंभीर प्रश्न लोकशाही राज्यव्यवस्थेच्या स्वीकारामुळे सुटतील असे नाही.

लोकशाही ही उद्याच्या समाजांची राज्यव्यवस्था आहे असे मी म्हणतो. कारण प्रगत, व्यामिश्र समाजांचा कारभार, सुविद्य व सार्वजनिक जीवनात क्रियाशील असणाऱ्या समाजांचा कारभार चालविण्यास लोकशाही हीच राज्यपद्धति अनुभवाने श्रेष्ठ म्हणून सिद्ध झाली आहे. आजच्या जगात असे प्रगत, लोकशाही समाज हे प्रभावी व बलाढ्य असल्याने बाकीच्या जगाला ते मार्ग दाखविणार.

## लोकशाहीची मूलभूत श्रद्धा

लोकशाहीकडे आपण अगदी रूक्ष व्यवहार्य वृत्तीने आतापर्यंत पाहिले. अद्ययावत समाजांचा कारभार चालविण्याची एक सर्वोत्तम व्यवहार्य रीत एवढाच काही लोकशाहीचा आशय मर्यादित नाही. व्यक्तिमात्राची प्रतिष्ठा ओळखणारी, तिचा आदर करणारी, व्यक्तित्वाचे पावित्र्य अभंग राखणारी, लोकशाही ही एकच राज्यव्यवस्था आहे. शिक्षण, संधि, कर्तृत्व, या सर्व क्षेत्रात आज सामाजिक विषमता तीव्र आहे. प्रत्यक्ष व्यवहारात सर्व माणसे सारखी मानली जात नाहीत. पण या व्यवहारापलिकडेहि असे एक क्षेत्र आहे जिथे मानवमात्र हा एक समान आहे अशी लोकशाहीची मूलभूत श्रद्धा आहे. एक माणूस दुसऱ्या माणसाहून उपजत श्रेष्ठ असत नाही, एक राजवट दुसऱ्या राजवटींपेक्षा श्रेष्ठ असत नाहीं, या श्रद्धेचा लोकशाहीत आविष्कार आहे. लोकशाही ही स्वतंत्र मानवांची राजकीय जीवनपद्धति आहे.

• • •

# १० विश्वराज्य

आधुनिक प्रगत समाजांचा कारभार चालविण्याची लोकशाही ही इतर ज्ञात रीतींपेक्षा अधिक श्रेष्ठ रीत आहे. लोकशाहीत मानवजातीसमोरच्या सर्व प्रश्नांना उत्तरे नाहीत. मानवनिर्मित संस्थांची मर्यादा आपण ओळखून ठेवावी हे बरे. लोकशाहीसंबंधी विन्स्टन चर्चिलच्या वडीलांचे एक वचन माझे आवडते आहे. हाऊस ऑफ कॉमन्सच्या लॉबीतून रागाने बाहेर पडत असता तो म्हणत आहे, 'राज्यव्यवस्थेचा लोकशाही हा जगातला सर्वांत बेअक्कल प्रकार आहे, इतर सर्व राज्यव्यवस्थांपेक्षा तो शहाणपणाचा आहे हे सोडले तर —'

## प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र सार्वभौमत्व ही आण्विक युगात एक कालविसंगत घटना

लोकशाही हे सर्व प्रश्नांवरील रामबाण औषध नसण्याचे आणखी एक कारण आहे. जगातल्या सर्व राष्ट्रातून लोकशाही राज्यव्यवस्था प्रभावीपणे काम करू लागली, जे होणे एकंदरीत कठीणच, तरी तेवढ्याने भागायचे नाही. शंभर सव्वाशे लोकशाही राष्ट्रांचे मिळून बनलेले जग हे लोकशाही जग असले तरी ते त्यावेळीहि **वेगवेगळ्या स्वतंत्र सार्वभौम** राष्ट्रांचे मिळून बनलेले जग असेल. आण्विक युगात प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र सार्वभौमत्व ही एक कालविसंगत घटना आहे असे माझे मत आहे. ज्या आणीबाणीच्या काळात

आपण राहत आहोत त्या काळात स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रांच्या जगात मानवजातीचे जीवित सुरक्षित राहू शकणार नाही.

लोकशाही आणि युद्ध यांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न इथे उपस्थित होतो. युद्धे कायमची कशी थांबवायची हा आजच्या युगाचा सर्वप्रथम आणि अत्यंत निकडीचा प्रश्न आहे. आपले सामाजिक-आर्थिक जीवन आपण भांडवलशाही पद्धतीने का समाजवादी पद्धतीने संघटित करावे या प्रश्नापेक्षाहि या दुसऱ्या प्रश्नाची निकड अधिक आहे. आज अनुभव असे सांगतो की लोक भांडवलशाही आणि समाजवादी दोन्ही प्रकारच्या व्यवस्थांखाली सुसह्य जीवन जगू शकतात. पण आण्विक युगात युद्धे चालू राहिल्यास कोणीच बचावणार नाही.

मागे वळून पाहिले म्हणजे मला असे दिसते की युद्धाच्या प्रश्नावर जेवढी दिशाभूल झाली तेवढी दुसऱ्या कोणत्याही प्रश्नावर समाजवाद्यांची दिशाभूल झालेली नाही. युद्धकालातील अनुभवाने समाजवाद्यांची जी घोर निराशा झाली तिला तोड नाही. भांडवलशाही राष्ट्रातील आर्थिक स्पर्धेतूनच वास्तविक युद्धांचा उद्‌भव होतो या प्रतिपादनावर समाजवादी, साम्यवादी, सर्व रंगांच्या समाजवाद्यांची फार गाढ श्रद्धा होती. या श्रद्धेतून दुसरी एक श्रद्धा निर्माण झाली. भांडवलशाही नष्ट करून सर्व जगात समाजवादाची प्रस्थापना केली की युद्धांचे मूळ कारणच नष्ट होईल आणि मग जागतिक शांतता प्रस्थापित करणे सोपे आहे अशी ही श्रद्धा होती. अलिकडच्या काळातील अनुभवांनंतर या समजुतीवर श्रद्धा ठेवणे अशक्य आहे.

एका प्रमुख समाजवादी समाजाच्या, साम्यवादी रशियाच्या, पंचेचाळीस वर्षांच्या जागतिक राजकारणाचा अनुभव आपल्या गाठीशी आहे. दुसऱ्या एका वृद्ध राष्ट्राच्याहि चौदा वर्षांच्या जागतिक राजकारणाचा आपल्याला अनुभव आहे. आणि या चीनचा प्रयत्न तर अधिक एकांतिक समाजवाद प्रस्थापित करण्याचा आहे. शांतता की युद्ध या प्रश्नावर त्यांची भूमिका काय राहिली आहे. भांडवलशाही राष्ट्रांपेक्षा साम्यवादी राष्ट्रे ही अधिक युद्धखोर आहेत अशी टीका करणाऱ्यांमध्ये मी नाही. लष्करी विजयाच्या मार्गाने रशिया साऱ्या जगात साम्यवाद प्रस्थापित करू इच्छितो हा आरोप चुकीचा आहे असे मला वाटते. एक दिवस सारे जग लाल होणार आहे, ही घटना

अटळ आहे, या गोष्टीवर रशियन साम्यवाद्यांचा विश्वास आहे, आणि, अगदी अलिकडेपर्यंत, युद्ध हे ऐतिहासिक प्रगतीचे एक साधन असू शकते यावर त्यांचा विश्वासहि होता. राज्यकर्त्यांच्या भावना व निष्ठा यांच्यापेक्षा त्यांच्या कृतींना अर्थात् अधिक महत्त्व आहे. शांतता की युद्ध या प्रश्नावर साम्यवादी राष्ट्रांचे रेकॉर्ड हे इतर साऱ्या राष्ट्रांहून चांगलेहि नाही आणि वाईटहि नाही. फिनलंड, हंगेरी, बाल्टिक राष्ट्रे या देशांशी रशियाने आक्रमक, चढेल व्यवहार केला आहे; पण तसाच व्यवहार पाश्चिमात्य राष्ट्रांनीहि गेल्या पंधरावीस वर्षांत इतर काही राष्ट्रांशी केला आहे. उदाहरणच घ्यायचे झाले तर ब्रिटनच्या सुएझवरील हल्ल्याचे घेता येईल.

## शांतता की युद्ध या प्रश्नाचे उत्तर समाजवादात नाहीं

साम्यवादी राष्ट्रांचा व्यवहार हा भांडवलशाही राष्ट्रांहून वेगळा राहिलेला नाही, हा निष्कर्ष माझ्यासारख्या समाजवाद्याच्या मनात खिन्नता व नैराश्य निर्माण करणारा आहे. सर्व समाजांची रचना समाजवादी धर्तीची केल्याने आण्विक युगात जागतिक शांतता टिकविण्याचा प्रश्न सुटणार नाही असा त्यातून निष्कर्ष निघतो. समाजवादी समाज हे एक स्वयंसिद्ध इष्ट ध्येय आहे असे मला वाटते. पण शांतता की युद्ध या प्रश्नाचे उत्तर काही समाजवादात नाही. चीनने नुकतेच भारतावर अगदी निर्लज्ज अक्रमण केले. आता चीन हा साम्यवादी तर भारत हा समाजवादाच्या मार्गावरील एक देश आहे. जागतिक शांतता निर्माण करण्याच्या प्रश्नाला आपण उत्तर शोधून काढले आहे हा दावा यापुढे समाजवाद्यांना करता येणार नाही. साम्यवादी जेव्हा असा दावा करतात तेव्हा ते स्वतःचे हसे करून घेतात.

युद्धाची आर्थिक कारणमीमांसा कुठे चूक होती? आक्रमक युद्धांचा मूळ हेतू आर्थिक लाभ होता असे आजहि मला वाटते. प्राचीन काळात, गुलामांच्या श्रमशक्तीवर आधारित ॲसिरिया, ईजिप्त, रोम आणि त्यांच्यासारख्या इतर साम्राज्यांच्या काळात, परकीय देशांवर आक्रमण करण्यामागे गुलाम जिंकून आणावेत आणि त्यांच्या श्रमशक्तीचा लाभ करून घ्यावा हाच प्रधान हेतू असे. गुलामांना आपल्या देशात नेऊन तेथे त्यांना उत्पादक परिश्रम करायला लावायचे, (रोमन लोक परकीय गुलामांकडून आपली शेती करवून घेत,)

किंवा त्यांचा देश आपल्या राज्याला जोडून या ना त्या प्रकारे त्या देशातली सर्व संपत्ति लुबाडून आपल्या देशात नेत राहणे, असे दोन प्रकार असत.

प्राचीन काळी मानवी श्रमाची उत्पादनक्षमता फार निकृष्ट दर्जाची होती. त्या स्थितीत दुसऱ्यांच्या श्रमावरच काही लोकांना चैनीत राहणे शक्य होत असे. जितके पदरी गुलाम अधिक तितके जीवनमान ऐश्वर्यसंपन्न होऊ शकत असे. आणि गुलामांचा भरपूर पुरवठा करण्याचा परदेशांवर आक्रमण हा एकमेव मार्ग होता. ही प्राचीन काळची गोष्ट झाली. भांडवलशाही राष्ट्रांची साम्राज्यविस्तारार्थ चाललेली युद्धे हे याच आर्थिक शोषणाचे नवे आधुनिक रूप होय अशी समाजवाद्यांची श्रद्धा होती. 'इंपीरिअलिझम्' या आपल्या पुस्तकात लेनिनने आपला युद्धविषयक सिद्धांत मांडला आहे! दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणात भांडवल गुंतविण्यासाठी, व कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या मालाला बाजारपेठ मिळविण्यासाठी भांडवलशाही राष्ट्रांना युद्धाच्या मार्गानेच आपल्या अंकित क्षेत्राचा विस्तार करणे आज शक्य आहे असे लेनिनचे मत होते. असा जर विस्तार ते करीत राहिले नाहीत तर वस्तूंच्या व संचित भांडवलाच्या ढिगाऱ्याखाली ते गुदमरून नष्ट होतील. प्रत्येक मोठ्या भांडवलशाही राष्ट्रात प्रेशर कुकरमध्ये वाफेचे असते तसे विस्ताराच्या दिशेने एक प्रचंड दडपण काम करीत असते आणि कधी ना कधी ते दडपण असह्य होऊन परकीय आक्रमणाच्या व साम्राज्यविस्ताराच्या रूपाने त्याचा प्रस्फोट झाल्याखेरीज रहात नाही अशी लेनिनची शिकवण होती.

## भांडवलशाही राष्ट्रांत युद्ध होणे अटळ नाही

१९१७ साली लेनिनने 'इंपीरिअलिझम्' हे पुस्तक लिहिले. त्यावेळच्या भांडवलशाही राष्ट्रांच्या धोरणांचे व कृत्यांचे विश्लेषण म्हणून लेनिनच्या सिद्धान्तात त्यावेळपुरता तरी सत्याचा थोडा अंश होता असे मला वाटते. कामगार वर्गाचे जीवनमान सतत दरिद्री व निकृष्ट पातळीवर ठेवणाऱ्या भांडवलशाही राष्ट्रांना जगात अन्यत्र स्वतःच्या सत्तेचा विस्तार करण्याखेरीज गत्यंतर नव्हते. बहुसंख्य जनतेच्या दारिद्र्यामुळे स्वतःच्या देशातील बाजारपेठ ही अत्यंत अपुरी पडून भांडवल गुंतवणूक व मालाची विक्री या दोन्ही गोष्टींकरता त्यांना बाहेर आपली दृष्टि वळविणे भागच होते. पण आधुनिक

विद्यमान भांडवलशाही समाजांना हे विश्लेषण लागू पडणार नाही. स्वदेशीय कामगार वर्गांचे जीवनमान भांडवलशाही व्यवस्थेत उंचावले जाऊ शकते आणि तसे ते सतत उंचावले जात आहे याविषयी शंका नाही हे मी पूर्वी दाखवून दिले आहेच. यामुळे स्वदेशात सतत विस्तार पावणारी बाजारपेठ भांडवलशाहीला उपलब्ध झाली असून स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी साम्राज्यविस्ताराची गरज भांडवलशाही राष्ट्रांना उरलेली नाही.

ही शक्यता लेनिनने अजमावलेली होती. कामगार वर्गांचे जीवनमान उंचावत गेले तर हे विस्ताराचे दडपण नाहीसे केले जाऊ शकेल हेहि त्याला तत्त्वतः मान्य होते. पण स्वतःमध्ये अशी सुधारणा करण्याची कुवत भांडवल-शाहीत मुळी असणेच शक्य नाही याविषयी लेनिनला फार पक्की खात्री होती. 'इंपीरिअलिझम्'च्या चौथ्या प्रकरणात लेनिनने असे स्पष्ट म्हटले आहे की जर भांडवलशाहीत कामगारांचे जीवनमान संपन्न होऊ शकले व शेतीचा विकास होत राहिला तर विस्तारासाठी दडपण नाहीसे होईल. तसे झाले म्हणजे भांडवलशाही राष्ट्रामध्ये युद्धाचा भडका उडण्याची परिस्थिति उरणार नाही.

गेल्या वीस वर्षांत भांडवलशाहीने नेमक्या या दोन गोष्टी साधल्या आहेत. भांडवलशाही राष्ट्रांनी शेती उत्पादनात प्रचंड वाढ करण्यात यश मिळविले आहे आणि बहुजन समाजाचे जीवनमानही उंचावले आहे. आणि आजहि त्यात खंड पडलेला नाही. लेनिनच्याच प्रतिपादनाप्रमाणे काटेकोरपणे पाहावयाचे तर या देशातील अर्थव्यवस्था आता भांडवलशाही अर्थव्यवस्था राहिलेल्या नाहीत असे म्हणायला हवे. गेल्या वीस वर्षांत भांडवलशाही अर्थव्यवस्थेत जे बदल व सुधारणा घडून आल्या आहेत त्यामुळे 'भांडवलशाही' हे नाव आधुनिक अर्थव्यवस्थेस लावणे चुकीचे ठरेल असे मत मांडणारे काही अर्थशास्त्रज्ञ आहेत. मला स्वतःला हे म्हणणे पटत नाही. पाश्चिमात्य देशातील अर्थव्यवस्थांचे भांडवलशाही असे वर्गीकरण करणे अर्थपूर्ण व सोयीचे आहे. काही थोडे पण महत्त्वाचे बदल केल्याने, ज्या गोष्टी भांडवलशाही कधी करू शकणार नाही असे लेनिन म्हणाला होता, त्या गोष्टी भांडवल-शाहीला करता आल्या एवढेच फक्त सिद्ध झाले आहे. (भांडवलशाहीच्या वाढीबरोबर कामगारवर्ग अधिकाधिक दरिद्री व विपन्न बनत जाईल या मार्क्सच्या मूळ भाकितापाशी एका निराळ्याच रस्त्याने पुन्हा आपण येऊन

पोहोचलो आहोत हे तुमच्या लक्षात आले असेल. मार्क्सचे हे भाकित खोटे ठरल्याने साम्यवादी सिद्धान्ताची पुढील सारी उभारणीच लंगडी ठरते ).

भांडवलशाही समाजांमध्ये युद्ध होणे अटळ नाही एवढी गोष्ट वरील विवेचनावरून स्पष्ट होते. शांतता कायम टिकवून त्यांची वाढ चालू राहू शकते. याचा अर्थ त्यांचा व्यवहार नेहमीच शांततापूर्ण होईल, वा युद्धाचा भडका उडणारच नाही असे नाही. समाजवादी समाजांना अर्थातच आक्रमण आणि विस्तार यांची अटळ **आवश्यकता** नाही. जनतेचे जीवनमान उंचावण्यसाठी व सर्वसाधारण विकासासाठी ते आपली सर्व शक्ती कामी लावू शकतात. अनुभव मात्र असे सांगतो की, **आवश्यकता** नसली तरी हीहि राष्ट्रे युद्धखोर बनू शकतात. नाहीतर चिनी सैन्य हिमालयाच्या सरहद्दींवर का आहे? कोणत्याहि दृष्टीने पाहिले तरी वास्तविक पहाता चीनने आपल्या शक्तीचा व साधनसंपत्तीचा कणन् कण अंतर्गत विकासाच्या प्रयत्नांवर खर्च करायला हवा आहे. तसे न करता भारतावर आक्रमण करण्यासासाठी चौदा डिव्हिजन्स सैन्य चीनने सरहद्दीवर रवाना केले.

## जगाची अलग अलग राष्ट्रात विभागणी
## हेच युद्धाचे प्रबळ कारण

या सर्व अनुभवावरून असे वाटते की, आम्ही समाजवादी समजत होतो त्यापेक्षा युद्धाची कारणेही अधिक साधी व व्यापक स्वरूपाची आहेत. वेगवेगळ्या सार्वभौम स्वतंत्र राष्ट्रांचे, मग ती राष्ट्रे समाजवादी असोत भांडवलशाही असोत, सरंजामी असोत, अस्तित्वच युद्धाच्या बुडाशी आहे असे दिसते. जगाची विभागणी शे-दीडशे अलग अलग राष्ट्रात झालेली आहे हेच एक युद्धाचे प्रबळ कारण होऊन बसते.

युद्ध हे आर्थिक स्पर्धेतून उद्‌भवते या समजुतीच्या भ्रमनिरासाच्या खोलात मी अशासाठी गेलो की, आज समाजवाद्यांची या गोष्टीवरून जी निराशा झाली आहे ती उद्या लोकशाहीवाद्यांची होऊ नये. हुकूमशाही, सर्वाधिकार-वादी, अनियंत्रित राज्यसत्ता हे युद्धांचे मूळ कारण असून सर्व जगात जर लोकशाही राज्यव्यवस्था प्रस्थापित झाली तर सगळ्या राष्ट्रांचा व्यवहार शांततापूर्ण असेल व मग युद्धे संपुष्टात येतील अशा प्रकारचे प्रतिपादन

लोकशाहीचे पुरस्कर्ते नेहमी करतात. मला असे वाटते की, हाहि एक भ्रमच आहे असे शेवटी सिद्ध होईल. हुकूमशाही व वेगवेगळ्या प्रमाणातील इतर अनियंत्रित राज्यसत्तांच्या मानाने लोकशाही राजवटींची आक्रमणाची प्रवृत्ती कमी असते या गोष्टीवर माझाहि विश्वास आहे. मतदारांना जबाबदार असलेल्या प्रत्येक राजवटीवर आपल्या देशास युद्धात न गुंतविण्याबद्दल एक दडपण अधून मधून तरी फार तीव्र होते. पण लोकशाही राज्ये नेहमीच शांततावादी असतात असे मात्र नाही. उलटपक्षी, असे कालखंड येतात ज्या वेळी लोकशाही राष्ट्रातील जनताच आक्रमक युद्धखोर भूमिका घेण्यास राजवटीला भाग पाडते. गेल्या शंभर वर्षांचा इतिहास घेतलात तर आक्रमक व युद्धखोर लोकशाही राष्ट्रांची उदाहरणे पुष्कळ सापडतील. ब्रिटनच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातच तुम्हाला याची कितीतरी उदाहरणे मिळतील. डाव्या विचारसरणीचे पुष्कळ लोक आज अमेरिकेला आक्रमक व युद्धखोर मानतात. आणि अमेरिका तर जगातली एक अत्यंत प्रभावी व समर्थ लोकशाही आहे. अमेरिकेचे जागतिक राजकारण विशेष आक्रमक वा युद्धखोर आहे असे मला वाटत नाही. पण अमेरिका पूर्ण शांततावादी राजकारणहि करीत नाही माझे मत आहे.

जगातली सर्व राष्ट्रे लोकशाही राष्ट्रे बनली तरी जगात युद्ध होण्याचा संभव कायमच राहणार. फार तर अशा जगाबद्दल आपण इतके म्हणू शकू की, अनियंत्रित हुकूमशाही राष्ट्रांमुळे युद्धाची शक्यता जितकी संभवते त्या मानाने अशा जगात युद्ध होण्याची शक्यता कमी राहील. हे कटु सत्य आपण लक्षात घेतले नाही तर समाजवाद्यांप्रमाणेच उद्या लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनाही घोर निराशा पदरात पाडून घ्यावी लागेल.

तेव्हा लोकशाही जगातही युद्ध होऊ शकेल इथपर्यंत आपण येऊन ठेपलो. यापुढे जाऊन मला असे म्हणायला पाहिजे की, स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्रे अस्तित्वात आहेत तोपर्यंत कधी ना कधी युद्ध उद्‌भवणे अटळ आहे. ते फार तर बरेच पुढे ढकलले जाईल. क्यूबा, बर्लिन, व्हिएटनाम या सारख्या संघर्षांना लोक फार भितात. वस्तुतः या संघर्षातून आण्विक युद्ध होईल आणि साऱ्या जगाचा नाश होईल असे मला वाटत नाही. पण एका संघर्षाची जागा दुसरा संघर्ष घेतो अशी आणीबाणीची परिस्थिती सतत

कायम राहिली तर आज ना उद्या युद्धाचा भडका उडणार नाही याची काही खात्री आहे काय?

## लोकशाही राज्यपद्धतीचा प्रसार होणे एवढेच काही पुरेसे नाही

जगात अराजकाचीच आज परिस्थिती आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या मनाप्रमाणे वागायला सार्वभौम आहे. सार्वभौम राष्ट्रांना दाबात ठेवणारी शक्ती आज कोणती नाही. सार्वभौमत्वाचा अर्थच तो आहे. अराजकाचा स्वतःचा जंगलचा कायदा आहे. अराजकाची परिस्थिती कायम राहिली तर केव्हा ना केव्हा या अराजकातून संघर्ष उद्भवणार, युद्ध होणार ही दगडावरची रेघ आहे.

आण्विक युगात मानवाला स्वतःचे संरक्षण करावयाचे असेल तर जगातली सर्व शे-दीडशे राष्ट्रे लोकशाही झाली एवढ्याने भागणार नाही. माणसाने जागतिक विनाशाची ही भयावह विध्वंसक शस्त्रास्त्रे निर्माण केली नसती तर मग अनेक वेगवेगळ्या सार्वभौम लोकशाही राष्ट्रांचे मिळून बनलेले जग टिकून राहिले असते, सुसह्य झाले असते. अधून मधून युद्ध होत राहिले असते. पण इतिहासात नेहमीच अशी युद्धे होत राहिली आणि तरीही मानवसंस्कृति विनाश पावली नाही. अण्वस्त्रांच्या शोधाने या परिस्थितीत मूलगामी परिवर्तन घडून आले आहे. मानवसंस्कृतीचे रक्षण करावयाचे असल्यास अण्वस्त्रांच्या साहाय्याने होणारे सार्वत्रिक युद्ध झाले तरी चालेल अशी भूमिका आपल्याला घेता येणार नाही.

## लोकशाही विश्वराज्याची आवश्यकता

मानवी जीविताच्या सुरक्षिततेसाठी जगभर सर्वत्र लोकशाही राज्यपद्धतीचाच प्रसार होणे पुरेसे नाही तर जगात एक लोकशाही विश्वराज्य प्रस्थापित व्हावयास हवे. काही दशकांच्या अवधीत जनतेला जबाबदार असे जागतिक सरकार प्रस्थापित करण्यात आपल्याला अपयश आले तर आपण कसे जिवंत राहू शकू मला कळत नाही. जनतेला जबाबदार याचा अर्थ असा की, हे

सरकार निवडून देता आले पाहिजे, तसेच ठराविक मुदतीनंतर ते नाके झाल्यास त्याला पदच्युतहि करता आले पाहिजे. याचाच अर्थ असाहि की, वेगवेगळ्या प्रकारच्या गटांमधून निवड करण्याची संधी जनतेला मिळू शकली पाहिजे. तसेच अधिकारारूढ सरकारवर जनतेला दडपण आणता आले पाहिजे. थोडक्यात देशांतर्गत लोकशाहीची सारी वैशिष्टये आपण पाहिली ती सर्वच्या सर्व विश्वराज्यालाही लागू व्हायला हवीत.

ही काही उद्या होणारी गोष्ट नाही. तुमच्यापैकी काही जण तर म्हणतील की उद्याच काय पण विश्वराज्य कधीच स्थापन होणार नाही. पुढचे खात्री-पूर्वक कोणी सांगावे ? पण विश्वराज्य ही असंभवनीय गोष्ट आहे असे म्हणत असताना खरोखर तुम्ही असेच म्हणत असता की आण्विक युगात मानव जातीचा टिकाव लागणेच अशक्यसे आहे. इथेहि तुम्ही खरे असाल. आण्विक युगात मानवजातीच्या जीविताच्या सुरक्षिततेचे आश्वासन असलेले दुसर कोणते ध्येय, उद्दिष्ट, आशास्थान तुम्ही दाखवून देऊ शकाल काय ? एकतर विश्वराज्य स्थापन होईल नाही तर सर्वनाश. ध्येय फार लांबवरचे आहे किंवा ध्येयाची चढण अत्यंत बिकट आहे म्हणून माणसाने ध्येयनिष्ठ असण्याचे काही सोडलेले नाही.

या विश्वराज्याच्या प्रस्थापनेची प्रक्रिया कोणती, तिच्या पायऱ्या कोणत्या, असे तुम्ही विचारलेत तर मला तुम्हास फारसे काही सांगता येणार नाही. असेहि असेल कदाचित् की जगाचा नाश टाळण्यासाठी लोकशाहीविरोधी मार्गांनीहि प्रारंभी साऱ्या जगाला एकत्र आणावे लागेल. बडी आण्विक राष्ट्रे आपापसात संगनमत करून साऱ्या जगावर एक संयुक्त हुकूमशाही प्रस्थापित करतील अशी शक्यता आहे. अशी हुकूमशाही फार दिवस सह्य ठरणार नाही. विश्वराज्य हे अंतिमतः लोकशाही राज्यच असेल. या विश्वराज्याची राजकीय घटना काय राहील त्याचेहि कल्पनेने चित्र रेखाटण्याचा उपक्रम मला फारसा लाभदायी वाटत नाही. सुरुवातीची पुष्कळ वर्षे राष्ट्रसत्तांच्या पातळीवरील अप्रत्यक्ष निवडणुकांद्वारा जागतिक सरकार निवडले जाईल अशी शक्यता आहे. या राष्ट्रसत्ता या खुल्या प्रौढ मतदानाने निवडलेल्या असतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७४०८

## यूनो संघटना ही विश्वराज्याच्या आकांक्षेचे एक बहुमोल प्रतीक

पण अंतिमतः विश्वराज्याच्या सरकारची निवडहि खुल्या जागतिक मत-दानातूनच व्हावी लागेल. यूनो संघटना ही विश्वराज्याच्या मानवजातीच्या आकांक्षेचे एक बहुमोल प्रतीक मी मानतो. यूनो हे विश्वराज्य आहे असे मला वाटत नाही. विचारविमर्श व विचारांची देवाणघेवाण याकरता असलेले ते व्यासपीठ आहे. ते व्यासपीठ असणे आजच्या परिस्थितीत अत्यावश्यक असले तरी ती एक राज्यसत्ता नव्हे हे विसरता कामा नये. विश्वराज्याची दोन वैशिष्ट्ये असली पाहिजेत : ते जबाबदार असले पाहिजे व त्या राज्याच्या हाती त्या जबाबदारीला शोभेसा अधिकारहि असला पाहिजे. यूनोची घटनाच अशी आहे की यापैकी यूनोजवळ कोणतीच गोष्ट नाही.

विसाव्या शतकातील इतिहासाच्या अनुभवावरून मी असा निष्कर्ष काढतो की भांडवलशाहीपासून साम्यवादापर्यंत अनेक प्रकारच्या अर्थव्यवस्था व्यवहारात शक्य आहेत. अशा भिन्न भिन्न अर्थव्यवस्था असलेली राष्ट्रे अस्तित्वात असू शकतात. कार्यक्षमता, कौशल्य आणि थोडा नशिबाचा हात असला तर या सर्व व्यवस्था समाधानकारकरीत्या काम देतात. समाजवादा-कडे झुकणाऱ्या अर्थव्यवस्था या अधिक यशस्वी व समाधानकारक ठरतात असे व्यक्तिशः मला वाटते. तेव्हा आपल्या देशाची अर्थव्यवस्था कोणत्या प्रकारची आहे त्यापेक्षाहि दुसऱ्या दोन गोष्टींना अधिक महत्त्व प्राप्त होते. आपल्या राष्ट्राचे राजकीय जीवन लोकशाही पद्धतीने आपण संघटित केलेले आहे की नाही ही पहिली महत्त्वाची गोष्ट. दुसरी महत्त्वाची गोष्ट साऱ्या मानवजातीचे एक राज्य बनविण्याचा आपला शोध यशस्वी होतो की नाही ही आहे. स्वतःच्या देशात कोणत्या प्रकारची राज्यव्यवस्था काम करते याला निःसंशय नितांत महत्त्व आहे. कारण आपण असे पाहिले की लोकशाही राज्यव्यवस्थेच्या अभावी अन्याय, अस्थैर्य आणि वेगवेगळी कृत्रिम संकटे यांना द्वार खुले होते. आजच्या आण्विक युगात विश्वराज्य स्थापन करण्याची आपली कुवत किती याचे महत्व याहूनहि अधिक आहे कारण ‘ एक व्हा नाही तर नष्ट व्हा ’ असा अण्वस्त्रांचा मानवाला बोध आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ७३६६० वि: भिवंडी
९६७६ २-३-६९

REFBK-0014408
REFBK-0014408

# समाज प्रबोधन प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक विकासाचा प्रश्न | दे. अ. दामोलकर | १·५० |
| २. | लोकशाहीचा कारभार | सदाशिव आठवले | २·०० |
| ३. | विश्वरचना | ना. वा. कोगेकर | १·२५ |
| ४. | आपला महाराष्ट्र | पन्नालाल सुराणा | २·५० |
| ५. | अपंगत्वावर विजय | उषा मोहनी | २·६० |
| ६. | भारतीय शेती | स. ह. देशपांडे | २·६० |
| ७. | अंतरीक्ष प्रवास | ना. वा. कोगेकर | २·०० |
| ८. | व्यक्तिमत्त्वाचा विकास | ग. वि. अकोलकर | २·६० |
| ९. | राजकीय पक्षांसाठी आचार-संहिता : अहवाल | पन्नालाल सुराणा | ३·५० |
| १०. | लोकमत | सदाशिव आठवले | २·०० |
| ११. | लोकसंख्येचा प्रश्न | ज. शं. आपटे | २·०० |
| १२. | शास्त्रीय विचारपद्धति | अ. भि. शहा | २·६० |
| १३. | कृषि औद्योगिक समाजरचना : अहवाल | | २·६० |
| १४. | उत्क्रांतिवाद | इंदुमती पारीख | १·६० |
| १५. | जीवोत्पत्ति | रा. वी. सोवनी | १·०० |
| १६ | सहकार : तत्त्व आणि व्यवहार | गो. स. कामत | २·०० |
| १७ | विज्ञानाचा समाजधारणेवरील परिणाम | बर्ट्रांड रसेल | ३·०० |
| १८. | आंतरराष्ट्रीय संस्था | अ. रा. कुलकर्णी | २·०० |
| १९. | प्रादेशिक नियोजन | वसंत पळशीकर | १·०० |
| २०. | स्वतंत्र राष्ट्रांचा उदय आणि लोकशाहीचे आव्हान | जॉन स्ट्रॅची | ४·०० |
| * | राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता : संकलित निबंध | | २·०० |
| * | Code of Conduct for Political Parties : A Symposium | | २·०० |

वाचकांचा मार्गदर्शक योजना :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिक्षण | ग. वि. अकोलकर | ०·५० |
| २. | इतिहास | सदाशिव आठवले | ०·५० |
| ३. | समाजकारण | मालतीबाई बेडेकर | ०·५० |
| ४. | विज्ञान | दि. धों. कर्वे | ०·५० |

समाज प्रबोधन संस्था, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे २